म. ग्रं. सं. ठाणे
विषय
ग्रं. क. ९० इतिहास
REFBK-0005607

इतिहास

८५

संदर्भ इतिहास ९७

दा.क्र. ५६०७

हितं मनोहारि च दुर्लभं वचः ।

# मनोहर ग्रंथमाला

प्रकाशन ३ रें

REFBK-0005607

# फ्रेंच राज्यक्रांति

लेखक — न. चिं. केळकर

क्र. ५६०७

[ पुस्तकासंबंधीचे सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन ]

प्रकाशक—
मनोहर महादेव केळकर,
बी. ए.,
१९६।३३, सदाशिव पेठ, पुणें २.

चित्रकार श्री. वसंत महादेव केळकर.

मुद्रक—
भगवान पंढरिनाथ सामण,
मॅनेजर, मॉडर्न प्रिंटिंग प्रेस,
९९९ अ, सदाशिव पेठ, पुणें २.

फ्रेंच राज्यक्रांति

# अनुक्रमणिका


| प्रकरणाचें नांव | | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १–२ |
| १ | लोकस्थितिवर्णन | १ |
| २ | वड्या पार्लमेंटची बैठक | २१ |
| ३ | खुद्द राजधानींत | ३८ |
| ४ | पहिला रक्तपात | ५१ |
| ५ | तीन सभांचें एकीकरण | ५९ |
| ६ | स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ | ६८ |
| ७ | राज्यघटना-मंडळांतील चर्चा | ७९ |
| ८ | राज्यक्रांतीचा दुसरा अंक | ९२ |
| ९ | लष्कराची बेदिली | ९९ |
| १० | नॅशनल फेडरेशन | १०३ |
| ११ | लुई राजाचें पलायन | ११४ |
| १२ | पुढारीपणाची स्पर्धा | १२० |
| १३ | नवें कायदेमंडळ | १२४ |
| १४ | पळपुट्यांची कारवाई | १३० |
| १५ | राजावर बाजू घसरूं लागली | १३७ |
| १६ | लुई राजाचा वध | १५० |
| १७ | कन्व्हेन्शनची कामगिरी | १६० |
| १८ | क्रांतिभारतांतील हत्याकांड | १६८ |
| १९ | फ्रेंच राज्यक्रांतीचा शेवट | १८७ |


ग्रंथ संग्रहालय 90२५0

## परिशिष्ट


| प्रकरणाचें नांव | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ फ्रेंच राज्यक्रांति व खिस्तीधर्म | ... ... | २०७ |
| २ नेपोलियनचें आपल्या मुलांस अखेरचें पत्र | ... | २२१ |
| ३ बास्तीलचा तुरुंग, राणी मेरी अँटोइनेट, संदर्भ ग्रंथसूचि | | २३२–२३३ |
| व्यक्ति आणि विषयांची सूचि महत्त्वाच्या तारखा | ... | २३४–२३५ |


## ग्राहकांशी हितगुज

(१) ' हितं मनोहारि च दुर्लभं वचः ' हें मनोहर–ग्रंथ–मालेचें ध्येय आहे.

(२) मालेला कोठल्याहि मताचें वावडें नाहीं; मात्र सदभिरुचीच्या मर्यादा पाळण्याचा प्रयत्न मनःपूर्वक करण्यांत येईल.

(३) थोर लेखकांचे ग्रंथ मालेतून प्रकाशित होतीलच, पण त्याबरोबरच नवोदित लेखकांच्या वाङ्मयकृतींना मालेंत अवश्य स्थान मिळेल.

(४) यापुढें लघुकथा, कादंबऱ्या, विनोदी लेख, तात्त्विक प्रबंध असें विविध साहित्य प्रसृत करण्यांत येईल.

(५) मालेला आपलें उद्दिष्ट साधण्यास ग्राहकांनीं साहाय्य करावें.

मनोहर महादेव केळकर.

# प्रकाशकाचें पान

आज जरी निरनिराळ्या राष्ट्रांतल्या क्रांतीच्या बातम्या हरघडी ऐकू येत असल्या तरी हिंदुस्थानांत क्रांति या शब्दानें विचार आणि सामाजिक आचार यांतील फरक एवढीच कल्पना कोणाच्याहि डोळ्यासमोर उभी राहते. राजकीय क्रांतीची भाषा वर्तमानपत्रें आणि व्याख्यानें यांतून जरी ऐकू येत असली तरी; ती **क्रान्त्या: कल्पना रम्या,** अशा स्वरूपाची आहे असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. एखाद्या राष्ट्रांत ज्यावेळीं अशी क्रांति खरोखर घडते त्यावेळीं क्रांतिपूर्व, क्रांतिकाळीं व क्रांतीनंतर कशी स्थिती असते याची कांहींशी कल्पना फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास वाचल्यानें वाचकांना येईल. या प्रसंगाचें महत्त्व केवळ फ्रान्सच्या इतिहासांतच आहे असें नव्हे तर, त्याचे परिणाम जागतिक महत्त्वाचे आहेत आणि म्हणूनच त्याला जगाच्या इतिहासांत स्थान आहे.

मूळ इंग्रजींत या प्रसंगावर शेकडों ग्रंथ आहेत आणि हजारों मतमतांतरें आहेत. पण या पुस्तकांत श्री. **नरसिंह चिंतामण** ऊर्फ **तात्यासाहेब केळकर** यानीं आरंभींच म्हटल्याप्रमाणें, या विषयावरील दहावीस प्रमुख ग्रंथांच्या आधारानें क्रांतीचा इतिहास दिलेला आहे व क्रांतीच्या बऱ्यावाईट परिणामाची सामान्य चर्चा केलेली आहे. लेखकानें आरंभींच म्हटल्याप्रमाणें फ्रेंच राज्यक्रांतीसंबंधीं कुठलेंहि मत प्रगट केलेलें नाहीं हे खरें. पण सर्व घटनेचें वर्णन निःपक्षपातीपणें केलेलें असल्यामुळें प्रत्येक सूज्ञ वाचकाला आपापलें मत बनविणें कठीण नाहीं. मनोहरग्रंथमालेच्या आतापर्यंतच्या दोन्ही लेखकांची इच्छा दुसऱ्यावर आपलें मत लादण्याची नसून दुसऱ्याला विचारप्रवण करण्याची आहे आणि या दृष्टीनें त्यांची पद्धत योग्यच आहे असेंच म्हटलें पाहिजे.

या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनेचा रोमांचकारी इतिहास प्रत्येक मराठी वाचकाला मोठा उद्बोधक वाटेल. पूर्वी प्रसिद्ध न केलेला लेख व नेपोलियनचें मुलास शेवटचें पत्र हीं यांतच प्रसिद्ध करून पुस्तक परिपूर्ण करावयाचा प्रयत्न केला आहे. परिच्छेदांना दिलेल्या मथळ्यांचा आणि परिशिष्टांतल्या सूचि-पत्रांचा अभ्यासू वाचकांनादेखील चांगलाच उपयोग होईल.

राज्यक्रांति जलद घडवून आणण्याला कांहीं अंशीं कारण झालेली आणि शेवटीं राज्यक्रांतीला बळी पडलेली राणी मेरी ॲन्टॉइनेट हिचें व राज्यक्रांती-नंतर माजलेल्या अराजकतेचा फायदा घेऊन स्वतः सम्राट् बनलेल्या पण त्या भाग्याला देखील अवघ्या पंधरा वर्षांत आंचवलेल्या नेपोलियनचें अशीं दोन चित्रें या ग्रंथांत दिलीं आहेत.

नेपोलियनचें चित्र व आवरणावरील बास्तिलचें चित्र हीं 'सह्याद्रींतील' व्यंग चित्रांनी मराठी वाचकांना सुपरिचित झालेले श्री. **वसंत केळकर** यांनीं काढून दिलीं आहेत. छपाई व पुस्तक बांधणी यांच्या सुबकतेबद्दल मॉडर्न प्रिंटिंग प्रेसचे मॅनेजर श्री. **भ. पं. सोमण** यांचे व त्यांच्या छापखान्यांतील कुशल कामगारांचे आभार मानले पाहिजेत. श्री. सोमण यांनीं पुस्तक छापून दिलें, एवढेंच नव्हे तर, इतरहि बरीच मदत आपुलकीनें केली आहे त्याबद्दल त्यांचा मी विशेष आभारी आहे.

पुस्तक शक्य तितकें सर्वांगसुंदर करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि वाचकवर्गाकडून त्याला सक्रिय सहानुभूति मिळेल अशी अपेक्षा आहे.

ता. १५।३।३७. } **मनोहर महादेव केळकर.**

१०८८०
क्र. ५६०७

# १ लोकस्थितिवर्णन

**क्रांति हा एक अनर्थच**

सृष्टीच्या भौतिक चरित्रांत महापूर, धरणीकंप, उल्कापात इत्यादि उत्पात होतात. त्यांना 'अनर्थ' असें म्हणतात. पण त्यांनाहि अर्थ असतो. राष्ट्रांच्या राजकीय इतिहासांतहि असेच 'अनर्थ' मधून मधून होतात. आणि त्यांनाहि अर्थ असतो. या दोनहि प्रकारच्या अनर्थांचा अर्थ सामान्य माणसाला कळत नाहीं. पण तत्त्वज्ञानी लोकांना तो कळल्याशिवाय राहत नाही.

'अर्थ' म्हणून जो वर म्हटला त्यांत कार्याचीं मूळ कारणें व नंतरचे परिणाम या दोहोंचाहि समावेश होतो. कारणाशिवाय कार्य उगीच सुखासुखी कसें घडेल? तसेंच जें कार्य दिसण्यांत अनर्थकारक भासतें त्यांतूनहि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष चांगले असे परिणाम कांहीं घडतातच कीं नाहीं?

(अठराव्या शतकाच्या अखेरीस फ्रान्स देशांत एक प्रचंड राज्यक्रांति झाली.) तो अनर्थच ओढवला. पण त्या अनर्थालाहि 'अर्थ' होता. त्याचें यथार्थ वर्णन व तात्त्विक चर्चा करणारीं शेकडों पुस्तकें इंग्रजी भाषेंत आहेत. पण कोणीहि एकानें तीं सर्वच्या सर्व आजवर वाचलेलीं नाहींत व तीं सर्व वाचणें शक्यहि नाहीं. तथापि त्यांतलीं सर्वमान्य अशीं दहा[?]ंच पुस्तकें वाचल्यानें या राज्यक्रांतीची सांगोपांग माहिती मिळूं शकते, व योग्य तो बोध

होऊं शकतो. म्हणून तीं वाचून त्यांचें साररूप तात्पर्य मराठी वाचकांकरितां देण्याचें योजिलें आहे.

हें तात्पर्य देतांना मुख्यतः हकीकत म्हणजे ऐतिहासिक सत्य स्वरूपाच्या अशा मानल्या गेलेल्या गोष्टी देण्याचा विचार आहे, मतप्रतिपादनाच्या भानगडींत फारसें पडण्याचा विचार नाहीं. विश्वसनीय असा पुरावा डोळ्यांपुढे असल्यावर सामान्य बुद्धीच्या वाचकालाहि आपल्या परीने निष्कर्ष काढतां येतो.

**एम्. थायरचें मत**

(फ्रेंच राज्यक्रांतीचा एक इतिहासकार एम्. थायर म्हणतो कीं, "या क्रांतींतील कोणत्या पक्षाला बरें म्हणावें, कोणत्याला वाईट म्हणावें हें ठरविणें फार कठीण आहे. दोघांहिकडे गुणदोषांची वांटणी जाते हें लक्षांत घेतल्यास निःपक्षपातीपणाला मदत होतेच. परंतु मीं आणखी असेंहि करतों कीं, एकदां मनाने राजपक्षाच्या भूमिकेंत शिरून अंतर्मुख होऊन विचार करतों, व नंतर तीच गोष्ट प्रजापक्षाच्या भूमिकेंत मनाने शिरून करतों.") आत्मौपम्याचें जें हें तत्त्व एम्. थायर याने सुचविलें तें बरोबर आहे. राज्यक्रांतीच्या वेळीं व त्यानंतर लगेच जे ग्रंथकार झाले त्यांना विकारवशता टाळतां आली नसेल. पण आतां दीडशें वर्षांनी क्रांतिविषयक उलटसुलट सर्व कांहीं लिहिण्यासारखें तें लिहून झाल्यावर तरी आधुनिक वाचकाला मन निर्विकार ठेवणें शक्य व्हावें.

**निर्विकार दृष्टिकोण**

अशा निर्विकार मनाने फ्रेंचराज्यक्रांतीकडे पाहणाराला हें कबूल करावें लागेल कीं, फ्रान्समध्ये राज्यक्रांति झाली नसती तरच आश्चर्य! या क्रांतींत जे अनेक अत्याचार व अनन्वित प्रकार झाले त्यांची क्रूरता पाहून मन विटतें. आणि स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, या उदार तत्त्वांचेंच का हें प्रदर्शन असें विचारावेसे वाटते! पण हे प्रकार किती थोडा वेळ झाले! आणि उलट पारतंत्र्य, विषमता व जुलूम हीं त्यापूर्वीं

किती शतकें अबाधित चालू होतीं! हें लक्षांत घेतलें म्हणजे क्रांतीला नांवें ठेवणें कठीण होतें.

होणारें टळत नाहीं असें नुसतें ज्योतिषीच म्हणत नाहींत; तर इतिहासकारहि त्याच अर्थाची कबुली देतात. फ्रेंच राज्यक्रांति टळत होती असें प्रत्येक ग्रंथकारानें म्हटले आहे. आणि त्याची कारणेंहि त्यानें दिली आहेत. तो असें म्हणतो कीं, फ्रान्समधील कित्येक वर्गांनीं योग्य वेळीं अवश्य तो समंजसपणा दाखविला असतां तर झाला तो प्रकार झाला नसता. पण हें होणार कसे? फ्रान्सचीच गोष्ट कशाला? जगांतल्या कोणत्या वर्गानें पूर्वी या गोष्टी केल्या? म्हणजे आधीं समंजसपणा दाखविला? आणि दाखविला तरी तो योग्य वेळीं दाखविला? आधीं जाते बुद्धि मग जाते भांडवल. पण ही बुद्धी जाण्याला मूळ कारण स्वार्थाची हाव! कधीं नव्हतें तें मिळविलें तर तें एक असो. पण मिळविलें त्याचा त्याग पुढें केव्हां तरी करावाच लागतो हें माहीत असतां मनुष्य तो आपखुषीनें करीत नाही. मग दुसऱ्यांनी तें बळजोरीनें हिसकावून घ्यावें हें ओघानेंच घडतें.

दुसऱ्याला बळजोरीनें हिसकावून घ्यावेंसें वाटेल असें डबोलें फारस नसणारा एक कनिष्ठ वर्ग प्रत्येक समाजांत असतो. आणि हाच वर्ग संख्येनें सर्वांत मोठा असतो. पण त्याजवळ जें थोडें आहे त्यावरहि जेव्हां वरिष्ठ वर्गाकडून लोभबुद्धीनें आक्रमण होतें तेव्हाच क्रांति घडते. वरिष्ठ वर्गाजवळ आत्मसंरक्षणाची साधनें अधिक प्रबल असतात. त्यामुळें ते प्रतिकाराची पराकाष्ठा करतात. पण संख्याबळ हें शेवटीं यशस्वी ठरतें. शिवाय निःपक्षपातबुद्धीनें या कलहाकडे पाहणाऱ्या न्यायी जगाची सहानुभूति सहजच कनिष्ठ वर्गाकडे असते. यामुळें या कहलांत बहुसंख्य लोकांकडून झालेल्या अत्याचारांना माफी मिळते. आणि शेवटीं निकाल लागतो तो एकंदरीनें न्यायाला

धरून असल्यामुळें जग वरिष्ठांनाच मुख्यतः दोषी ठरवितें. फ्रेंच राज्यक्रांतींत अत्याचारांचा कहर झाला. पण इतिहासकारांनी त्यांना फारसें महत्त्व दिलें नाहीं.

**क्रांति व रक्तपात**

युरोपखंडांत नियंत्रित राजसत्तापद्धतीचा प्रारंभ इंग्लंडने १६८८ सालीं केला; त्याचप्रमाणे लोकमतप्रदर्शक संघ किंवा सोसायट्या यांचा प्रारंभ फ्रान्सने १७८९ त केला. दोहोनीहि घडवून आणली ती क्रांतिच होय. पहिली रक्तपाताशिवाय घडून आली व दुसरी घडून येतांना रक्ताचे पूर वाहिले. म्हणुन दुसरी अत्याचारी व पहिलीला अनत्याचारी असें म्हणतात. पण त्यांत थोडेसें हें लक्षांत घ्यावें लागतें कीं, इंग्लंडमधील १६८८ ची क्रांति शांततेनें पार पडली असली तरी तिची पार्श्वभूमिका १६४८ च्या यादवी युद्धांतील रक्तपातानें रंगविलेली आहे. १६४८ तला इंग्लंडचा राजा पहिला चार्लस आणि १६८८ तला राजा दुसरा जेम्स यांचा स्वभाव सारखाच म्हणजे हट्टी होता. पण चार्लस राजाविरुद्ध प्रजेनें हत्यार उपसून रणांगणावर जय मिळविला व अखेर राजाचा शिरच्छेद केला, ही अवघ्या चाळीस वर्षापूर्वीची हकीगत जेम्सच्या डोळ्यापुढें होती. शिवाय जेम्स हा चार्लसइतका हट्टी असला तरी त्याच्याइतका धैर्यशील नव्हता. यामुळें त्यानें पळ काढून प्राण वांचविला आणि क्रांतीची वाट मोकळी करून दिली. नाहीं तर १६८८ च्या राज्यक्रांतीच्या प्रसंगीहि रक्तपात झाल्याशिवाय राहताना.

**क्रांतिकालीन समाज-रचना**

तात्पर्य, लोभ व स्वार्थलोलुपता प्रमाणाबाहेर गेली म्हणजे राज्यक्रांति ही शांततेनें होऊं शकतच नाहीं. ही गोष्ट जगाच्या इतिहासावरून स्पष्ट होत असल्यानेंच फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास लिहिणारांनीं तदनुषंगिक अत्याचारांकडे दुर्लक्ष करून

सींतून काय निष्पन्न झालें याची तात्त्विक चर्चा करण्यावरच मुख्य भर दिलेला आढळतो. त्यांच्या मतें फ्रेंच राज्यक्रांतीनें एका नव्या युगाचा अवतार करविला. या क्रांतीनें नुसती राज्यपद्धति बदलली असें नसून एकंदर समाज-रचनाच बदलली. म्हणून त्या क्रांतीच्यापूर्वी फ्रान्सची स्थिति काय होती व नंतर ती कशी झाली हें ध्यानांत आणावें लागतें.

**क्रांतिपूर्व चार काल-खंड**

फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वीच्या दोन हजार वर्षांच्या कालावधीचे चार खंड पडतात ते असे: (१) अज्ञानयुग (२) मध्ययुग (३) पुनरुज्जीवन युग (४) अर्वाचीन युग. पहिल्या युगांत फ्रेंच लोक केवळ रानटी स्थितींत होते. रोमन लोकांच्या ताब्यांत गेल्यानें ते परतंत्र झाले, पण रोमन लोकांच्या संस्कृतीचा लाभहि त्यांना कांहीं घडला. पांचव्या शतकांत रोमन लोक फ्रान्समधून गेल्यावर त्यांच्याकडून मिळालेली ही संस्कृतीहि लोपून फिरून अज्ञानाचा अंधःकार माजला. नंतर जर्मनवंशीय शार्लमेन यानें फ्रान्समध्यें बादशाही स्थापली त्याबरोबर फिरून रोमन विद्या व कला यांचा प्रकाश फ्रान्समध्यें पडूं लागला. पण शार्लमेन-नंतर लवकरच तोहि लोपून मध्ययुगाला सुरुवात झाली. या युगांत फ्रँक जर्मन वगैरे लोकांचा रानटीपणा बराचसा गेला होता. परंतु विद्या व कला यांची पूर्वींचीच हीन स्थिति कायम राहिली. तींत प्रगति झाली नाहीं.

**क्रांतीचें खरें कारण**

नंतर पंधराव्या शतकांत 'पुनरुज्जीवन युगा' ला सुरुवात झाली. त्यांत विद्या व कला यांचें पुनरुज्जीवन होऊं लागले, आणि अठराव्या शतकांत म्हणजे राज्यक्रांतीच्या वेळीं तर फ्रान्समध्यें राजकीय वैभव, विद्या, कला व तत्वज्ञान हीं सर्व पुष्कळच उत्कर्षाला पोंचलीं होतीं. परंतु राज्यक्रान्तीचें खरें कारण, एका वाक्यांत सांगावयांचें तर असें कीं, मध्ययुग व पुनरुज्जीवन–युग या दोहोंमध्यें फ्रेंच जन-

तेची जी दुःस्थिति माजली होती व अर्वाचीन युगांतहि (इतर रीतीनें देशाच्या उत्कर्ष होत असतां) जी हटली नाहीं, तिच्यावर या नव्या विद्या, कला व तत्वज्ञान, विशेषतः तत्वज्ञान, यांनीं झगझगीत प्रकाश पाडून आपली सुस्थिति संपादण्याची वासना सामान्य जनतेमध्यें उत्पन्न केली.

**कनिष्ठ वर्गाची असहायता**

या दोन पूर्वयुगांत ज्या ज्या वेळीं प्रबळ व सुसंस्कृत मनाचे राजे फ्रान्स देशांत होऊन गेले त्या त्या वेळीं त्यांनीं दोन गोष्टी चांगल्या केल्या. एक, राजसत्तेचें एकीकरण, व दुसरी, विद्या व कला यांची प्रगति. राजकीय जुलूमजबरदस्ती कमी झाली. परंतु मध्यमवर्ग म्हणजे सरदार, जहागीरदार, धर्माधिकारी यांच्या ताब्यांतील प्रजाजन यांवर होणारा जुलूम थांबला नाहीं. वरून दिसण्यांत देशभर शांतता! पण शांत दिसणाऱ्या समुद्राच्या पोटांत ज्याप्रमाणें गुप्त प्रवाहांची खळबळ, आणि मोठ्या जलचर प्राण्यांनीं लहान जलचर प्राण्यांना खाण्याचा क्रम चालविल्यामुळें माजणारें युद्ध हीं सुरू असतात, त्याप्रमाणें फ्रान्स देशाची व जनतेची स्थिति होती. जेव्हां जेव्हां मध्यवर्ति राजसत्ता दुर्बळ होई त्या त्या वेळीं, या मध्यम वर्गावर दडपण घालणारा कोणी उरला नसल्यानें खालच्या वर्गाच्या जनतेची स्थिति अधिकच दुःसह होई.

दहाव्या शतकांत जर्मन–फ्रँक जातींनीं एकाच फ्रान्स देशांत लहानसहान राष्ट्रें स्थापण्याचा प्रयत्न केला. लष्करी शिस्त व न्याय-मुनसफीची व्यवस्था ढासळली. याचा परिणाम अन्याय बळावला. याला किंचित् उतारा धर्माधिकारी लोकांनीं, प्रथम कांहीं वेळ दिला. तो असा कीं, केवळ ऐहिक सुखाकडे व क्षुद्र स्वार्थाकडे मध्यम वर्गाचें जें लक्ष लागलें होतें तें काढून घेऊन धर्माचाराकडे लागावें असा प्रयत्न त्यांनीं केला. त्यामुळें राजे-रजवाडे, संस्थानिक, सरदार, शिलेदार यांनीं पॅलेस्टाइनची पुण्यभूमि आरब, सारासन लोकांच्या हातून सोडवण्याकरितां धर्मयुद्धाच्या मोहिमेवर जाऊन शौर्य, वीर्य, स्वार्थ-

त्याग इत्यादि सद्गुण प्रकट केले. पण परत आपल्या वतनदारीवर येतांच त्यांना स्वार्थ चिकटला. त्याच शौर्य-धैर्याचा उपयोग आपल्या संस्थानांतील जहागिरींतील लोकांना त्रास देऊन छळ करण्याकडे होऊं लागला. आणि सर्वांत मौज ही कीं, ज्या धर्माधिकाऱ्यानीं, राजे-रजवाड्यांना, जहागीरदारांना तात्पुरते स्वार्थपराङ्मुख करून धर्मयुद्धाच्या मोहिमेवर पाठविलें, तेच स्वतः कालान्तरानें ऐहिक सुखांत व सत्ताधिकारांत मग्न होऊन, त्यांनी स्वतःच्या जहागिरीच काय पण संस्थानेंहि थाटली.

**सरंजामी-पद्धत**

जहागिरीची पद्धत, फ्रान्समध्यें झाली तरी, कशी असेल याची माहिती महाराष्ट्रांतील लोकांस सांगण्याचें कारण नाहीं. ती एके काळीं सर्व जगभर अमलांत आलेलीच आहे. जहागीर ही मूळ विशेष प्रकारच्या पराक्रमाकरितां दिलेली असूनहि पुढें ती भोगणारांनीं तोच पराक्रम व त्या पराक्रमाची साधनें नेहमी सिद्ध किंवा तयार ठेवावी याकरितां ती चालवावयाची असते. पण ती वंशपरंपरेनें चालू राहिल्यास, जहागिरीचें उत्पन्न व जहागिरीच्या मुलखांतील प्रजेवरचा अधिकार हीं कायम राहतात. मात्र पराक्रम, शिस्त व सैन्याची तयारी हीं वंशपरंपरा चालूं शकत नाहींत. आणि न्यायदानाचेहि अधिकार जहागीरदाराकडे असले म्हणजे मग तर जनतेच्या दुःस्थितीला पारावार राहत नाहीं. सरदार, शिलेदार यांना वंशपरंपरा उत्पन्न असलें तरी वाटण्या झाल्यास किती झालें तरी तें थोडेंच असतें. पण बापजाद्यांचा पराक्रम एवढेंच ज्यांचें भांडवल, त्यांनीं मिशांना फुकाचा पीळ भरावा, आळशी बनावें, अपहारबुद्धि ठेवावी, आणि ज्या लोकांशीं सत्तेचा कोणताहि संबंध येत नाहीं अशांवरहि जुलूमजबरदस्ती उगीच करावी, अशी संवय त्यांना लागते.

**'दास' किंवा 'गुलाम'**

उरला वर्ग या खालचा. त्यांना केवळ 'दास' हीच संज्ञा योग्य. हा वर्ग वरच्या वतनदारांच्या आधीन असे. हे वतनदार त्यांच्याकडून असेल नसेल तें लुबाडीत व त्यांना कैदेंतहि ठेवीत. त्यांच्या या जुलमाची दाद वर सहसा कोणी घेत नसे. आतां ही

'दास' संस्था एकट्या फ्रान्समध्येंच होती असें नाहीं. परंतु फ्रान्समध्यें ती कळसाला पोचली होती. अर्वाचीन काळांत हें दास्य नाहीसें होण्याच्या मार्गाला लागलें आहे. त्याचें एक कारण असें कीं, दास म्हटला म्हणजे धन्यानें त्याला थोडीबहुत तरी भाकरी देऊन संभाळलें पाहिजे. पण अशा प्रकारें दासाच्या पोटाला देऊन धनीपणा गाजवण्याचें सामर्थ्य ज्यांच्याजवळ राहिलें नाही त्यांनीं आपण होऊन आपल्या गुलामांना रजा दिली. शिवाय देशांत उद्योगधंदे वाढून मजुरांची गरज भासूं लागली, तेव्हां दास्यांत असलेले लोक खेड्यांतून पळून जाऊन, शहरांत राहून, मजुरी करून, उदर-निर्वाह करूं लागले. त्यांना कायद्याच्या जोरावर परत खेंचून आणणें, त्यांच्या धन्यांना अशक्य झालें व तसें करण्याचें कारणहि दिवसेंदिवस वर सांगितल्याप्रमाणें कमी झालें. पण वतनदाराच्या पोटांतच कायम कुळें या नात्यानें जे लोक शेतीचा धंदा करून राहात त्यांजवरचा वतनदारांचा जुलूम अधिक काळ टिकला. हा दास-वर्ग 'सर्फ' या नांवानें युरोपांत प्रसिद्ध आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या सुमाराला, वर दर्शविलेल्या कारणांनीं, दास वर्गांतील कांहीं भाग स्वतंत्र होत चालला होता. दुसऱ्या कांहींना राजा व सरदार यांच्या कलहांत सरदारांचा पाडाव करण्याच्या बुद्धीनें खुद्द राजाकडून फूस मिळाल्याकारणानें तो सरदार वतनदार वर्गावर उलटी कमान करूं लागला होता. आणि उरलेल्या वर्गाला प्रत्यक्ष कोणी त्राता न भेटला तरी, एकंदरीनें सत्ता व अधिकार यांच्या विरुद्ध तत्ववेत्त्यांची शिकवण सुरू झाल्यामुळें, आत्मसामर्थ्याच्या बळावर उद्धार करण्याची उमेद त्यांना प्राप्त होऊन, त्यांनीं दास्यविमोचनाचा उद्योग स्वतःच आरंभिला.

**समाजाचे चार विभाग**

फ्रेंच समाजाचे स्थूलमानाने चार विभाग होते. राजा, राजदरबार, राजमंडळ, राजपरिवार मिळून एक. दुसरा सरदार, दरकदार, शिलेदार, मोठमोठे जमीनदार यांचा; यांत राजघराण्यांतील लेकवळे, श्रीमंतीने प्रतिष्ठा पावलेले परदेशी रहिवाशी यांचाहि

समावेश होतो. तिसरा समस्त धर्माधिकारी–मंडळ आणि चवथा शेतकरी, व्यापारी, उदमी, कामकरी व अर्धवट गुलामगिरींतील लोक. पैकीं प्रत्यक्ष सत्ता पहिल्या तीन वर्गांत वांटून गेलेली असे. येऊन जाऊन या तीन वरिष्ठ वर्गांचीं भांडणें आपापसांत होत तेव्हां या चवथ्या वर्गाला किंचित् महत्त्व येई. कारण भांडणाऱ्या वर्गांपैकीं एखाद्याला या चवथ्या वर्गाच्या मदतीची अपेक्षा असे. परंतु मदत घेणाऱ्याचें कार्य साधलें किंवा इतर रीतीनें तंटा मिटला म्हणजे फिरून या चवथ्या वर्गाची उपेक्षा पूर्वीप्रमाणेंच सुरूं होई.

**कनिष्ठ वर्गीयांचीं बंडें**

हा चवथा वर्ग स्वतःकरितां भांडणाला सिद्ध होऊन, आपल्या पायावर उभा असा पूर्वी केव्हांच राहिला नाहीं. येऊन जाऊन कोठें कोठें वैतागाच्या चळवळी किंवा सशस्त्र बंडें होत. पण इतिहासकारांनीं नमूद करून ठेवण्याइतक्या महत्त्वाचीं बंडें फार थोडीं झालीं. पैकीं सन १२५४ सालीं धनगर लोकांचें एक बंड झालेलें नमूद आहे. सेंट लुई राजाच्या कारकीर्दींत, तो परमुलखीं असतां, पॅरिसमधील नॉतर देम नामक धर्ममंदिराच्या अधिकाऱ्याने आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून लोकांचा छळ केला तेव्हां लोक उठले. "देवाचा दृष्टांत झाल्यामुळें आपण पॅलेस्टाइनच्या पुण्यभूमीच्या रक्षणार्थ जाणार आहों" असा बहाणा करून त्यांनीं हत्यारांची जुळवाजुळव केली. धर्माधिकाऱ्यांना धाब्यावर बसवून आपलीं धर्मकृत्यें ते आपणच करूं लागले. पण हें बंड लवकरच मोडलें. मात्र सेंट लुई परत आल्यावर त्याच्या मनावर या बंडाचा थोडाबहुत परिणाम होऊन धर्ममंडळाच्या कारभारांत सुधारणा करण्याचें त्यानें कबूल केलें.

त्यानंतर असेंच एक बंड फ्लँडर्स परगण्यांत झालें होतें. त्याचें कारण तेथील सुभेदाराने स्थानिक कारभारासंबंधीं लोकांचे अधिकार काढून घेऊन कामकरी लोकांच्या मजुरीवरहि कर बसविला. तेव्हां बंडवाल्यांनीं बंडाची तयारी

केली, व राजाकडून सैन्य चालून आलें तरी त्याला टक्कर देण्याचा निश्चय करून, एका लढाईंत हजार बाराशें सरकार-शिपाई मारले. सन १३५९ सालीं त्रयथ्या वर्गातील लोकांनीं सरदार-वर्गाविरुद्ध चळवळ केली. "सरदार लोक पदरीं लष्कर संभाळण्याकरितां म्हणून प्रजेनें दिलेल्या करांतील पैसा सरकारी तिजोरींतून घेतात, परंतु लष्कर नीट संभाळीत नाहींत; सरंजाम नीट ठेवीत नाहींत; शौर्यधैर्यादि गुण लोपल्यामुळें ते शत्रूशीं लढतांना टिकाव धरीत नाहीत; समरांगणावरून पळून येतात; व फ्रान्सची बेअब्रू करितात;" अशी सरदार लोकांविरुद्ध त्यांची तक्रार होती. इंग्रज व फ्रेंच यांच्यांतील युद्धांत सरदार लोकांविरुद्ध झालेल्या या तक्रारी बऱ्याचशा अनुभवालाही आल्या. या चळवळीमुळें राजाला सरंजामदारांच्या व्यवस्थेंत लक्ष घालावें लागलें.

सन १३८१ सालीं मिठाच्या करावरून असेंच एक बंड झालें. करवसुलीमध्ये जुलूम होऊं लागला. यामुळें कर वसूल करणाऱ्या कामगारांना अनेक ठिकाणीं ठार मारण्यांत आलें. हें बंड इतकें वाढलें कीं, राजा व राजमंडळ यांना भीतीमुळें राजधानी सोडून पळून जावें लागलें. इंग्लंडमध्यें वॉट टायलरचें बंड याच वेळीं अशाच कारणानीं झालें होतें. या इंग्रज बंडवाल्याच्या मागण्या खालीलप्रमाणें होत्या: "गुलामगिरीची व वेठीची चाल बंद करावी; राजा व सरदार लोक यांनीं सामान्य लोकांकडून सक्तीनें नोकरी न घेतां वाटल्यास कांहीं ठराविक कर घ्यावा, गोरगरीबांना मनास येईल तो उद्योगधंदा करण्याची मोकळीक असावी." परंतु हीं दोन्ही बंडें पुढें मोडलीं, व बंडाची प्रतिक्रिया म्हणून नवीन कर बसवून जुन्याची वसुली सक्तीनें सुरू झाली. यामुळें जनता फिरून हवालदील झाली.

**जुलुमी विषमता**

प्रजेला विषमता भासत होती ती मुख्यतः सरकारी कर देण्यासंबंधानें. कारण "गरिबांतल्या गरीबाला चापून कर द्यावे लागत असतां समाजांत जितकें वर वर जावें तितकी अधिक सूट व कराची माफी," असा प्रकार दिसे! ज्यांपासून सरकारला एक पै

१०४५९



देखील कर मिळत नसे अशा प्रतिष्ठितांची संख्या सुमारें तीन लाख होती. या लोकांच्या पूर्वजांनीं कोणत्या राजाची काय सेवाचाकरी केली असेल ती असो ! ती आज कोणाच्याही स्मरणांत राहण्यासारखी नव्हती. पण त्यांना मिळालेल्या सुटी, सवलती व मोठमोठ्या मिळकती या मात्र इतर लोकांच्या डोळ्यांत सहजत भरत व खुपत. पण याहिपेक्षां जी विशेष जाचक अशी गोष्ट होती ती ही कीं, वरिष्ठ लोक हे स्वतः सरकार देण्यापासून मुक्त असतां कनिष्ठ प्रजेवर त्यांना विशेष प्रकारचे अधिकार गाजवितां येत. याचीं कांहीं उदाहरणें अशीः—

(१) गांवांत इनामदारालाच दारू तयार करण्याचा व विकण्याचा अधिकार असून, शिवाय गांवच्या लोकांनीं त्याच्याचकडून दारू विकत घेतली पाहिजे, अशी सक्ती असे.

(२) इनामदारानें घरीं दळणाच्या चक्क्या ठेविल्या तर गांवकऱ्यांनीं त्याच्याच चक्क्यांवर, तो लावी त्या दरानें, दळण दळून घेतलें पाहिजे अशी सक्ती असे.

(३) गांवच्या हद्दींत कोठें पूल, कोठें नदीवर नाव, कोठें पाणवटा असेल तेथें इनामदाराला टोलनाकीं बसवून दस्तुरी वसूल करण्याची परवानगी असे. गांवांतील विस्तीर्ण गायरानांतून गुरें,झाडाला तोंड न वितां, नुसती वाट चालून गेलीं तरीहि वाटल्यास इनामदाराला दस्तुरी घेतां येई.

(४) इनामदाराच्या घरीं कांहीं कामधाम निघालें तर त्याला गांवचे लोक अगदीं थोड्या मजुरीनें वेठीला धरतां येत; शिवाय कुळें या नात्यानें त्यांनी देण्याचे कर व इतर चाकरी ही वेगळीच.

(५) इनामदाराचें तें कूळ असो वा नसो, गांवांत कोणीं फळझाडें लाविलीं तर त्यांतील हिस्शावर इनामदार बेधडक हक्क सांगे.

(६) गांवांतील शेतांच्या बांध-उरोळ्या दुरुस्त ठेविण्याबद्दल इनामदार खर्चाकरिता म्हणून कर घेई.

(७) शेतकऱ्यानें पीक कापून खळें घातलें म्हणजे दर दहावीस कणसांगणीक एक कणीस उचलून नेण्याचा अधिकार इनामदाराला असे.

कित्येक वेळां या हक्कांच्या बजावणींत इनामदाराचा विशेष फायदा नसतांहि, गांवकऱ्यांना मात्र तो विशेष तोटा वाटण्याचा संभव असे. शिवाय इनामदार गांवीं समक्ष स्वतः राहाते तर त्यांचीं व रयतांची समक्ष गांठ तरी पडती. पण ते आपल्या गांवाला सहसा दर्शनहि द्यावयाचे नाहीत! त्यांचें मुख्य काम राजधानींत किंवा आसपास राहून राजपरिवाराच्या मिरवणुकींत सामील होऊन मिरवावें! हवी तशी चैन, उधळपट्टी करावी! राजांना देणग्या व आहेर देऊन खूष करावें! पदरीं उगीच हत्यारबंद लोक ठेवून कज्जेदलाली करावी! आणि या सर्व कामाला त्यांना लागणारा पैसा त्यांच्या मुखत्यारांनीं, मुनिमांनीं, गांवच्या लोकांकडून जुलुमानें वसूल करून पुरवावा अशी त्यांची कदर असे.

**उपद्रवी धर्मरक्षक**

स्वतःला धर्मरक्षक म्हणविणाऱ्या धर्माधिकाऱ्यांची स्थितिहि अशीच होती. देशांत सुमारें दीड लाख धर्माधिकारी होते. यांपैकीं २५००० अविवाहित मठवासी व ३५००० अविवाहित मठवासिनी असत. बाकीचे गृहस्थाश्रमी असून धर्मपीठांचे अधिकार चालवीत. त्यांचीं अधिकारक्षेत्रें हीं लहानसहान संस्थानेंच होतीं. कोणाचें सालीना उत्पन्न चार लाखांचें, कोणाचें पांच लाखांचें; याच्या उलट कांही देवस्थानांचें उत्पन्न नित्यनैमित्तिक खर्च भागण्याइतकेंहि नसे. या केवळ धर्मसंस्थानांचें उत्पन्न मिळून सुमारें ८-८॥ कोटि कायमचें! याशिवाय भाविक शिष्यवर्गाकडून गुरुदक्षिणा म्हणून तितकेंच उत्पन्न दरसाल

होई. या सर्व उत्पन्नांत राजानें, सरकारनें तोडून दिलेलें असें थोडें. बहुतेक सगळें जनतेकडूनच मिळणारें. शिवाय धर्माधिकाऱ्यांचें आचरण असावें तितकें शुद्ध नाहीं, व त्यांच्या हातून जनतेचें धर्मकार्य घडावें तितकें घडत नाहीं, हा आक्षेप शिल्लक होताच.

अशा साधनसंपन्न, उपद्रवी, निरुपयोगी प्रतिष्ठितांना सरकारदेण्याची माफी!

**लोभमूलानि पापानि**

यामुळें यांच्याविषयीं जनतेच्या मनांत किती असंतोष माजत असेल याची कल्पना सहज करतां येईल. धर्म-भावनेने कोणी कांहीं देतो त्याला ऐच्छिक स्वरूप असावें; पण धर्माधिकारी लोभी बनून, त्यांनीं चालू वहिवाटीचे आधारावर न्यायकोर्टात फिर्यादी करण्या-पर्यंत मजल नेली. अशा दाव्यांची संख्या सन १७८८ सालीं सुमारे चार लक्ष होती! ही विषमता खुद्द धर्माधिकारी-वर्गातील, पण कनिष्ठ प्रतीच्या लोकांना ती दुःसह वाटूं लागली होती आणि या एकाच वर्गात श्रीमंत भिक्षुक व गरीब भिक्षुक असे दोन उपवर्ग बनून, या गरिबांनीं या श्रीमंतांचा मत्सर करावा व कलह माजवावा, ही स्थिती सुरू होती. फ्रान्समध्यें प्रॉटेस्टंट म्हणजे सुधारलेल्या ख्रिस्ती धर्माचे अनुयायी थोडेसे होते; त्यांनीं तर या विषमतेवर झोड उठविलीच होती; पण आज्ञाधारक, धर्मगुरूंना नावें ठेवणें हें पाप मानणारे, कॅथोलिक लोकहि मनांतून या विषमतेला कंटाळलेले होते.

**कडक शिस्त आणि प्रबळ संघटन**

फ्रान्समधील ख्रिस्ती धर्मसंस्थेची संघटना पुरातन व अत्यंत प्रबळ होती. एकवेळ राज्यकाभार ढिला पडेल, पण धर्म-संस्थेची शिस्त ढिली पडणें अशक्य होतें. खेडेगांवांतील क्षुद्र पाद्यापासून रोममधील पोपापर्यंत एकसारखी साखळी जोडलेली असून, राजाचेहि हातीं जो अधिकार नाही तो धर्माधिकाऱ्याच्या हातीं असे. कारण ते इहलोकीं बहिष्काराची शिक्षा देऊन न थांबतां परलोकीं दुर्गतीची शिक्षा देत! रोमन लोक फ्रान्समध्यें शिरले त्यापूर्वी फ्रेंच लोक वृक्ष, पाषाण इत्यादि

अचेतन सृष्ट पदार्थांना देव मानून त्यांची पूजा करीत. ती पूजा ते प्रायः उपाध्यायांच्या हातून करवीत. या उपाध्यायांना 'ड्रुईड' म्हणत. ते स्वाभिमानी व स्वतंत्रताप्रिय असत. रोमन लोक फ्रान्समध्यें राज्यकर्ते झाल्यावर त्यांनीं आपला 'पेगन,' म्हणजे बहुदेवतात्मक धर्म फ्रेंच लोकांवर लादण्याचा प्रयत्न केला. त्याला ड्रुइड लोकांनीं प्रथम जमावाने तोंड दिलें. परंतु तिसऱ्या शतकांत ख्रिस्ती धर्माचा प्रवेश फ्रान्समध्यें झाला. सन ३१२ त कॉन्स्टंटाइन नामक रोमन बादशाहानें ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यापासून त्या धर्माला तेज चढलें. सन ४९६ सालीं फ्रेंच राजा क्लोव्हिस याने ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्याच्या बरोबर तीन हजार दरबारी लोक व योद्धे यांनी धर्मांतर केलें. पुढे शार्लमेन बादशाहाने ख्रिस्ती धर्माचा प्रसार सर्व देशभर केला. नवीन ख्रिस्ती मंदिरांत उपासना व दानधर्म हीं सर्व धर्माधिकाऱ्यांनीं आपल्याच हातीं ठेविल्यामुळें त्यांचें संघटन झालें. त्याला कारभाराचें स्वरूप आलें. यामुळें भाविक लोकांवर धर्माधिकारी-मंडळाची पकड बसत चालली.

**प्राबल्य मात्र अकारण नव्हे**

या धर्माधिकाऱ्यांचा एक गुण त्यांच्या अधिकारस्थापनेला विशेष उपयोगी पडला. तो म्हणजे तत्कालीन सर्व विद्यांचें अर्जन व संवर्धन. या विद्यांमध्यें वैद्यकी आणि ज्योतिष यांचाहि समावेश झाला होता. आणि अशिक्षित, भाविक मनुष्य या विद्यांनीं कसा भारून व मोहून जातो हें आज सुधारणेच्या काळांतहि प्रसिद्धच आहे! राजे लोक झाले तरी दैविक बाबतींत दुबळ्या मनाचे असतात. तेहि धर्माधिकाऱ्यांचे अंकित झाल्यामुळें त्याजकडून धर्माधिकाऱ्यांना पुष्कळच हक्क व सवलती आणि आर्थिक मालमत्ता हीं प्राप्त झालीं. या लोकांना लष्करी नोकरी माफ असे. त्यांना सामान्य लोकांप्रमाणें कर द्यावे लागत नसत. दिवाणी फौजदारी कायद्याच्या कारभारांत त्यांना सामान्य लोकांहून विशेष राखीव हक्क असत. अशा रीतीने धर्माधिकारी-मंडळ हें बहुमानाचें, अधिकाराचें व

सुखाचेंहि स्थान होऊन बसलें. यामुळें बुद्धिमान लोकांना धर्माधिकारी-मंडळांत शिरण्याची आवड उत्पन्न झाली. ती इतकी कीं, कोणाला धर्ममंडळांत घ्यावें, घेऊं नये, या विषयीं नियम करावें लागले. दिसण्यांत एक गोष्ट या लोकांच्या मान्यतेला अनुकूल अशी होती कीं, त्यांना दीक्षा मिळाल्यावर अविवाहित राहून, संसारसुखाचा त्याग करावा लागे. ही दीक्षा जन्मभर संभाळावी असाहि निर्बंध त्यांजवर असे. त्याग व संन्यासव्रत यांची छाप कोणत्याहि समाजावर सहजच पडते. हळूहळू या धर्माधिकाऱ्यांचे संघ बनूं लागले. आणि सांप्रदायिकपणामुळें त्यांचें संघटन सहजच झालें. त्यांचे मठ हे राजवाड्यांसारखे टोलेजंग असत. आणि समाजाच्या दानधर्मामुळें हे वाडे ऐहिक सुखोपभोगांना अवश्य अशा सर्व वस्तूंनी समृद्ध असत.

**राजाची सत्ता व संपत्ति यांशीं स्पर्धा**

सतराव्या अठराव्या शतकाच्या सुमारास धर्ममंडळाची केवळ सत्ताच नव्हे तर संपत्तीहि राजांच्या संपत्तीशीं स्पर्धा करूं लागली. आणि फ्रान्समधील एकंदर जमीनीपैकीं एकपंचमांश इतकी जमीन या धर्ममंडळाच्या मालकीची झाली. या धर्ममंडळांत पोपच्या खालोखाल कार्डिनल, त्याखालीं आर्चबिशप, त्याखालीं आर्च डीकन, बिशप, डीकन, व्हिकर, पॅट्रिआर्क, प्रीस्ट, कॅनन, अॅबट, प्रायर असे एकाखालीं एक दर्जे होते. हें अधिकारी-मंडळ इतकें फैलावल्यावर त्याचा उपद्रव राजापासून रंकापर्यंत सहजच सुरू झाला. राजा झाला तरी तो धर्मदृष्ट्या धर्ममंडळाचा अंकित! त्याचा राज्याभिषेक व मुकुटदान हीं धर्माधिकाऱ्यांकडूनच झाली तर त्यांना पवित्रता व कायदेशीरपणा येई. एखाद्या राजाला आपल्या नावडत्या स्त्रीला सोडचिट्टी द्यावयाची असली किंवा निषिद्ध मानलेल्या नातलगांच्या किंवा इतर वर्गांतील स्त्री ही आपली बायको करून घ्यावीशी वाटली, तर त्याला धर्ममंडळाचें आर्जव करावें लागे. आणि कांहीं कारणानें त्या दोघांमध्यें विरोध उत्पन्न झाला तर त्याला प्रचंड राजकारणाचें स्वरूप येई.

खुद्द राजाची ही गोष्ट झाल्यावर गरीब रयतेला धर्माधिकाऱ्यांपासून किती त्रास होत असेल याची कल्पना कोणीही करावी. या अधिकाऱ्यांनीं दिलेल्या शुभ आशीर्वादाचें फल मिळावयाचें तें परलोकांत ! तें कोणी पाहिलें ? पण त्यानें बहिष्कार घालून एखाद्याचे घरचे धर्मसंस्कार मना केले म्हणजे याला नरकयातना मात्र याच जन्मीं भोगाव्या लागत. विशेष संस्कारांचा प्रसंग नसला तरी, नित्य दानें देण्याघेण्याची चाल इतकी रूढ होऊन बसली कीं, त्याला करपट्टीचें स्वरूप आलें. आणि सामान्य इनामदार, जमीनदार, आपल्या कुळांकडून जितक्या सक्तीनें आपला खंड वसूल करी तितक्याच सक्तीनें हे धर्माधिकारी आपला धार्मिक करहि वसूल करून घेत. शिवाय लोकांकडून पैसे उकळण्याचे नैमित्तिक प्रसंगहि, कांहीं चहाडी लबाडीनें तर कांहीं स्वतः धर्माधिकाऱ्याच्या अभिलाषबुद्धीनें, उत्पन्न होत. त्याचा एक मुख्य प्रकार असा कीं, धर्मश्रद्धेच्या किंवा धर्माचाराच्या लोपाचा अपराध कोणी केला अशी फिर्याद किंवा संशय आला, तर एखाद्या न्यायकोर्टाप्रमाणें धर्ममंडळाच्या अधिकार बजावणीला एकदम सुरुवात होई. जगांत पोलीस लोक गुन्हा हुडकून काढतांना कबुली-जबाब घेण्याकरितां आरोपीचा छळ करतात अशी ख्याती आहे, तीच या धर्ममंडळाचीहि होती. या सर्व कारणांनी सामान्य मनुष्याला धर्माधिकाऱ्यांचा जाच दुस्सह होत होता. तरी वर डोळे करून त्याजकडे पाहणें शक्य नव्हतें; व अशा गोष्टींत हात घालण्याचा अधिकार राजालाहि नाही अशी समजूत होती.

रयतेला जाच दुस्सह झाला.

धर्ममंडळाचा जुलूम कसा होत असे याचें वर्णन एका इतिहासकारानें खालीलप्रमाणें केलें आहे. " या पवित्र संस्थेनें नेमलेले लोक शिकारी कुत्र्या-प्रमाणे जिकडे तिकडे हिंडत. ते आपलें काम फारच गुपचुपपणें व दक्षतेनें करीत. पुष्कळ वेळां तर असें होई कीं, एखाद्या मनुष्यावर मतांतराची तोह-

मत घेणारा महंतच त्याचा न्याय निवडण्यास कचेरीमध्यें स्वतः बसे. मग काय विचारतां! महंत इतके अविचारी व निर्दय असत कीं, आरोपित मनुष्यास आपल्या तर्फेचा पुरावा आणण्यासहि ते संधि देत नसत. आणखी असें कीं, आरोपित मनुष्यास गुन्हेगार ठरविण्यांत ह्या न्यायाधीशांचें मोठें हित असे. कारण गुन्हेगारांची जप्त केलेली सारी संपत्ती त्यांच्या हातीं येत असे; आणि त्यांच्यापुढें मतांतराच्या गुन्ह्यास्तव चौकशीस आणलेले लोक बहुतकरून जे मोठे धनाढ्य तेच असत."

फ्रान्सइतकें इतर कोणत्याहि युरोपियन देशांत पोपचें व रोमन कॅथॉलिक धर्माचें प्रस्थ माजलें नव्हतें. फ्रान्सला 'पोपच्या गादीची सर्वांत वडील वारस मुलगी' असें म्हणत. सुधारलेल्या प्रॉटेस्टंट धर्मपंथाला अखेरपर्यंत फ्रान्समध्यें निव्वळ जगण्यापलीकडे स्थान नव्हतें. मध्यें एक वेळ धर्मसहिष्णुतेचें फर्मान राजाकडून निघालें होतें. पण तेंही पुढें अधिकारी धर्ममंडळानें रद्द करवून घेतलें. सेंट बार्थोलोमो या साधूच्या पुण्यस्मरणाच्या दिवशीं पॅरीसमध्यें एका रात्रींत प्रॉटेस्टंट लोकांची जी भयंकर कत्तल झाली तिचा तपशील माहीत नसणारांनाहि तिचें नांव माहीत असण्याइतकी ती प्रसिद्ध आहे! एका फ्रान्स देशांतच धार्मिक मठांची संख्या सुमारे पांच हजार होती. प्रत्येक मठाकडून, आपल्या क्षेत्रांतील लोकांच्या प्राप्तीचा सहावा अंश, कर म्हणून वसूल करण्यांत येई. त्याबद्दल तसा कायदाच होता. शिवाय भाविक लोक उघड व गुप्त दानें करीत तीं वेगळींच. करांचें व जमिनींचें मिळून पंधरा कोटि उत्पन्न एकंदर धर्ममंडळाला होतें. उत्पन्न लोकांच्या डोळ्यावर येऊं नये म्हणून तें शक्य तितकें लपवून छपवून ठेवण्याचा प्रयत्न धर्ममंडळ करी आणि कोणी त्यावर श्रीमंतीचा आरोप केला तर "आम्ही काय मठवासी लोक; त्याग हाच आमचा धर्म. आणि कोठें कांहीं किडूकमिडूक ठेवलेलें आमच्याजवळ असलेंच तर तें लोकांच्या धार्मिक कल्याणाकरितांच संभाळलेलें आहे हें उत्तर ठरलेलें

असे. पण खून हा जसा उघडकीला आल्याशिवाय रहात नाहीं म्हणतात त्याप्रमाणें ही संपत्ति प्रगट झाल्याशिवाय राहत नसे. कारण कित्येक वरिष्ठ धर्माधिकारी स्वभावानें सुखलोलुप असल्यामुळे, ते आपल्या मठांतून राजांचें ऐश्वर्य थाटीत. नांव देवाचें, पण विलास बुवाचे! यामुळें धर्माधिकाऱ्यांविषयीं पुज्यबुद्धि नष्ट होऊं लागली होती. शिवाय त्यांच्या हातून जे सामाजिक अन्याय घडत त्यांनीं धर्मानें गांजलेल्या गरीब जनतेच्या काळजाला झालेल्या जखमांतून मधून मधून द्वेषाचें मीठ भरलें जाई. यामुळें पुढें क्रांति झाली, तेव्हां धर्ममंडळाच्या मुळावर कुऱ्हाड चालण्यांत आली, व हा खालचा वर्ग जनतेला जाऊन मिळाला. असो.

पंधराव्या शतकांत फ्रेंच जनतेची काय स्थिति होती याचें वर्णन एका तत्कालीन ग्रंथकाराने खालीलप्रमाणें केलें आहे:——

**सामाजिक अन्यायाची भर**

" साध्या मिठावरसुद्धां कर होता. यावरून सर्वसाधारण सरकारी करांची कल्पना होईल. मिठावर कर आणि मीठ विकत घेण्याची सक्ती, असा दुहेरी जाच होता. आणि करवसुलीच्या मिषानें राजसेवकांनीं वाटेल त्यांच्या घरांत शिरावें, वाटेल त्या जिनसांत हात घालून पाहावें, असा धुडगूस घालण्यांत येई. इतर रीतींनिहि अव्यवस्था होतीच. गांवगन्नाचे रस्ते अगदीं खराब. एका जिल्ह्याची दाद दुसऱ्या जिल्ह्याला लागावयाची नाहीं. एका जिल्ह्यांतून दुसऱ्या जिल्ह्यांत व्यापारी माल नेणें आणणें अगदीं कठीण होऊन बसे. अशा रीतीने देशांत अराजक नसतांहि, नुसती अव्यवस्थाच अराजकतेइतकी भयंकर झाली होती. आणि खुद्द राजाचा जुलूम म्हणण्यासारखा नसताहि, समाजांतील वर्गांचाच एकमेकांवर इतका जुलूम होई कीं, त्यापुढें राजाचा जुलूम पुरवला.

" एखाद्या मेंढवाड्यामध्यें सिंह, लांडगे, चित्ते वगैरे हिंस्र पशु शिरून गरीब मेंढरांचा नाश करितात, तसा सरदार लोकांनीं गोरगरिबांचा नाश चालविला होता. राजाकडे भांडण नेलें तर कांहींच जबाब मिळत नसे. मात्र

उलट मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानें, राजाची गरज भागविण्याकरितां, लोकांच्यामागे पैसावसुलीचा तगादा सुरू असे. करवसुलीचा प्रसंग म्हणजे तो बहुधा मारामारीचा किंवा जाळपोळीचा प्रसंग होई. पण अशानें लोकांची स्थिति कायमची सुधारत नसे."

**संघे शक्तिः कलौ युगे**

याला प्रतिकार म्हणून कांहीं धंदेवाले लोकांच्या जुटी किंवा संघ असत. त्यांचें थोडेसें साहाय्य प्रजेला राजाविरुद्ध भांडणाच्या कामीं केव्हां केव्हां होई. प्रथम हे संघ आपल्या व्यापाराचें शत्रूपासून रक्षण करण्याकरितां होते. पुढें त्यांचा उपयोग आपापसांतील व्यवहाराचे नियम करण्याकडे होऊं लागला. अशा रीतीनें वाढत चाललेल्या संघटनेचें भय राजांना वाटूं लागून, असे व्यापारी संघ करण्याला परवानगी पाहिजे असा नियम करण्यांत आला!

याशिवाय सामान्य लोकांनीही सरदार लोकांच्या जुलुमाला आळा घालण्यांकरितां आपापले संघ कोठें कोठें केलेले असत. त्या संघांना 'कॉम्यून्स' असें म्हणत. ही संघांची पद्धत दहा ते चौदा शतकापर्यंत एकसारखी चालू होती. जुलुमानें गांजलेले शेतकरी रानावनांत गुप्तपणें जमून जुलुमाला प्रतिबंध कसा करावा याविषयीं चर्चा व ठराव करीत. कालांतरानें ठिकठिकाणचे हे संघ आपले प्रतिनिधि निवडीत. त्या प्रतिनिधींच्या सभा भरूं लागल्या. संघांतील शिस्त कडक असे, पण ती संभाळली जाई. या शिस्तीमुळें त्यांचें सैन्य वाटेल तेव्हां जमून खडे होई. लोकांपाशीं सरदारांसारखीं चांगलीं हत्यारें नव्हतीं तरी संख्याबळ भरपूर असे.

**संघांची कामगिरी**

या संघाचा कटाक्ष एकट्या सरदार वर्गाविरुद्ध असल्यामुळें, ज्या ज्या वेळीं फ्रेंच राजांना सरदारांचें पारडें हलकें करावेसें वाटे, तेव्हां तेव्हां तेहि या कॉम्यून्सना आश्रय देत. कित्येक धर्माधिकाऱ्यांनीहि याच हेतूनें त्यांना मदत केली. क्रमानें या

कॉम्यून्सना चांगलें स्वरूप आलें. या चळवळीमुळें सामान्य जनतेला आपली योग्यता व हक्क यांची जाणीव उत्पन्न झाली. राज्यामध्यें प्रातिनिधिक संस्था निर्माण होण्यास या कॉम्यून्सचा उपयोग झाला. आणि पुढें राज्यक्रांतीच्या प्रसंगीं तर या कॉम्यून्स संघांनीच देशभर क्रांति पसरविण्याचें काम यशस्वी रीतीनें केलें. सरदार लोकांशी भांडून व त्याचें वर्चस्व कमी करून, त्या कॉम्यून्सनीं प्रथम राजसत्ता प्रबळ होण्याला एक प्रकारें मदतच केली खरी; परंतु स्वतःच्या संघटनेने जें बळ त्यांनीं कमाविलें त्याचा पुरा फायदा त्यांनीं राज्यक्रांतीच्या वेळीं स्वतःला करून घेतला.

## २ बड्या पार्लमेंटची बैठक

राज्यक्रांतीपूर्वी फ्रान्स देशांतील लोकस्थिति कशी होती, आणि या स्थितींत सुधारणा होण्याला कायदेशीर व संघटित साधनांपैकी धंदेवाल्यांचे संघ आणि कॉम्यून्स यांचा किती मर्यादित उपयोग होत असे हें मागील प्रकरणांत सांगितलें. आतां पार्लमेंटस् व स्टेट्स-जनरल ( म्हणजे प्रांतिक व राष्ट्रीय लोकसभा ) यांचा उपयोग किती झाला हें पाहूं.

**लोकसभेचा इतिहास**

राजसत्तेविरुद्ध प्रजेने चळवळ करण्याची एक ठराविक जागा पार्लमेंट म्हणून बहुतेक युरोपियन देशांत पूर्वापार होती. तिला कांहीं अंशीं प्रातिनिधिक स्वरूप असे. पण वस्तुतः राजानें भरविलेल्या 'दरबार' चाच तो एक प्रसंग होय. तशा प्रकारची एक सभा फ्रान्समध्यें चवदाव्या शतकापासून भरत असल्याचा दाखला मिळतो. या सभांचे दोन वर्ग असत. एक 'पार्लमेंट' या नांवाची पण प्रांतिक; व दुसरी 'स्टेट्स जनरल' म्हणजे राष्ट्राची. या सभांचा उगम जितका प्रजेच्या स्वातंत्र्य-बुद्धींत तितका राजे लोकांच्या स्वार्थांतहि होता! फ्रँक लोक प्रथमपासूनच स्वातंत्र्यप्रिय असत. त्यांना जुलमी अमलाचा तिटकारा असे. होतां होईतों निरनिराळ्या टोळ्यांतून सत्ता विभागलेली राही. राजपद म्हणून ते सहसा स्थापूं देत नसत. आणि राजा करणेंच झाला तर आपल्या इच्छेला येईल त्याला करीत. 'लोकनियुक्त राजपदा'ची ही वहिवाट फ्रान्समध्यें फार जुन्याकाळा-

पासून होती. पुढें पुढें 'राजवंश' स्थापित झाले, तथापि प्रत्येक राजाला प्रजेची औपचारिक तरी संमति मिळाल्यावरच राजमुकुट डोक्यावर घालतां येई. तसेंच कायदे करणें व अंमलबजावणी करणें या कामीं कांहीं भाग घेतां यावा म्हणून मधून मधून लोकसभा भरविण्याचा आग्रह प्रजा धरीत असे. या सभांना येणाऱ्या दरबारी लोकांतहि सामान्य जनतेच्या डोक्यावर असलेल्या तीन सामाजिक वर्गांच्या प्रतिनिधींचाच भरणा अधिक असे. शार्लमेनसारखा एखादा राजा प्रबळ असल्यामुळें तो आत्मविश्वासाच्या बळावर, अशा सभा वर्षांतून दोन दोन वेळहि भरवी. पण त्याच्यानंतर जे राजे दुर्बळ निघाले त्यांना आत्मसामर्थ्याचा विश्वास व आधार नसल्यामुळें ते या लोकसभा भरविण्याचें टाळीत. कारण दरबार म्हटला तरी त्यांत थोडीबहुत हक्कांची किंवा गाऱ्हाण्यांची चर्चा होणारच. आणि या चर्चेंत प्रजेचा पक्ष, युक्तिवादांत कां होईना, सरस किंवा सबळ ठरला, तर राजाची मानहानी होण्याचा प्रसंग यावयाचा. शिवाय 'दरबारी' लोकांनींच कां होईना जमावानें कांहीं मागण्या केल्या तर त्यांना सर्वस्वी नकार देणें राजालाहि जड जावयाचें, म्हणून असला कठीण प्रसंगच नको या बुद्धीनें दुर्बळ राजे या सभा सहसा भरवीत नसत. अशा रीतीनें या सभा कित्येक शतकें बंद पडल्या. याच काळांत सरदार लोक शिरजोर झाल्यामुळें राजा व प्रजा यांचा संबंध बराचसा तुटला. यामुळेंहि लोकसभा भरविण्याचें कारण कमी झालें. बऱ्याच वर्षांनीं सन १३०२ मध्यें चवथ्या फिलिफ राजाच्या कारकीर्दींत पहिली स्टेट्स जनरल भरली. यानंतर १३०८ ते १५०१ पर्यंत निरनिराळ्या कालावधीने लोकसभा भरत. पण त्यांतील कामें पाहिलीं तर तीं पुष्कळशीं राजाचा स्वार्थ साधण्याचीं असत. उदाहरणार्थ पोपशीं भांडण जुंपलें तर आपल्या धोरणाला राजाने लोकसभेकडून संमति मिळवावी. सरदार लोकांना राजाने शिस्त लावली तर तिला प्रजेनें संमति द्यावी. नवीन कर बसविण्यास व युद्धाकरितां पैसा खर्चण्यास प्रजेकडून संमति घ्यावी.

**चोर सुटला, आणि संन्यासी—**

सन १७८९ च्या प्रारंभीं फ्रेंच राजा सोळावा लुई यानें अशाच हेतूनें लोकसभेची बैठक भरविली व तेथपासूनच राज्यक्रांतीच्या प्रत्यक्ष इतिहासाला प्रारंभ होतो. कोणताहि राजवंश घेतला तर त्यांत चांगल्यापेक्षां वाईट व्यक्तीच अधिक निर्माण होतात. फ्रान्स-वर पांचचार निरनिराळ्या राजवंशांनीं राज्य केलें. त्यांत शार्लमेन, चवथा हेन्री, असे नांव घेण्यासारखे राजे थोडेच झाले. चवदाव्या लुईसारख्या कांहीं राजांचीं नांवें लोकांच्या तोंडीं आहेत, पण तीं त्यांच्या सद्गुणांपेक्षां व प्रजा-वात्सल्यापेक्षां त्यांच्या वैभवसंपन्नतेच्या कीर्तीमुळेंच आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वीं लागोपाठ गादीवर बसलेल्या दोन राजांपैकीं पंधरावा लुई हा अत्यंत मिजासी, बदफैली व बदमाष असा होता. आणि सोळावा लुई हा भिडस्त, पापभीरू व प्रजावत्सल होता. पण पहिल्याला न भोगावा लागणारा छळ व दुःख हीं दुसऱ्याच्या वाट्याला आलीं. दैवयोग हा असाच कांहीं चमत्कारिक असतो! सोळाव्या लुईच्या अंगीं दोष एकच होता. तो हा कीं, तो बायकोच्या मुठींत असून तिच्या तंत्रानें बेसुमार खर्च करी व राजमंडळांत नालायक लोकांचें प्रस्थ माजूं देई.

**राजाचें औदार्य गरिबांच्या मुळावर**

लुई भिडस्त यामुळें राजपरिवारांतल्या लोकांपैकीं ज्यानें जें मागावें तें त्यानें द्यावें. हजार तर हजार, लाख तर लाख. या लोकांनीं राजाच्या सहीच्या वराता फडणविसावर नेऊन लावाव्या, आणि त्यानें खाका वर करून मोकळी तिजोरी दाखविली म्हणजे त्यांनीं त्याला शिव्या देत उठावें. करवसुलीच्या कामावर पठाणवजा दोन लक्ष निर्दय लोक देशभर वावरत असत. लोकांना वाटे टोळधाड पुरवली पण ही नको. जप्तीवारंटाबरोबर माफीपत्रकांचाहि वर्षाव देशभर होई. मात्र पहिली गरिबांना उखाडायला व दुसरी श्रीमंतांना संभाळायला!

या दोघांहि राजांच्या कारकीर्दींत उत्पन्न कमी व खर्च त्याहून फार अधिक अशी स्थिति पुष्कळ वर्षें चालू राहिल्यानें दिवाळखोरीचा प्रसंग आला

होता. तो टाळण्याकरितां हा नाहीं तो असे अनेक प्रधान ( डी मॉपो, टर्गो, नेकर ) एकामागून एक नेमले गेले. पण केवळ फडणवीशीच्या चतुराईने खनजिनसी पैसा कसा कोठून उत्पन्न होणार ? कर देण्याचें त्राणच प्रजेच्या अंगीं उरलें नव्हतें. रक्त संपलें तरी जळु किंवा गोचीड तोंड फिरवीत नाहीं, या न्यायाने राजा आपल्या फडणविसाकडून करवसुलीच्या नव्या नव्या सूचना मागवीत असे. आणि फडणवीसहि आपलीं डोकीं खाजवून व बुद्धिसर्वस्व खर्च करून कांहीं युक्त्या सुचवीत. पण युक्ती कोणतीहि असली तरी खुद्द प्रजेकडून, या नाहीं त्या उपायानें निदान औपचारिक, संमति मिळविल्या-शिवाय नव्या कराचा एक पैसाहि वसूल होणें शक्य नाहीं हें राजमंत्र्यांना कळून चुकलें होतें.

**वरिष्ठ वर्गाची सभा**

या कार्याकरितां प्रथम वरिष्ठ वर्गाची सभा बोलवावी असा सल्ला फडणवीस कॅलोन यानें सोळाव्या लुई राजाला दिला. त्याप्रमाणें ही ' नोटेबल्स ' ची सभा ता. २२ फेब्रुवारी १७८७ रोजीं भरविण्यांत आली. या सभेचे १४४ सभासद असून तिचे आठ विभाग होते. या सभेपुढें राजमंत्र्याने उदारमतत्वादित्वाचा बाहणा करून, पूर्वी मुख्य प्रधान टर्गो यानें सुचविलेल्या सर्व राजकीय सुधारणा अंमलांत आणण्याचें आश्वासन दिलें. पण नंतर खिशांतला गुलदस्त बाहेर काढून असें सांगितलें कीं, " सुधारणा करण्यालाहि पैसा लागतो. तो यापुढें नवीन मिळ-ण्याचा मार्ग म्हणजे फ्रान्समधील सरसकट जमीन धारण करणारांवर कर बस-विणें हा होय. आणि कर सरसकट बसवावयाचा तर खालच्या वर्गाप्रमाणें वरिष्ठ वर्गानेहि तो आपल्या स्वतःवर बसवून घेण्यास तयार झालें पाहिजे. " हें पिलू बाहेर पडतांच हे बडे दरबारी बुजले व बिथरले. कांहींनी जुन्या करांचा खर्च कसकसा झाला याचे हिशोब मागितले. कांहींनी स्टेट्स-जनरलची, म्हणजे सर्वांत बड्या राष्ट्रीय पार्लमेंटची, बैठक भरल्याशिवाय नवे कर बसवितांच येत

नाहीत अशी कायदेशीर हरकत पुढें मांडली. खुद्द पारिसच्या ( नगर ) पार्लमेंटने या हरकतीस जोराने पाठिंबा दिला. अशा रीतीने ' बड्या दरबारा 'ची ही सभा निष्फळ ठरली. यावर राजाने रागावून एप्रिलमध्ये कॅलोनला बडतर्फ करून त्याचे जागीं ब्रिन्न याची नेमणूक केली. पारिसची पार्लमेंट ही कायमच्या स्वरूपाची संस्था असून अत्यंत बलिष्ठ होती. आणि तिच्या पुढारीपणाने फ्रान्समधील इतर छोट्या बारा प्रांतिक पार्लमेंटांनीहि स्टेट्स–जनरल सभा बोलवावी असा आग्रह धरून तसे ठराव करून वर पाठविले. बरीच झटापट होऊन ' १७९१च्या जानेवारींत मी ही बडी सभा भरवीन ' असें राजाने आश्वासन दिलें. परंतु त्यापूर्वी राजा आपल्या अधिकारांत हुकुमावर हुकूम सोडूं लागला. प्रधान ब्रिन्ने याला पदभ्रष्ट व्हावें लागलें. फिरून एकवार जुना राजमंत्री व फडणवीस नेकर याचीच नेमणूक करणें राजाला भाग पडलें. पण त्यानेहि पारिस पार्लमेंटची सूचना ग्राह्य मानून स्टेट्स–जनरल लवकरच बोलवावयाची शिफारस केली. जुलै १७८८ मध्यें स्टेट्स–जनरलचें जुने दाखले धुंडाळून काढण्यास सुरुवात झाली. कारण पावणेदोनशें वर्षांत ही सभा न भरल्यानें, म्हणजे सहा सात पिढ्या मध्यें गेल्यानें, दप्तरखान्यांत जुन्या दाखल्यांचें संशोधन करणेंच प्राप्त झालें.

स्टेट्स–जनरल भरविण्याचें पर्यवसान कांहीं एका प्रकारच्या क्रांतींत मात्र ( प्रत्यक्ष पुढें झाली त्या प्रकारच्या नव्हे ) होणार हें सर्वांनाच कळून चुकलें होतें. सर्व वर्गांना क्रांति हवीच होती. पण राजाला पायबंद घालावा म्हणून सरदारांना ती हवी होती. सरदारांना दडपण्याकरितां धर्ममंडळाला ती हवी होती. आणि धर्ममंडळाचा नाश करण्याकरितां कनिष्ठ वर्गाला हवी ती होती. एकटा कनिष्ठ वर्ग मात्र असा होता कीं, त्याला बुडवावें म्हणणारा त्याहून खालचा असा वर्गच नव्हता! तथापि जमिनीला टेकलेला भागच म्हणतो " गाडा चालूं लागूं दे " " क्रांति सुरू होऊं दे ! "

सन १७८८ साल संपत आलें. तों एक दिवस (डिसेंबर २७) फ्रान्सचा राजा १६ वा लुई याच्या हातीं एक महत्त्वाचा खलिता आला. त्यावेळचा मुख्य प्रधान नेकर याचा तो होता. त्यांत अशी सूचना केली होती कीं, राजानें 'स्टेट्स-जनरल' लोकसभेची बैठक तातडीनें भरवावी. ही सभा नांवानें पूर्वीपासून फार वर्षें अस्तित्वांत होती तरी तिची प्रत्यक्ष बैठक सन १६१४ पासून पुढें १७५ वर्षें भरली नव्हती! राजाला ही सूचना मोठी चिंता उत्पन्न करणारी झाली. कारण लोकांच्या मनांत असंतोष जागृत झाला होता. त्यांच्या राजभक्तीला उतार लागला होता. आणि लोकसभा भरविली असतां ती काय ठराव करील, काय मागेल, याचा नेम कोणी सांगावा? सर्कशींतील रिंग-मास्तर दहापांच लोखंडी पिंजऱ्यांचीं तोंडें उघडून त्यांतून वाघ सिंह खेळाकरितां बाहेर काढतो. आणि त्यांच्यापुढें आपण एकटाच हातांत नुसता चाबूक घेऊन उभा राहतो. पण हे वाघ सिंह आपल्या डोळ्याच्या धाकांत आहेत व आपण त्यांच्याकडून हवा तो खेळ करवून घेऊन प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवूं असा आत्मविश्वास त्याला असतो. राजा लुई याला हा आत्मविश्वास नव्हता. पूर्वी ज्या ज्या वेळीं लोकसभा बोलावण्याची गोष्ट निघाली होती तेव्हां तेव्हां "ही सभा भरविली असतां लोक काय ठराव करतील याचा नेम नाहीं" असे उद्गार इतर सल्लागारांनीं काढल्यामुळे अखेर ही सभा भरविण्याची कल्पना रहित करण्यांत आली. पण आतां ही बोलावल्यावांचून गत्यंतर नाहीं" असें मुख्य प्रधान नेकर यानेंच राजाला स्पष्ट कळविलें. नेकरला राज्यकारभाराच्या इतर बाबींशीं फारसें कर्तव्य नव्हते. पण तो मुख्य प्रधानाप्रमाणें स्वतःच फडणवीस होता. यामुळें सरकारी खजिना रिकामा पडत चाललेला पाहून काय करावें हें त्याला सुचेना. दिवाळखोरी वांचवावयाची तर जुने कर सक्तीनें वसूल झाले पाहिजेत. कांहीं नवीनहि बसविले पाहिजेत. पण हे जुने नवे कर लोकांच्या खिशांतून

**नेकरचा सल्ला**

द्यावयाचे. यामुळे त्यांना मोठेपणा देऊन आंजरूनगोंजरून, त्यांच्या कांहीं मागण्या कबूल करून, दिलजमाईचा निदान घाट तरी घालून, आपलें काम साधून घ्यावयाचें, तर 'लोकसभा' रीतसर बोलावणें प्राप्त. हा युक्तिवाद राजाला मान्य करणें भाग होतें. शिवाय तत्कालीन लोकमताप्रमाणें पाहतां, राजा लुई हा वृत्तीनें सरळ होता. प्रजेविषयीं त्याच्या मनांत आदर व प्रेम हीं थोडीं बहुत तरी होती. आणि १७५ वर्षे दाराला कुलूप पडलेली लोकसभा आपण फिरून भरविली तर आपली लोकप्रियता वाढेल, आणि लोक मनांतून असंतुष्ट असले तरी सामोपचाराचा हात पुढें करतील, अशी अपेक्षा त्यानें केली असल्यास ती अगदींच चुकीची म्हणतां येणार नाहीं.

**लोकसभेला दोन शतकांनीं आमंत्रण**

अशा रीतीनें अनेक अधिकारी देवतांचा कौल एकाच बाजूस पडल्यामुळे नेकरच्या सूचनेप्रमाणें लोकसभा बोलाविण्याचें राजाने ठरविलें व सन १७८९ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेला तशा अर्थाचा जाहीरनामा प्रसिद्ध करविला. नूतन वर्षारंभाच्या दिवशीं राजाने दिलेल्या या देणगीबद्दल जनतेला किती आनंद झाला असेल याचें वर्णन कोण करणार? जाहीरनाम्याच्या प्रति हजारों लाखोंनीं काढल्या गेल्या तरी त्या कोणाच्या वाटणीलाच येईनात! ज्या कोणाच्या हातीं लागल्या त्या वरचेवर हाताळल्या जाऊन फाटल्या, आणि त्यांवर भावनाप्रधान प्रजाजनांचे आनंदाश्रु पडून त्या ओल्या चिंबहि झाल्या! जवळ जवळ दोन शतकांत न घडलेली गोष्ट! राजाने 'लोकसत्ता' मान्य केली याची ती खूण ना! मग तिचें कौतुक काय वर्णावें! कोणी कृतज्ञतेने तर कोणी आनंदानें नुसते बेहोष होऊन गेले.

**आनंदलेली जनता**

त्यातल्या त्यांत आणखी एक गोष्ट घडली. लोकसभेत पूर्वी लोकप्रतिनिधींच्या म्हणून जितक्या जागा सामान्य जनतेस दिल्या होत्या, त्यांच्या दुप्पट जागा या नव्या लोकसभेच्या प्रसंगाने त्यांना देण्यांत आल्या. यामुळें अमीरउमराव व धर्माधिकारी

वगैरे वरिष्ठ वर्गांच्या बरोबरीने सामान्य जनतेला मान्यता राजाकडून मिळाली हें उघड् झालें. पूर्वानुभवावरून सूत्रचालकांना अशी आशा होती कीं सामान्य जनता, याहि प्रसंगीं, आपले प्रतिनिधी म्हणून वरच्या वर्गांतल्याच लोकांना नेमून देईल. आणि तसें झालें म्हणजे दिसण्यांत उदारपणाच्या उदाहरण होऊन जनतेला फलप्राप्ति कांही होणार नाही ती नाहीच. कुळें मतदार झालीं तरी ती आपल्या इनामदाराला किंवा धन्यालाच निवडून द्यावयाची! नुसती लोकसभा बोलाविली या गोष्टीच्या आनंदांत, या दुसऱ्या गोष्टीची भर पडली. कोणी म्हणाले, "पारतंत्र्याची रात्र संपून स्वातंत्र्याच्या प्रकाशाने दिशा उजळण्याला प्रारंभ झाला खास." दुसरे कोणी म्हणाले, "या राज्याला घटना म्हणून कांही नव्हती, यामुळेंच सर्व कांही बिघडलें होतें. पण आता लोकसभेंत बहुधा तेंच मुख्य काम होणार असावें. एरवीं १७५ वर्षांनंतर सरकार ती कशाला भरवील? आणि एकदा कां राज्याला घटना प्राप्त झाली म्हणजे सर्व तक्रारी आपोआप मिटतील"! वास्तविक 'घटना' या शद्बाचा अर्थ कोणाच्याच मनांत निश्चित असा कांही नव्हतां. आणि जाणत्या अशाहि पांचपन्नास पुढाऱ्यांना "तुम्हांला घटना कशी हवी" असें विचारलें असतें, तर पांचपन्नास निरानिराळींच उत्तरें मिळालीं असतीं. पण घटना म्हणजे बेबंदशाहीला कांही नियमन व नियंत्रण असा स्थूल अर्थ जर कोणाच्याहि मनांत असला तर त्यापुरता तो खराच होता!

**तत्ववेत्त्यांची शिकवण**

यापूर्वी पन्नासपाउणशें वर्षे फ्रान्समध्ये तत्वज्ञानाच्या अनेक अंगांचें वाङ्मय झपाट्याने निर्माण झालें होतें. त्यांत लोकांना मुख्य शिकवण दिली गेली ती ही कीं, कोणत्याहि देशांत, राष्ट्रांत, राज्यांत सत्ता म्हणून जी कांही असते, तिचें मूळ व खरं उगमस्थान त्यांतील जनता हेंच होय. मग ती सत्ता म्हणून कितीहि वळणांनी व्यक्तिमात्राच्या हातीं लागो. सर्वांसमोरून गंगा वाहत असली म्हणजे मग

" माझ्या काटवटींत ती आली नाहीं " अशी तक्रार कोणाला करितां येत नाही. पण " मला प्रत्यक्ष सत्ता किती भोगायला सांपडेल " या विचारापेक्षां आज जो कोणी सत्ता मिळवितो व गाजवितो त्याला स्वतःचा स्वयंभू असा अधिकार मुळीच नाही " हा विचार लोकांपुढें वावरत होता, व त्यांच्या मनांत बिंबविला जात होता. जनतेला नास्तिक वाद पटून " प्रत्यक्ष ईश्वराने आपलें अस्तित्व व अधिकार आपण पुढे येऊन सिद्ध करावा " असें म्हणण्यापर्यंत मजल गेली होती ! मग " राजा झाला तरी त्याच्या हातीं असलेली सत्ता मुळांत जनतेचीच आहे; स्पष्ट नसला तरी गर्भित करार असून ती सत्ता लोकानीं राजाच्या स्वाधीन केली आहे; यामुळें ती मर्यादित करण्याचा किंवा काढून घेण्याचा हक्कहि लोकांना आहे " इत्यादि सिद्धांत प्रिय होऊन राहिले होते. यांत काय नवल ? लोकांच्या मनांतील देवाचें सिंहासन व्हाल्टेअर नामक तत्त्वज्ञाने डळमळीत केलें, तसेंच राजाचें सिंहासन रूसोनामक दुसऱ्या एका तत्त्वज्ञाने डळमळीत केलें होतें. असेच इतरहि अनेक प्रतिभासंपन्न कलमबहाद्दर किंवा ' नर्म लेखक ' पुढें येऊन त्यांनी लोकांच्या मनांतील जुन्यापुराण्या निष्ठेच्या तटांवर आणि बुरुजांवर आपल्या युक्तिवादाच्या पाहारी व कुदळी चालवून, ते बरेचसे उध्वस्त व कांहीं ठिकाणीं तर जमीनदोस्तहि केले होते. देवाप्रमाणें राजाकडे नक्की काय मागावें याविषयीं एकदम नसलें तरी, काय वाटेल तें मागण्याचा त्यांना हक्क तरी आहे, याविषयीं मात्र पूर्ण एकमत होतें. " आद्य राजाने आद्य जनतेशीं केलेला जुना करार सांडला असला, कोठें सांपडत नसला, तर नवा करावा. त्याला हरकत नाहीं. पण या कराराची जाणीव उभय पक्षीं राहिली पाहिजे. विशेषतः राजानें व त्याच्या अधिकाऱ्यांनीं ही जाणीव जागृत ठेवून वागलें पाहिजे "या सिद्धांताच्या भोंवती लोकांची मनें वावरत व रमत होती. म्हणून " आता जी लोकसभा भरणार ती हा जुना करार शोधून काढणार, निदान नवा बनविणार, अर्थात्

प्रचलित अव्यवस्था संपून व्यवस्था लागेल अशी कांहीं राज्यघटना तयार होणार" अशी मोठी आशा लोकांच्या मनांत एकदम उत्पन्न झाली. ज्याच्याकडे पाहावें तो आनंदानें खुललेला व त्याच्या तोंडावर आशा रंगलेली दिसे!

**जनतेचा आशावाद**

नव्या राज्यघटनेंतून खुद्द राजाच काढून टाकण्याची कल्पना लोकांच्या मनाला प्रथम शिवलीहि नव्हती. एक राजा वाईट निघाला तर दुसरा बरा निघतो हा अनुभव त्यांनाहि होता. तसेंच जुन्या काळाकडे लक्ष दिलें तर राजेलोकांनीं निदान उमराव जमीनदार वगैरे वरिष्ठांकडून प्रजेवर होणाऱ्या जुलुमाला आळा घातला होता. राजा जुलमी झाला तरी ती एक व्यक्ति. पण जुलुमी अमीर उमराव जमीनदार व धर्माधिकारी हे देशभर परगण्यानिहाय पसरले होते. त्यांचा जुलूम कमी करून गरीब रयतेला त्यांच्या त्रासांतून सोडवण्याची कामगिरी कांहीं जुन्या राजांनीं केली ती गरीब जनता अद्यापि विसरली नव्हती. यामुळें नव्या घटनेंत "राजा कायम ठेवावा, पण इतर वरिष्ठ म्हणून मिरविणारे आणि विशेष हक्क सांगणारे लब्धप्रतिष्ठित गणंग मोडून काढावे, म्हणजे मग समतां प्रस्थापित होईल; आणि सर्व राष्ट्राच्या शिरावर राजा म्हणून कोणी असला तरी त्या समतेला बिघाड येणार नाहीं" अशी लोकांची समजूत होती. राष्ट्राला जुनी कां होईना पण राज्यघटनाच नाहीं असें म्हणणें अर्थातच कठीण होतें. पण आहे त्या घटनेवरील धुरळा झाडून टाकला असतां तिचें इष्ट स्वरूप प्रकट होईल, अशी भोळी भावना मात्र जनतेची खास होती! देशांतल्या प्रतिष्ठित वरिष्ठांप्रमाणें परशत्रूंनाहि मोडून काढण्याला राजा हवा! त्याच्या तरवारीनें काम दिलें, तसें ती पुढेंहि देईल. राष्ट्रांतील मुख्य अंमलदार व मुख्य न्यायाधीश राजाशिवाय दुसरा कोण होऊं शकणार! याकरितां राजा ठेवून बाकीचे उंचवटे ठीक साफ केले पाहिजेत, इतकाच यावेळीं 'समान'-तेच्या घोषणेचा खरा अर्थ फ्रेंच लोकांच्या मनांत होता. राजाच्या मनांत

सुधारणा करावयाची आली तरी खरोखर दरबारी लोकच त्या कार्याला विघ्न आणतात अशी लोकांची ठाम समजूत होती. राजधानींतल्या जुलमापेक्षां प्रांतानिहाय शहरें व खेडीं यांतील जुलूमच अधिक दुःसह होता. आणि आतां लोकसभा भरणार तींत अमीरउमराव धर्माधिकारी वगैरे सुप्रतिष्ठितांच्या बरोबरीनें अप्रतिष्ठित जनतेला प्रतिनिधींची वांटणी मिळणार, तेव्हां या सभेंत घटना होईल ती लोकांच्या मनासारखीच बहुधा होईल अशी त्यांची अपेक्षा कां नसावी?

असो, लोकसभा बोलावणाऱ्या जाहीरनाम्यांत खालील शब्द होते:—

**राजाचा जाहीरनामा**

"सभा भरविण्याचा राजेसाहेबांचा निश्चय झाला आहे एवढेंच नव्हे, तर ती राजवाड्याच्या जवळच कोठें तरी भरवली जाईल. याचा हेतु, राजाच्या सान्निध्यामुळें सभासदांना मोकळ्या मनानें चर्चा व ठराव करण्याला संकोच वाटावा असा नसून, उलट हेतु इतकाच कीं, ज्याअर्थी राजेसाहेब स्वतःला जनतेचे आप्त मित्र व उत्तम सल्लागार मानतात, त्याअर्थी कोठें कांहीं किल्मिष निघालें, अडलें तर चट्दिशी सल्ला देण्याला घेण्याला राजेसाहेब तितकें जवळ असलेलेच बरें."

राजा स्वतःला अशा रीतीनें जनतेचा मित्र व आप्त म्हणवतो याहून त्याच्या भलेपणाचा अधिक पुरावा कोणता असणार?

सभेच्या जाहीर कार्यक्रमांत खालील कलमें होती:—

(१) कर बसविण्याला स्वतः लोकांची संमति असली पाहिजे. या संमतीचा अधिकार जो पूर्वी होता पण मध्यें बंद पडला होता, तोच फिरून चालू करण्याचा विचार होईल.

(२) लोकसभा यापुढें ठराविक मुदतीनें भरवली जाईल.

(३) सरकारी खर्चाचें अंदाजपत्रक तयार करून लोकांपुढें मांडलें जाईल.

(४) सरकारी खजिन्यांतील पैसा हल्लीं अधिकाऱ्यांना केवळ आपल्या अधिकारानें हवा तसा खर्च करतां येत आहे, त्याला आळा घालण्याचा विचार होईल.

(५) वाटेल त्या व्यक्तीला केवळ बिनजबाबदार अधिकाऱ्यांच्या हुकुमानें पकडून कैदेंत ठेवतां येत होते, तें यापुढें चालणार नाहीं, अशी हमी देण्याचा विचार होईल.

(६) मुद्रणस्वांतत्र्याचा विचार होईल.

(७) प्रांतिक राज्यकारभाराच्या घटनांचा विचार होईल.

(८) कर बसवण्याच्या बाबतींत हल्लीं अमलांत असणारी विषमता काढून टाकून समानता प्रस्थापित करण्याचा विचार केला जाईल.

(९) कांहीं निश्चित, ठरीव, रेखीव, आंखीव अशी राज्यघटना करण्याचा विचार होईल.

**मताधिकार व नेकरची सूचना**

लोकसभा भरल्यावर तिचे ठराव करण्याकरितां प्रतिनिधींचीं मतें घ्यावीं लागतील, तीं कशीं घ्यावी याविषयीं स्पष्ट असा उल्लेख कांहीं नव्हता. पण शिरगणतीनें मतें मोजण्यांत यावीं, अमक्या व्यक्तीला तो वरिष्ठ वर्गाचा म्हणून अधिक मतें व अमक्याला तो कनिष्ठ वर्गाचा म्हणून कमी मतें, असा भेदभाव नसावा अशी सूचना नेकर याच्या रिपोर्टांतच होती. जनतेंत मुख्य तीन घटक होते—(१) अमीरउमरावांचा वरिष्ठ वर्ग, (२) धर्माधिकाऱ्यांचा मध्यम वर्ग व (३) सर्व सामान्य लोकांचा कनिष्ठ वर्ग. पैकीं अमीरउमरावांची संख्या कायम होती. त्यांच्या प्रतिनिधि-संख्येंत वाढ करण्यांत आली नाहीं. पण शिरगणतीनें मतें मोजावयाची तरी प्रत्येक वर्गांत ती गणती वेगवेगळी व्हावी, व त्या वर्गाचा

१०५५०



तेवढा ठराव वेगळा म्हणून जाहीर करावा, हा जुना नियम आतांहि अमलांत राहणार असें दिसलें.

धर्माधिकारी वर्गाच्या प्रतिनिधि–संख्येंत मात्र वाढ झाली होती. लहान गांवें व खेडीं यांतून धर्माधिकारी होते, परंतु त्यांना लोकसभेंत पूर्वी जें स्थान नव्हतें तें या जाहीरनाम्यानें देण्यांत येऊन दुसऱ्या प्रतींत त्यांना घातलें गेलें, यामुळें लोकसभेंतील या वर्गाची संख्या वाढली.

**कनिष्ठ वर्गाचे मतदार वाढले**

तिसऱ्या म्हणजे कनिष्ठ वर्गांत ही वाढ याहून पुष्कळच करण्यांत आली व असें ठरवण्यांत आलें कीं, जो मनुष्य २५ वर्षें वयाचा झाला व कर देण्याच्या यादींत ज्याचें नांव पडलें त्या प्रत्येकाला निवडणुकीचा अधिकार असावा. आणि मतदारांची संख्या अधिक त्या मानाने प्रतिनिधींची संख्याहि अधिक ! अशा रीतीने या कनिष्ठ वर्गांत सुशिशित व अशिक्षित, नागरिक व गांवढळ, सुखवस्तु व कामकरी, कारखानदार व शेतकरी, या सर्वांची गल्लत व्हावयाची होती. या वर्गांतील मताधिकार वाढविण्यांत कोणी फक्त असा हेतु मानीत कीं, “ केवळ मत नसलेल्यांना मत द्यावें ” म्हणजे समानता झाली. पण दुसऱ्या कित्येकांच्या मतें हा हेतु इतका सरळ व न्यायबुद्धीचा नव्हता. तो खरा असा होता कीं, सुशिक्षित नागरिक व सुखवस्तु असे लोक मूठभर, पण तेच असंतुष्ट व चळवळ करणारे असतात व त्रासदायक होतात. म्हणून त्यांच्याहून कमी प्रतीच्या बहुसंख्य लोकांना मताधिकार दिला म्हणजे ते यांना खाऊन टाकतील. शिवाय “ अशिक्षित हा सुशिक्षितांपेक्षां अधिक सद्‌गुणी व भला असतो, राज्याच्या स्थिरतेचा आधार तोच होऊं शकतो ” म्हणून त्याला वाढवून बलिष्ठ करणें यांत देशहित व न्यायबुद्धि दोन्ही सहज साधतात, असाहि बहाणा व मखलाशी करतां येण्यासारखी होती. आणि हा दुसरा तर्क अगदीच खोटा असेल असें म्हणवत नाहीं.

यानंतर प्राथमिक निवडणुकी झाल्या त्यांत फारच गोंधळ माजला. तें

**डाव टाकला पण हुकला**

सगळेंच काम नवें होतें. पावणेदोनशें वर्षे गेल्यानें कोणतीहि रीति किंवा पद्धति सहजच विसरली जाते. राष्ट्रांतील सगळ्या जनतेचें मत अर्थातच शेंकडों निरनिराळ्या ठिकाणीं घ्यावें लागतें. पण फिरून तेंहि हप्त्या हप्त्याने घेण्यांत आलें. निवडणुकीचा कारभार ज्याच्या हातीं ते लहान सहान अधिकारी सरकारनेच नेमिलेले होते. पण खेड्यापाड्यांतून निवडणुकी सुरू झाल्यावर त्यांचें काम नियमाप्रमाणें होतें कीं नाहीं, यावर योग्य देखरेख कशी राहाणार ? ही देखरेख करणारे अधिकारी आपण नेमलेले म्हणून ते आपले हित पाहतील अशी सरकारची अपेक्षा. त्यांना अधिकारपत्रें दिलीं त्यांत असें लिहिलें होतें कीं, "त्यांनीं निवडणुकीच्या कामीं कोणालाहि पक्षपात करूं नये." पण प्रत्यक्ष असें घडलें कीं, या अधिकाऱ्यांनी अखेर स्थानिक लोकमताच्या जोराला मान लवविली. साठ परगण्यांपैकीं अवघ्या तीन परगण्यांत सरकारने नेमलेले अध्यक्ष मान्य करण्यांत आले. बाकी लोकपक्षीय निवडले गेले. "आम्हा मतदारांची सभा तर, अध्यक्ष आमचाच कां नको ? सरकारी काय म्हणून ?" आणि लोकमत म्हटलें म्हणजे त्यांत तीव्र स्वभावाचे चळवळे, बोलके खटपटे, कारस्थानी, अशा लोकांचा भरणा अधिक असावयाचा· तसा होऊन, उद्यां लोकसभेंत लोकांची बाजू राजापेक्षा अधिक घेतील असेच लोक निवडून आले. जेथे राजपक्षाचे थोडे-बहुत चालले तेथेहि लोक निवडून आले ते राज्यकारभारांत पुष्कळच सुधारणा झाल्या पाहिजेत या मताचे. मात्र या निवडणुकी आश्चर्यकारक शांततेनें पार पडल्या. पॅरिसमध्यें फक्त एकाच ठिकाणीं दंगा झाला व तो बास्तिल तुरुंगा-समोरच ! दंग्याच्या सबबीवर स्टेट्स–जनरलची बैठक आयती पुढे ढकलतां येईल अशी सरकारची आशा होती; पण आपल्या शांत स्वभावाने लोकांनी ती आशा विफल केली.

लोकसभेचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील तीन महिन्यांत

**वरिष्ठाविषयीं तीव्र द्वेष**

निवडणुकी झाल्या त्याबरोबर लोकसभेंत मांडण्याच्या लोकांच्या तक्रारी–अर्जांचे मसूदेहि तयार झाले. कारण जाहीरनाम्यांत प्रतिनिधी निवडण्याच्या सूचनेबरोबरच, त्या प्रतिनिधींच्या हातीं तक्रारी अर्ज देऊन पाठवावे अशीहि सूचना करण्यांत आली होती. निवडणुकींप्रमाणें हे अर्ज तयार करण्याचे कामीं सरकारने उघडपणें खटपट केली नाही. पण आपल्या हस्तकांकडून ती गुप्तपणें केल्याशिवाय सोडिली नाही. याकरितां लागणाऱ्या खर्चाचीहि सरकारने खाजगी रीतीनें तरतूद केली होती ! यामुळें सर्व तऱ्हेचे तक्रार–अर्ज तयार झाले–म्हणजे कांही सरकारविरुद्ध तर कांही प्रतिष्ठित व मध्यम वर्गाविरुद्ध ! याचें कारण असें कीं, सरकारला लोकसभेकडून जो अधिक पैसा हवा होता तो जड बुडाच्या प्रतिष्ठित वर्गाकडून काढला तरच यापुढे मिळणार होता. याकरितां परस्पर लोकांकडूनच या वर्गाविरुद्ध तक्रार करविली तर ती शोभणारी असून, त्यायोगें सरकारचेंहि परस्पर कार्य साधणारें होतें. तक्रारी–अर्जांत समानतेची स्थूल मागणी करण्यावर लोकांचें बहुतेक समाधान झालें ! पण सरकाराचें पाहाणें असें कीं, कनिष्ठांच्या बरोबरीनें वरिष्ठांकडून कर वसूल केले म्हणजे सरकारचा खजिना भरेल ! या वरिष्ठ वर्गाविषयींचा द्वेष इतका पसरला होता कीं, कित्येक तक्रारी अर्जांत, वरिष्ठांवर कर बसविण्याच्या ईर्षेत, गरिबांवरचे कर कमी व्हावे हें मागण्याचेंहि कांही लोक विसरले ! आपणाला अपशकुन झाला तरी चालेल, पण या वरिष्ठांचें नाक कापावें, हीच बुद्धि या अर्जांत प्रमुख होती.

अमीरउमराव, धर्माधिकारी वर्ग, व सामान्य प्रजाजन यांच्या कांही कांही मागण्या अर्थात् वेगवेगळ्या होत्या. राज्यकारभारांत सुधारणा व्हावी असें सर्वांनाच वाटत असल्यामुळें, ज्याला ज्या सूचना तोंडाला आल्या त्या

त्यांनीं अर्जांत लिहून टाकल्या. पण पुष्कळ तक्रारीअर्जांत अर्जदारांचें अज्ञानच प्रगट झालें. " वरहि वरावयास पाहिजे. " ही उक्ती खरी ठरली. आपलें कांही तरी दुखतें खुपते असें मन सांगत असलें तरी तें काय हें नक्की कळत नाही, व कळलें तरी स्पष्ट करून मांडतां येत नाही, यामुळें पुष्कळ लोकांनी आपला गांवढळपणा अर्जांतून प्रगट केला. ' समानता ' हा शब्द लोकांचा तोंडपाठ झाला होता यामुळें, समानतेच्या तपशीलवार मागण्या करणाऱ्या कित्येकांनीं स्वतःला हास्यास्पद करून घेतलें !

**अर्जांचें अजीर्ण**

तात्पर्य, चांगल्याबरोबर वाईट अर्जांचींहि भेंडोळींच्या भेंडोळीं तयार झालीं. या भेंडोळ्यांची वाट काय लागणार हें शहाण्या लोकांना दिसतच होतें. पण तक्रारी करण्याची वेळ आयती आली ती व्यर्थ घालविणें हें बरोबर नाही अशा बुद्धीनें शहाण्या लोकांनीहि काय मिळेल तें मिळेल, साधेल तें साधेल, असें म्हणून तक्रार अर्ज करण्या करविण्यांत फार उत्साह प्रगट केला. तक्रार अर्जांचा मसुदा मंजूर करण्याकरितां जेथें सभा भरली नाहीं असा एकहि गांव फ्रान्समध्यें राहिला नाहीं. आणि या सभांकरितां देवळें, बाजार व वेळीं स्मशानभूमि यांचाहि उपयोग करण्यांत आला. हा अर्जांचीं सर्व भेंडोळीं जशींच्या तशीं नऊन राजापुढें गुदरावयाचीं तर त्याला अनेक लमाणांचे तांडे लावावे लागले असते. म्हणून योजना अशी केली होती कीं, लहान गांवांतून हे अर्ज मोठ्या गांवांत जावे; तेथें त्यावरच्या सह्या मोजून मुद्द्यांचें टिपण केलें जावें; आणि अशाच रीतीने वर वर जातां जातां संक्षेप होऊन दाखल करितां येतील, वाचतां येतील, इतकेच अर्ज अखेर शिल्लक राहावे. मात्र निवडणुकींत निवडलेल्या प्रतिनिधींच्या खिशांत एक एक अर्ज राहावयाचा व त्याबरहुकूम त्याने लोकसभेंत मागणी करावयाची असें ठरलें होतं. किंबहुना या प्रतिनिधींनी त्यांजवर सोपविलेल्या कामांत कांही कसूर करूं नये व आपल्या पदरचें भलतेंच कांही सांगू नये, अशी त्यांजवर कदर ( मँडेट ) ठेवण्यांत आली होती.

**प्रतिनिधींचे प्रेक्षणीय नमुने**

तक्रारी अर्जांतील मागण्यांप्रमाणें निवडणुकींत निवडलेल्या प्रतिनिधीं-मध्येंहि सर्व प्रकारचे नमुने होते. कोणी केवळ देशभक्ति-प्रेरित, तर कोणी राजधानीला जाऊन स्वतःचा कांहीं स्वार्थ साधूं पहाणारे ! कोणी जहाल व तापट; तर कोणी आळशी व अनास्थे-वाईक ! कांहीं प्रतिनिधि स्वतःच्या तेजानें प्रखर, तर कांहीं लोकमताच्या पाठ-बळानें प्रबळ झालेले असे होते. लोकसभेच्या पुढील इतिहासांत या सर्वांचे गुणावगुण चांगलेच प्रत्ययास आले; म्हणजे कित्येकांनीं आपल्या देशभक्तीची व श्रमसायासाची कमाल केली, तर कित्येक राजदरबारच्या मोहाला बळी पडून त्यांनीं संधि येईल त्याप्रमाणें उलटसुलट उड्या मारल्या.

अखेर अशा रीतीने सुमारें १३०० प्रतिनिधि स्टेट्स–जनरल सभेच्या बैठकीकरितां राजधानीला जाऊन पोहोचले. त्यांत बहुतेक सर्व धंद्याचे लोक होते. धर्माधिकारी, वकील, डॉक्टर, अमीर उमराव, शेतकरी यांचे त्या काळांतील पोषाक किती विचित्र असतील, आणि राजधानीच्या रस्त्यांतून त्या दिवसांत किती विचित्र देखावे लोकांना पहावयास सांपडले असतील, याची सहज कल्पना होईल. त्यांना पाहून राजदरबारच्या कांहीं लोकांनीं मनांतून त्यांची थट्टा चालविली होती. त्यांचे वेष पाहून तर ते हसतच. पण अखेर त्यांचा हा सर्व खटाटोप व्यर्थ जाणार व त्यांची फजिती होणार या कल्पनेने तर त्यांना विशेष हसूं येत होतें. एकमेकांशीं कानगोष्टी करून ते म्हणत, “ आले लेकाचे मोठे लोक-प्रतिनिधि म्हणून मिरवीत ! काय त्यांचा दिमाख ! काय आढ्यता ! पण यांना राजदरबारांत विचारतो आहे कोण ? सरकार यांच्या तोंडाला येथे पानें पुसणार आणि हे हात हालवीत परत गांवीं गेले म्हणजे तेथे आपल्या मतदारांकडून खेटरें खाणार ! राजदरबारचे लोक मुत्सद्दी खरे. त्यांनीं लोकसभेचा हा नवा खेळ आपल्या नुसत्या फायद्याकरितांच नव्हे तर करमणुकीकरितांहि उभा केलेला दिसतो. ”

# ३ खुद्द राजधानींत

येथून पुढें स्टेट्स–जनरल लोकसभेंत काय घडलें व या लोकसभेंत जागच्या जागीं क्रांती कशी निर्माण झाली हें सांगावयाचें. पण ती हकीकत सांगण्याला एकदां सुरवात झाली म्हणजे तींत खंड पडणें ठीक होणार नाहीं. यामुळें तत्पूर्वी या लोकसभेबाहेर फ्रान्स देशांत पण मुख्यतः पारिसच्या राजधानींत, या क्रान्तीला पोषक व उत्तेजक अशा घटना व चळवळी कोणत्या चालू होत्या हें एकवार एकत्र सांगून टाकतों. क्रान्तीच्या पुढील इतिहासक्रमांत या घटनांचा व चळवळीचा संबंध मधून मधून आलेला ठिकठिकाणीं व्यक्त होईल.

**कथानुसंधान**

चौदाव्या लुई राजाच्या कारकीर्दींत फ्रान्समधील सर्व प्रकारचे महत्वाकांक्षी व राष्ट्रभक्त लोक निरनिराळ्या कारणांनी पारिसमध्यें एकलित होत होते. वाङ्मयशास्त्र व राजकारण या क्षेत्रांत कोणालाही यश व कीर्ति मिळवावयाची तर पारिसला जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. चौदाव्या लुईचें घातक जुलमी राजकारण व पंधराव्या लुईची सर्वांगीण बदमाषी याविरुद्ध तेव्हांही पारिसमध्यें शेकडो जळजळीत हस्तपत्रकें तयार होत; पण राजदंडाच्या भीतिमुळें तीं फ्रान्स देशाबाहेर युरोपखंडांतील अनेक राष्ट्रांच्या राजधानींत निनावी प्रसिद्ध केली जात.

वाङ्मय व साहित्य यांच्या बाबतींत पारिस हें सर्व युरोप खंडांत अग्रगण्य मानलें जाई. इतर देशांत केवळ त्याचें अन्धानुकरण होई. "गर्जेल तो पडेल काय" या न्यायाप्रमाणें "लिहील तो करील काय" हाहि न्याय चौदाव्या लुईला खरा वाटून त्यानें जाणूनबुजून वाङ्मयप्रचाराला उदार आश्रय दिला होता! 'लेखक खंदे पण राजाचे बंदे.' असा प्रकार घडावा अशी दरबारची अटकळ विश्वकोशकार–मंडळ (एनसायक्लोपिडिस्ट्स) हा त्या काळच्या विद्वान लोकांचा आदिमठ व उत्कृष्ट नमुना. यांच्या ग्रंथांनीं भौतिक ज्ञान पुष्कळच पसरलें. तसेंच राजकारणाचेंहि, पण तें प्रायः तात्विक. त्यांनीं व्यावहारिक राजकारण लिहिलें तरी इतर देशांचें. प्राचीनांतील ग्रीस इटाली या राष्ट्रांचे, राजकीय इतिहास, व अर्वाचीनांतील इंग्लंडचा राज्यकारभार, याविषयीं ते लिहीत. पण घरच्या फ्रान्सच्या राज्यकारभाराला मात्र ते बगल देत. अर्थशास्त्री तर असें उघड लिहीत कीं, "राजशासित राज्यपद्धति हीच राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला अत्यंत अनुकूल ठरते." पण ज्ञानकोश–मंडळाचे ग्रंथ वाचूनच विद्वान झालेल्या तरुण पिढीला जेव्हां आपल्या ज्ञानाचा प्रात्यक्षिक उपयोग करण्याची इच्छा झाली, राजकारणाची उदात्त तत्त्वें खुद्द फ्रान्सच्या विद्यमान लोकस्थितीला लावून पाहावीं असें त्यांच्या मनानें घेतलें, तेव्हां आमूलाग्र क्रांतीशिवाय गत्यंतर नाहीं असेंच त्यांना दिसून आलें!

**क्रांतिपूर्व वाङ्मय**

लोकसभेच्या बैठकीच्या जाहिरनाम्याबरोबर निनांवी हस्तपत्रकें व चोपड्या बंद पडून वर्तमानपत्रें सुरू झालीं. लिंग्वे यानें अघाडी मारून लोकांचें लक्ष वेधलें. कारण तो स्वतः बास्तिलच्या तुरुंगांत कांहीं दिवस कैदी म्हणून होता. आणि आपल्या वर्तमानपत्रांत या तुरुंगांतील हकीकती तो छापूं लागला. त्यावर वाचकांच्या उड्या पडूं लागल्या. मात्र त्याच्या लिहिण्यांत क्रांतीचा विधायक कार्यक्रम असा

**पत्रपंडिताचें युग**

कांहीं नव्हता. हळूहळू छापखाने, प्रकाशक व पुस्तकविक्रे यांच्या धंद्याला तेजी येऊं लागली. पानकोक याने एक वर्तमानपत्र राजपक्षाचें व दुसरें प्रजापक्षाचें काढून व एकमेकांवर टीकेचा भडिमार करून दोनहि पक्षांचे वाचक काबीज करून खूप पैसा मिळविला! लेजे याचा छापखाना म्हणजे तो एक राजकारणाचा मोठा अड्डाच बनला. त्याच्या बायकोवरील प्रेमामुळे लोकपक्षाचा अग्रगण्य पुढारी मिराबो याची बैठक या छापखान्यांत रात्रंदिवस पडे. मिराबो, व्हालने, बारे हे संपादक असून लोकसभेचे सभासद होते. मिरोबाचे नांव मोठे, यामुळें अनेक लेखक आपले लेख त्याच्या परवानगीनें त्याच्या नांवावर छापीत! व्हालने याचा छापखाना व संपादकीय कचेरी ज्या वाड्यांत होती तो भयाण असून त्यांत भुतें वावरतात अशी समजूत असे. एवढ्यामुळेंच त्याच्या वर्तमानपत्राला वाचक फार मिळत. कारण त्यांतील मतांना अदृश्य सृष्टींतील आत्म्यांचा आधार असून, त्या मतांच्या पोटीं खरीं भविष्यें असणार अशीं भोळ्या लोकांची समजूत होती! पुढोम हा कट्टा लोकपक्षीय संपादक असून त्यानें १७८७ ते १७८९ या दोन सालांत पंधराशें लेख छापून वाटले. बारे हा स्टेट्स–जनरलमधील कामकाजाची हकीकत फार चटकदार रीतीनें लिही. त्यामुळें त्याला वाचकांचा तोटा नव्हता. जीन ब्रिसो यानेंहि बास्तिलच्या तुरुंगवासाचा अनुभव घेतला होता. त्यानें फाशीची शिक्षा रद्द करावी याविषयीं मतप्रसार सुरू केला होता, व तो समतेचा कट्टा पुरस्कर्ता होता. मिराबो, लाफायत इत्यादि पुढाऱ्यावर त्याचें फार वजन असे. त्याच्या पत्रांतील परराष्ट्रीय धोरण वाचकांना फार पसंत पडे. लूस्तालो या नांवाच्या तरुण, तडफदार संपादकानें 'क्रांतिकारक पारिस' या नांवाचें साप्ताहिक पत्र काढलें, त्याच्या दोन लाख प्रति निघत असें म्हणतात! लेहोदे, मारेत व मीजान यांनीं लोकसभेचे रिपोर्टर म्हणून एकदम मोठें नांव मिळविलें. बॅरॅनो हाहि चतुर रिपोर्टरच होता. पुढें राजकारणांत पडून तो नेपोलियनचा एक वेळचा परराष्ट्रीय प्रधान झाला!

संपादकांच्या कचेऱ्या व छापखाने यांच्या खालोखाल लोकमत बनविण्याचें प्रतिष्ठित कारखाने म्हटले म्हणजे सार्वजनिक कामांत लक्ष घालणाऱ्या विदुषींची घरें. श्रीमान सुशिक्षित व कारस्थानी स्त्रियांनीं मतप्रचाराचें काम हातीं घेतल्यास तें किती सुलभ रीतीनें व गुप्तपणें होत असेल याची कल्पना करितां येते. यांचीं निमंत्रणें राजकारणी पुरुषांना व मुत्सद्यांनाही बहुमानास्पद वाटत. स्त्रियांच्या पुढारीपणानें चालणाऱ्या या क्लबांना 'सलून' म्हणत. ती एक संस्थाच बनली होती. तींत शिरकाव होण्याकरितां निमंत्रण नसलेले लोचट आगंतुक हरप्रयत्नानें निमंत्रणें मिळवीत. अध्यक्षस्थानीं यजमानीणबाई बसावयाच्या, त्यांच्याभोवतीं हा परिवार जमावयाचा, व वेळ जाण्याला निमित्त म्हणून जेवण, फराळ, मद्य यांची योजना तयार असावयाची. सुरवातीला हवेसंबंधीं चार औपचारिक शब्द, पोषाखांच्या नव्या नव्या रीति, खेळ व क्रीडा, बाजारी गप्पसप्प इत्यादि निरुपद्रवी विषयांचा परामर्ष घेतां घेतां प्रचलित राजकारणाची चर्चा सुरू व्हावयाची, व मग पुढें तीच रूसून चालावयाची. १७८९ मध्यें पोषाखाच्या फॅशनपेक्षां राजकारणाच्या चर्चेची आवड श्रेष्ठ वर्गातील स्त्रियांना कशी अधिक जडली याचें तत्कालीन इतिहासकारांनीं आश्चर्य प्रगट केलें आहे. पण गोष्ट तशी होती खरी.

**विदुषींचें राजकारण**

या चर्चेंत मनुष्यस्वभावाचे सर्व प्रकार दिसून येत. केवळ सुखोपभोगाकरितां गेलेले लोक खाऊनपिऊन मजा मारीत. थोडीबहुत जुगारहि चाले. चावट व आचरट लोक हास्यविनोदांत गुंग राहून प्रतिपक्षावर क्षुद्र हलकट कोट्या करून बुद्धिवैभवाचें प्रदर्शन मांडीत. क्लबांत जमणाऱ्या स्त्रियांचा सहवास हेंहि कित्येकांना मनांतून आमिष असे. ही झाली पाहुण्यांची गोष्ट. पण अशा लोकांच्या द्वारें होईल तितका आपल्या मतांचा प्रसार करावा या हेतूनेंच, कावेबाज यजमानीणबाई याचा खर्च करीत व अनेके उपाधि

घोशीत. अशा स्त्रियांपैकीं स्वतः मुख्य प्रधान नेकर याचीच स्त्री व मुलगी, मादाम दी स्टील, मादाम शांबोना, मादाम साब्राम, मादाम जेनलिस, मादाम ब्रॉग्ली, मादाम बफन, मादाम जुलितालमा वगैरे लहान थोर व बऱ्यावाईट स्त्रिया होत्या. या सलूनमध्यें राजपुत्र डयूक ऑफ ऑर्लिन्स व मिराबो यांच्यापासून तो तहत नाटक-प्रसहनकार, लुंगेसुंगे कवि, नट व चलाख गावगुंड इतक्यांची सरमिसळ होत असे. मादाम नेकरसारख्या स्त्रियांचा हेतु आपले नवरे व आप्तमित्र यांच्यातर्फे लोकमत बनविण्याचा असे, तर कित्येक क्रांतिकारक स्त्रिया आपले हेतु गुप्त ठेवून, या क्लबांतील संभाषणांतून निघणारे राजकारणी बेत समजून घेऊन बाहेर पडत; व त्यांची बातमी आपल्या सहकारी लोकांना देत. अशा क्लबांत जाणाऱ्या कित्येक स्त्रियांनींच पुढें क्रांतीच्या झटापटींत हातांमध्यें निशाणें घेऊन, व्हर्साइलच्या राजवाड्यावर चाल केली.

**आणखी कांहीं चर्चा-केंद्रें**

याशिवाय विद्वान लोकांचे क्लब पारिसमध्यें पूर्वीपासून असत. त्यांत आतां वाङ्मय व शास्त्रीय चर्चा यांच्या ऐवजी राजकारणाची चर्चा सरास सुरू झाली. पण अशा विद्वानांच्या क्लबांतून मात्र थोडे लोक जमत. कारण त्यांतून प्रत्यक्ष क्रांतिकारक कार्यक्रम असे निष्पन्न होत नसत. विद्वानांच्या या क्लबांखेरीज सामान्य लोकांचे क्लब तर सर्व पारिसभर पसरले होते. त्यांत कांहीं कार्यक्रम वादविवादाचा तर कांहीं गुप्त मसलतीचा असे. यांना 'सोसायट्या' असें म्हणत. गुत्ते हे देखील राजकारणाचे अड्डे बनले होते. मोठमोठ्या रस्त्यांवरील चौकांतूनहि उघड्या हवेंत लोक जमत. या प्रसंगाचा फायदा प्रथम गावगुंडी वक्ते व चळवळ्या स्त्रिया यांनी तर घेतलाच, पण पुढें पुढें केवळ रस्त्यांतून फिरणाऱ्या निरुद्योगी बेकार लोकांना महत्त्व आलें तेव्हां प्रमुख राजकारण चळवळ्यांनींहि अशा सभांचा फायदा घेण्याला कमी केलें नाहीं. अशा सभांतून जहाल स्वरूपाचे ठराव कसे मतभेदाशिवाय पास होत असतील हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. येथें

सरसकट अधिकारी वर्गावर ताशेरे झाडले जातांना, खुद्द राजा व राणी यांनाहि कोणी वगळीत नसे. आपल्या हत्यारांची पेटी किंवा पिशवी खिशांत, काखेंत मारून कामावरून घरीं परत जातांना कामकरी लोक क्षणभर अशा सभांना थांबत; व आपल्या मालकांकडून मजुरीचे दर सक्तीनें वसूल करण्याचा उघड धाक घालण्याची भाषणें करीत. भाकरी रोटीही खाण्याला कमी पडणाऱ्या लोकांनीं, "रोटीवाल्यांच्या दुकानावर चाल करून गेल्याशिवाय आतां आमच्या दुःखाचें निवारण होणार नाहीं" असें उघड बोलावें. पारिसबाहेर लोकसभेकरितां प्रतिनिधि निवडून आले ते आपलें काम बरोबर करतात कीं नाहीं हें पाहण्याकरितां, परगण्यानिहाय कांहीं कांहीं इतर लोक मुद्दाम पाठविण्यांत आले होते. ते तर पारिसमध्यें निरुद्योगीच. म्हणून तेहि अशा रस्त्यांवरील सभांतून आपल्या परगण्यांचीं सुखदुःखें राजधानींतील नागरिकांना समजावून देत.

**दोन प्रख्यात अड्डे**

याशिवाय आणखी एकदोन चळवळींच्या अड्ड्यांचा विशेष रीतीनें उल्लेख केला पाहिजे. एक राजपुत्र ड्यूक ऑफ ऑर्लिन्स याचा, व दुसरा इंग्रज सरदार ड्यूक ऑफ बेडफोर्ड याचा. हा ड्यूक पारिसमध्यें येऊन सुखवस्तु म्हणून राहिला होता. तो आचरणानें चैनबाज व व्यसनी असून राज्यक्रांतीला उत्तेजन देणें हें त्याचें राजकीय तत्त्व होतें. त्याच्याजवळ पैसाहि पुष्कळ होता. त्यांतला पुष्कळ पैसा त्यानें आपल्या या दोन्ही प्रकारच्या हौशी फेडण्याकरितां नासला. फ्रेंच राजपुत्र ऑर्लिन्स हा राजाशीं बेबनाव झालेला. तो धीट किंबहुना धाडसीहि असे. त्याला राज्यपद मिळण्याचा संभव नव्हता. यामुळें तें नष्ट करण्याचा विडाच त्यानें उचलला होता. त्याचा एक मोठा वाडा, बरीच मोकळी जागा, व एक विस्तीर्ण बगीचा अशीं एकत्र होतीं. या मोकळ्या जागेंत त्यानें भाडें उत्पन्न करण्याकरितां नवीं दुकानें बांधिलीं, आपला बगीचा सार्वजनिक केला,

व वाड्यांत राजकारणी लोकांचा एक क्लबच काढला. क्रांतिकारक लोकांना हें मोठेंच निधान लाभलें. कारण चळवळीला पैशाचें बळ, आणि चळवळीचा पुढारी राजघराण्यांतला म्हणून चळवळीला नैतिक पाठबळ. या त्यांच्या दोन गोष्टी आयत्या साधल्या. त्यानें बांधलेल्या दुकानांपैकीं अनेकांतून दारूचे गुत्ते व जुगारीचे अड्डे होते. यामुळें अस्सल क्रांतिकारकाप्रमाणें स्वार्थी व बेहोष बदमाषांचें तें एक मोठेंच केन्द्र निर्माण झालें होतें.

स्टेट्स-जनरलच्या बैठकीच्या आधी कांहीं दिवस पारिसमध्यें अस्वस्थता नांदत होतीच; पण लोकसभेची बैठक भरल्याबरोबर समुद्राला भरती यावी त्याप्रमाणें या अस्वस्थतेला तोंड फुटून दंग्यांचें स्वरूप येऊं लागलें. राजधानीचें संरक्षण करण्याचें काम पूर्वापार वहिवाटीप्रमाणें तीन हजार शिपायांच्या नागरिक सैन्याकडे असे. परंतु हे शिपाई रणांगणावर जाणारे नसून पारिसमध्यें बैठेच राहणारे असल्यामुळें, ते हत्यारांचा खरा उपयोग व लष्करी कवाईतहि विसरून गेले होते. या सैन्यांतील अधिकाराच्या जागा वशिल्यावारी मिळत. या सर्व दृष्टींनीं पाहतां, खुद्द पॅरिसच्या जनतेविरुद्ध लढण्याचा प्रसंग असतां हें सैन्य सहजच नालायख ठरणारे होतें. आणि चळवळ्या लोकांना ही गोष्ट माहीत असल्यामुळें, या सैन्याच्या ऋणानुबंधावर विश्वास टाकून त्यांना आपल्या चळवळी चालवितां येत. बादशाही फौजेची गोष्ट वेगळी. पण ती फौज खुद्द राजाजवळ व्हर्साइल येथें राजवाड्याच्या संरक्षणाकरितां ठेवलेली असे. नागरिक सैन्याच्या मुख्य अधिकाऱ्यांचीं मतें कोणीकडे झुकतात हें अजून निश्चितपणें ठरलें नव्हतें. पण दुय्यम अधिकारी एकजात लोकपक्षाला सामील व मनानें क्रांतिकारक होते.

राहतां राहिला पॅरिसमधील व्यापाऱ्यांचा व इतर धनाढ्य लोकांचा वर्ग. हा वर्ग मात्र अजून मनानें क्रांतीपासून फार दूर होता, किंबहुना सर्वस्वी राजपक्षपाती होता असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. यांतील कांहीं लोक करवसु-

लीच्या मक्त्यांवर श्रीमंती थाटून, आपलीं डबोलीं घेऊन, सुस्त होऊन बाजूला सरले होते, तर कांहीं करांच्या मक्तेदारीचें काम आज प्रत्यक्ष करीतच होते. करवसुलीची मक्तेदारी हा श्रीमंत होण्याचा एक राजमार्ग असे. कारण फ्रान्स-मधील बहुतेक करांची वसुली मक्तेदारांकडे सोंपविलेली असे. करवसुलीच्या ठराविक रकमा त्यांना तिजोरींत भराव्या लागत. पण त्या भरून वर उरणाऱ्या मोठमोठ्या रकमा या कायदेशीर नफ्याच्या समजल्या जात. करवसुलीच्या कामीं निष्ठुरपणें जुलूम व छळ करावा लागे. पण या कामीं सरकारी अधि-कारी पोलीस व सैनिक यांची मदत त्यांना हवी तितकी मिळे. शिवाय वेळ पडलीच म्हणजे दोषाचें खापर राजाच्या व विद्यमान राज्यव्यवस्थेच्या डोक्यावर फोडून त्यांना भलेपणानें अलग होता येई! कामगिरीवर असलेल्या या कर-वसूली मक्तेदारांचा उपयोग जसा राजाला तसाच राजाचाहि त्यांना! बरें मक्ते सोडून पैसा मिळवून जे घरीं बसले त्यांचाहि राजाशीं ऋणानुबंध तुटत नसे. कारण सरकारी खजिना वारंवार मोकळा पडत असल्याकारणानें, आणि करवसुली वक्तशीर होणें कठीण असल्यानें, राजाला कर्जें काढावीं लागत. १७८८ सालीं तीन वर्षांच्या उत्पन्नाइतकी तूट सरकारी हिशेबांत आधीच पडली होती. यावरून अशा सावकारांची गरज राजाला किती असेल याची कल्पना होईल. या सुखवस्तु मक्तेदारांवर राजाचा डोळा असे, तसाच सरदार लोकांचा राग असे. कारण त्यांनी आपल्या चैनीच्या राहणीनें बाजारांत पदार्थांच्या किंमती वाढविल्या होत्या; व सरदार लोक निर्धन यामुळें बाजारची ही तेजी त्यांना जाणवे. खुद्द प्रधानादि अधिकारी मात्र या सुखवस्तु मक्ते-दारांचें आर्जव करीत व त्यांना खूष ठेवीत. कारण त्यांना आडल्या वेळीं हमखास कर्ज मिळविण्याची तीच एक जागा होती.

**धनसंपन्नांचा ओढा मात्र राजाकडे**

हें सर्व खरें, तथापि याला दुसरीहि एक बाजू होती. ती अशी कीं, राज्यक्रांति यशस्वी झाली तर नव्या राज-कर्त्यांचा पहिला हात पडावयाचा तो सरकार-च्या जुन्या सावकारांवरच! ही गोष्ट त्यांतल्या त्यांत चाणाक्ष असणाऱ्या

सावकारांच्या व पेढीवाल्यांच्या लक्षांत येत असे. तथापि, उलट त्यांना असेंहि वाटे कीं, जुनीं कर्जें फार तर बुडतील पण उद्यां लोकशाही स्वराज्य झालें तर पहिली सुधारणा जनतेवरील कर कमी करण्याची होणार. परदेशीं होणारीं युद्धें वांचणारीं नाहींत, व त्याकरितां पैसा लागणार तो तरी आमच्या-कडेच मागितला पाहिजे. मिळून आम्ही जुन्या सरकारचे सावकार होतों तसेंच नव्यांचेहि होऊन राहूं. मात्र त्यांच्या लक्षांत हें यावें तें एकदम आलें नाहीं कीं, क्रांति यशस्वी करणारे मुत्सद्दी नुसतीं जुनीं कर्जें बुडवून स्वस्थ बसतील असें नाहीं, तर सावकाराजवळ असलेली ऐनजीनसी विद्यमान मालमत्ताहि लुटून सरकारी खजिन्यांत कां नेणार नाहींत! कसेंहि असो, एकंदरीनें धनिक व व्यापारी वर्ग अजून संशयांत घुटमळत होता; व त्याचा पक्षपात मनांतून असलाच तर तो राजाकडे व क्रांतिकारकांविरुद्ध असा झुकत होता एवढें खचित.

**कायदेपंडितांचें क्रांतीला उत्तेजन**

पॅरिसच्या तत्कालीन शिष्टवर्गामध्यें धनसंपत्तिमानाबरोबर वकील व कायदेपंडित यांचा उल्लेख केला पाहिजे. मात्र फरक हा कीं पहिला वर्ग क्रांतीला प्रतिकूल होता; तर हा दुसरा क्रांतीला, अनुकूल होता क्रांतीचें स्वरूप पुढें भेसूर भयप्रद झाले तेव्हां वकील वर्गानें माघारा पाय घेतला हें खरें. तथापि प्रथम तरी समानतेच्या तत्त्वाला तात्त्विक संमति देऊन वकील वर्गानें क्रांतीला उत्तेजनच दिलें. चुरशीचें चालू राजकारण लोकांच्या डोळ्यांत भरू लागेपर्यंत तेथें वकील वर्गालाच जागा होती. फ्रेंच युनिव्हर्सिटींतील कायद्याचे प्रोफेसर जगभर प्रसिद्ध असत, व फ्रेंच न्यायकोर्टांतून वकील लोक वाद-प्रतिवादाची जी पद्धति अवलंबीत तिचें अनुकरण युरोपांतील वर्ग करीत असे. फ्रेंच पार्लें-मेंट्स ( प्रांतिक स्वराज्य संस्था ) यांना न्यायदानाचेंहि बरेच अधिकार असत. वकील लोक येथे प्रसिद्धीस आले म्हणजे मग ते पॅरिसला जाऊन तेथील

पार्लमेंटमध्यें सभासदत्व मिळवीत, किंवा त्याच्या न्यायकोर्टांत कामें करीत. बोर्डो येथील 'पार्लमेंट'चा अध्यक्ष मॉंटेस्क्यू हा कायद्याच्या शास्त्रांतील अग्रगण्य पंडित म्हणून अजूनहि प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणें ला मोइगनॉन व मालेशर्ब्स हे क्रांतीच्या वेळी पॅरिसमधले नामांकित वकील होते. पारिसची पार्लमेंट रोमन सेनेटचें ध्येय डोळयांपुढे ठेवून चालत होती. म्हणजे पॅरिसमधील लोकांना राजकारणांतहि बहुमानाचें स्थान असावें ही तिची महत्त्वाकांक्षा असे. पार्लमेंटचा हा न्यायदानाचा अधिकार काढून घेण्याची कारवाई क्रांतीपूर्वी राजमंडळाकडून सुरू झाली होती; व त्या गोष्टीला वकील लोक विरोध करीत होते. डँटन, डेस्मॉलिन, रोबेस्पीयर, पातियन हे वकीलपेशाचे लोक क्रांतीचे मोठे पुढारी झाले.

**क्रांतिकालीन साहित्य**

या वेळच्या सुशिक्षितांतील तरुण वर्ग क्रांतीला अनुकूल होता. क्रांतीमुळें चालू राजकारण हें पुढें पुढें लोकांच्या डोळयांत भरूं लागलें तोंपर्यंत त्या स्थानीं वकिलांबरोबर ग्रंथकार व साहित्यिक यांना मानाची जागा असे. राजाच्या गैरमर्जींत नसणाऱ्या ग्रंथकारांना पैशाची प्राप्ति बरी होई. व्हॉल्टेअर हा लष्करी कंत्राटदाराचें काम करून श्रीमान् झाला होता, हें पुष्कळांना आश्चर्यकारक वाटेल! रूसोला त्याच्या श्रीमान् भक्तिणी नियमित तनखे देऊन त्याचा चरितार्थ चालवीत. विद्वान शास्त्रज्ञ लोकांना सरकारांतून पेनशनें चालू असत. अशा वर्गांतूनच, पण त्यांतल्या तरुण लोकांतून, क्रांतीला उत्तेजन मिळालें. ज्योतिर्गणिती बेली हा नॅशनल असेंब्लीचा एक वेळ अध्यक्ष निवडला गेला. कॉंडोरसेट हा पारिस पार्लमेंटचा एक प्रतिष्ठित सभासद होता. अशाच रीतीनें पुष्कळ तरुण साहित्यिकांना क्रांतींतून निर्माण झालेल्या राज्यव्यवस्थेंत अधिकाराच्या जागा मिळाल्या. उलट कांहीं तरुण साहित्यिक स्वार्थाला बळी पडून राजपक्षपाती झाले होते, व त्यांनी आपली प्रतिभा,

आपला कोटिबाजपणा, क्रांतीला विरोधी वाङ्मय निर्माण करण्याकडे खर्चिला; पण असें थोडेंबहुत होणें अपरिहार्यच होय.

**कामगार आणि क्रांति**

मध्यम वर्गांतील साधारण सुखवस्तु लोकहि क्रांतीला अनुकूल झाले, मग खालच्या वर्गांचे मजूर कामगार वगैरे झाले असतील हें सांगावयास नकोच! पॅरिसबाहेर शेतकरी कामकरी वर्गाची स्थिति काय होती याचा पूर्वी एकदां उल्लेख आलाच आहे. ते राजधानींत नसल्यामुळें त्यांच्या हातून क्रांतीच्या कामाला सुरुवात होऊं शकली नाहीं. पण त्याच दर्जाचे जे लोक पॅरिसमध्यें होते त्यांना क्रांतीला प्रारंभ करण्याचें श्रेय मिळालें. पॅरिसमधील कारखान्यांत काम मिळविण्यासाठीं हजारों बेकार लोकांची भरती या सुमारास या शहरामध्यें होत होती. पॅरिसमध्यें त्यांना मजूरीहि बरी मिळे. पण ज्यांना काम मिळालें नाहीं अशा बेकारांची वस्तीहि बरीच असे. आणि 'आम्ही काम करण्याला तयार आहों' असे म्हणत असतां ज्याला काम मिळत नाहीं, त्याला मग इतर कोणत्याहि अयोग्य मार्गानें देखील आपलें पोट भरण्याला एक प्रकारचा हक्कच उत्पन्न होतो! अशाच बेकार लोकांनी पॅरिसमध्यें क्रांतीच्या तोंडीं झालेल्या दंग्यांना सुरुवात केली. मौज ही कीं, राजघराण्यांतील ऑर्लिन्सचा ड्यूक हा स्वतः अशा लोकांच्या जमावाला व हुल्लडीला उत्तेजन देत असे. त्यावेळीं पॅरिसमध्यें भिक्षा मागण्याला सरकारी प्रतिबंध नव्हता, व भिकाऱ्याला भिक्षा घालणें हा पॅरिसचे लोक धर्माचार मानीतहि. परंतु अशा भिक्षेनें फार थोड्यांचा निभाव लागण्यासारखा होता. सरकारनें मनावर घेतलें असतें तर त्याच्या धर्मादाय खात्यांतून बऱ्याच लोकांना या नाहीं त्या कामावर पोटगी मिळाली असती. परंतु भिकाऱ्यांचें पोट कसें भरेल याचा विचार करण्याऐवजीं त्यांना पॅरिसमधून घालवून देऊन फक्त दृष्टीआड कसे केले जाईल इतक्यापुरताच सरकार विचार करी! पण ज्यांच्यावर हा

जुलूम होई ते पॅरिसमध्यें इतर रीतीने चाललेली श्रीमंतांची चैन पाहात आणि या श्रीमंतीबद्दल सहजच द्वेष वाटून ते मनाशीं म्हणत कीं, “ सुखासुखी बाहेर जाण्यापेक्षा झगडून राजधानींतच राहूं, व मनगटाच्या जोरावर काय मिळवावयाचें तें येथेच मिळवूं. शिवाय लोकसभेची आता प्रत्यक्ष नॅशनल असेंब्ली बनली आहे तेव्हां आता शहाणा मुख्य प्रधान नेकर हा आमच्या पोटापाण्याची कांहीं व्यवस्था करील ! ” अशी आशा उपासमार सोसणाऱ्या लोकांना वाटत होती. पण दैव असें चमत्कारिक कीं नेकरलाच कामावरून काढण्याची बुद्धि लुई राजाला कां न व्हावी !

**क्रांतीचा श्रीगणेशा**

नेकरला बडतर्फ करण्याची बातमी कानीं पडतांच दारूंत ठिणगी पडावी तसा प्रकार झाला. ता. २८ एप्रिल रोजीं रव्हेलॉन नांवाच्या कागदाच्या कारखानदारावर मवाली लोकांनीं हल्ला केला त्याला कारण इतकेंच झालें कीं, तो बेकार लोकांशी सहानुभूति दाखविण्याऐवजीं “ हे लोक चावट आहेत. उपासमारीची सबब उगाच सांगतात, ” असें तो कोठें बोलला म्हणे. मवाली लोकांनीं त्याचा कारखाना साफ लुटला. तेव्हां नगररक्षक सैनिकांनीं तो दंगा मोडावा, पण अधिकाऱ्यांना असा संशय आला कीं, यांना दारूगोळा देऊन पाठविलें तर दंगा मोडण्याऐवजीं हेच दंगेखोरांना सामील होतील. कित्येक म्हणत राजदरबाराकडूनच हा दंगा करविला गेला. कारण खाजगी मालमिळकतीवर मवाली लोकांची कशी धाड पडेल हें सुखवस्तु लोकांना प्रत्यक्ष उदाहरणाने कळलें म्हणजे क्रांतीला चिथावणी देण्याचे त्यांचे चाळे थांबतील ! कसेंहि असो; मवाली लोक दंगे करण्याला अगदीं आतुर झाले होते. आणि क्रांतिकारकांचा असा निश्चित प्रयत्न सुरू झाला होता कीं, दंगेधोपे होऊं लागले तर नागरिक सैनिकांनी शक्य तितकें तटस्थ राहावें.

असो. खुद्द पॅरिस राजधानींत क्रांतीच्या आगमनाची तयारी कोणकोणाकडून कसकशी होत होती हें येथवर सांगितलें. आणि आतां स्टेट्स-जनरल म्हणजे मोठी लोकसभा हिची हकीकत पुढें कशी घडली हें पाहूं. लोकसभेंतील राजकारण व बेकार, मवाली, बेजबाबदार, क्रांतिवादी लोकांची चळवळ या दोन्ही गोष्टी, जाणूनबुजून कीं होईना पण, एकमेकाला संवादी व अनुकूल अशाच ठरल्या.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५६०७

# ४ पहिला रक्तपात

**कलहाचें तोंड**

ता. १ मे सन १७८९ रोजीं व्हर्साइल राजवाड्याच्या आसपास मोठी धामधूम चालू होती. श्रीमंती पोशाख घातलेले राजदूत मोठ्या घोड्यांवर बसून चौकाचौकांतून फिरत होते. त्यांच्या हातांत असलेल्या लांब तुताऱ्या मधून मधून जोरानें वाजवून, लोकांचें लक्ष वेधून घेऊन ता. ४ मे रोजीं भरणाऱ्या लोकसभेचा ताजा जाहीरनामा ते वाचून दाखवीत होते. त्यांच्यामागून सशस्त्र स्वारांच्या टोळ्या हिंडत होत्या. दंगा-धोपा थांबविण्याकरितां म्हणून नव्हे तर जाहीरनाम्याच्या ललकाऱ्यांना शोभा यावी म्हणून! बरेचसे प्रतिनिधि ता. २६ एप्रिलपासूनच राजधानींत येऊन राहिले होते. आणि कांहीं कामधाम नसल्यामुळें या उमरा-वाला भेट, त्या अमीराची गांठ घे, या मुत्सद्याशीं कानगोष्ट कर, त्याला आपल्या खिशांत आणलेल्या अर्जाचीं कलमें समजावून दे, असें करीत वेळ घालवीत होते. या प्रतिनिधींचें स्वागत वरिष्ठ वर्गाकडून खुल्या दिलानें होत नसे. हे खेडवळ लोक सांगतील ते नागरिक पुढारी ऐकून घेत, पण एकंदरीने त्यांच्याविषयीं तुच्छतादर्शक भावच प्रकट करीत.

ता. २ मे हा दिवस राजाने लोकप्रतिनिधींची धूळभेट घेण्याचा म्हणून ठरला होता. इतरांच्या गर्दीतून वाट काढीत राजापर्यंत पोचण्याला कनिष्ठ वर्गाच्या प्रतिनिधींना पुरा एक प्रहर लागला! या भेटींत फक्त राजदर्शन

पडलें. राजा एक शब्दहि कोणाशीं बोलला नाहीं, यामुळें या प्रतिनिधींना सहजच आपली मानखंडना झाली असें वाटलें. कारण ते या वेळीं व्यक्ति-स्वरूपांत नसून लोकप्रतिनिधी होते. हा नवीन अहंकार त्यांच्यामध्यें बराचसा संचरला होता.

ता. ४ रोजीं राजदर्शनाचा दुसरा समारंभ झाला. त्याला धार्मिक स्वरूप ठेवण्यांत आलें होतें. या प्रसंगीं अमीर-उमराव वरिष्ठ धर्माधिकारी व राजमंडळ यांचे पोषाक रंगीत, मातबर, शोभिवंत, आणि कनिष्ठ धर्माधिकारी व लोकप्रतिनिधी यांचे पोषाक काळसर, मजीद, हलक्या किंमतीचे, ओबड-धोबड शिवणीचे, असा फरक एकत्र दृष्टीस पडला.

धर्ममंदिरांत पाहुणे मंडळी तीन तास राजाची वाट पाहून कंटाळली. नंतर प्रथम राजपरिवारांतील लोक आले, त्यांचें स्वागत सहजच 'शेम शेम' या निषेधदर्शक शब्दांनीं झालें! मग राजकुटुंबांतील कांहीं खाशी मंडळी आली, तेव्हां समाजाने निषेधदर्शक मौनव्रत धरलें. नंतर राणी आली. तिचें मात्र स्वागत औपचारिक रीतीने टाळ्या वाजवून करण्यांत आले. राजा आल्यावर मुख्य धर्माधिकाऱ्याने लांबलचक, रूक्ष असें उपदेशपर भाषण केलें. तें ऐकतांना कंटाळून राजा व इतर अनेक लोक डुलक्या घेऊं लागले! या भाषणांत लोकांच्या दुःखांचा उल्लेख सहानुभूतीने केला होता. स्वतः राजाने भाषण करण्याचा हा प्रसंग नव्हता, म्हणून त्याने फक्त मान लववून, मधून मधून जागा होऊन, औपचारिक रीतीने मान्यता दर्शविली. रात्रीं राजवाड्यावर दीपोत्सव होऊन सर्व लोकांनीं सुखानें झोंप घेतली.

ता. ५ मे रोजीं बाहेरून आलेल्या प्रतिनिधींची नांवें मोठ्यानें घेऊन त्यांची नोंद करण्यांत आली. सिंहासनापुढें १७०० प्रतिनिधींचा घोळका जमला होता. राजा येण्यापूर्वी त्यांची नुसती हजेरी पुरी होण्याला दुपारचा एक वाजला. नंतर राजा लुई हा राणी व इतर परिवार यांसह सभागृहांत

आला. त्यानें एक लहानसें भाषण वाचलें. तो म्हणाला, "१७५ वर्षें कधीं न भरलेली लोकसभा आज भरली. त्याचा अर्थ हाच कीं, मला राज्यकारभाराविषयीं लोकमत समजून घ्यावयाचें आहे. सूचनांचा अखेर निकाल मात्र योग्यायोग्य पाहूनच मला करावा लागेल व तसा तो मी करीन. माझें प्रजेवर प्रेम आहे; पण प्रजेनेहि मजवर विश्वास ठेविला पाहिजे." एकंदरीने हें भाषण मोठासा उत्साह उत्पन्न करील असे नव्हतें. तथापि रीतीप्रमाणें लोकांनी टाळ्या वाजीवल्यानंतर एका राजसचिवाचें भाषण (शिकेनविसाचें) झालें. त्यांत लोकसभेच्या कार्याचें किंचित् दिग्दर्शन केलें होतें. नंतर मुख्य प्रधान व फडणवीस नेकर याचें भाषण दोन तास झालें. पण त्यांतहि लोकांच्या कोणत्या मागण्या मान्य करण्यांत येणार, याची कल्पना कांहीच येण्यासारखी नव्हती. त्या दिवशीं सभेचें काम संध्याकाळीं ४ वाजतां संपलें.

**लोकसभेचे तीन विभाग**

ता. ६ रोजीं लोकसभेचे तीन स्वाभाविक विभाग झाले. अमीर-उमराव व वरिष्ठ धर्माधिकारी हे एक-एका स्वतंत्र दिवाणखान्यांत चर्चेला बसले. सामान्य जनतेच्या प्रतिनिधींना एक तिसरीच जागा देण्यांत आली होती. या वेळीं या तिसऱ्या वर्गाच्या सभेंत प्रथमच असा प्रश्न उत्पन्न करण्यांत आला कीं, स्टेट्स-जनरल ही जर सर्व राष्ट्राची मिळून सभा, तर या लोकसभेचे असे तीन विभाग काय म्हणून करावे? या सर्वांनीं मिळून एकाच ठिकाणीं बसून चर्चा व ठराव कां करूं नये? वरिष्ठ—कनिष्ठ असा हा भेदभाव कां? हे वरचे वर्ग आमच्या संपर्कानें बाटतात कीं काय? या तिसऱ्या वर्गाच्या सभेंत अजून पक्षोपपक्ष बनले नव्हते. आणि पुढारी कोण हेंहि ठरलें नव्हतें. तथापि तीनहि वर्गांची मिळून एकच सभा असावी असें जवळ जवळ एकमत होतें. मात्र त्यांची कल्पना अशी कीं, "वरच्या दोन वर्गांनाहि आतां आपल्यासारखेंच वाटूं लागलें. असेल तेव्हां तीन वर्गांची मिळून एकच सभा भरवावी अशी सूचना आपण

होऊन करण्याचा समंजसपणा ते कां न दाखवितील ! आपणच उतावळेपणा कां करा ! " आणि खरोखरच पाहतां अशा प्रकारचा ठराव वरच्या वर्गातील त्यांतल्यात्यांत जे उदारमतवादी होते त्यांनी पुढे मांडलाहि होता, पण तो थोड्या बहुमताने नामंजूर झाला.

**मतभेद, कालक्षेप आणि गोंधळ**

ही बातमी ताबडतोब या तिसऱ्या वर्गाच्या सभेंत येऊन पोहोचली, तेव्हां अर्थातच चलबिचल झाली. मग मिराबो नांवाचा प्रतिनिधि पुढें येऊन त्याने या गोष्टीचा निषेध केला. तो स्वतः वरच्या वर्गांत मोडण्यासारखा असतांहि केवळ लोकप्रियतेचा भोक्ता म्हणून कनिष्ठ वर्गाचा प्रतिनिधि या नात्याने त्यानें आपली निवडणूक त्या वर्गाकडून मुद्दाम करून घेतली होती. पण मोनिए नांवाच्या एका प्रतिनिधीनें असा ठराव मांडला कीं, "मिराबो याच्या सल्ल्याप्रमाणें आपण जागा धरून रुसून बसूं नये; या वरिष्ठ सभांकडे वकील पाठवून आपलें म्हणणें त्यांस समजाऊन सांगावें." हा ठराव मंजूर होऊन स्वतः मोनिए यालाच वकील म्हणून वरती पाठविण्यांत आलें. त्याची वकिली धर्माधिकाऱ्यांच्या सभेंत यशस्वी झाली नाही. अमीर–उमरावांच्या सभेनें वकीलाचें म्हणणें सर्व शिष्टाचार पाळून ऐकून घेतलें, पण तेथेंहि त्याला नकारच मिळाला. तेव्हां तिसऱ्या विभागांतील लोक बरेच रागावले. ते म्हणाले, "आपण असेंच राहूं या. आपण अध्यक्षहि निवडूं नये. कारण तसें केलें तर आपली सभा वेगळी ठेवून काम करण्याचें आपण कबूल केलें असें होईल!"

मग आतां या मतभेदाचा निकाल कसा लागणार ? येथून पुढें दहा दिवसपर्यंत तीनहि सभांचे वकील एकमेकांकडे जाऊन, आपापलें म्हणणें समजावून देण्याची शिकस्त करीत होते. राजा व प्रधानमंडळ कांहींच बोलेनात. अकराव्या दिवशीं "तिन्ही सभांच्या प्रतिनिधींचीं अधिकारपत्रें तपासून द्यावीं आणि त्यांनीं आणलेले तक्रारअर्ज दाखल करून घ्यावें" अशी सूचना प्रधान-

मंडळाकडून आली. ती कनिष्ठ सभेनें साफ नाकारली. तें ऐकून हा राजद्रोह आहे अशी हाकाटी राजपरिवारानें सुरू केली. पण निर्णय असा कांहींच लागेना. राजा रागावून लोकसभाच बरखास्त करतो कीं काय असेंहि वाटूं लागलें!

कालक्षेपाला कंटाळून कनिष्ठ सभेचा वकील बेली हा राजदर्शनाला गेला व त्यानें आपल्या सभेचें म्हणणें अर्जरूपानें राजापुढें मांडलें. पण याच्या आधीं चार दिवस राजाचा एक लहान मुलगा वारला होता, त्या सबबीवर ही मुलाखत फार थोड्या वेळांत आटपण्यांत आली. आणि "ठीक आहे मी तुमचा अर्ज नीट पुनः वाचीन व योग्य दिसेल तें करीन" असें तुसडेपणाचें उत्तर देऊन राजानें वकीलाची रवानगी केली. वरच्या दोन सभांत बरेंच दुमत माजून राहिलें होतें. धर्माधिकाऱ्यांच्या सभेंत कनिष्ठ सभेच्या मागणीला अधिकाधिक पाठिंबा मिळत चालला होता, तर अमीर–उमरावांच्या सभेंत युद्ध पुकारण्याची भाषा बोलण्यांत येत होती. पण कनिष्ठ सभेचेंच बळ दिवसें-दिवस वाढत चाललें होतें.

यापूर्वी ता. २५ मे रोजीं सर्वांत शेंवटीं पॅरिस येथील जे प्रतिनिधि येऊन कनिष्ठ सभेंत मिसळले होते त्यांतच बेली, ॲबे, साई वगैरे सुप्रसिद्ध लोक होते. "वरिष्ठ वर्ग आपलें ऐकत नाहीं तर आपणच आपली अधिकार-पत्रें नोंदवून घेऊं" असें या सभेनें ठरविलें. उमराव सभेला सहकारितेचें निमंत्रण पुनः एकवार केलें तें तिनें ७९ विरुद्ध १७३ इतक्या मतांनीं नामंजूर केलें. धर्माधिकारी वर्गांत मात्र चांगलीच फूट झाली. तिचे तीन सभासद आपली सभा सोडून कनिष्ठ वर्गाच्या सभेंत येऊन "आम्ही तुम-च्यांतच येऊन बसणार" असें म्हणाले. दुसऱ्या दिवशीं आणखी नऊ आले. "या सर्वांचें स्वागत कनिष्ठ सभेकडून कृतज्ञतापूर्वक आलिंगनानें व आनंदा-श्रूंनीं करण्यांत आलें" असें वर्णन आढळतें. आणि तें योग्यच आहे. कारण वरिष्ठ म्हणविणारे अभिमान सोडून कनिष्ठांत येऊन मिसळले म्हणजे कनि-ष्ठांना आपला विजय झाला असें वाटतें!

ता. १७ जून रोजीं एका प्रतिनिधीनें उठून असा ठराव मांडला कीं,

**राष्ट्रीयलोकसभेची प्रतिष्ठापना**

"या आपल्या सभेला यापुढें नॅशनल असेंब्ली (राष्ट्रीय लोकसभा) असे नांव ठेवावें." एकदम लोकसभेच्या मनांत नव्याच स्फूर्तीचा किरण प्रकाशमान झाला. कोणी अशी शंका काढली कीं, "या गोष्टीला राजाची मंजुरी लागेल. यावर उलट उत्तर असें आलें कीं, "अमेरिकेंतील वसाहतींनीं स्वातंत्र्य पुकारून आपली राष्ट्रीय सभा प्रस्थापित केली, तेव्हां इंग्लंडच्या राजाच्या मंजुरीची वाट त्यांनीं थोडीच पाहिली होती!" "हें बोलणें राजद्रोहात्मक ठरेल" अशी कांहींना भीति वाटली. त्यावर दुसरे कांहीं म्हणाले "लोकसभेंत कांहींहि बोललें तरी राजद्रोह होऊं शकत नाहीं." पण कोणी राजद्रोह म्हटला तरी 'नॅशनल असेंब्ली' हें नांव न घेण्याला तें कारण होऊं शकत नव्हतें. शेवटीं सर्वानुमतें हें नांव घेण्याचें ठरलें; मात्र त्याबरोबर राजेसाहेबांचा जयजयकार करून, राजनिष्ठाहि प्रकट करण्यांत आली!

ही वार्ता राजदरबारीं पोंचली तेव्हां टॅलेरॅं नामक राजसचिवाने लोकसभेच्या पुढाऱ्यांना शिक्षा करावी असें सुचविलें. पण

**अशुभस्य कालहरणम्**

"असें केलें तर पाठोपाठ असेंब्ली बरखास्त करावी लागेल, आणि ती बरखास्त होत नाहीं म्हणाली तर सैन्यांतील शिपाई आणून बळजबरीने ती बरखास्त करावी लागणार! म्हणून विषाची परीक्षा पाहूं नये. नॅशनल असेंब्ली हें नांव लोकसभेने अनधिकारानें घेतलें तरी तें तिला घेऊं द्यावें. आणि राजाच्या नांवानें जयजयकार केला गेला तितक्यावरच संतुष्ट राहावें" असें राजमंडळानें ठरविलें. सभासदांना मात्र या बरखास्तीचा संशय येत होता. म्हणून कांहींनी आपण आतां घरीं जावें हें बरें असें म्हणून प्रस्थानेंहि ठेविली. पण बरखास्तीचा जाहीरनामा निघाला नाहीं हें पाहून सभेला आणखी बळ चढलें. लगेच सभेनें ठराव केला कीं, "यापुढें लोकसभेनें स्पष्ट शब्दांनीं मंजूर न केलेला असा कोणताहि कर राजाला वसूल करतां येणार नाहीं व लोकां-

नींही तो देऊं नये. तसेंच प्रतिनिधींची नांवें रीतसर नोंदवून घ्यावीं; सभेंतील कामकाजाचें नियम करावें; होतील ते ठराव कायदेशीर भाषेंत मांडावें; व देशांतील अन्नाचा पुरवठा व दरदाम यांची व्यवस्था करावी." या सर्व कामाकरितां सभेनें कमिट्या नेमिल्या. या लोकसभेचें बळ वाढूं लागलें तसें दोन्ही वरिष्ठ सभांचें बळ हटूं लागलें. त्यांचा आत्मविश्वास ढळला. तिसऱ्या वर्गाच्या लोकसभेशीं मिळतें घ्यावें, असे ठराव मधून मधून सुचीविण्यांत येऊं लागले.

ता. १९ जून रोजीं धर्माधिकाऱ्यांच्या सभेने तर "कनिष्ठ लोकसभेला जाऊन मिळावें" असा स्पष्ट ठरावच प्रचंड बहुमताने मंजूर केला. अनुकूल मत देणारांमध्ये कांहीं थोडे वरिष्ठ धर्माधिकारीहि होते. या विजयाची वार्ता ऐकतांच सभागृहांच्या बाहेर जमलेले लोक नाचूंओरडूं लागले. त्यांची दुमदुम राजवाड्यापर्यंत जाऊन पोहोचली. लगेच हे १४९ सभासद कनिष्ठ लोकसभेंत जाऊन आपल्या जागा घेऊन बसलेहि. इतिहासकार म्हणतो, "पुढे तीन वर्षांनी धर्माधिकाऱ्यांना कळून आलें कीं, लोकसभेचें खरें प्रेम आपणांवर किती आहे!" पण गोष्ट घडली म्हणजे मागाहून कोणालाहि हवें तें बोलतां येतें हा नियमच आहे. आज तरी या १४९ पाहुण्यांचें स्वागत कनिष्ठ सभेंतील लोकांनीं प्रत्यक्ष आलिंगनें देऊन केलें खरें; धर्माधिकारी सभेंतील उरलेले नाराज झालेले, थोडे सभासद राजाकडे गेले, आणि "आतां आमचे रक्षण आपणच करणार" असें केविलपणांने म्हणूं लागले. राजमंडळाने त्यांना धीर दिला. आणि असें ठरविण्यांत आलें कीं, राजाने तिन्ही सभांना पुन्हा एकवार निमंत्रण करावें आणि स्वतः हजर राहून तिन्ही सभांना पूर्वीसारखें वेगवेगळे बसावयाला सांगावें. या नवीन सभेची तारीख २३ जून ही ठरली. तोंपर्यंत तीनहि सभा बंद करून सभागृहाच्या दारांना कुलुपें लावण्यांत आलीं.

ता. २० रोजीं सभासद नेहमीप्रमाणें येऊन पाहतात तों दाराला कुलुपें! कोणी "असें कां" म्हणून विचारलें तर त्याला उत्तर मिळे कीं,

"ता. २३ रोजीं खास राजेसाहेब जातीने हजर राहून सभा भरविणार आहेत, त्याकरिता नव्या बैठकी घालावयाच्या आहेत, म्हणून सभागृह बंद केलें आहे." फरासांनी सांगितलेली ही सबब लोकांना खोटी वाटली. त्यांनी एकमताने ठरविलें कीं आपलें सभागृह नाही तर नाही, आपण नजीकच्या 'टेनिस कोर्टा-च्या' उघड्या मैदानांतच सभा भरवूं. लगेच त्या ठिकाणीं सर्व जुळले. रीत-सर सभा भरली असें म्हणून बेली याला अध्यक्ष निवडण्यांत आलें. सभा-सदांच्या रागाचा पारा चढूं लागला. ठरावांची भाषा अधिकाधिक जहाल होऊं लागली. मोनिए व ग्रेनोबल या सभासदांनीं अशी सूचना मांडली कीं, "येथल्या येथें सर्व सभासदांनी राष्ट्रनिष्ठेच्या शपथा घ्याव्या आणि असें ठरवावें कीं, आपल्या हातून स्वराज्याची भावी घटना तयार होऊन राजाकडून तिला मान्यता मिळेपर्यंत सभा एकसारखी भरलेलीच ठेवावी; फुटूं देऊं नये." लगेच शपथ-पत्रिकेवर सह्या घेण्यांत आल्या. प्रत्येक सभासदाला आज आपण देश वांचविला असें वाटूं लागलें. या 'टेनिस कोर्टावर' राजपुत्र व राज-परिवारांतील इतर मंडळी येऊन चेंडू खेळण्याचा नेहमीचा प्रघात होता. कौंट अरतॉय हा सरदार जुन्या घमेंडींत असल्याने त्याने सभेकडे निरोप पाठ-विला कीं, "आम्ही टेनिस खेळावयाला येणार आहों, जागा खालीं करून द्या." पण निरोप्याला धिक्कारपूर्वक परत पाठविण्यांत आलें.

# ५ तीन सभांचें एकीकरण

**राजा हताश झाला**

इकडे ठरल्याप्रमाणें, राजानें तिन्ही सभांना निमंत्रण पाठवून बोलाविलें. पण टेनिस कोर्टावर जमलेले लोक आपलीच जागा धरून बसले. फक्त उरलेले लोक येऊन हजर झाले. सभागृहाभोवती सैन्याचा वेढा घालण्यांत आला होता ! ‘ पूर्वींप्रमाणें वेगवेगळ्या ठिकाणीं बसून सभा चालवा ’ असा हुकूम राजाने पुन्हा केला, व इतर थोडेसें बोलून त्याने प्रयाण केलें. त्याच्यामागून वरिष्ठ सभांचे प्रतिनिधीहि उठून निघून गेले. कनिष्ठ सभेचे लोक मात्र जागा सोडीनात. त्यांना उठवून द्यावें म्हणून राजाने आपला खासगी कारभारी पाठविला. तो बरोबर सैन्य घेऊन आला होता ! सैन्याला दाराबाहेर ठेवून हा अधिकारी आंत आला. त्यानें राजाचा निरोप तोंडीं सांगितला. आता मात्र खरा आणीबाणीचा प्रसंग येऊन ठेपला. तेव्हां अध्यक्ष बेली याने संभावितीने उत्तर केलें कीं, “ ठीक आहे. आपण आणलेल्या निरोपाचा विचार सभा करील. तुम्हांला यापुढें येथें राहण्याचें कारण नाहीं. ” पण मिराबो हा उडी मारून पुढे येऊन तणतणून म्हणाला, “ जा जा, कारभारीसाहेब, आपल्या धन्याला जाऊन सांगा कीं, आमच्या शरीरांत ‘ बागनेटे ’ खुपसून आम्हाला बाहेर काढाल तेव्हांच जाऊं.”

कारभारी दोन्ही उत्तरें घेऊन परत राजाकडे गेला. तीं ऐकून आतां राजेसाहेब काय म्हणणार याकडे सर्वांचे डोळे लागले. लवकरच चकमक झडून ठिणगी पडणार अशी पुष्कळांची अपेक्षा होती. पण राजा थकल्या

भागल्यासारखा होऊन हाताने कपाळ चोळीत शांतपणें हलक्या आवाजानें म्हणाला, " बरें आहे बुवा ! लोकसभा जागा सोडीत नाहीं म्हणते तर सोडूं नको म्हणावें. तिला हवें तसेंच होऊं दे ! " कित्येकांना ही राजाच्या सौजन्याची परमावधि वाटली. पण खरा प्रकार असा होता कीं, ' बागनेटें चढवून हल्ला करा असा हुकूम शिपायांना केला आणि त्यांनी तो मानला नाहीं तर मग काय करणार, ही भीतिच खरोखर राजाच्या मनांत होती.

**लोकमताचा वाढता जोर**

इकडे राजदरबारीं कांहीं हालचाल नाहीं असें पाहून ॲबे साई याने असा ठराव मांडला कीं, " राजानें लोकसभेच्या सभासदांवर हात टाकणें हा देशद्रोह समजावा. आपण केलेले जुने ठराव सभेने पुनः कायम करावे. कारण आता लोकसभा हडसून खडसून सुप्रतिष्ठित झाली. " याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. ता. २६ जून रोजीं उमरावापैकींहि ४७ लोक कनिष्ठ सभेला उघडपणें येऊन मिळाले ! त्यांत ड्यूक ऑर्लिन्स हा राजाचा प्रत्यक्ष भाऊहि आला होता. मग काय विचारतां ? हें पाहून राजमंडळाचें धाबें दणाणलें. लष्कर फडाकडून बातमी आली ती अधिक चिंताजनक होती. सैन्याचे लोक असे म्हणूं लागले कीं, " आम्हाला गोळ्या घालावयाचा हुकूम झाला तर त्या वरिष्ठ वर्गाच्या सभेवरच झाडूं. खालच्या लोकसभेवर झाडणार नाहीं. " एका पलटणींतील शिपायाने बेदील होऊन वरिष्ठ अधिकाऱ्याला कांहीं कारणावरून गुद्दे चढविले अशीहि बातमी आली. तेव्हा राजा लुई याने नाइलाजाने लेखी हुकूम देऊन फर्माविलें कीं, " यापुढे लोकसभेचे तीनहि विभाग एकत्र बसूनच लोकसभेचें काम चालावें ! " त्याप्रमाणे ता. २७ जून रोजीं वरिष्ठ सभांतून उरलेले सर्व सभासद कनिष्ठ लोकसभेला येऊन मिळाले.

तीन दोऱ्यांचा एकच चाबूक वळण्यांत आला. मात्र या चाबकाचे फटके आपल्या पाठीवर लवकरच बसणार याची कल्पना राजाला नव्हती.

किंबहुना "खरा आणीबाणीचा प्रसंग टळला" असें कांहीं म्हणूं लागले, तर कांहीं यापुढें जाऊन म्हणूं लागले कीं, "बरें झालें, एकदाचा जीव भांड्यांत पडला. संक्रांत आली तशी निघून गेली. होणार होणार म्हणून ज्या राज्यक्रांतीचा बोभाटा होता ती एकदाची होऊन गेली ना! आता शांतिसूक्तपठणाला प्रारंभ करण्याला हरकत नाहीं. चार सुधारणा काय इकडे तिकडे व्हावयाच्या त्या होतील, आणि राज्याचा गाडा पूर्वीसारख्या जुन्या चाकोरींतून चालूं लागेल. आहे काय नि नाहीं काय?"

**राजाची मनोव्यथा**

पण राजाला मात्र तसें वाटत नव्हतें. अंगावरून वारें जावें तसें होऊन काळजीनें त्याचें मन पांगुळलें. हातांत घेतलेले पाणी बोटांतून झिरपून जावें, तशी राजसत्ता आपल्या हातांतून गळून गेली व ती आपण बोलाविलेल्या लोकसभेंतून प्रविष्ट झाली, असेंच त्याला वाटूं लागलें.

**वरिष्ठांच्या मनांतील वैषम्य**

तीनहि सभांचें एकीकरण झालें या गोष्टीचें राजापेक्षांहि वरिष्ठ वर्गानाच अधिक वाईट वाटलें. तें मनांत म्हणाले, "यांत राजाचे काय गेलें? त्याचा दर्जा, प्रतिष्ठा, वैभव सगळीं आहेत तशींच कायम राहिलीं. खालच्या वर्गांत आम्हांला घालून किंवा कनिष्ठांना वरच्या वर्गांत चढवून आमची प्रतिष्ठा मात्र त्याने कमी केली." पण राजाला झाल्या गोष्टीचा विषाद वाटण्यापेक्षां आनंदच अधिक झाला असें त्यानें भासविलें. मग त्याच्या मनांतून कनिष्ठ व वरिष्ठ वर्ग एकमेकांविरुद्ध लढवून आपला तेवढा डाव साधावयाचें होतें कीं काय न कळे!

**प्रतिनिधींचें राजदर्शन**

नव्या नॅशनल असेंब्लीचे (राष्ट्रीय लोकसभेचे) प्रतिनिधि राजदर्शनाला गेले, त्यांची भेट राजाने राजवाड्यांत थाटाने घेतली. दिवाणखान्याचीं सर्व दारें खिडक्या उघड्या टाकल्या होत्या. बाहेर शिपाई किंवा सैनिक कोणी उभे केले नव्हते. कमरेला

तलवार पुष्कळ वेळ बांधल्याने जड वाटूं लागून शिपाई गडी कंबरबंद सोडून ती खुंटीला अडकावून ठेवितो तेव्हांहि, तो तरवारीचा उपयोग मानीत असला तरी, कांहीं वेळ ती दूर असली तर बरें असें त्याला वाटतें. अशी भावनाहि तो प्रगट करितो. राजा लुई याने या वेळीं लोकांना असेंच भासविलें. पण कांहीं लोक मनांत म्हणाले, "खुंटीला टांगून ठेविलेली उरवार आयत्या वेळीं हाताला न आली म्हणजे कसें होतें हें राजेसाहेबांना लवकरच कळून येईल!" पण राजाने आपल्या दिवाणखान्यानजीक बंदोबस्त ठेविला नसला तरी, प्रधान-मंडळाने पॅरिस शहरच्या आसपास सैन्य आणून ठेवण्याची कारवाई सुरू केली होती. कोणी कोणाशीं बोलत नव्हते. पण शिपाई व प्रजाजन हे मैदानांतून एकमेकांजवळून जाऊं लागले म्हणजे वांकड्या नजरेने किंचित् एकमेकांकडे पाहून पुढे जात.

**जबाबदारी तर घेतली पण?**

ता. १ जुलै रोजीं राजाने शिष्टमंडळाची भेट घेतल्यापासून लोकसभेचें काम जोराने सुरू झालें. यापुढें "लोकसभा" म्हणजे "नॅशनल असेंब्ली" आणि ती देशांतील कनिष्ठ, वरिष्ठ, मध्यम सर्व वर्गांची मिळून एकच असें ठरलें. सभेने नव्या राज्यघटनेच्या कलमांची छाननी सुरू केली; त्याबरोबरच देशांतील धान्याच्या पुरवठ्याकडे लक्ष दिलें. कारण दिवसानुदिवस दुष्काळाचें दुःख जाणवूं लागलें होतें. "नवी लोकशाही लोकांच्या भाकरीचा बंदोबस्त करील तर ती खरी! नाहीं तर एकी एकी एक राजा होता तोच बरा। आतां एकाऐवजीं लोकसभेंत दीड हजार राजे नवे झाले; पण ते गरिबाच्या भाकरीची तजवीज न करतील तर काय कामाचे?" अशा रीतीने लोकशाहीविरुद्ध पहिल्या महिन्यांतच कुजबूज सुरू झाली.

**पुढें काय?**

स्वराज्याचे अधिकार मागावयाला ठीक; पण हातीं आले म्हणजे ते वापरावयाला कठीण. दुसऱ्याला नांवें ठेवावयाला जीभ हवी तितकी सैल सोडतां येते; पण स्वतःला नांवें ठेवून घेण्याची पाळी आली म्हणजे मग त्या जिभेला बरोबर उतारा मिळतो!

१३०० लोकप्रतिनिधिरूपी किरणाच्या एकीकरणाने लोकसत्ता राजसत्तेपेक्षांहि झगझगीत दिसूं लागली. परंतु एक तर त्याचें मन एक; आणि लोकसभा १३०० ची तर तेथें मनें व मतें १३००. या दोन स्थितींतला फरक आपो-आप नजरेला पडूं लागला. ज्यांचे प्रतितिधि म्हणून आपण लोकसभेंत आलों, ते 'भाकरी द्या' 'भाकरी द्या' म्हणून एकीकडे गिल्ला व गोंगाट करूं लागले. आणि दुसरीकडे "प्रजेच्या भाकरीची काळजी करण्याची जबाब-दारी आता आपणावर उरली नाहीं, ती ज्याची त्याने संभाळली आहे. आता आपलें काम म्हणजे स्वतःचें, स्वतःच्या कुटुंबाचें व परिवाराचें संरक्षण करणें एवढेंच उरलें" असें समजून सैन्याची जुळवाजुळव करण्याला राजाने संमति दिली. ही गोष्ट लोकसभेच्या कानावर आली तेव्हा तिला कात्रींत सांपडल्या-सारखें वाटूं लागलें.

प्रधानमंडळाकडून सैन्याचा जमाव व्हर्साइलच्या राजवाड्याजवळ न करतां पॅरिस शहराजवळच करण्यांत येत होता. याचें कारण, राजवाड्याला धोका येण्यापूर्वी प्रथम खुद्द पॅरिस शहरांतच दंगे-धोपे होतील असा अदमास होता. यामुळे ता. १ जुलै रोजीं राजाने लोकसभेला मान्यता दिली याचा जो आनंद लोकसभेच्या तोंडावर दिसत होता तो किंचित् मावळून, त्या जागीं ता. १० जुलैच्या सुमारास चिंतेची किंचित् छटा दिसूं लागली. शिवाय लोकसभा बोलावण्याचा मूळ सल्ला नेकर याने दिला व त्या कायद्याचा नायटा होऊन बसला, या भावनेने राणी व राजमंडळ यांचा नेकरवर जो राग झाला होता तो राग त्यांनी राजाच्या हातून आतां उगवून घेतला. नेकरच्या जागीं नवा मंत्री व त्याचे सल्लागार येणार ते लोकसभेचे शत्रु येणार हें उघड होतें. ते अधिकारारूढ होतांचे त्यांतील एकाने म्हटलेंच म्हणे कीं, "हे पाजी लोक भाकरीची ओरड कां करतात? गवत कां खात नाहीत?"

ता. १३ जुलै रोजीं नेकरच्या बडतर्फीचा निषेध करण्याकरितां सभेनें राजाकडे शिष्टमंडळ पाठविलें. त्याचें पुढारीपण व्हीएन नांवाच्या एका मोठ्या

धर्माधिकाऱ्याकडे देण्यांत आलें. त्याने राजाच्या तोंडावर स्वच्छ सांगितलें कीं, " आपण नेकरला नोकरींतून काढा; पण तो लोकसभेच्या मनांतून कधींच नाहीसा होणार नाही. आणि आपण नवे मंत्री नेमिले त्यांच्यावर लोकांचा विश्वास नाही." राजाने हें सर्व ऐकून घेतलें, उत्तर असें कांहीच दिलें नाही. नुकत्याच बडतर्फ केलेल्या नेकरला तो थोडाच परत बोलाविणार? पण तिकडे राजा आपला जुना अधिकार गाजवीत होता, तर इकडे लोकसभा स्वतःचे नवे अधिकार निर्माण करीत होती. मंत्रिमंडळाच्या अदलाबदलीला अनुलक्षून तिने कायमचा ठराव करून नोंदून टाकला तो असा कीं, " राजा कोणतेंहि प्रधानमंडळ नेमो, त्याच्या कारभाराचा जाब मागण्याचा अधिकार लोकसभेला पूर्णपणें राहील. तसेंच योग्य वाटल्यास त्याचा इनसाफ करून त्याला शिक्षा करण्याचाहि ! "

पण लोकसभेला हें कळेना कीं, या ठरावानें लोकांना जी 'भाकरी' पाहिजे होती, तिचा पुरवठा तावडतोब कसा होणार? तसेंच सैन्याच्या हाल-चाली दिसून येत, त्या पाहून जी भीति वाटे तिचें निवारण कसें होणार?

**गुंडांचा सुळसुळाट**

काय असेल ते असो, पॅरिस शहरांतील लोकांचीं मनें या वेळीं अतिशय अस्वस्थ झालीं होतीं. यामुळें नव्या असेंब्लींत काय कामकाज होत आहे यापेक्षां खुद्द शहरांत काय भानगडी होणार याकडे त्यांचें लक्ष अधिक लागलें होते. " पूर येऊन पाणी गढूळ झालें म्हणजे मासे आन्धळे होतात. तेव्हां मासेमाऱ्याचें काम चांगलें साधतें " अशी म्हण आहे. त्याप्रमाणें पॅरिसमधील जनतेच्या चिंताग्रस्त मनाचा फायदा मवाली गुंड लोकांनीं घेण्याला सुरवात केली व चोर–दरोडेखोरांचा सुळसुळाट झाला. १७८९ च्या एप्रील महिन्यापासून मवाली बदमाषांची भरती राज-धानींत होऊं लागली होती. किरकोळ लुटालुटी होत होत्या. आगी लागत होत्या. धान्य वगैरे बाहेरून येणारा माल क्वचित् मधूनच हातोहात लांबविला

जाई. शहराच्या वेशींतून हे पुंड जबरदस्तीनें संध्याकाळच्या वेळीं शहरांत घुसून जिकडे तिकडे पांगून जात. यामुळें त्यांना हुडकून बाहेर घालविणें पोलिसांना कठीण जाई. मैदानांतून मोठमोठ्या सभा भरवाव्या, व बेजबाबदार लोकांनी सरकारावर आणि समाजाच्या पुढाऱ्यांवर पाहिजे तसें तोंडसुख घ्यावें, त्या वेळचें एक भाषण कोणी टिपूनहि ठेवलेलें आहे. कॅमिल डेस्मॉलिन नांवाच्या एका मवाली वक्त्यानें खालीलप्रमाणें उघड उपदेश लोकांना केला.

"अरे, पाहतां काय! वाघ आयता पुरा जाळ्यांत सांपडला आहे. मारून काढण्याची हीच वेळ आहे. याहून अधिक लूट पुढें केव्हां एकल मिळणार नाहीं. अमीर उमराव, श्रीमंत सावकार, व्यापारी यांचीं चाळीस हजार घरें लुटावयाला सांपडतील. वेळींच किंचित् धाडस केलें तर बक्षिस खूप मिळेल!"

**अराजक माजूं लागलें**

सरकारी आधिकाऱ्यांकडून अशा गोष्टींचा बंदोबस्त होत नाहीं, असें पाहून लोकांनी 'मतदार-मंडळ' (कमिटी ऑफ इलेक्टर्स) या नांवाची समिती स्थापिली व तिला सर्व प्रकारचा कायदेशीर अधिकार असल्याचा बहाणा सुरू केला. होटेल डी व्हील नामक इमारतींत रोज रात्रीं या समितीच्या बैठका भरूं लागल्या, व पॅरिसमधील बंडाळीचा बंदोबस्त कसा करावा, याची चर्चा होऊं लागली. सैन्यांतील शिपाई लोक मैदानी सभांना हजर राहिलेले आढळून येऊं लागले. सभांतून त्यांची उघड स्तुति होऊं लागली. "सैनिकांना भिण्याचें आपणाला काय कारण? ते जनतेंतलेच आहेत. त्यांना पगार मिळतो तो राजाच्या खाजगी खजिन्यांतून मिळत नाहीं, राष्ट्राच्या खजिन्यांतूनच मिळतो. मग प्रसंग पडला तर सैन्य कोणाची बाजू घेईल? कोणाचें काम करील? राजाचें का राष्ट्राचें? ज्याचा पगार त्याचीच हुकमत हें उघड आहे" इत्यादि. हे सैनिकहि उलट सहानुभूतीचा जाब देत आणि म्हणत "चालू द्या. तुम्ही करीत आहां तें

ठीकच आहे. लोकांच्या खऱ्या हिताचें आहे, वेळ येईल तेव्हां आम्हीही पाहून घेऊं." आणि याचा प्रत्यय ता. २४ जून रोजीं आलाहि होता. कारणं अशाच एका सभेवर हल्ला करून ती मारून काढण्याचा हुकूम झाला असतां तो हुकूम अमान्य केल्याबद्दल कर्नल चातेल यानें कांहीं थोडे सैनिक नुसते पकडून बराकींत ठेविले होते; पण ता. २४ रोजीं सैन्याचा उपयोग करावा लागेल असें पाहून दारूगोळा वाटून होतांच लष्करी शिपाई बराकींतून बाहेर पडले, व कनिष्ठ लोकसभा (थर्ड इस्टेट) इच्या नांवानें त्यांनीं जयजयकार केला! मवाली गुंडांनी त्यांचें स्वागत करून त्यांना फुकट दारू पाजली. बराकींत परत आल्यावर त्यांना अटकेंत ठेविण्यांत आलें. पण तिसऱ्या दिवशीं लुस्तलो नांवाचा गुंड उठला. त्यानें लोक जमविलें. बराकीवर हल्ला करून हे शिपाई सोडविले. आणि अखेर या गोष्टीकडे काना डोळा करण्यांत येऊन असेंब्लीनें राजाकडून त्यांना माफी देवविली!

हें पाहून मतदारसमितीनें स्वतःचें एक लष्करी स्वयंसेवक पथकच बनविलें. कारण १२ जुलै रोजीं मवाली गुंडांचा हल्ला पॅरिस शहरावर होणार अशी दाट वदंता उठली होती. इकडे राजा लोकसभा बरखास्त करणार, व खजिन्यांतून होणारा खर्च यापुढें बंद करावा असा हुकुम देणार, अशी बातमी पसरली. पूर्वी 'सेंट बार्थोलोम्यु' सणाचे दिवशीं प्रॉटेस्टंट लोकांची जंगी कत्तल झाली तशी आज रात्रीं होणार अशी गप्प ठोकून देऊन, डेस्मॉलिन कॅमिल या पुढाऱ्यानें ज्याला जें शस्त्र हातीं लागेल तें घ्यावें असा उपदेश उघड चालविला. दहा हजार लोक मिळतील तीं हत्यारें घेऊन राजवाड्याच्या आसपास जमले. एका सरकारी पलटणीवर दगडफेंक झाली. बागेंत बसण्याकरितां मांडलेल्या खुर्च्या त्यांजवर फेकण्यांत आल्या. तथापि पलटणीचे लोक पुष्कळसे शांतपणें वागले, व परत बराकींत निघून गेले. गुंडांचे पुढारी म्हणूं लागले, "बाबाहो! आतां हातीं घेतलेले काम पुरें करा, नाहीतर फासा-

वर लटकण्याची पाळी येईल." तेव्हां गांवांत दुकानांची लुटालूट सुरू झाली. समितीच्या संरक्षक स्वयंसेवक पथकाचे कांहीं चालेना. उलट तिच्या इमारतीलाच बदमाषांनीं गराडा घातला. रोटीवाल्यांच्या दुकानावर धाड पडली. 'लाफोर' नांवाच्या एका लहानशा तुरुंगावर हल्ला होऊन त्यांतील कैदी सोडण्यांत आले. शहरच्या मॅजिस्ट्रेट लोकांना काय करावें हेंच समजेना! सरकारी दारूगोळा काडतुसें बदमाषांच्या हातीं पडूं नयेत म्हणून तीं सैन्यांत वाटून दिलीं, याचाच उलट गवगवा करण्यांत आला. मवाली पुढारी म्हणूं लागले, "हें पहा सरकारनें चढाईचें लष्करी धोरण स्वीकारलें."

पण खरोखर या लोकांवर हल्ला करण्याचा हुकूम राजाकडून सुटलेला नव्हता. ता. १४ जुलै रोजीं सकाळीं सरकारी दारूगोळा ठेवण्याचें एक ठिकाण 'होतेल इनव्हॅलिद' नांवाचें होतें त्यावर लोकांनी जमावानें हल्ला करून कांहीं लहान मोठ्या तोफा व बत्तीस हजार बंदुका काबीज केल्या. पण दारूगोळ्याचा मुख्य साठा 'बास्तील'च्या किल्ल्यांत ठेविलेला असतो, या समजुतीनें तो हस्तगत करावा अशी शक्कल निघाली. तसेंच या किल्ल्यांत राजानें जुलुमानें ठेवलेले लोक असतात, म्हणून किल्ला सर करून या कैद्यांना सोडविणें हा राजाच्या जुलमी अधिकाराचा उघड निषेध करण्याचा मोठा चित्ताकर्षक प्रकार होईल, या कल्पनेची त्यांतच भर पडली.

----------

# स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ

**बास्तिलचा किल्ला**

वास्तविक बास्तिल हा केवळ नांवाचा किल्ला होता. त्याच्या तटावर उभारलेल्या तोफांतून फक्त सणावाराचे दिवशीं वांझे बार निघत. आजपर्यंत या तोफा पाहून लोकांना कधींच भीति वाटली नाहीं. पण मनाच्या विकाराने डोळ्यांना विपरीत दिसूं लागतें त्याप्रमाणें याच तोफांचा देखावा लोकांना भयंकर वाटूं लागला. म्हणून दंगेखोरांच्या समाधानाकरिता मतदारसमितीने मुद्दाम या किल्ल्याच्या किल्लेदाराला निरोप पाठवून या तोफा तटाच्यामागे ओढून घेऊन दिसेनाशा केल्या. शिवाय किल्लेदाराने या तोफा कशा निरुपद्रवी आहेत हें एका शिष्टमंडळाला प्रत्यक्ष दाखविलें व स्नेहभावानें त्याला फराळाला ठेवून घेतलें. पुनः आणखी एक पुढारी आंत गेला. त्याला जेलरने किल्ल्यांतले सगळे 'दुबळे हशम प्यादे' दाखविले. आणि शेवटीं जेथून तोफा तटांतून मागे ओढून घेतल्या होत्या तेथलीं खिंडारें फळ्या घालून बुजविलीं! अशा रीतीने बोलणें करावयास गेलेल्या पुढाऱ्यांचें समाधान झालें.

**बास्तिलवर हल्ला**

ते बाहेर पडल्यावर किल्लेदारानें नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें खंदकावरील तक्त्यांचा पूल साखळ्यांनीं वर ओढून घेतला. पण दैव सगळें कांहीं विपरीत करतें! पूल ओढून घेणें हीच शत्रुत्वाची खूण समजून दोघे जवान पुढे सरसावले. त्यांनी कुऱ्हाडींनी मोड-

तोंड करून पूल फिरून खंदकावर आडवा पाडला. त्याबरोबर दंगेखोर लोक त्यावरून किल्ल्यांत शिरले. त्यांनीं आंतील सरकारी शिपायांवर गोळीबार सुरू केला. अर्थात् किल्लेदाराला उलट गोळीबार करण्याचा हुकूम देणें भागच पडलें ! प्रथम दंगेखोर किंचित् मागे हटले, पण सरकारी लष्करांतील कांहीं शिपाई लवकरच त्यांच्या मदतीला धाऊन आले. मग किल्लेदाराला शरण यावें लागलें ! पण त्याला दिलेलें वचन मोडून बंडखोरांनीं पुढील तास-अर्ध्या तासांत त्याचा खूनच केला; त्याचें डोकें कापून भाल्यावर लाविलें; व आणखी कांहीं लोकांना मारून, आंतील कैद्यांना बंधमुक्त करून, आपला विजय गाजवीत बंडवाले बाहेर पडले. सोडविलेले कैदी अवघे सात आणि तेहि अगदीं क्षुद्र होते ! त्यांचा राजकारणाशीं खरोखर कांहींच संबंध नव्हता. पण बंडखोरांनीं त्यांची मिरवणूक राजरस्त्यांतून काढली.

किल्ल्यांतील लूट व निशाणें घेऊन बंडवाले ‘ मतदारसमिती ’च्या इमारतींत शिरले. समितींतील एक दोन सभासदांना ठार मारून त्यांचीं मुंडकीं मैदानांत टांगण्यांत आलीं. तें पाहून बायकापोरेंहि एक प्रकारचा हर्षवायु होऊन नाचूं लागलीं. “ बास्तिल किल्ल्यांतील तुरुंगांत बंदिवानांचे छळ करण्यांचीं यंत्रें आम्ही पाहिलीं. तीं फार भयंकर होतीं ! ” अशा कंड्या बंडखोरांनीं उठविल्या.

**लोकसभेंत रक्तपाताचें मंडन**

अशा रीतीने रक्तस्त्रावाची लालसा मुद्दाम जागृत करण्यांत आली. लोकसभेच्या पुढाऱ्यांना हा सर्व प्रकार मोठा भयप्रद वाटला. त्यांतील एक मिराबो याने तर बंडखोरांचें वर्णन निषेधप्रदर्शक अशा योग्य शद्बांनीं लिहून ठेविलें आहे. पण आयती परस्पर गोष्ट झाली व तिचें श्रेय सहज मिळतें, तर कां घेऊं नये ! या बुद्धीने दुसऱ्या दिवशीं, “ पॅरिसच्या लोकांनीं राजाच्या जुलुमाविरुद्ध काल मोठा जय मिळविला ” असे उद्गार लोकसभेंत ऐकूं येऊं लागले. आदल्याच

दिवशीं " या दंगेखोराविरुद्ध कांहीं संरक्षणाची तजवीज केली पाहिजे, " " पॅरिसचें बदनाम होऊं देतां कामा नये, " अशी भाषा सुरू होती. पण दुसऱ्या दिवशीं सर्व दोष किल्लेदारावर लादण्यांत येऊन " झालें तें ठीक " असें समर्थन करण्यांत येऊं लागलें. झाला तो न्याय झाला, किल्लेदाराचा ' खून ' झाला नाहीं, त्याला फक्त आपल्या पापाचें प्रायश्चित्त भोगावें लागलें असा उलटा युक्तिवाद करण्यांत येऊं लागला !

ता. १४ जुलै रोजीं नॅशनल असेंब्लीची बैठक साऱ्या रात्रभर चालू होती. राजाला सर्व प्रकार गैरवाका समजाविण्यांत आला. दुसऱ्या दिवशीं राजाने जातीने असेंब्लीला भेट दिली. तिचें कौतुक वाटून सभासदांनीं त्याचा जयजयकार केला. राजा निघून गेल्यावर लोकसभेने आपल्या खास सैन्याची योजना निश्चित केली. त्याचा मुख्याधिकारी म्हणून जनरल लाफायत यास नेमलें, आणि बेली या नांवाच्या सभासदाला त्यांनीं पॅरिसचा ' मेयर ' म्हणजे नगराध्यक्ष केला.

**तोंड दाबून बुक्क्याचा मार**

ता. १७ जुलै रोजीं राजा उघड्या गार्डांतून व्हर्साइल येथील राजवाड्यांतून पॅरिसला आला. त्याच्याबरोबर लोकसभेचे बरेच सभासद होते. झाला हा सर्व प्रकार लोकसत्तेचा विजय होय असें भासविण्याकरिता अमीर उमराव, धर्माधिकारी, व त्यांतच सरमिसळ खेडवळ लोक, असे मिळून मिरवणुकीच्या थाटाने चालत होते. शहराच्या मुख्य वेशीजवळ नगराध्यक्ष राजाला सामोरा गेला व त्यानें वेशीच्या किल्ल्या औपचारिक रीत्या राजाच्या हातीं दिल्या. राजा मनांतून रुष्ट होता, पण बिचारा करतो काय ? बास्तिल किल्ल्याजवळून जातांना त्याने दृष्टी दुसरीकडे वळविली; इतकेंच नव्हे तर लोकसत्तेची खूण म्हणून एक तिरंगी टोपी बनविण्यांत आली होती तीहि राजाने लोकांना खूष करण्याकरितां आपल्या डोक्यावर घातली ! लोक म्हणूं लागले, " आता मात्र फ्रान्सचा राजा हा फ्रेंच लोकांचा राजा खरा. आता आम्ही दोघे मिळून सर्व युरोप जिंकूं ! "

## मुहूर्तमेढ

राजा उच्चासनावर बसल्यावर अनेक सभासदांनीं त्याच्या स्तुतिपर भाषणें केलीं. पण त्यांत त्यांनी लोकसत्तेचें महत्त्व मनसोक्त गाइलें. " लोक व सरकारी अधिकारी यांच्यांत विरोध वाढूं लागला होता तो राजेसाहेबांनीं मिटवून दिलजमाई केली, " असें त्याचें दिखाऊ वर्णन करून त्याला ऐकविलें. हें सर्व चाललें असतां राजाचा चेहरा गोरामोरा झालेला दिसत होता. कांहीं शब्द ऐकून तर कानांत बोळे घातलेले बरे असें त्याला वाटले असेल ! पण सापळ्यांत सापडलेल्या वाघाप्रमाणे त्याचा सर्व गोष्टींत नाइलाज झाला होता. बास्तिलच्या किल्ल्यावर राजाचा पुतळा उभारण्याची शक्कल निघाली, व राजाला त्या गोष्टीला संमति द्यावी लागली ! बास्तिलच्या विध्वंसाला एक प्रकारचा पवित्रपणा येऊन, त्या किल्ल्याचे दगड कांहीं कांहीं भोळ्या भाबड्या बायकांनीं आपल्या घरीं नेऊन दर्शनीय वस्तु म्हणून सजवून ठेवले, तर कांहीं लबाडांनीं ते दगड पंढरपूरच्या गोपीचंदनासारखे व तुळशीमाळांसारखे किंमत घेऊन विकले !

**महाजनो येन गतः स पंथाः**

इतका गोंधळ झाला तरी बाहेर देशांत पॅरिस शहराची कीर्तिच झाली, व कीर्तिमागून अनुकरण सुरू झालें. प्रत्येक जुनें सरकारी ठाणें किंवा गढी या जणुं काय बास्तिलचा किल्ला असें मानण्याचा प्रघात पडला. लष्करी शिपायांनीं नोकरी सोडून स्थानिक बंडखोरांत मिसळणें, एखाद्या मॅजिस्ट्रेटाला कज्जा करून मारणें, यांत विशेष कांहींच नाहीं अशी भावना देशभर पसरली. जो तो हक्काची व हुकुमाची नवी भाषा बोलूं लागला. अधिकाऱ्यांचे हुकूम मानणें ही गोष्ट उरली नाहीं. फ्रान्समधील साठ परगण्यांपैकीं प्रत्येकाला आपण स्वतंत्र आहों असें वाटूं लागलें. पॅरिसमध्ये व्यक्तिशः अत्याचार सुरू झाले ते पुढे केव्हांहि थांबले नाहींत. कोणाचा " खून होऊन रक्तपात झाला " असें एकानें म्हटलें तर दुसऱ्यानें म्हणावें " अहो, तें रक्त अशुद्ध होतें. तें काढून टाकलें हेंच बरें

झालें." पॅरिसमधील अत्याचारांची आग हळूहळू बाहेर देशभर भडकली. सर्व अधिकारी वर्गाला दहशत बसली. राजाचा अधिकार चालवावा खरा; पण जो राजा आपल्या अधिकाऱ्यांचें संरक्षण करूं शकत नाहीं त्याचा अधिकार तरी कां चालवावा ? अशा विचाराचा मोह खुद्द अधिकाऱ्यांनाच पडूं लागला. व्यापाऱ्यांचीहि तीच गत. व्यापार सर्रास चालता तर लोकांना अन्नसामुग्री जरूरीपुरती मिळाली असती; पण जवळचा माल बाहेर काढावयाला व्यापारी भिऊं लागले. "वरिष्ठ वर्गाच्या लोकांनी धान्याचा नाश करून उपासमारीनें आम्हांला शरण आणण्याचा घाट घातला असावा" असें लोक म्हणूं लागले. एक पाय डोंगराच्या कड्यावर कसा तरी चिकटून राहिला आहे, पण दुसरा खाली दरीकडे लोंबत आहे, केव्हां कडेलोट होईल नेम नाहीं, असें ज्याला त्याला वाटूं लागलें. कर्जदारांना सावकारांचीं कर्जें बुडविण्याचा विचार सुचूं लागला. सावकारांचीं दप्तरें लुटावीं आणि त्यांचें कागदपत्र जाळावे हें सुरूं झालें. राखीव रानें उध्वस्त होऊं लागली, अमीरउमरावांच्या बागांतून व शिकारखान्यांतून, फार काय राजवाड्याच्या तटाखालच्या रानांतून, लोक परवानगीवांचून घुसून शिकार करूं लागले !

**कायद्याचा बोजवारा**

पण मौज ही कीं, प्रथम दंगेखोरांविरुद्ध म्हणून जे उठले ते पुढें स्वतःच दंगेखोर बनले ! हळुहळू कायदा असा अस्तित्वांत राहिला नाहीं. मग सरकारी कर वगैरे वसूल होण्याची काय स्थिती असेल याची कल्पना करावी. मध्यम वर्ग हा केवळ सुधारणावादी होता. त्याला खरें खुरें बंड नको होते. पण सुधारणा पदरांत पडण्याला क्रांतीचें जें दहशतीचें यंत्र त्यांनीं उभें केलें त्यांतून प्रत्यक्ष अत्याचार निघूं लागले. आणि या अत्याचारापासून आपलें रक्षण कसें होईल याची काळजी करण्याची पाळी स्वतः या सुधारणावादी लोकांवरच आली. म्हणून समाजाचा बचाव करण्याचें कामों, राजाधिकाऱ्यापेक्षां राजाधिकाराला प्रथम

विरोध करणारे लोकच पुढें अधिक लक्ष घालूं लागले! या लोकांनी या कार्याकरितां स्वतःकडे जे अधिकार घेतले त्यांना प्रथम कायदेशीर अधिष्ठान नव्हतें. पण तें हळूहळू आपोआप येऊं लागलें. पॅरिसप्रमाणें बाहेर इतरत्र सर्व देशभर हीं अधिकार-मंडळें स्वयंभू निर्माण झाली. क्रांतींतून नवें सरकार व अव्यवस्थेंतून नवी व्यवस्था निर्माण करूं पाहणाऱ्या मंडळांना 'कॉम्यून्स' हें जुनें नांव नवें होऊन प्रतिष्ठा पावून मिळालें. या मंडळांतील लोकांची नेमणूक जशी राजानें केलीं नव्हती तशीच पण त्यांची निवडणूकहि कोणा कायद्यानें रीतसर झाली नव्हती. हीं मंडळें व म्युनिसिपालिट्या कोठे समव्याप्त तर कोठे वेगवेगळ्या असत; म्हणून कित्येक वेळां हीं 'कॉम्यून्स' व या म्युनिसिपालिट्या यांचा परस्पर विरोधहि येई. यामुळें तेथें अखेर व्यवस्थेपेक्षां अव्यवस्थाच अधिक वळावूं लागली. सूड घेण्याची बुद्धि इथून तिथून सर्वांच्या डोक्यांत डोकावूं लागली. आणि जो कोणी आपला शत्रूसा वाटे त्याला कॉम्यून किंवा म्युनिसिपालिटी यांच्या हुकुमानें पकडून शिक्षा कशी करतां येईल हा ध्यास ज्याला त्याला लागला.

लोकांचें समाधान करावें म्हणून राजाने नेकरला पुनः प्रधानपद दिलें. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. शिस्तीची तरवार राजाच्या हातून गळून पडली; पण ती नॅशनल असेंब्लीच्या हातीं आली नाहीं. मध्यंतरी ती अशा लोकांच्या हातीं पडली कीं, तिचा दुरुपयोग करून हे नरमांसभक्षक रानटी लोकांप्रमाणें क्रूर तरी बनतील किंवा त्यांनाहि कोणी वस्ताद भेटला म्हणजे त्यांचे बंदे गुलाम होतील! राजा हळूहळू सुधारणावादी लोकांना वश होत चालला. त्यानें नवीन प्रधान किंवा मंत्री नेमताना ते नवमतवादी असेच पाहून घेण्याला प्रारंभ केला. असेंब्लीलाहि त्याने जवळजवळ असा परवाना दिला कीं, "तुम्हाला योग्य वाटेल ते तुम्हीं करा, व तुम्हीं कराल तेंच कायदेशीर असे मी समजेन. तुमचे अधिकारी जें काय करतील त्याला तुमच्या लोकसभेची तरी मंजुरी मिळाल्याची खबरदारी घ्यावी म्हणजे झालें!"

सुधारणावादी लोकांत कायदेपंडित होते त्यांना अमुक गोष्ट कायदेशीर आहे कीं नाहीं, व कायदेशीर नसेल तर ती कशी करावी, याविषयीं थोडी तरी चिंता वाटे. पण सामान्य जनतेला विधिनिषेध कांहींच वाटेना. यामुळें या दोन बुद्धींचा मेळ कसा घालावा याची चिंता खुद्द या राज्यक्रांतीच्या चालकांनाच पडूं लागली.

ता. ४ ऑगस्ट रोजीं कौंट नोएल याने लोकसभेंत उठून असा ठराव मांडला कीं, "देशांतील असंतोषाचें खरें कारण 'फ्यूडल सिस्टिम' म्हणजे जमीनदारी पद्धति ही आहे. म्हणून ही पद्धति यापुढे नाहीशी करावी." आपल्या म्हणण्याला तेज यावें म्हणून तो म्हणाला, "मी स्वतः एक ड्यूक व जमीनदार घराण्यांतला आहेना! पण मीच ह्या जमीनदारीवर हें पाहा आपल्या हाताने पाणी सोडतों." गोष्ट अशी होती कीं, हा ड्यूक केवळ नांवाचा ड्यूक होता. तो आपल्या घराण्यांतील धाकट्या पातीचा वतनदार असल्यामुळें त्याला खरोखर जमीनच नव्हती! पण 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र' ठेवावयाला कुणाचें काय जातें? मग एक बिशप उठला. त्याने धर्माधिकारी वर्गातर्फे म्हणून या ठरावाला संमति दिली. पण खरोखर त्याचेंहि व्यक्तिशः त्यांत फार नुकसान नव्हतें. अशा रीतीने परस्पर (!) स्वार्थत्यागाची अहमहमिका सुरू झाली. आणि 'केवळ वरिष्ठ वर्गाचा स्वाहाकार झाला येवढ्यानेच स्वातंत्र्य प्रस्थापित झालें' अशा समजुतीने राजाच्या नांवाने जयजयकार करण्यांत आला. लोकसभेला आपण केलें याची धन्यता वाटली. ता. ४ व ५ ऑगस्ट यांचे दरम्यान या स्वाहाकाराचे मंत्र नवे रचून व म्हणून पुरे झाले. मात्र याविषयीं मंजूर झालेल्या तीस निरनिराळ्या ठरावांची परस्पर संगति कशी घालावी हे लोकसभेंतील जाणत्या लोकांना मोठें कोडें होऊन राहिलें. आशावादी लोकांना वाटलें कीं, या बलिदानाने तरी यापुढे क्रांतीचा समंध शांत होईल!

सर्व जनता अशा रीतीने एकाच दर्जावर आली. तेव्हां आतां

**समान हक्काचा जाहिरनामा**

समानतेच्या हक्काचा म्हणून एक जाहीरनामा काढावा असें ठरलें. या जाहीरनाम्यांतील बहुतेक कल्पना दहा वर्षांपूर्वी अमेरिकेने काढलेल्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांतून उचलल्या होत्या. शिवाय कांहीं थोड्या खास खुद्द फ्रेंच जनतेच्या म्हणून होत्या. निवडणुकीच्या बरोबर 'तक्रारअर्ज' तयार व मंजूर झाल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. त्या तक्रारअर्जांतून कांहीं कल्पना घेतल्या होत्या. या जाहीरनाम्याचा एकंदर झोक असा होता कीं, "आपण स्वातंत्र्य प्रस्थापित करणार ते केवळ फ्रान्सपुरतें नसून जगांतील सर्व देशांकरिता समजावें. सर्व जगाला पुढील सर्व काळपर्यंत फ्रान्समधील जननेचें स्वातंत्र्य हें आदर्शभूत राहावें." पुष्कळ जाणत्या प्रतिनिधींनी या शेफारलेल्या अहंकारबुद्धीचा उपहास केला. "खुद्द रूसोने हा जाहीरनामा पाहिला तर तोहि त्याला हसेल किंवा भिईल कीं!" असें कांही म्हणाले. स्वतः मिराबोसारख्या जहाल म्हणविणाऱ्या पुढाऱ्याचेंहि मन गांगरलें. त्याचें म्हणणें असें कीं, "आधीं पक्की राज्यघटना तयार होऊं द्या; मग स्वातंत्र्याचा व समानतेचा जाहीरनामा काढणें योग्य होईल. लोकांच्या हक्काबरोबर त्यांच्या कर्तव्यांचाहि उच्चार झाला पाहिजे. तो करतानांच हक्कांना योग्य बंधनें पडावीं तीं पडतात. म्हणून केवळ हक्कांचा असा एकतर्फी जाहीरनामा काढणें बरोबर नाहीं. समाज–व्यवहारांत, राजकीय व्यवहारांत, पदोपदीं मर्यादा पडतात व घालाव्याहि लागतात. त्यांच्या रेघांवरून लोकांचा हात आधीं फिरवून, त्या मर्यादांचा परिचय त्यांना करून द्यावा. मग उरलें तें सर्व तुमचेंच स्वातंत्र्य असें त्यांना सांगावें. याच्या उलट, आज तुम्ही करीत आहां तें असें कीं, सर्व जनतेला तुम्हीं डोंगराच्या माथ्यावर नेऊन सर्वांना मिळून सांगणार कीं, खालीं सभोंवार दिसतो तो सर्व प्रांत, ती सर्व जमीन, तुमची समाईक आहे.

आणि मग खालीं उतरून जो तो व्यक्तिशः सगळी जमीन माझी म्हणूं लागेल तेव्हां तंटे माजतील!" पण मौज ही कीं, मिराबोचें म्हणणें अमान्य करून, समानतेच्या नांवानें हा असा जाहीरनामा काढावा म्हणणाऱ्यांमध्यें वरिष्ठ वर्गांतीलच कांहीं लोक प्रमुख होते. याला उद्देशून एका इतिहासकाराने असें म्हटलें आहे कीं, "न जाणों, या लोकांच्या मनांत असें असेल कीं, जनता आपल्या मरणाने मरावी! स्वातंत्र्याचा इतका मोठा घांस तिला एकदम चारावा कीं तो तिला गिळतां येऊं नये, व गिळला तरी पचूं नये!"

हा जाहीरनामा नव्या होऊं घातलेल्या राज्यघटनेचा सरनामाच म्हणायास हरकत नाहीं. निदान तसा व्हाणा तरी होता. परंतु पुढें प्रत्यक्ष झालेली घटना पाहावी तर तिच्या प्रास्ताविक स्वरूपाला साजेसा हा सरनामा नव्हता. कारण प्रत्यक्ष घटनेंत स्वातंत्र्य, समता, बंधुता यांना फारसा ठावठिकाण नव्हता! आणि या सरनाम्यांत तर! या उदारमतवादी त्रयींचा अमर्यादित पुकारा केला होता. मिराबोसारख्या जहाल लोकसत्तावादी पुढाऱ्यालादेखील असें वाटलें कीं, "फ्रेंच जनतेच्या देवळाच्या गाभाऱ्यांत या त्रिमूर्तीची स्थापना व्हावी व होणारहि आहे. पण ती पक्की होईल तेव्हाच दारावरचा पडदा उचलून त्रिमूर्तीचें दर्शन देणें हे हिशेबी होईल. आज आपण हा जाहीरनामा काढून पडदा वर उचलू खरा, पण आंत या त्रिमूर्तीचें दर्शन कसें घडणार? जाहीरनाम्यांत मनुष्याचें जे मूलभूत म्हणून हक्क सांगितले, ती कांहीं साधी सुधी गोष्ट नाहीं. तें एक जालीम रसायन आहे. तें पचनी पडावयाचें तर त्या आधीं चांगली सोयीची राज्यघटना बनविली पाहिजे, शांतता व सुराज्य स्थापिलें पाहिजे, आणि जनतेच्या अंगीं हें रसायन पचविण्याची शक्ति आली म्हणजे मग तें तिला प्यावयाला दिलें पाहिजे. नाहींतर धोका ठेवलेला आहे. असो. या जाहीनाम्यांतील हक्क फ्रेंच जनतेच्या पदरीं पुढें केव्हांहीं पडलें नाहींत. एकानें असें म्हटलें आहे कीं, "१७८९ मध्यें स्वतंत्रता देवीच्या देवळांत

हा पडदा उचलण्याचा प्रयत्न प्रथम झाला; पण लगेच तो पडदा खालीं टाकून दिला गेला. १७९३ च्या लोकांनीं तो फाडण्याचा प्रयत्न केला; पण १७९५ मध्यें पुन्हां टांके मारून तो शिवला गेला. आणि आजवर त्यानंतर तो पडदा पुरा उचलला गेलाच नाहीं."

**राजमंडळाची चिंता**

मूलभूत हक्कांची ओरड व जयजयकार मधून मधून मोठमोठ्यानें ऐकूं येई. पण तो केवळ प्रतिक्रिया म्हणून होता. कारण राजा, राणी किंवा राजमंडळ यांच्यापैकीं कोणी उचल केली म्हणजे तेवढ्यापुरती लोकसभेंतील पुढाऱ्यांना मूलभूत हक्कांची आठवण व्हावयाची. ही उचल होण्याचें कारण असें कीं, सर्व राजमंडळ स्वतःच्या सुरक्षिततेबद्दल सहजच हळुहळू साशंक होत चाललें होतें. लोकसत्तेच्या खुद्द पहिल्या पुढाऱ्यांच्या हातीं देखील जर लोकसभा राहण्याचीं चिन्हें नव्हतीं, तर उतरणीला लागलेला हा गाडा राजमंडळाला कसा वर ओढून धरतां आला असता ? म्हणून मिराबोसारखे जहाल पुढारी आणि लाफायत यांसारखे राष्ट्रीय सैन्याचे मुख्याधिकारी यांनाच आपले समजून त्यांच्या मार्फतीनें तरणोपाय दिसला तर पाहावा, एवढीच आशा काय ती राजमंडळाला होती. लाफायत हा स्वभावानें उमदा आणि मिराबो हा स्वार्थी व संधिसाधु असल्यामुळें, खरोखरच त्या दोघांना जवळ करून, त्यांना अधिकाराच्या जागा देऊन राजमंडळानें सलोख्याचा प्रयत्न केला असता तर कांहीं साधला असतां; पण लोकसभेच्या पहिल्या उसळीच्या वेळीं या दोघांनी दाखविलेल्या जहालपणाबद्दल त्यांच्यावर राजमंडळाचा राग झाला होता. तो कायम होता. यामुळें तें मंडळ या दोघांनाहि जवळ करीना. आणि तिकडचें संधान जमत नाहीं असें जेव्हा मिराबोनें पाहिले, तेव्हां त्याला अखेर उद्गार काढावे लागले कीं, "राजा, राणी व राजमंडळ आता वाचण्याची आशा नको. हे खवळलेले लोक त्यांचे मुडदे पाडल्याशिवाय राहणार नाहींत."

तथापि आपल्या जीवाची आशा ही प्रत्येकाला असतेच. त्याप्रमाणे राजमंडळाला एकच उपाय वाटे तो हा कीं, लोकसभेंत दुफळी माजली व तिची लोकप्रियता बाहेर कमी झाली, म्हणजे तरी आपण देशांतील राजनिष्ठ जनतेकडून या क्रांतीवर प्रतिक्रांति लढवूं. लोकसभा भरल्याबरोबर पोटभर भाकरी मिळण्याचा बंदोबस्त होईल अशी भुकेल्या जनतेची सहजच अपेक्षा होती पण ती फसली; तेव्हां जनता लोकसभेवर सहजच थोडीशी नाराज झाली. समता, बंधुता, स्वातंत्र्य यांचा लालभडक झगझगीत जाहीरनामा निघाला, तो केवळ वीज चमकल्यासारखा ठरला. म्हणजे त्याने क्षणभर लोकांचे डोळे दिपविले. पण लगेच फिरून लोकांचे डोळ्यांपुढे पूर्वीहून अधिक अंधकार उभा राहिला !

या जाहीरनाम्यानंतर राज्यघटनेच्या कलमांची चर्चा सुरू झाली.

**प्रतिक्रांतीचा निष्फळ प्रयत्न**

आणि विधायक कार्य म्हटलें म्हणजे तें रुक्ष ! भावनावश माणूस त्यांत कशाला लक्ष घालील ! स्वराज्याचे, स्वातंत्र्याचे काव्यमय रसभरित पोवाडे गाणारा मनुष्य हाच सामान्य लोकांना खरा देशभक्त वाटतो आणि राज्यघटनेचीं कलमें बनवीत बसणारा मनुष्य व्यर्थ कागदकुत्र्या, रिकामटेकडा, असें त्यांना वाटतें. यामुळे “ भाकरी देतां येत नाही तो स्वराज्य काय देणार ? व देऊन कसलें देणार ? ” असा निंदेचा प्रवाद लोकसभेविरुद्ध उठूं लागला. राजमंडळाला वाटलें कीं उलट्या क्रांतीचें वादळ उठवावयाला आतां ही संधि बरी आहे. त्याने हळूच हवेंत एक सूचना फुंकून पसरून दिली कीं हवा होता तो हक्कांचा जाहीरनामा फडकावून झाला, क्रांति हवी होती ती झाली, तेव्हां आता लोकसभा बरखास्त करण्याला काय हरकत ? परंतु राजमंडळाची ती युक्ति साधली नाही. उलट ही बातमी बाहेर फुटल्याने लोकसभेंतील पुढारी सावध होऊन, नेमस्त होते तेहि जहालपणाकडे झुकूं लागले. तोंडांत, डोळ्यांत धूळ न शिरतां वादळ चालू राहिलें तर तें त्यांनाहि हवेंच होतें.

# ७ राज्य-घटना-मंडळांतील चर्चा

फ्रेंच राज्यक्रान्तीच्या सुरुवातीसच राज्यघटना–मंडळ स्थापलें जाऊन, त्यांत भावी राज्यघटना कशी असावी याविषयीं जी चर्चा झाली ती फार बोधप्रद आहे. ता. २७ ऑगष्ट सन १७८९ पासून ता. १ ऑक्टोबरपर्यंत म्हणजे सुमारें पांच आठवडेपर्यंत ही चर्चा सतत सुरू होती. राज्यकारभार कोणी करावा? तो कसा करावा? त्यांत हुकूम देणारा एक, हुकूम अमलांत आणणारा दुसरा, या दृष्टीने तरी अधिकारी मंडळांत श्रेष्ठकनिष्ठभाव व त्या मानानें सत्ता असावी कीं नाही? कायदे करण्याचा अन्तिम अधिकार कोणाचा असावा? त्यांत दुरुस्ती करावयाची तर कोणी करावी? कायदा करणारे व कायदा अमलांत आणणारे यांचे परस्पर संबंध कसे असावे? धर्म-मंडळासारख्या ज्या आगंतुक उपाधि राज्याला पुष्कळ काळपर्यंत चिकटून बसलेल्या होत्या, व त्यामुळें ज्यांना बांडगुळाचें स्वरूप आलें होतें, त्या उपाधि काढून टाकाव्या कीं नाही? जर त्या राहूं दिल्या तर त्यांचा संबंध राज्यघटनेंत काय राहावा? राज्याला राजा म्हणून कोणी असावा कीं नाही? व असला तर त्याचे अन्तिम अधिकार काय असावेत? आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, किरकोळ बाबी सोडून दिल्या असतां, एकंदरीने राज्यघटना एकदा बनली तर ती फिरून दुरुस्त करावयाची कीं नाही? व करावयाची तर तो अधिकार अखेर कोणाला

**भावी घटनेची चर्चा**

असावा? इत्यादि प्रश्न राज्यघटना-प्रकरणांत उपस्थित होतात हे अलीकडील अनुभवावरून वाचकांना माहीत असेलच.

**घटना करण्याचा अधिकार कोणाचा?**

राज्यघटना-मंडळ बनवावयाचें तर केव्हां व कोणी बनवावें या प्रश्नाचें उत्तर एकच असूं शकतें. तें हेंच कीं, ज्याच्या हातीं विद्यमान काळीं राज्यकारभाराची अन्तिम सत्ता आली त्यानेच राज्यघटना करावी. किंबहुना यापुढेहि जाऊन असें म्हणावें लागतें कीं, केवळ ही तात्त्विक सत्ताच नव्हे, परंतु ती कार्यकारी व प्रभावी करण्याकरिता लागणारी जी दंडशक्ति म्हणजे लष्करी सत्ता व सामर्थ्य हीं ज्याच्या हातीं असतील त्यानेच, व तीं हातीं येतील तेव्हांच, राज्यघटना-प्रकरण उपस्थित करणें शोभतें. एरवीं अन्तिम सत्ता परक्याचे हातीं, देशांतील लोकांमध्ये वर्गकलह व मतभेद, आणि ते सर्व मिटवले तरी त्यांनी केलेल्या एकमुखी मागणीला सरकारने वाटाण्याच्या अक्षता खुशाल लावाव्या-अशी स्थिति असतां राज्यघटनेच्या गोष्टी बोलूं लागणें सहजच हास्यास्पद ठरतें. फ्रेंच राजा लुई हा १७८९ च्या मे मध्ये गादीवर असला तरी ऑगस्टांत तो सर्वस्वी लोकसभेच्या हातीं आला आहे; लोकसभेची तीन खातीं एक होऊन संयुक्त राष्ट्रसभा बनली आहे; या सभेने राज्यघटना केली असतां ती सर्व राष्ट्राने केली नाही असें म्हणण्याची कोणाला छाती होणार नाही; आणि करूं तें पार पाडूं असा आत्मविश्वास उत्पन्न करण्यासारखी सैन्याची सहानुभूति आपणाला आहे; असें जेव्हा फ्रेंच पुढाऱ्यांनी पाहिलें तेव्हांच त्यांनी राज्यघटनेच्या कार्याला हात घातला. आता अशाहि स्थितींत राज्यघटना केली म्हणजे ती वज्रलेप झाली असा अर्थ नाही. कारण लॉर्ड ॲक्टन याने म्हटल्याप्रमाणे, सन १७८९ च्या पुढील ८६ वर्षांत फ्रान्सच्या निरनिराळ्या १४ राज्यघटना झाल्या. म्हणजे सुमारें दर साहासात वर्षांनी एकेक नवी राज्यघटना झाली! पण एकदां केलेली राज्यघटना पुढें केव्हां बदलणें हें कांही, प्रथम राज्यघटना करण्याच्याविरुद्ध, कारण होऊं शकत नाही. कां कीं

राज्यघटना हें साधन आहे, साध्य नाही. स्वतंत्र राष्ट्राला आपला राज्यकाभार कसा चालवावा याविषयीं मत बदलण्याचा व त्याप्रमाणे निश्चय करण्याचा अधिकार असला पाहिजे; व तें मत राष्ट्रांतील लोकांच्या अभिरुचीप्रमाणे बदलल्यास त्याला अनुसरून राज्यघटना बदलण्याचा अधिकारहि त्यांनाच असला पाहिजे. त्याप्रमाणे फ्रेंच पुढाऱ्यांनी तेव्हां राज्यघटना प्रकरणाला हात घातला यांत नवल नाही व ती त्यांची चूकहि नव्हे.

**लोकसभेंतील मतांतरें**

राज्यक्रान्तीच्या प्रारंभीं किंवा त्यापूर्वींहि कांही काळपासून, अखिल फ्रेंच राष्ट्रांतील बुद्धिमान व विद्वान लोक पॅरिसमध्ये जमा होत होते हें पूर्वी सांगितलेंच आहे. अशा लोकांनी मिळून राज्यघटना करावयाची नाही तर मग ती कोणी करावयाची ? मात्र ही घटना करण्याला ‘नॅशनल असेंब्ली’ (राष्ट्रीय लोकसभा) बसली तेव्हां राजकीय समाजांतील मनुष्य-स्वभावाचे सर्व नमुने तेथे दिसून आले. मनुष्यां-मनुष्यांत तात्त्विक भेदभाव नाही अशी घोषणा केली तरी त्यामुळें ईश्वरनिर्मित त्रिगुणांचें साम्राज्य नष्ट होऊं शकत नाही. नॅशनल असेंब्लींत बसलेले लोक राजकीय अधिकाराने सर्व सारखे असले तरी व्यक्तिगुणाने त्यांत श्रेष्ठ-कनिष्ठ भाव व वैचित्र्य हीं होतींच. यामुळे लवकरच राजकीय पक्षभेद दिसून येऊं लागले ते असेः—

१ निखालस राजपक्ष. या पक्षाला राज्यक्रान्ति किंबहुना प्रगती देखील मुळींच पसंत नसून, लोकसभा गुंडाळून घेऊन फिरून राजदरबाराचें प्रस्थ पूर्वींसारखें चालू करावें असें वाटे.

२ नेमस्तांचा पक्ष. हा पक्ष प्रगतिपर खरा; तथापि यांच्या मतें राजपद संभाळून होईल तीच प्रगति करावी. राजाचा अधिकार मर्यादित करावा, तथापि लोकांनाहि सर्वस्वी शिरजोर होऊं देऊं नये. कनिष्ठ वर्ग, म्हणजे ज्यांना बुद्धि व शिक्षण हीं दोनहि कमी, तीं त्यांना लाभेपर्यंत, तो वर्ग श्रेष्ठ

वर्गाच्या अंकितच रहावा. एकंदरीने अव्यवस्थेंतून व्यवस्था निर्माण होऊन करांची वांटणी न्यायबुद्धिने व्हावी; पण राष्ट्राचें वैभव राखण्याकरितां लागेल तो सर्व पैसा उभा करतां यावा, व त्या कामीं गरिबांनीहि तक्रार करूं नये असें या नेमस्त पक्षाचें मत होते.

३ लोकशाही तत्त्वाचा पक्ष. या पक्षाचें म्हणणें असें कीं, नेमस्त वरिष्ठ पक्षाच्या अंगीं शहाणपणा असला तरी, केवळ शहाणपण हीच कांही राज्य-कारभाराची पात्रता नाही. कनिष्ठ वर्गाला ती संधी, तो फारसा सुशिक्षित नस-तांहि, दिली पाहिजे. आणि तोच वर्ग लोकसंख्येने सर्वांत अतिशय मोठा असल्यामुळें एकंदरीने त्यांचें मतच राज्यकारभारांत प्रभावी राहिलें पाहिजे.

४ याहि पलीकडचा एक पक्ष होता तो निखालस क्रान्तिकारकांचा. त्याला विधायक अशी सूचना कांहींच करावयाची नव्हती. पण त्यांचें मत असें कीं, आहे हें प्रथम सगळें उलथेंपालथें करावयास पाहिजे. आणि आज समाजांत किंवा राज्यांत ज्या ठळक खुणा म्हणून दिसतात त्या सर्व नष्ट होऊन जागेवर कांही राहतां कामा नये. मग पुढे काय होईल तें होईल. या-शिवाय, आजच्या परिस्थितीला जे पूर्वी कारणीभूत झाले, त्यांच्यावर राष्ट्राने पुरापूर सूड घेतल्याशिवाय समाधान होणार नाही.

अशा रीतीने राजस व तामस गुणांची स्पर्धा 'नॅशनल असेंब्ली' मध्ये सुरू होती. ज्याच्या गुणाला सात्त्विक असें नांव यथार्थ देतां येईल अशा, व्यक्ति या सभेंत फारशा नव्हत्याच म्हटलें तरी चालेल.

**पारिसबाहेर**

१७८९ च्या ऑगस्टच्या सुमारास राज्यक्रांतीचें कार्य लोकसभेपेक्षा बाहेर सर्व फ्रान्स देशभरच अधिक चालू होतें. दंगेधोपे, जाळपोळ, अत्याचार हे सर्वच परगण्यांतून थोडथोडे सुरू झाले. पॅरिसचें अनुकरण करण्याच्या बुद्धीमुळे, आपापल्या परगण्यांतले जमीन-दारांचे, सरदारांचे वाडे, हे बास्तील किल्लेच होत अशी कल्पना करून क्रांति-

कारक त्यांवर हल्ले चढवीत! भटाभिक्षुकांचा उपद्रव आणि भाकरीचें दुर्भिक्ष हीं तर राजधानीपेक्षांहि बाहेरच फार जाणवणारीं होतीं. आणि बाहेरच्या या अस्वस्थतेचा बंदोबस्त लोकसभेने करावा तर ती स्वतः आपल्याच राज्यघटना निर्माण करण्याच्या कार्यांत बेसुमार गढून गेली होती. हें कार्य गोंधळाचें बनण्याला वर सांगितलेल्या पक्षोपपक्षांची चुरस व त्यांच्या राजकीय तत्त्व-ज्ञानाची स्पर्धा कारणीभूत होतीच. परंतु त्याहिपेक्षा एकंदरीने लोकसभेंत काम चालविण्याच्या पद्धतींचें अज्ञान हेंच अधिक कारणीभूत होतें. हें काम कसें चालत होतें याचें वर्णन एका इतिहासकाराने केलें आहे त्याचा सारांश असा:—

**लोकसभा कीं जुना बाजार**

"लोकसभेने नेमलेली उपमंडळें आपलें काम उत्तम रीतीनें पार पाडीत. कारण त्यांत फक्त पुढारीच असत. या मंडळाचे ठराव रिपोर्टांच्या रूपाने लोकसभेला सादर होत, ते विधायक, निश्चयात्मक व स्पष्ट असत. परंतु भर लोकसभेंत मात्र गोंधळ उडे. वेळ पुष्कळ खर्च होऊनहि अखेर कांहींच निष्पन्न होत नसे. इंग्लंडच्या पार्लमेंटचें आपण अनुकरण करावें अशी लोकसभेची इच्छा; पण शेंकडों वर्षे काम करून सराईत झालेल्या इंग्लिश पार्लमेंटची कार्यपद्धति फ्रेंच लोकसभेच्या आंग-वळणीं अद्यापि पडावयाची होती. सभेंत एका वेळीं एकाने बोलावे व त्या वेळीं इतरांनीं शांत राहावें हा मुख्य नियमदेखील पाळला जात नसे. एक बोलला कीं, दुसऱ्याने त्याला जागेवरूनच विरोध करावा व उभयपक्षीं शिवी-गाळहि व्हावी! मतें देण्याच्या वेळीं कित्येक सभासद शेजारच्या सभासदांना आपल्यासारखें मत देण्याचा जुलूम करीत. त्यांत ओढाताण होऊन कपडे फाटतहि. बसल्या बसल्या लाथाबुक्यांचाही प्रयोग होई! मिराबोला याचें फार वाईट वाटे. त्याने इंग्रज कायदेपंडित सॅम्युअल रॉमिली याजकडून पार्लमेंटांतील कामकाजाच्या नियमांचा एक मसुदा करून घेऊन त्याचें फ्रेंच भाषांतर करून तें सभासदांना दिलें. पण त्याप्रमाणें कोणी वागेना. इंग्लिश पार्लमेंटांत सभा-

सद आपल्याच जागीं उभे राहून बोलतात, पण फ्रेंच लोकसभेंत एक उंच व्यासपीठ मांडलें होतें त्यावर चढून सभासदाने बोलावे असा प्रघात होता. त्यावर चढलेला वक्ता वेळेचें बंधन न मानतां खुशाल बोलत राही. मग त्याच्या मागून बोलूं इच्छिणारे वक्ते व्यासपीठाच्या पाहिऱ्यांवर जाऊन बसून गर्दी करून आपली पाळी लावीत, आणि ? उतावळेपणाने चालू वक्त्याच्या झग्याची टोकें हळूच ओढून त्याला खालीं बसविण्याचा प्रयत्न करीत ! अध्यक्षाला सर्व सभासदाची तोंडओळख पुरी नसल्यामुळे सभासद नसलेले लोकहि आंत घुसत, वादविवाद चालू असतां खुशाल इकडे तिकडे हिंडत व गर्दीचा फायदा घेऊन मतेंहि देत ! वक्त्याने बोलण्याच्या भरीला कागदाचे वाचन सुरू केलें म्हणजे इतरांचा उतावळेपणा फारच माजे. अध्यक्षाने घंटा वाजविली तरी शक्य तितके तिकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति. चर्चेच्या विषयाला लागू काय गैरलागू काय हें ठरविण्याच्या भानगडींत अध्यक्षाला फारसें पडतां येत नसे."

**हक्कांचे वाद**

ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यांत जनतेच्या हक्काचा स्थूल वाद चालला होता तेव्हां फारसा मतभेद होण्याचें कारण नव्हतें; परंतु ठरावांत हा शब्द घालावा का तो घालावा, कोणते शब्द घातले असतां रूसोचें तत्त्वज्ञान अधिक स्पष्ट होईल, याचाच पुष्कळसा कीस पडे. पण हा तात्त्विक विषय बाजूला जाऊन वरिष्ठ सभा व राजाचे अधिकार हे विषय चर्चेला निघाले तेव्हा निरनिराळे पक्षोपपक्ष रूपारंगाला आले, व या गोष्टीचीहि भर आधीच्या गोंधळांत पडली. फ्रेंच राज्यक्रांतीचें कौतुक करणारे इंग्रज लिबरल पक्षाचे कांही मुत्सद्दी, फ्रेंच लोक आपल्या नव्या पार्लमेंटचें कामकाज कसें काय चालवितात हें पाहण्याकरिता, लंडनहून मुद्दाम आले होते. हा प्रकार पाहून त्यांची बरीच निराशा झाली. शिवाय एक वरिष्ठ लोकसभा कनिष्ठ लोकसभेची जोडीदार म्हणून असावी हा ठराव जेव्हा प्रचंड बहुमताने नापास झाला, तेव्हा तर या इंग्रज मुत्सद्द्यांनी

कयासच बांधला कीं, फ्रेंच पार्लमेंटचें गाडें सुरळीत चालणें कठिण. हा निकाल होतांच कांही नेमस्त पुढाऱ्यांनी वैतागून राजीनामे दिले व त्यांच्या जागीं लगेच जहाल पुढाऱ्यांनी वरिष्ठ लोकसभेच्या वादांत जें यश गमावलें तें राजाला व्हेटो किंवा नामंजुरीचा अधिकार देण्यांत कांहींसें मिळविलें. अखेर असें ठरलें कीं, राजाला नामंजुरीचा अधिकार असावा; पण तो फक्त कांही वेळापुरता. एकंदरीने फ्रेंच पार्लमेंटने राज्यघटना केली ती धड इंग्लंडच्या नमुन्याप्रमाणें नव्हती किंवा अमेरिकेच्या नमुन्याप्रमाणेंहि नव्हती.

**क्रांतीचे पुढारी**

राज्यघटनेच्या चर्चेच्या प्रारंभींच फ्रेंच राज्यक्रांतीचे पुढारी आपल्या बुद्धिबलानें चमकून गेले. खरी क्रांति अवघीं दहा वर्षें टिकल्यानें या पुढाऱ्यांची कारकीर्द कमी अधिक प्रमाणानें क्रान्तिकारकांशीं समव्यास ठरते. एखादा मोनिएरसारखा रंगभूमी-वरून आधीं निघून गेला व एखादा ॲबे साईसारखा क्रान्ति झाल्यावरहि राहिला. तथापि क्रान्तीची सर्व खळबळ चालू असतां या पुढाऱ्यांच्या बुद्धीची किंवा पराक्रमाची चमक मधून मधून दिसून येतच होती. राज्यघटनेची चर्चा संपून कायम घटना झाल्याबरोबर ती घटना निष्फळ कशी व्हावी किंवा करावी या विषयीं जणुं काय स्पर्धा लागल्याप्रमाणें निरनिराळ्या पक्षांचे उद्योग सुरू झाले व शेवटीं शेवटीं घटना म्हणून कांहीं पदार्थ जागेवर नाहीं, अशा रीतीनें बळी राजाचें राज्य फ्रान्समध्यें सुरू झालें. सर्वांत अधिक जहाल कोण बोलेल, सर्वांत अधिक क्रूरता कोण प्रकट करील, व सर्वांत अधिक रक्तपाताची हौस कोण दाखावील, याच दृष्टीनें एकेक पुढारी इतरांना मागें ढकलून पुढें येत होता व असा जो येईल त्याचा स्वीकार व सत्कार करण्याला फ्रेंच जनता सिद्ध होऊन राहिली होती.

या पुढाऱ्यांचीं नांवें एकदाच सांगून टाकावयाची तर ती अशी—मोनिअर, लाली, मिराबो, मारा, ॲबे साई, बारनेव्ह, कॅमस, बुझो, रोबे-स्पिअर, डेस्मॉलीन, डॅण्टन, ड्यूपो, लॅमेथ इ.

**मुत्सद्यांचे डावपेंच**

राज्यघटनेच्या चर्चेच्या कामीं मिराबो याच्याइतका मुत्सद्दीपणा इतर कोणी दाखवला नाहीं. मोनिएर हा अत्यंत सुविचारी, ॲबे साई हा अत्यंत कल्पक. परंतु मिराबोसारखा धोरणी राजकारणी पुरुष त्या सर्वांमध्यें कोणी झाला नाहीं. चर्चेला सुरवात नेमस्तपक्षाचा पुढारी मोनिअर यानें केली. या पक्षाचें म्हणणें असें कीं, राज्यसत्ता ही अनेक ठिकाणीं वाटून दिली जावी व एका अधिकाऱ्याचें दडपण दुसऱ्यावर विशेष बाबींत तरी असावें. तात्पर्य, राजसत्ता ही एका राजाच्या हातीं राहू नये हें इष्ट असलें तरी जनतेंतील किंवा कायदेमंडळांतील एखाद्या वर्गाच्याहि हातीं ती सर्वस्वीं जाऊं नये! या पक्षानें आपल्या डोळ्यापुढें अमेरिका व इंग्लंड यांचेंच ध्येय कांहीं अंशीं ठेविलें होतें. लोकसभेचे दोन विभाग असावेत, राजाला नामंजुरीचा अधिकार असावा व पार्लमेंट (लोकसभा) शिरजोर झाल्यास ती बरखास्त करून पाहिजे तेव्हां नव्या निवडणुकीचा हुकूम देण्याचा अधिकार राजाला असावा, अशा तिहेरी पेचानें राज्ययंत्र जखडून राहिल्यास राज्यकारभारांत उच्छृंखलपणा येणार नाहीं. डेमोक्रॅटिक म्हणजे लोकशाही पक्षाची सूत्रें बारनेव्हप्रभृति पुढाऱ्यांच्या हातीं होती, व त्याला केव्हां ॲबेसाई, केव्हां टॅलेरॉं, केव्हां त्याचा प्रतिपक्षी मिराबो हाहि मदत करी. सरदारवर्गाचा पक्ष एकंदरीनें कमकुवत होता. वास्तविक हा वर्ग एकजुटीनें वागला असता तर त्याला इतर पक्षांना आपल्या तळहातावर खेळवतां आलें असते. परंतु त्या वर्गाला त्या काळाला अनुरूप असे पुढारी लाभले नाहींत. धर्माधिकारी मंडळाचा तृतीय पंथच होता. समान हक्कांचा जाहीरनामा निघाला, परंतु त्यांत धर्माधिकारी मंडळाला राज्ययंत्रांत कोठेंच स्थान दिलेलें नव्हतें, यामुळें आपली गत पुढें काय होणार याविषयीं तें मंडळ चिंतातुर झालें होतें. लोकसभेच्या तीन अंगांचें एकीकरण होण्याच्या वेळीं धर्म–मंडळाने विशेष उत्साह दाखविल्याचें मागें एका ठिकाणीं सांगितलेंच आहे. परंतु राज्यघटनेची चर्चा सुरू झाली तेथपासून त्यांच्या क्रान्तिप्रेमाचा पारा

उतरूं लागला. यामुळें राज्यघटना सुदृढ व टिकाऊ होईल अशी कोणतीहि सूचना पुढे आली म्हणजे धर्माधिकारी मंडळ ती हाणून पाडण्याचा प्रयत्न करी. त्याची कल्पना अशी कीं ज्या राज्यघटनेंत कॅथॉलिक धर्मपंथाचें वर्चस्व किंबहुना अस्तित्व दिसून येत नाही ती घटना सुदृढ न होतां दुर्बळ किंबहुना नष्ट झाली तरी तें अधिक बरें. मोनिएरच्या योजनेप्रमाणें कायदे करणें ते लोकसभेनेच करावे, तिची बैठक दरवर्षी भरावी, तिच्या निवडणुकी अप्रत्यक्ष रीतीने व्हाव्या, पार्लमेंटाच्या कायद्यांना राजाची संमति मिळाल्याशिवाय त्यांची अंमलबजावणी होऊं नये, सर्व फ्रान्स देशाचे सारख्या आकाराचे परगणे करून मतदारी ही मिळकतीवर अवलंबून ठेवावी, मात्र श्रीमंतांना तेवढें महत्त्व व गरिबांना नाही असें करूं नये. प्रधान हे लोकसभेचे सभासद असूं नयेत. कोणत्याहि कायद्याची योजना प्रथम पुढे यावयाची ती राजाने न आणतां लोकसभेंतूनच निर्माण व्हावी व सरकाराला खर्चाला पैसे देऊं अगर देणार नाही हें म्हणण्याचा अखत्यार लोकसभेला यावा. या मूळ योजनेवर चर्चा होतां होतां जवळजवळ तिच्या चिंधड्या उडाल्या. आणि वर दर्शवल्याप्रमाणे अखेर वरिष्ठ लोकसभा नामंजूर होऊन लोकसभेचे कायदे नामंजूर करण्याचा हक्क राजाला देण्यांत आला. वरिष्ठ लोकसभेची कल्पना वरिष्ठ वर्गाच्या जुन्या अनुभवामुळे अप्रिय झाली होती; शिवाय मौज ही कीं, वरिष्ठ वर्ग म्हणजे सरदार अमीर उमराव. याहि लोकांनी मोनिएरच्या या योजनेला द्यावें तितकें पाठबळ दिलें नाही. वरिष्ठ लोकसभेच्या सूचनेला म्हणजे द्विदल पद्धतीला लाफावत व केव्हा केव्हा मिराबो यांचें पाठबळ मिळे. ॲबेसाई म्हणे कीं चर्चेच्या सोयीकरिता दोनच काय तीनसुद्धा लोकसभेच्या शाखा केल्या तरी हरकत नाही. तथापि मतें नोंदण्याच्या वेळीं ती नोंदणी एकत्र झाली पाहिजे. तसें न केलें तर सभेच्या तीन शाखा मोडून एकच लोकसभा पूर्वी हट्टाने केली तिचें स्वारस्य काय राहील ?

**जनमनाचा कोंडमारा**

राजांवर सर्वस्वी विश्वास टाकूं नये हें तत्त्व सर्वसंमत झालें होते. परंतु खरा वाद होता तो असा की, लोकांवर तरी सर्वस्वी विश्वास टाकल्याने राष्ट्राचें हित होईल किंवा नाही ? वरच्या लोकांनी सत्ता कमी करण्याचें काम समानतेच्या जाहिरनाम्याने बरेंचसे केलें होतें; तथापि खालच्या टोकाला अधिकारयंत्र निर्माण होऊन सुदृढ राहून परिणामकारक रीतीने चालू राहावयाचे तर त्याची योजना काय कशी करांवी या विषयी मतैक्य होणें अशक्यप्राय दिसूं लागलें. सत्ता लोकांची खरी, पण ती सरकार या नांवाच्या कोणत्या तरी घटनेच्या द्वारेंच अमलांत येणार ती अमलांत आली तरच समानता, व्याप व व्यवस्था हीं लोकांच्या पदरांत पडणार हेंहि सर्वांना मान्य होतें. पण सरकार या सदरांत समाविष्ट होणारे अधिकारी लोकतंत्र राहतील कीं स्वतंत्र होतील, किंवा कदाचित् बेइमान होऊन राजपक्षाला मिळतील याविषयीं कोणाचा अंदाज चालेना. यामुळे राज्यघटनेची सर्व चर्चा संशयग्रस्त अशा वातावरणांत चालू होती. आणि आंतून हा संशय प्रबळ असतां बाहेरून भलेपणा राखून अंतरंग दिसूं न देतां राजकीय तत्त्वज्ञानाच्या सिद्धांतावें भांडण केवळ तात्त्विकदृष्टया आपण भांडत आहों असा बहाणा चालू होता.

**दुटप्पी मोनिएर आणि चरित्रहीन मिराबो**

अखेर तारीख ९ सप्टेंबर रोजीं लोकसभेंत वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन सभा असूं नयेत हा ठराव ४९९ विरुद्ध ८९ एवढ्या बहुमतानें पास झाला. नंतर राजाच्या अधिकाराचा प्रश्न निघाला. या चर्चेंत स्वतः राजपक्षापेक्षा देखील मोनिएर याने राजाधिकाराची बाजू अधिक घेतली. त्याचें म्हणणें असें कीं, लोकसभा जरी एकच एक राहिली तरी नामंजुरीचा राजाचा हक्क सर्वस्वी अबाधित व संपूर्ण असा असावा. पण मौज ही कीं, स्वतः राजा व राजमंडळ यांनीं एवढा मोठा अधिकार राजाला न दिला तरी चालेल, त्याचा नामंजुरीचा अधिकार मुदत-

बंद असला तरी हरकत नाहीं, किंबहुना राजा तेवढ्यानें संतुष्ट होईल, अशा अर्थाचें पत्र राजमंडळाकडून लोकसभेपुढें वाचण्याकरिता पाठविण्यांत आलें. अशा रीतीनें दुर्दैवी मोनिएरने वरिष्ठ वर्गाचा पक्ष उचलून धरला तेव्हा त्या वर्गाने त्याला दगा दिला, व आता राजपक्ष उचलून धरला तेव्हा राजपक्षानेहि दगा दिला ! तात्पर्य, असें मोठें अपयश पदरांत घेऊन मोनिएर याला लोकसभेंत पुढारी म्हणून राहणें अशक्य झालें, व त्याने ता. १२ सप्टेंबर रोजीं कमिटीचा राजीनामा दिला. पण दुसऱ्या बाजूला मिराबो याचें वर्तन कसें झालें एवढें सांगून हें प्रकरण संपवूं. राजमंडळापैकीं राणी हीच अत्यंत घातक असून तीच खरोखर आपल्या नवऱ्याच्या मुळावर आली असा मिराबोचा ग्रह झाला होता. म्हणून तो तिचा व राणी त्याचा अत्यंत द्वेष करी. परंतु राजासंबंधानें मिराबोची अगदी उलट भावना होती. ती अशी कीं, राजा लुईचसा काय परंतु एकंदरीनें राजपददेखील नेहमीं अभंग राहावें, नामंजुरीचा अधिकार राजाला राहावा, व समानतेचा जाहीरनामा रीतसर प्रकट झाला असला तरी एकंदरीनें लोकांचें शहाणपण तितपतच असणार यामुळें, लोकसभेला सर्वस्वी शिरजोर होऊं न देतां राजा व लोकसभा या दोहोंच्या हक्काला मुरड घालून घटना बनवावी, असें मिराबोचें म्हणणें होतें. हे विचार शहाणपणाचे खरे; तथापि इतिहासकारांच्या मतें तो अत्यंत अप्रामाणिक, स्वार्थी, कपटी, दुतोंडा, बहाणेखोर असा असल्यामुळे कोणत्याच पक्षांत त्याला आदर उरला नाहीं. एकीकडे लोकसभेंत अधिकारी वर्गावर बेगुमान तोंड टाकीत असतां आंतून राजमंडळाकडून लक्षावधि रुपयांचा लांच तो घेत असे. ही गोष्ट त्याच्या आचरणावरून पॅरिस शहरच्या लोकांच्या लक्षांत येऊं लागली. एकप्रकारचें राष्ट्रप्रेम मिराबोच्या मनांत वसत होतें हें खरें; परंतु व्यक्तिशः दानत खोटी यामुळें त्याचें शहाणपण मातीला मिळालें व त्याच्या कीर्तिपेक्षां त्याची अपकीर्तीच इतिहासांत मागे उरली. इतर कित्येक पुढारी कोणी तर्कटी तर कोणी विकारवश

असून त्या अवगुणानीं त्यानीं आपलें हसें करून घेतलें व कांहींना स्वतःचे बळी द्यावे लागले. तथापि चारित्र्याच्या दृष्टीने इतिहासकार त्यांना शहाण्या व धूर्त मिराबोच्या वरचें स्थान देतात!

**भुकेनें चवताळलेला जनसमंध**

राज्यघटना लिहिणारांना मनांतून राजपद काढून टाकावयाचें नव्हतें. लोकसभेंत दुमजला बांधावा—म्हणजे कनिष्ठ सभेच्या डोक्यावर एक वरिष्ठ सभा म्हणून निर्माण करावी—आणि एकींत कांही भलतेंसलतें बेजबाबदार रींतीने करण्यांत आलें तर तें वरिष्ठ अधिकाराने दुसरींत फिरवून घ्यावें, अशी सूचना पुढे आली होती. परंतु ती नापास झाली. यामुळे एका पक्षाने राज्यघटनेच्या जबाबदारींतून आपलें अंग काढून घेतलें. मग ही वरिष्ठ सभा नसो, पण निदान राजाला तरी लोकसभेचे कायदे व ठराव नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार असावा कीं नाही असा प्रश्न निघाला. त्यावर रण माजलें, तें इतकें कीं, लोक क्षणभर भाकरीचें गाऱ्हाणें विसरून जाऊन राजाला कोणताहि अधिकार न देण्याचा मुद्दाच पकडून बसले. या 'नको म्हणण्या'च्या अधिकाराला 'व्हेटो' किंवा 'नकार' हा शब्द राज्यघटनांतून रूढ आहे. सामान्य लोकांना त्या शब्दाचा अर्थ कळण्याची पात्रताहि नव्हती. कांही चळवळ्या लोकांनी 'व्हेटो' या शब्दाचा अर्थ हवा तसा विपरीत करून सांगण्यास सुरुवात केली. कोणी म्हणाले, येऊन जाऊन आम्हांला पोटभर भाकरी न मिळूं देण्याचा हा डाव दिसतो! समजा घरीं तुमच्या बायकोनें स्वयंपाक तयार करून ठेविला आहे; पण राजाला व्हेटोचा अधिकार दिला म्हणजे तुमची बायको तुम्हांला म्हणणार 'तुम्ही येऊं नका, मी तुम्हांला जेवायला वाढीत नाहीं!" आणि दुर्दैवहि असें हात धुवून पाठीस लागले होते कीं, अखेर लोकसभेनें राजाला व्हेटो दिल्याबरोबर तीन दिवसांत, वरिष्ठ लोकांनीं व जमीनदारांनीं तो 'राजाकडून विकत' घेतला, म्हणजे फ्रान्समधलें धान्य बाहेर पाठवूं नये असा कायदा लोकसभेनें केला तरी तो, राजमंडळाला पैसे

चारून, त्याच्या शिफारसीन राजाकडून नामजूर (व्हेटो) करविला. आणि त्याच्या जोरावर सगळ्या देशांतलें धान्य ते बाहेर पाठवू लागले. मग सह-जच "आम्ही लोकसभेंत प्रतिनिधि म्हणून पाठविले तेच असे राजमंडळाला फितूर झाले कीं! या प्रतिनिधींना त्यांच्या जागेवरून खेंचून ओढून बाहेर काढलें पाहिजे." असे उद्गार देशभर ऐकूं येऊं लागले. ता. ४ ऑगस्ट रोजीं झालेले जे ठराव खरोखरच राजानें 'अमान्य' केले होते, ते जाणत्या लोकांनाहि दाखविण्याला आयतें एक उदाहरणच झालें. भुकेनें मनुष्य गांजला म्हणजे तो वैतागून जातो, आणि नुसते 'भूक' 'भूक' हे शब्द म्हणावयाचें सोडून 'भूत भूत' असेंहि म्हणून लोकांना तो भिववूं लागतो. ह्याप्रमाणें लोक म्हणूं लागले, "ज्यांच्या हातीं आमची रोटी तो बडा रोटीवाला व्हर्साइल्च्या रापवाड्यांत हाहातो. तेथें जाऊन त्याला व त्याच्या बायकामुलांना पकडून आणूं या. म्हणजे रोटी आपसुखेंच मिळेल." या धांदलींत महत्त्वाकांक्षी पुढारी स्वतःला महत्त्व आणण्याचा कावा साधूं लागले. "राज्यक्रांती पहिला अंक झाला, पण दुसरा कोठे झाला आहे! तो घडवून आणूं या," असें लोक म्हणूं लागले.

# ८ राज्यक्रांतीचा दुसरा अंक

**वाड्यावर हल्ला करण्याची तयारी**

त्याला उत्तर राजमंडळाने फ्लँडर्स येथील लष्करी पलटणी व्हर्साइलच्या राजवाडयाकडे बोलाविल्या. पण या विषयीं दोन प्रवाद आहेत. एक मत असें कीं, वर सांगिल्याप्रमाणे राजमंडळाने या पलटणी बोलाविल्या. दुसरें मत असें कीं, त्या पलटणी राजमंडळाच्या रक्षणाकरिता बोलाविल्या जात नसून, खरोखर असेंब्लीच्या रक्षणाकरिताच बोलाविल्या जात होत्या. आणि याचा पुरावा असा कीं, या पलटणींचा मुख्याधिकारी हा लोकसभेचा सभासद असून तो जहाल पक्षांत मोडत होता. उलट कांहीं पलटणींतील लोकांनीं दारूच्या धुंदींत 'राजाचा जयजयकार असो' असे शब्द उच्चारले हेंहि खरें आहे. ही गोष्ट ता. १ ऑक्टोबर रोजीं घडली. लगेच दुसरे दिवशीं लोकांचा एक प्रचंड जमाव व्हर्साइलच्या राजवाडयाकडे जाण्याला निघाला. त्यांत दहा हजार बायका सामील झाल्या होत्या. आणि अगदी खालच्या वर्गातील कैदाशिणी एकदा कां ओरडूं लागल्या म्हणजे मग त्या कसा गहजब करतात, हें प्रसिद्धच आहे! या मिश्र जमावांतील पुरुषांनीं असें ठरविलें कीं, या बायकाच पुढें जाऊं देत; कारण त्यांच्यावर गोळ्या झाडण्याला शिपायांचा हात थोडा तरी मागे घेईल! असें म्हणतात कीं, हा स्त्रियांचा समुदाय मोठा दिसावा म्हणून राष्ट्रीय सैन्यांतील कांहीं तरुण शिपाई मिशा काढून बायकी झगे घालून बायकांत मिसळले होते! "आमच्या मागून लष्करी लोकांनीं

येऊन आम्हांलाच मदत केली पाहिजे " असा या जमावाने आग्रह धरला. त्याप्रमाणे अखेर नॅशनल गार्डची पलटण चालूंहि लागली. लाफायत हा लष्करी अधिकारी खरोखरी संभावीत व किंचित् राजपक्षपाती होता. परंतु त्यालाहि 'नाही' म्हणणें होईना. लोकसभेच्या बैठकींत अर्थातच चलबिचल झाली. राजाने अंतिम अधिकार बजावून, मूलभूत हक्कांच्या जाहीरनाम्याला संमति देण्याचें लांबणीवर टाकिलें—फक्त राज्यघटनेसंबंधी कांही कलमांना संमति दिली—ही बातमी ता. ५ ऑक्टोबर रोजीं लोकसभेला कळतांच समुद्र खवळला. मिराबो याने व्यासपीठावर चढून असें सांगितलें कीं, "एका राजाखेरीज बाकी सर्व राजमंडळाच्या अंगावर आता हात टाकल्याशिवाय गत्यंतर नाहीं. राजापेक्षा राणीच अधिक आग्रही व प्रतिगामी आहे " असेंहि त्याने उघड बोलून दाखविलें.

**अबला कीं सबला**

इतक्यांत पॅरिसहून निघालेली बायकांची टोळी येऊन पोहोंचली. त्यांतील कांहीं बायका लोकसभेंतच शिरल्या. राजाचें हुकूम आम्ही फिरवून आणूं, घाबरूं नका, असें बोलून कांहीं सभासद त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करूं लागले तेव्हां ती गोष्ट त्यांनीं सोडून, भुकेची आणि भाकरीची गोष्ट काढून त्यांना गप्प बसविलें. "देशांतून धान्य बाहेर जाऊं देऊं नये," असा हुकूम राजाकडून आणण्यासाठीं लोकसभेच्या अध्यक्षानेंच स्वतः जावें असें ठरलें. तो आपली जागा सोडून गेल्यावर आणखी बायका आंत घुसल्या. कांहीं बेताल होत्या, त्यांतील एकजण जाऊन अध्यक्षाच्या खुर्चीवर बसली! कांही जणी, बसावयास जागा न सांपडल्याच्या सबबीवर, खुर्चीवर बसलेल्या सभासदांच्या मांडीवर जाऊन बसल्या! व्हर्साइलकडे गेलेल्या अध्यक्षाच्या जागीं एका वृद्ध धर्माधिकाऱ्याला हंगामी अध्यक्ष नेमण्यांत आलें होते. त्याच्या पांढऱ्या दाढीवर हात फिरवून कांहीं जणींनी 'हे पहा आमचे

अध्यक्ष बाबा' असें म्हणून त्याचे 'मुके' घेतले! ता. ५ ऑक्टोबर रोजीं संध्याकाळीं 'चला आपण आतां राणीचेंच डोकें कापून आणूं' असें कांहीं म्हणूं लागल्या. राजवाड्याभोंवतीच्या पलटणींतून घुसून बायका निरनिराळ्या दाराकडे जाऊं लागल्या. कोणी त्यांना म्हटलें कीं, "बायांनो, तुम्हीं राजवाड्यांत जाऊन काय करणार!" तर त्या उत्तर देत "काय करणार म्हणजे काय? राजाराणीला पदच्युत करणार!" कांहीं जणी तर बेभान होऊन राणीच्या शरीरावयवाचे तुकडे करुन वांटून घेण्याच्याहि गोष्टी बोलूं लागल्या! इतकें झालें तरी या जमावावर गोळीबार करण्याचा हुकूम राजा देईना. बायांची समजूत पडावी म्हणून कांहीं शिपायांनी बंदुकांचे दस्ते वर उचलून नळ्यांचीं तोंडें खालीं जमिनीला लावून त्यांची खात्रीहि केली कीं, आम्ही तुमच्यावर गोळ्या झाडीत नाहीं. शेवटीं राजाच्या हुकुमावरून बायकांचीं दोन शिष्टमंडळें वाड्यांत येऊं दिलीं. राजाने त्यांचीं भेट घेतली, व दोन मोठ्या सरकारी कोठारांतील धान्य वांटण्याचा हुकूम मी देतों असें आश्वासन दिलें.

इतके झाल्यावर बाहेरचा जमाव थोडा हटला. नंतर असा बूट निघाला कीं, आतां यापुढें लोकांनीं राजवाड्यांत राहूं नये. नुसते राजवाड्याबाहेरच नव्हे तर, राजधानीबाहेरहि जावें. राजाकडून हवे होते ते हुकूम लोकसभेसंबंधीं घेऊन कायमचा अध्यक्ष मोनिअर हा परत लोकसभेंत आला. हुकूम जाहीर झाल्यावर त्या जमावाने इकडून तिकडून कांहीं रोट्या व दारू पैदा केली व जयजयकार करीत त्यावर ताव मारला!

हें सर्व पाहून लाफायन चिंताग्रस्त झाला. राजाला हरप्रयत्नानें वांचवावा अशी त्याला उत्कट इच्छा होती. तथापि हें घडावें तर राजाने सरकारी सैन्य माघारें लावून देऊन, स्वतः लाफायतवर व त्याच्या राष्ट्रीय सैन्याच्या पलटणीवर विश्वास टाकावा हें अवश्य होतें. त्याप्रमाणें त्याने राजाचें मन वळवून राजाचें खास लष्करी पथक दूर लावून दिलें,

व त्याचे जागीं आपल्या राष्ट्रीय पलटणीची त्यानें स्थापना केली. इतके झाल्यावर सर्व राजमंडळ पहाटे दोन वाजतां सुखाने झोपीं गेलें, व लाफायत यानें परत लोकसभेकडे येऊन तिची बैठक त्या दिवसापुरती खलास करण्याचा सल्ला दिला. अध्यक्ष मोनिअर हाहि थकला भागला होता. त्याने आनंदानें सभा बरखास्त केली. सभासद निघून गेल्यावरहि बाहेर बायकांचे कांहीं थवे जागा धरून बसले होते. त्यांतल्या पुष्कळांना बहुधा स्वतःचीं घरेंदारेंच नसावीं! अशा या फटिंग बायांनीं मग तेथें काय लीला केल्या असतील याचें वर्णन कोणी न करणेंच बरें!

**राजा बंदिवान झाला**

दुसरे दिवशीं सकाळीं व्हर्साइलच्या वेशीजवळ लोकांची गर्दी हळू हळू जमूं लागली. आणि लवकरच असें दिसून आलें कीं, पहाटे दोन वाजता लाफायत याने जो बंदोबस्त केला तो बहुधा फुकट जाणार! राजवाड्याभोंवतीं जी भिंत होती तिचे दरवाजे लोकांना आयते उघडे सांपडले. त्यांतून हातांत बंदुका कुऱ्हाडी वगैरे घेतलेल्या लोकांच्या टोळ्या आंत शिरल्या. लाफायतच्या पलटणीच्या मुख्य अधिकाऱ्याला व त्याच्या लोकांना हळूहळू रेटीत रेटीत लोकांनीं मुख्य संगमरवरी जिन्यापर्यंत नेलें. मग मात्र तो जागा धरून त्यांना आडवा आला. तेव्हां त्यांनीं त्याला धक्का देऊन खालीं पाडलं. त्याचे डोकें तोडून ते जिना चढून आले. एका शिपायाने जरासें दरडावून त्यांना विचारलें, "चला हटा, तुम्हाला काय पाहिजे?" तेव्हां जमावांतल्या एकाने किंकाळी फोडून उत्तर दिलें "राजा-राणीचें काळीज व त्यांचीं आंतडीं पाहिजेत!" लगेच आंतल्या शिपायांनीं दारें बंद करून त्यामागे अडगळ लावण्याचा प्रयत्न केला, पण तो फुकट जाऊन राजमहालांत रक्ताचा सडा पडला. राणी घाईघाईनें अर्धवट पोषाख करून राजाच्या महालांत शिरली. इतक्यांत लाफायत हा गडबडीनें तेथें आला. त्यानें राजाला असा सल्ला दिला कीं, "तुम्ही व राणीसाहेब यांनीं आता पॅरिसला जाण्याचें वचन दिल्याशिवाय या बंडखोरांचे

समाधान होणार नाहीं." हवें तें आश्वासन मिळाल्यावर तें विश्वासानें स्वीकारण्याचा भलेपणा दाखवून, हल्ला करणाऱ्या या लोकांनीं तोंड फिरविलें. त्यांनीं राजाला पॅरिसला नेण्याकरितां जणुं कांहीं मिरवणूकच बनविली माल या मिरवणुकीबरोबर, राजवाड्यांत मारलेल्या दोन पहारेकऱ्यांचीं रक्तानें माखलेलीं डोकीं भाल्याच्या टोंकाला लावून चालविलीं होती. पूर्वी राजानें आत्मरक्षणाकरितां रूआँ येथें जावें असा एक बूट निघाला होता, त्याऐवजीं आतां बंडखोरांचा बंदिवान म्हणून पॅरिसला जाण्याचें प्रस्थान ठेवावें लागलें! रूआँला जाण्याचा उद्देश राजमुकुट वांचविण्याचा होता; आता तो हटकून घालविण्याचा प्रसंग प्राप्त झाला!

**राजाला पारिसला आणले**

इकडे सकाळीं ११ वाजता लोकसभेची बैठक सुरू झाली. अध्यक्ष मोनिअर याचे राजाला वांचविण्याचे आतापर्यंतचे सर्व प्रयत्न फुकट गेले. जहाल स्वरूपाचे ठरावामागून ठराव सुचविण्यांत येऊं लागले. शेवटीं बारनेव्ह नांवाच्या एका सभासदाने पुढे आणलेला ठराव मंजूर झाला. तो असा कीं, "यापुढे राजाचें वास्तव्य पॅरिस शहरांत होणार म्हणून लोकसभेनें आपल्याहि बैठका तेथेंच भरवीत जाव्या." लगेच कांहीं तासांतच प्रतिनिधींची मिरवणूक सजविण्यांत आली. सोबत चालणारे लोक नाचत गात आरोळ्या मारीत व वरिष्ठ वर्गांना शिव्याशाप देत चालत होते. "या वरचढ बदमाषांना सांपडेल त्या जवळच्या कंदिलाच्या खांबावर फांशी द्या!" असें कोणी मधून मधून म्हणत. कोणी हातांत झाडांचे टहाळे घेतले होते. कोणी एखाद· दुसरा लष्करी शिपाई कैद करून बरोबर चालविला होता, त्याची ते मधून मधून कुचेष्टा करीत. राजरथाशेजारीं चालणाऱ्या शिपायांनी नेहमीप्रमाणें हातांत नागव्या तरवारी घेतल्या होत्या, पण लोकांनी त्या बळजबरीनें परत म्यानांत घालावयास लाविल्या. आणि अपमानाने खाली मान घालून चालत असलेले हे 'राजरक्षक शिपाई' स्वतःच

कत्तलखान्याकडे चालविलेल्या पशूंसारखे दिसत होते ! राजरथ दिसतांच कोणी म्हणे, "झाला, आता बडा रोटीवाला हस्तगत झाला." कोणी म्हणे, "व्हर्साइलचा राजवाडा आता खाजगी कारभाऱ्याला भाड्याने द्यावा लागणार. त्याचें भाडें किती ठरलें असेल हो !" राणी दिसतांच, प्रत्येक रस्त्यांत, तिला ऐकूं जातील असे अपमानकारक शब्द उच्चारले जात होते. रात्रीं ९ वाजतां दिवट्यांच्या उजेडांत ही मिरवणूक टुलरीसच्या राजवाड्याजवळ आली. आंत गेल्यावर मुख्य दरवाजाचीं कवाडें लावून घेण्यांत आलीं, व आंतल्या एका खोलींत ताटें वाढून राजाराणीकडे पाठवून दिलीं. त्या दिवशीं सहा राजरक्षक शिपाई मारले गेले. पण एकहि नागरिक दगावला नाहीं ! लोकसभेकरिता या वाड्यांतील घोडदौडीजवळील इमारत पसंत करण्यांत आली.

**राजमंडळ भांबावलें**

पॅरिसमध्यें राजाला आणून ठेविल्यावर राजाराणीला वाटूं लागलें कीं, आपण लोकांचे बंदिवान झालों त्याअर्थी ते म्हणतील त्याला होय म्हणत गेलें, आणि फक्त विरोध टाळला, म्हणजे पुढील क्रांति आपोआप थांबेल. राजमंडळ व राजपरिवार इतका भांबाऊन गेला कीं, राजाला सल्ला देण्याचेंच त्याला सुचेना. व्हर्साइलच्या राजवाड्यांत सुरक्षित असतां, या बंडखोर लोकसभेविरुद्ध चुरचुर जीभ चालविणारे, वावदूक आता मुके बनले. ट्यूलीअर्सच्या वाड्यांत त्यांच्या रक्ताच्या उष्णतेचा पारा हळू हळू खाली जात होता. मिराबोसारखे राजहितचिंतक म्हणविणारे लोक गुप्तपणें राजाकडे खुषामतीचे निरोप पाठवीत; पण भर लोकसभेंत जळजळीत भाषा वापरीत. कदाचित् कोणी म्हणेल कीं, "जहालपणाचा आविर्भाव करून लोकसभा हस्तगत करावी, व मग तिच्याकडून मवाळपणाचें म्हणजे राजरक्षणाचें कार्य सिद्धीस न्यावें, असाहि त्यांचा कावा नसेल कशावरून ?" पण लोकसभा व राजमंडळ यांचा संबंध तोडून टाकण्याकरिता लोकसभेने असा ठरावच केला कीं, कोणाहि सभासदानें राजसचिवाची

किंवा राजमंत्र्याची जागा स्वीकारूं नये. यामुळें मिराबो, टालेरॉं वगैरे उभयान्वयी लोकांना आता लोकसभेहून दुसरा आसरा किंवा आधार उरला नाहीं! तीच गोष्ट लाफायतची होती. त्यांचा उभयान्वयी संबंध टिकता तर कदाचित त्यांना राज्यक्रांतीच्या बेतालपणाला कांहीं नियंत्रण घालतां आलें असतें. पण आता लोकसभाच काय ती राहिली होती, व ती जिंकावयाची तर शक्य तितकें जहाल बोलणें एवढेंच साधन शिल्लक उरलें!

**क्रांतीचें पहिले ध्येय**

राजाला पॅरिसमध्ये कैदेंत ठेविल्यापासून पुढेहि १७९० च्या फेब्रुवारी अखेरपर्यंत लोकसभेंत राज्यघटनेची चर्चा मधून मधून सुरूच होती. राज्यघटनेचें हें काम अखेर, न्यायखातें वगैरे संबंधानें अवशिष्ट कायदेकानू करून, १७९१ च्या सप्टेंबरांत संपलें व त्या घटनेला राजानें संमति दिली. या घटनेंत वारिष्ठ विधिमंडळ उरूं दिलें नव्हतें; परंतु विशिष्ट परिस्थितींत कांहीं कायद्यांची व कलमांची अंमलबजावणी कांहीं वेळ थांबविण्याचा अधिकार मात्र राजाला ठेवण्यांत आला होता. या घटनेंत सारी खरी सत्ता, एकंदर लोकसभेकडेच ठेवण्यांत आली होती. कार्यकारी मंडळाला कांहींच सत्ता ठेविली नव्हती. पण राजाप्रमाणे लोकसभा देखील बेजबाबदार रीतीनें आपल्या सत्तेचा दुरुपयोग करूं शकतात हें घटना बनविणाऱ्यांना कळून यावयाचें होतें तें पुढे आलेंच! १६ व्या लुईच्या कारकीर्दीत जी ही राज्यघटना झाली ती केवळ त्याच्यापूर्वीचा पुंड बेजबाबदार जुलमी राजा १४ वा लुई याची कारकीर्द लक्षांत घेऊन केली गेली. राजा 'ताब्यांत ठेवावयाचा' इतकीच या क्रांतिकारक घटनेची मजल जाणार होती. "स्पार्टासारख्या जुन्या राजसत्ताक राज्यांत एक सोडून दोन राजे नव्हते काय? तसाच आमचाहि एक राहील. नांवाने राजा आमच्या स्वराज्याचा मुख्य अधिकारी राहील, पण नोकर म्हणून." इतकेंच राज्यक्रांतीचें पहिलें ध्येय होतें.

——×*×——

ग्रं. ५२५

१०६५०

# १ लष्कराची बेदिली

फ्रेंच लोकसभेला 'स्टेट्स–जनरल' हें नांव १७८९ पर्यंत होतें तोंपर्यंत तिला फक्त औपचारिक दरबाराचें रूप होतें.

**कॉन्स्टिटयुअंट असेंब्ली**

पण चालू बैठकींतल्या बैठकींतच, मधली कायदेमंडळाच्या प्रकाराची पायरी ओलांडून, ती लोकसभा बसल्या बसल्याच स्वतः-च्या अधिकाराने पूर्ण सत्ताधारी पार्लमेंट बनली, व तिला 'कॉन्स्टिटयुअंट असेंब्ली' हें नांव प्राप्त झालें. तीहि पार्लमेंटच, पण देशाची राज्यघटना कशी असावी हें स्वतःचें स्वतःच ठरविणारी. स्वतःची राज्यघटना स्वतःला हवी तशी ठरवुन तिजप्रमाणे सर्व कारभार अखत्यारीने करणें येथें कोणत्याहि लोक-सभेच्या राजकीय अधिकाराची परिसमाप्ति होते. पार्लमेंटच्या एखाद्या कायद्याला नापसंत ठरवून नकार देण्याचा, किंवा सबंध राज्यघटनाहि विशेष कारणा-करिता तात्पुरती बाजूस ठेवून एकतंत्री राज्य करण्याचा अधिकार 'राजा' किंवा 'अध्यक्ष' यांना ठेवण्यांत आला असला तरी, पार्लमेंटाच्या स्वायत्त-तेला त्यामुळे बाध येतो असें तत्त्वतः मानीत नाहीत. हें सांगण्याचा हेतु इतकाच कीं, स्टेट्स–जनरलचें दरबारी स्वरूप जाऊन कायदेमंडळाच्या पली-कडेहि प्रगति होऊन, राज्यघटना निर्माण करणाऱ्या 'कॉन्स्टिटयुअंट असेंब्ली'-चें स्वरूप आतां तिला प्राप्त झालें होतें. अवघ्या एका वर्षांत झालेली ही केवढी मोटी क्रांति! पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, फ्रेंच कायदे-मंडळाला

राज्यघटना-मंडळाचा खरा अधिकार केव्हां आला? तर त्याने राजाला कैदेंत ठेवून सैन्य आपल्या स्वाधीन करून घेतलें तेव्हांच आला!

एका इतिहासकाराने फ्रेंच राज्यक्रांतीसंबंधाने असें म्हटलें आहे,–

**एक महत्त्वाचा सिद्धांत**

"फ्रेंच सैन्याने, सरकारी हुकूम अमान्य करून प्रजेवर म्हणजे आपल्याच जातभाईंवर गोळ्या झाडीत नाहीं असें अधिकाऱ्यांना सांगितलें त्या दिवशीं फ्रेंच राज्यक्रांतीला खरा प्रारंभ झाला. आणि पुढें ज्या दिवशीं फिरून, सरकारी आज्ञा मान्य करून त्यांजवर गोळ्या झाडण्याला त्या सैन्याने पूर्वीसारखी सुरुवात केली त्या दिवशीं फ्रेंच राज्यक्रांतीचा खरा शेवट झाला. या दोन गोष्टींत जो कालावधि गेला तितकाच पहिल्या फ्रेंच राज्यक्रांतीचा कालावधि होय असें समजावें." पण ही गोष्ट फ्रान्सच काय इतर कोणत्याहि देशांतील राज्यक्रांतीसंबंधाने खरी आहे. असाच अभिप्राय द्यावा लागेल.

**एक मूलभूत प्रश्न**

ता. २० फेब्रुवारी १७९० या दिवशीं लोकसभेपुढे एकाने सरळ प्रश्नच उपस्थित केला कीं, "लष्करी शिपायांना नागरिक प्रजेवर गोळया झाडण्याचा, हत्यार यापुढें चालवण्याचा, हुकूम देण्याविषयीं वरचेवर प्रसंग यापुढें येणार. तरी कोणत्या परिस्थितींत स्वतः शिपायाने तो हुकूम मान्य किंवा अमान्य करावा!" हा प्रश्न मूलभूत असाच ठरतो. म्हणजे तो राजकारणशास्त्रांत शेषाच्या टाळूला जाऊन भिडतो. कारण राज्यव्यवस्थेचा सर्वस्वी आधार सरकारी लष्करी शिपायाची तरवार व बंदूक! ती उचलावी किंवा न उचलावी, याचा निर्णय स्वतः शिपायालाच करतां येईल व तो त्यानेच करावा असें म्हटलें म्हणजे ग्रंथच आटोपला! राज्यक्रान्ति पुरी झाल्यावर, राजा लुई पदच्युत होऊन प्रजासत्ताक (रिपब्लिक) राज्याची स्थापना झाल्यानंतरहि हुकुमी सैन्याची गरज उरली नाहीं असें नाहीं. आजहि फ्रान्समध्यें 'रिपब्लिक' आहे. तथापि सैन्याने सरकारचा

क्र. ५६०८



हुकूम ऐकावा की नाहीं हा प्रश्न उद्भवत नाहीं. पण सन १७९० मध्ये हा प्रश्न उद्भवण्याचें कारण असें कीं, राजसत्तेची विभागणी कोणाकोणामध्ये कशी व्हावी हें अजून ठरलें नव्हतें. राजा व प्रजा हे दोन्ही राजसत्तेच्या जोरावर 'रस्सीखेचीचा' डाव लढवीत होते. आणि लष्कर ज्याला वश होईल त्याचीच सरशी होणार हें उघड दिसत होतें. लोकसभेला आपल्या हातीं लष्कर ठेवावयाचें तर, "राजाचा हुकूम अमान्य करण्यांत तुमच्याकडून कोणताहि गुन्हा होत नाहीं" असा परवाना किंवा बेदावेपत्र सैन्याला मिळणें अवश्य होतें. आणि हा परवाना घेणें न घेणें, मागणें न मागणें, ही गोष्ट सैन्याच्या मर्जीवर अवलंबून होती. सैन्याची मर्जी आता तो परवाना मागण्याची दिसून आली. सैन्य बंडखोर बनलें. राजाचा पक्ष सोडून प्रजेचा पक्ष घ्यावा असें त्याला वाटूं लागलें, यामुळें लोकसभेंत कोणी तरी वरील प्रकारचा सूचक प्रश्न मांडावा व त्याचें उत्तर अस्तिपक्षीं घ्यावें, इतकाच औपचारिक विधि उरला होता. तो ता. २० फेब्रुवारी रोजीं करण्यांत आला. या निर्णयाने सैन्य हें पुढे लोकसभेलाहि डोईजड होणार होतें. पण आज केवळ राजाच्या हुकमतींतून तें काढून घ्यावें इतकाच मुद्दा असल्यामुळे, भावी परिणामाकडे लोकसभेने लक्ष दिलें नाहीं.

**लष्करी बेबंदशाही**

या वेळीं सरकारी सैन्यांत कम-अस्सल म्हणजे हलक्या मनोवृत्तीच्या लोकांची बरीचशी भरती झालेली होती. कोणी धंदेवाईक बदमाष, कोणी कैदेची शिक्षा पुरी करून तुरुंगांतून बाहेर पडलेले उडाणटप्पू पुंड, कोणी अन्यायाने बढती थांबवण्यांत आल्यामुळें अधिकाऱ्यांवर नाराज झालेले तापट शिपाई—अशा सर्वांची गांठ सैन्यांत पडलेली होती. अधिकारीहि बेदिल, व आपापसांतील चुरशीमुळे ज्याकडून बढती मिळेल त्याचा पक्ष उचलण्यास तयार झालेले असे होते. उरलेल्यामध्यें कांहीं सैनिक व अधिकारी राजनिष्ठ होते, परंतु त्यांना हत्यार न उचलण्याचा हुकूम लोकसभेने राजाकडून देवविला होता. अधिकाऱ्याने

हुकूम करावा तर तो पाळला जाईल असा त्याचा त्यालाच विश्वास वाटेनासा झाला. जुनें सैन्य खिसगणतींत न घेतां, लोकसभेचें म्हणून नवें वेगळें सैन्यहि या नाहीं त्या रूपानें ठेवण्याला यापूर्वीच सुरुवात झाली होती.

पॅरिस बाहेर सर्व फ्रान्सभर लष्करी बेबंदशाहीचा धुमाकूळ सुरू होता. कोठे शिपाई लष्करी खजिना लुटून पसार झाले. कोठे त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच बडतर्फीचा हुकूम देऊन घालवून दिले. कोठे त्यांनीं तळ हलवण्याचे हुकूम साफ नाकारले. कोठे त्यांनी अधिकाऱ्याला पकडून 'गार्ड रूममध्ये' कैदेंत ठेवलें. या सर्व बातम्या लोकसभेकडे येत. कित्येक वेळा, लष्करी शिस्तीविरुद्ध, अधिकाऱ्यासंबंधीं कागाळी करणारे असे शिपायाचे अपीलअर्ज परस्पर लोकसभेकडे जात तेव्हां, लोकसभेचा रोख अधिकाऱ्यांना दोष देऊन खालच्या शिपायांना पक्षपात दाखवून त्यांना चढवून ठेवण्याचा उघड दिसत होता.

# १० नॅशनल फेडरेशन (राष्ट्रीय संघटन)

**'कौम्यून' किंवा 'संघ'**

याच सुमारास राज्यक्रान्तीला आणखी एक नवा कोंब फुटला. तो असा कीं राज्यघटना समितीने जुने राज्यविभाग मोडून टाकले, तेव्हा प्रजाजनांनी सोईप्रमाणे आपापले नवे विभाग व त्यांतील संघ आपल्या आपणच बनवण्यास सुरुवात केली. एक एका कनिष्ठ संघाचें नांव 'कॉम्यून' असें ठेवण्यांत आलें. आणि असे शंभर कॉम्यून एकत्र झाले म्हणजे ह्या संघटनेला प्रांत (प्रॉव्हिन्स) असें नांव देण्याचें ठरलें. उदाहरणार्थ 'अँजू' व 'ब्रिटनी' असे दोन परगणे पूर्वी निराळे होते असें समजा. ह्यांतील मतदारांनी सभा भरवून असें ठरविलें कीं, "यापुढें आपण 'ब्रेटन' किंवा 'अँजेव्हिन' असे तुटक राहिलों नाहीं, तर केवळ एका अविभाज्य अशा राज्याची प्रजा झालों." लोकसभेला या संघांची भीति वाटूं लागली. कारण पॅरिसची राजधानी सोडून दिली असतां, देशांतील इतर भागांत, विशेषतः कानाकोपऱ्यांत, राजनिष्ठ लोकांची भरती अद्यापि बरीच होती. तेव्हा या संघांना मान्यता तर द्यावी, पण ते आपल्या बंडखोर पक्षाला सामील करून घ्यावे, अशी लोकसभेला इच्छा झाली. देशांत क्रांतिकारक लोकांचे क्लब (समित्या) होतेच; व त्यांचा उपयोग क्रांतिकारक मताची आग बाहेर पसरविण्याचे कामीं लोकसभेला होत होती. पण या नवीन संघांमुळे समित्यांना प्रतिपक्षी उत्पन्न होणार असें दिसतांच, संघांचा सन्मान करून त्यांना आपलेसे करण्याकरितां 'नॅशनल फेडरेशनची' कल्पना निघाली.

**नॅशनल फेडरेशन**

नॅशनल फेडरेशन म्हणजे 'राष्ट्रीय संघांचें संघटन.' हे संघ बनण्याला १७८९ च्या ऑक्टोबरमध्यें सुरवात झाली होती; व जून १७९० पर्यंत या संघांची चळवळ बळावल्यामुळें, त्यांचें संमेलन भरविण्याचा ठराव लोकसभेनें केला. या संमेलनाला नॅशनल गार्ड्स म्हणजे 'राष्ट्रीय सैन्य' याचे प्रतिनिधीहि बोलाविण्यांत आलें. अशा दुतर्फी प्रतिनिधींच्या संमेलनाचा उद्देश दुहेरी होता. बंडखोर संघ हे लोकसभेचे उघड पक्षपातीच होते. पण नॅशनल गार्ड्सचा मुख्याधिकारी लाफायत हा राजपक्षपाती असल्यामुळें, खुद्द राजाकडून नव्या घटनेला संमति व तिजविषयीं निष्ठा प्रगट करवावी असा कावा होता. हें प्रचंड संमेलन ता. १६ जुलै १७९० रोजीं झालें. इतिहासकारांनीं त्याचीं मोठी मजेदार वर्णनें लिहून ठेविलीं आहेत. ह्यांतील एक वर्णन असे :—

**संस्मरणीय संमेलन**

"समारंभाची व्यवस्था मोकळ्या विस्तृत जागेंत करण्यांत आली होती. तींत पितृदेशाच्या नांवानें स्थापलेल्या देवतेची पूजा करण्याकरितां एक स्थंडिल बांधलें होतें. त्याच्या भोंवतीं गवती मैदानांत, पॅरिसच्या लहान मोठ्या लोकांनीं, समारंभांत बसण्यासाठीं आपल्या हातानें जागा आंखून ठाकठीक करून घेतल्या होत्या. परगण्यांतील कॉम्यून्सचे प्रतिनिधि आले त्यांनीं राजाला एक आंगठी नजर केली. ब्रेटनं येथील प्रतिनिधींनी राजापुढें येतांच त्याच्या पायाशीं शब्दशः लोटांगणें घातलीं आणि रडून त्याची करुणा भाकली. त्यांच्या पुढाऱ्यानें कमरेची तलवार सोडून राजाचे हातीं दिली आणि तो म्हणाला, "महाराज आपले जे कोणी शत्रू असतील त्यांचेंच रक्त या तलवारीला लागेल." तेव्हां राजानेहि त्याला आलिंगन देऊन म्हटलें कीं, "छे, छे, हें तुम्हीं बोलून कां दाखवायला पाहिजे? तुम्हां ब्रेटन लोकांचें प्रेम व राजनिष्ठा यांची शंका मी मनानेहि कधीं घेतली नव्हती. तुम्ही परत जाऊन आपल्या लोकांना सांगा कीं, त्यांचा बाप, भाऊ, सगासोयरा सर्व कांहीं मीच आहे!"

"धार्मिक स्वरूपाचा विधि करण्याचें काम एका मोठ्या बिशपकडे देण्यांत आलें होते. त्याच्याभोंवतीं झगे घातलेले चारशें धर्माधिकारी उभे होते. सर्वांनीं मिळून नव्या घटनेला आशीर्वाद दिले. राष्ट्रीय सैन्याचा अधिपति लाफायत हा पुढें येऊन, त्यानें आपली तलवार स्थंडिलाजवळ ठेवली; आणि राजा, राष्ट्र व कायदे या सर्वांविषयीं त्यानें निष्ठापूर्वक शपथ घेतली. नंतर लोकसभेचा अध्यक्ष व त्यामागून त्या सभेचे प्रतिनिधि यांनीं शपथा घेतल्या. पण राजा लुई व सेनापती लाफायत यांच्या शपथविधीच्या वेळीं जो जयजयकार व टाळ्यांचा गजर लोकांनीं केला, तसा तो यावेळीं झाला नाहीं. लोकसभेपेक्षां राष्ट्राला मान्यता अधिक असा पंक्तिप्रपंच लोकांच्या वागणुकींत अजूनहि दिसून आला. हें सर्व पाहून राणीला सहजच आपल्या ऐश्वर्याचा अभिमान वाटला; व तिनें छोटा युवराज हातांत धरून, वर उचलून लोकांना दाखवून, लोकांवरील आपला अनुग्रह जाणविला. हा सर्व समारंभ राजनिष्ठापूर्वक होतोसा दिसत होता तरी तो क्रांति करण्यांस सरसावलेल्या लोकांनीच घडवून आणला होता! यामुळे लोकांनी जशी राजाविषयी तशीच राजानेहि क्रांतीविषयीं मान्यता दर्शविणें योग्यच होतें! या आनंदाच्या अतिरेकांत राजा लोकांना ऐकूं जाईल असें मोठ्यानें म्हणाला—या क्रांतीचें समर्थन व संरक्षण करण्याकरितां मी आपलें रक्तहि सांडीन."

अर्थात् फ्रेंच राज्यक्रांति (रेव्होल्युशन) याचा अर्थ या क्षणापर्यंत किती मर्यादित होता, हें स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. दुर्दैवानें पुढें लवकरच राजाचे हे शब्द एका वेगळ्या अर्थानें खरे होऊन त्याला आपलें रक्त या क्रांतीकरितां सांडावें लागलें. पण तो अर्थ कोणता हें लवकरच कळून येईल!

"संध्याकाळीं दीपोत्सव झाले. सहाशें गाणार वाजविणार लोकांचा ताफा तयार करण्यांत आला. त्याजकडून, 'नोत्रदाम' नामक सुप्रसिद्ध देवळा-

मध्यें, 'बास्तील' किल्ला घेतल्याच्या प्रसंगाचें नाटक करून दाखविण्यांत आलें आणि जो येईल त्यानें किल्ला उध्वस्त झालेल्या बास्तीलच्या जागेवर नाचून आपण गुलामगिरीच्या मढ्यावर नाचत आहों असें मानण्याची हौस फेडून घेतली !"

तात्पर्य, एकीकडे राजा व एकीकडे राज्यक्रांति या दोहोंचा जयजयकार एकाच तोंडानें कित्येक लोक करीत होते! निंदेचा शब्द ऐकूं आलाच तर त्यांतल्या त्यांत किंचित् लोकसभेच्याच वांट्याला तो येत होता. याचें लोकसभेच्या प्रतिनिधींना मनांतून वैषम्य वाटत होतें. आणि जॅकोबिन क्लबांतील जहाल लोकांनी याचा पुरा फायदा घेऊन प्रतिनिधींच्या मनांत असें भरवून दिलें कीं, "तुमचे लोकसभेचे अधिकारी इसमच बेइमान झाले आहेत. प्रतिष्ठित वर्गाच्या ऐश्वर्याला भुलून ते स्वतःच प्रातिष्ठित होऊं पाहात आहेत. लाफायतचेंच उदाहरण घ्या. तो राष्ट्रीय सैन्याचा सेनापति म्हणवितो आणि आपली तरवार काढून राजापुढें ठेवतो! तेव्हां याचें उट्टें काढण्याचें काम आतां सैन्याशिवाय दुसरा कोण करणार ? म्हणून समाचार घेण्याची सुरवात करावयाची ती अशा अधिकाऱ्यापासूनच केली पाहिजे."

**दुटप्पी कीं दुहेरी**

ता. ६ ऑगस्ट रोजीं 'नॅन्सी' येथें एका पलटणीनें बराच पुंडावा केला व आपल्या अधिकाऱ्याच्या अंगावर हात टाकला. ही बंडाळी माजूं देऊं नये म्हणून लाफायतनें लोकसभेकडून कांहीं विशेष अधिकार मंजूर करवून लष्करी अधिकाऱ्यांना देवविले. अखेर नॅन्सी येथील बंड महत्प्रयासानें मोडलें. तेहतीस बंडवाल्या शिपायांना फांशीं दिलें. पण पूर्वी वर्णन केलेल्या मोठ्या संघटनासमितीच्या (फेडरेशन) समारंभांत सैन्याला कमीपणा दिला गेला, याचें वैषम्य उत्पन्न झालें तें जिरलें नाहीं. लष्करांतील या बेबनावामुळें राज्यक्रांतीला अधिक तीव्र स्वरूप येईल इतकाच फायदा लोकसभेंतील कांहीं प्रतिनिधींनी पाहून मनांत ठेवला.

**'नॅन्सी' येथील बंडाळी**

**मिराबोचा मृत्यू**

एकामागून एक अधिक जहाल अशा लोकप्रतिनिधींची भरती लोकसभेंत होऊं लागली होती. चळवळ सुरू करून देणारे पहिले नेमस्त पुढारी कांहीं मागें पडूं लागले, कांहीं मुद्दाम मागें हटूं लागले. बाहेर बेकारी व उपासमार वाढली त्याबरोबरच, सरकारी खर्च व परदेशी गेलेली संपत्ति यामुळें एका वर्षांत फ्रान्सचें द्रव्यबळ सुमारें ४० कोटि रुपये कमी झालें! देशांतली निम्मी दुकानें व तिसरा हिस्सा कारखाने यांना कुलुपें लागलीं. याला क्रांतिकारकच जबाबदार अशा कल्पनेने केवळ थारेपालट म्हणूनच कीं काय, आतां प्रतिराज्यक्रांति सुरू होते असें भासूं लागलें. या उलट सुलट दोन गतींनी समाज घुसळून निघूं लागला. लोकसभेंतील 'जहाल' पक्षांत 'अनिष्ट' अशाहि लोकांची संख्या वाढूं लागली. मुलुखाचे धाडसी, महत्त्वाकांक्षी, अविवेकी, अप्रामाणिक अशा लोकांचा वरचष्मा झाला. "तूं जहाल तर मी तुझ्याहून अधिक जहाल होतो कीं नाहीं पाहा" अशी स्पर्धा सुरू झाली. आणि या स्पर्धेंत जो अधिक बेफाम ठरेल त्याला अज्ञानी जनतेच्या टाळया ठरलेल्या! मिराबो, लाफायत यांसारख्या लोकांना रोबोस्पियरसारख्या लोकांनी मागें टाकलें. जहाल पक्षांतहि कांहीं नेमस्त असतातच. पण नेमस्तपणा हें शहाणपण असलें तरी बळ नव्हे असें त्यांच्या निदर्शनास येऊं लागलें. नेमस्त हें सहजच उभयान्वयी ठरतात. मिराबोसारखे पुढारी इकडे राजमंडळाला पशु ही संज्ञा देत, तर तिकडे लोकसभेला रानटी गाढवांचा कळप असेंहि म्हणत! पण यामुळें दोनहि पक्ष त्यांच्यावर तुटून पडत. मिराबोला प्रधानपद पाहिजे होतें तें लोकसभेला शिव्या देऊनहि राजाकडून मिळालें नाहीं. आणि राजमंडळाला शिव्या दिल्यानेहि लोकसभेने त्याला निर्विवाद पुढारीपण दिलें नाहीं. लाफायत हा अधिक प्रामाणिक होता. क्रांतिकारकांच्या फाजीलपणाचा त्याला मनापासून तिटकारा असे. आणि वेळ पडेल तेव्हां राष्ट्रीय सैन्याचें हत्यार अशा लोकांविरुद्ध उचलण्याला तो मागेंपुढें पाहात नसे. त्याच्यामागें प्रामाणिकपणाचें बळ भक्कम

होते. यामुळें हा दुहेरीपणा संभाळूनहि तो मिराब्रोपेक्षां अधिक वेळ जागेवर टिकला. शेवटीं राजाकडून नाहीं तरी लोकांकडून मिराबोला बक्षिस मिळालें. १७९१ च्या मार्चमध्यें त्याला पॅरिसखात्याचा अध्यक्ष नेमण्यांत आलें. ही जागा म्हणजे जवळ जवळ प्रधानपदच. परंतु तें त्याला फार दिवस लाभलें नाहीं. कारण पुढें थोड्याच दिवसांत तो आजारी पडून मरण पावला. तेव्हां दोनहि पक्षांचें दुःखोद्गार मात्र त्याला लाभले.

मिराब्रोच्या मृत्यूमुळें क्रांतीची पावलें जलद उचलण्याला मदत झाली.

**क्रांति धावूं लागली**

क्रांतीच्या चावऱ्या कुत्र्याला तो तोंडानें 'छू' करी, तरी त्याच्या गळपट्ट्याच्या साखळीवरील आपला हात त्यानें ढिला केला नव्हता. तो मेल्यामुळें तो हात सहजच निघाला. मरतांना तो टॉलेरॉंजवळ म्हणाला, "अराजकाच्या दलदलींत फ्रान्सचा पाय रोज अधिकाधिक खोल जात आहे. माझ्या हातून घातक क्रांतीला अपकारापेक्षां उपकारच अधिक झाला. राजसत्तेच्या आता काय त्या फाटक्या चिंध्याच उरल्या आहेत. पण त्याहि मी आपल्याबरोबर माझ्या थडग्यांत घेऊन जात आहे. एकंदरीनें माझ्या हातून विधायकापेक्षां विध्वंसक कार्यच अधिक झालें. राजाला आतां कोणी पाठीराखा मिळणार नाहीं. माझ्या देहाबरोबरच राज्यपदाचे सर्व अलंकार भुईंत गाडले गेलें असें समजावें." आणि हें खरेंच होते.

मिरायो मरण पावल्याने राजसत्तेचा उरलासुरला सर्व आधार नाहींसा झाला. आणि दैवहि असें की मरणापूर्वीं जी एक गोष्ट, काय वाटेल तें झालें तरी, करूं नका असें त्याने राजमंडळाला बजावून सांगितलें होतें तीच गोष्ट त्याच्या मरणानंतर लवकरच त्या मंडळाच्या हातून घडली. ती गोष्ट म्हणजे राजाचें गुप्त रीतीने राजवाड्यांतून पलायन! अशा पलायनाचा पायंडा इतर राजपक्षपाती व क्रांतिद्रोही फ्रेंच लोकांनी पूर्वींच घातला होता हें खरें. पण इतरे-जनांनी पळून जाणें व खुद्द राजाने पळून जाणें यांत सहजच जमीन–

अस्मानाचें अंतर पडतें ! या पळपुटेपणानें राजाचें तर मरण ओढवलेंच, पण राजपदच समूळ नष्ट होऊन प्रजासत्ताक राज्य ( रिपब्लिक ) स्थापन केलें गेलें.

फ्रेंच राज्याची घटनाच्या घटनाच बदलली. कारण क्रांतिकारकांचा पहिला विचार राजपद नष्ट करण्याचा नव्हता हें मागील प्रकरणांत आम्ही सांगितलेंच आहे. आणि राजा पळून न जाता तर तोच विचार बहुधा कायमहि राहता. पण पळपुटेपणामुळें क्रांतिकारकांच्या डोळ्यापुढे परचक्राची भीति उभी राहिली, आणि परचक्र म्हणजे क्रांतीचा नाश !

१७८९ त क्रांतीचीं चिन्हें दिसूं लागतांच फ्रान्समधील अमीरउमराव देशत्याग करून बाहेर जाऊं लागले होते. अशी एक म्हण आहे कीं, एखादें जहाज समुद्रांत बुडावयाचें झालें तर ती गोष्ट कत्तानाच्या आधीं जहाजांतील उंदरांना अंतर्ज्ञानानें समजते आणि तें जहाज सोडून पळून जाऊं लागतात ! राजवाड्यांतहि दरवाजे लावून खलबतें होऊं लागली. राजाला असा सल्ला देण्यांत येऊं लागला कीं, त्यानें प्रत्यक्ष देशत्याग न केला तरी फ्रान्सच्या सरहद्दीजवळ मेट्स या लष्करी ठाण्यापर्यंत जाऊन तेथे मुक्काम करावा. तेथील सैन्य व सेनापति राजनिष्ठ आहेत. तिकडून परदेशचें सैन्यहि सरहद्दीपर्यंत चालून येईल मग वाटेल तर त्या सैन्यासह परत येऊन किंवा त्याचा धाक दुरून दाखवून राजसैन्याकडून बंड मोडवावें. पण भिंतीला कान असतात या म्हणीप्रमाणे हीं खलबतें बाहेर कळून आल्यामुळें राजदरबारच्या सर्व मंडळींवरील नजरकैद सुदृढ करण्यांत आली. बाहेर हिंडा-फिरायास जावयाचें झालें तरी मागे राष्ट्रीय सैन्याचे शिपाई, दिसण्यांत सन्मानार्थ पण वस्तुतः हालचालीवर नजर ठेवण्यास, पाठविले जात. एक दिवस राजा पळून जाणार अशी भुमका सहज कोणी अदमासानें उठविली. ती पसरून खरी वाटून राजवाड्याभोवती चिकार गर्दी जमली. राजवाड्यांतून गुप्तपणें पळून जाण्याला चोरवाटा किंवा भुयारें कोठे आहेत कीं काय याचा शोध सुरू झाला. कोणी म्हणूं लागले,

"राजाच्या मनांत पळून जावयाचें नाही खरें, पण ती राणी आहेना! तिच्या मनांत आलें तर ती आपल्या शिपायांकडून राजाला बळजबरीने खेचून पुढे घालून घेऊन जाईल!"

**राणीचें राजकारण**

१७९० च्या जुलै–ऑगस्टपर्यंत, म्हणजे क्रान्तीला सुरुवात होऊन सुमारें १५ महिने लोटेपर्यंत, राणीनेहि ही उचल केली नव्हती. आतांहि ती केली तरी तिचा अर्थ इतकाच होता की, "निवाणीचा उपाय म्हणून आपल्या भावाने फ्रान्सकडे सैन्य पाठवण्याचा बहाणा केला म्हणजे इकडे क्रान्तिकारकांना दहशत बसून ते थोडे नरम होतील." ऑस्ट्रियन बादशाहहि शहाणा होता. त्याने आपल्या बहिणीला असें सुचविलें कीं, पॅरिसवर सैन्य पाठवण्यापेक्षां तुम्ही मंडळी युक्तिप्रयुक्तीने पॅरिस सोडून फ्रान्सच्या सरहद्दीशी आला तर, मला तुम्हांला सरहद्दीच्या अलीकडे ठेवून घेऊन नुसतें तुमचें रक्षण करण्यालाच नव्हे तर, राज्यक्रान्ति जिरवण्यालाहि मदत करतां येईल.

**पळपुटे राजमंडळ**

आदल्या वर्षीं क्रांतिकारक चळवळीला सुरवात झाली, त्याबरोबर राजमंडळांतील कांही खाशांनी पोबारा केला. या चळवळीचा पहिला आघात आपल्यावर पडणार अशी यथार्थ भीति वाटून, हे लोक आपली संपत्ति घेऊन परदेशाचा आश्रय करूं लागले. सर्व देशभर वरिष्ठ वर्गावर पहिला हल्ला सुरू झाला. यामुळे राजमंडळांत सभाविष्ट नसलेले असेहि कित्येक अमीर–उमराव फ्रान्स सोडून जाऊं लागले. आणि हे लोक आपण होऊन पळून जातात, तेव्हां यांचें पापी मनच यांना खात आहे, या पुराव्यावरून लोकसभा वरिष्ठ वर्गाचे हक्क काढून घेत आहे ती गोष्ट न्यायाचीच होय, असें आपोआप ठरूं लागलें. पळपुटे लोक देशांत राहाते तरी राजाला त्यांची प्रत्यक्ष मदत कितीशी होणार होती म्हणा. पण ते राहिल्याने जी अप्रत्यक्ष मदत त्याला झाली असती, तिचाहि संभव

उरला नाही. हातांत पानें घेऊन गंजिफांचा डाव खेळत राहणाऱ्याला अखेरी जिंकण्याची आशा तरी असते पण डाव झाला असें म्हणून कोणी आपल्या हातांतलीं पानेंच फेकून दिलीं तर, तो अखेरी कशी जिंकणार ?

पळून गेलेल्या या लोकांनी परदेशांतहि फ्रान्सला उपकारापेक्षा अपकारच अधिक केला. शरणागताला अभय देणे हें ठीक, पण या पळपुट्यांपैकी कांहींनी आपल्या उन्मत्तपणाने परदेशीयांना नाराज केलें, आणि सहानुभूतीपेक्षां द्वेषच अधिक संपादिला. कित्येक परदेशीय लोक स्वार्थदृष्टीने या पळपुट्यांकडे पहात होते. या पळपुट्यांजवळच्या संपत्तीवर त्यांचा डोळा होता. पण या पळपुट्यांनी निर्भयता लाभतांच बराचसा पैसा चैनीत उधळला व सहानुभूतीचें साहाय्य मिळविण्याचें एक साधन आपल्याच हाताने गमावलें. पळपुट्यांची जीभहि वाईट होती. सरहद्दीपलीकडे गेल्याबरोबर आम्ही यंव करूं, फ्रेंच जनतेवर असा सूड उगवूं, अशा बढाया त्यांनी सुरूं केल्या !

**राणीचें कृत्य समर्थनीय**

आपल्या भांडणांत परक्याला हात घालूं दिल्याने नाश होतो, ही गोष्ट खरी. पण संकटाचे वेळीं या प्रशस्त नीतीचें स्मरण मनुष्याला राहात नाही. दुसऱ्याची मदत घेऊन आपलें काम यशस्वी झालें म्हणजे ती मुत्सद्देगिरी व तो शहाणपणा ठरतो. आणि ती युक्ति फसली म्हणजे मग त्याला मूर्खपणा हें नांव येतें. काट्यानें काटा काढावा ही म्हण सनातनच आहे. ज्या दुसऱ्या काट्याने आपण पहिला काटा काढतों, तो काटाच असतो. किंबहुना पहिल्या काट्यापेक्षा दुसरा काटा अधिक कणखर व अणकुचीदार, असा पाहूनच आपण त्याचा उपयोग करतों. काटा पायांत मोडतो तो आपणाला न कळत, वेडावाकडा वाटेल तसा मोडतो, वाटेल तितका आंत घुसतो, पण तो काढण्याचें साधन म्हणून आपण हातीं घेतलेला काटा सोसवेल असाच चाळवून जरूर तितकीच इजा करून घेऊन काम संपतांच फेकून देतों. तथापि काट्याने काटा काढूं जातां

पहिला पायांतून न निघतां उलट दुसराच मोडून पायांत राहतो असें घडणेंहि शक्य आहे! अर्थात् ही उलटसुलट विचारसरणी स्वस्थ मनाची आणि दुसऱ्याला लागूं करण्याची आहे. स्वतःवर संकट आलें म्हणजे मन गोंधळून जातें, आणि स्वतःला फायदेशीर तितकाच युक्तिवाद बरोबर असा मोह पडतो. खुद्द फ्रान्सच्या पूर्वेतिहासांतच ह्यूजेनॉट प्रॉटेस्टंट लोकांनी इंग्लंड व जर्मनी यांची मदत मागितली होती. राजपुत्र कान्दे याने स्पॅनिश लोकांची मदत मागितली होती. परराष्ट्रांशीं स्नेहसंबंध ठेवणें, ही गोष्ट नवी नाहीं व हे संबंध लोकसभा उघडपणें ठेवीत असल्या तरी स्वतः राजे लोक गुप्त तह म्हणून वेगळे करीत असतातच! हें सगळें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, खुद्द आपल्या भावाला मदतीला बोलाविण्यांत राणीने अगदी कांहीं भलतेंच केलें असा जो आरोप टीकाकार करतात, तो बरोबर नाहीं.

**लुईचें मनोराज्य**

जितके पळपुटे लोक देशत्याग करूं लागले, तितका लोकांना राजाविरुद्ध अधिक चेव येऊं लागला; व देशाबरोबर त्याचीहि नाकेबंदी अधिक कडक रीतीने करण्यांत येऊं लागली. "राजाने युरोपांतील राजांना स्वदस्तुरचें पत्र लिहून कळवावें कीं, मीं निर्भय आहें. माझी काळजी तुम्ही करूं नका." असा नवाच बूट निघाला. त्याप्रमाणे राजाने पत्रें लिहिलीं! किंबहुना त्याने कांहीं दिवस असें धोरण ठेवलें कीं, लोकसभा जें जें सांगेल तें तें करावें, आणि लोकसभेंत बेसावधपणा उत्पन्न करून हळूच राणीसहवर्तमान परदेशीं पलायन करावें. राजाचा हा कल पाहून राणी व राजमंडळ यांना फार बरें वाटलें. पॅरिसमध्यें आपलें स्वातंत्र्य व दर्जा हीं तर धोक्यांत आलींच, परंतु आपल्या धार्मिक मतांवरहि लोकसभेने जुलूम केला. तेव्हां आता येथे राहूं नये, असा राजाने निश्चय केला. पण जावें, तर जावें कोठें? याला एकच तोड होती. ती ही कीं, मेट्झ येथील सैन्य सर्वांत अत्यंत राजनिष्ठ, तेव्हां त्या सैन्याच्या आश्रयाला गेल्यास आपलें रक्षण

होईल, व क्रांतिकारकांना उलट शह देतां येईल. शिवाय यांत परक्याचा हात पडणार नाहीं. एकदा अशा रीतीने क्रान्तीवर मात केली म्हणजे मग प्रजा ही काय आपलीच आहे. तिला क्षमा करूं, अधिक उणें देऊं घेऊं, सर्व कांहीं आपलाच मामला आहे.


# ११ लुई राजाचें पलायन

**राजा पळाला**

ता. २१ जून रोजीं सकाळीं ७ वाजतां पहारेकरी राजाच्या दिवाणखान्याकडे येऊन पहातात तों तेथें सर्व शुकशुकाट होता. तीच गोष्ट राणीवशांतील दिवाणखान्याची. पहारेकऱ्यांनीं बोंबाबोंब केली. आणि एक तासाच्या आंत पॅरिसमधल्या सर्व मोठ्या घंटा घण–घण वाजून लोकांना जमाव करण्याची सूचना देऊं लागल्या.

आदल्या रात्रीं टुलिरसच्या वाड्यांत एक अकल्पित प्रकार घडून आला होता. मध्यरात्रीपर्यंत राजा व लाफायत यांचें नेहमीप्रमाणें संभाषण होऊन सेनापति आपल्या शिबीराला गेला. रस्त्यावरील गाड्यांची रहदारी हळुहळू कमी झाली. तथापि एक मोठी बुरखेवाली बगी वाड्यालगतच्या एका आडरस्त्याला उभी होती. बराच वेळ तिच्यांतून कोणी उतरले नाहीं, किंवा तींत कोणी चढलें नाहीं. हा रिकामटेकडा 'कोचमन' येथें उगीच माशा मारीत इतका वेळ कशाला बसला याचें अनेकांना आश्चर्य वाटलें. सर्वत्र सामसूम झाल्यावर घरकाम करणाऱ्या नोकराचा पोषाख घातलेला राजा फेरीवाल्या जिपसीचा पोषाख घातलेली राणी, बरोबर मुलें व कांहीं परिवार, अशीं हळूच वाड्यांतील एक दोन चौक ओलांडून जवळच्या फाटकांतून येऊन गाडींत बसलीं. लगेच दरवाजा बंद होऊन गाडी चालूं लागली.

## राणी मेरिअँटॉइनेट



**पण लगेच सांपडल्या**

या गुप्त पलायनाचे मुक्काम व त्याच्या पाठपुराव्याची योजना आधींच ठरली होती. पहिल्या मुक्कामाला कांहीं ड्रॅगून लष्करी शिपाई राजाला येऊन मिळणार होते. पुढच्या मुक्कामाला आणखी कांहीं इतर शिपाई येणार होते. तिसऱ्या मुक्कामाला मेट्झ येथील पलटणींचा राजनिष्ठ सरदार बोइले हा स्वतःच येऊन मिळणार होता व राजाला पुढें मेट्झकडे घेऊन जाणार होता. पण प्रथमच सेंट मेनेहोल्ड या गांवीं या ड्रॅगून शिपायांनीं थोडा चढेलपणा केला. यामुळें लोकांचें लक्ष या प्रवाश्यांकडे वेधलें. एरवी स्वतः राजाचा रथ देखील कांहीं कमी चहाडखोर नव्हता म्हणा! कारण किती झालें तरी राजाचा रथ! कोणाहि प्रजाजनाच्या रथापेक्षा तो मोठा असलाच पाहिजे. तसा तो होताहि. या गांवचा पोस्ट-मास्तर द्रोए हा मोठा चाणाक्ष होता. त्याला शंका आली, तेव्हा त्याने आपले दोन तरुण हस्तक, चलाख घोड्यावर घालून, जवळच्या रानांतून आडवळणाने या रथाच्या पुढच्या मुक्कामाच्या अदमासाने पिटाळले. दिवसभर ऊन खात, धूळ खात, फ्रेअरमॉंड येथील ठरल्या मुक्कामाला राजा संध्याकाळीं पोंहोचला. तेथें कौंट दामा राजाच्या व्यवस्थेला आला होता. पण त्याने ड्रागून शिपाई यापुढें मना केलें, व मुक्कामावर न थांबतां रथ तसाच पुढें चालवला. इकडे द्रुएच्या हस्तकांनीं व्हारेनच्या मुक्कामाला आधीं बराच वेळ पोचून थोडी विश्रांति घेतली, आणि लगेच लोकांना उठवून तिथ्यावर एक रिकामा अवजड छकडा त्यांनीं आडवा ओढून ठेवला. आणखीहि कांहीं अडगळ त्यांनी अशीच आडवी घातली.

या युक्तीचा उपयोग अदमासाप्रमाणे झाला. राजाचा रथ या जागीं थांबून बोलाचाली सुरू झाली. इतक्यांत लोक गोळा झाले. राजा कोचमनाला रथ हाकण्याचा हुकूम जोराजोराने करूं लागला तेव्हा लोक धीट होऊन एक दोघांनीं बंदुकी वर उचलल्या; व ते म्हणाले, "खबरदार! कोणी पाय

उचलला तर! गोळ्या घालूं." इतक्यांत गांवचा सरपाटीलआला, व त्याच्या सल्ल्याने वर्दळीवर न येतां रात्रभर त्या गांवीं मुक्काम करण्याचें राजाने कबूल केलें. शेवटीं कांहीं लोकांनीं राजाला ओळखलें व राजा पळून चालला असा गवगवा सुरू झाला. राजाने आपल्याकडून मऊपणा अंगीं आणून "बाबांनो, मी कांहीं देशत्याग करून चाललों नाहीं. फक्त स्वदेशांतच स्थलांतर करण्याला जात आहे" असें सांगून पाहिलें. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. लोकांनीं रथाचें तोंड मागे पॅरिसकडे फिरविलें, कोचमनाला रथ हांकण्याची आज्ञा केली व रखवालीकरितां टोळ्या करून लोक रथाच्या आगेमागे चालूं लागले.

**पॅरिसमधील धांवपळ**

इकडे पॅरिसमध्ये राजा पळून गेल्याची बातमी समजतांच राजवाड्या-भोवती प्रचंड घोळका जमला. लाफायतहि आला. "तुम्हीच राजाला सामील आहां" असा आरोप लोकांनी त्याच्या तोंडावर उघड केला. तेव्हा तो मोठा कष्टी झाला. आदले दिवशीं मध्यरात्रीपर्यंत आपण राजाशीं बोलत बसलों होतों, तेव्हा लोक आपला संशय सहजच घेणार, या विचाराने तो खजिल झाला. म्हणून लोकांची खात्री करण्याकरितां त्याने नगराध्यक्ष आणि लोकसभेचा अध्यक्ष यांना घेऊन, आवेशाने गर्दीतून वाट काढून, वाड्यांत प्रवेश केला. असेल तेथून राजाला पकडून आणण्याच्या हुकुमावर सह्या करून घेऊन त्याने चोहो दिशांना घोडे-स्वार पिटाळले, व पॅरिसच्या बंदोबस्ताला तो निघून गेला. मोकळा राज-वाडा हातीं लागतांच राजद्वेष्ट्या लोकांनी मौज करून घेतली. एका माळणीने माळव्याने भरलेली आपली पाटी राणीच्या पलंगावर ठेवली, आणि थट्टेचा स्वर काढून ती म्हणाली, "राणीसाहेब, हा घ्या कीं भाजीचा अहेर!" मग टपालवाला आला. ज्यांच्या नांवाची पत्रें त्यांतले येथें कोणीच दिसत नाहींत, असें पाहून हसत हसत त्याने पत्रावर शेरा लिहिला कीं, "मालक बेपत्ता. पळून गेल्यामुळें बदललेला पत्ता मागे कोणास सांगितलेला नाहीं!"

एकाने एका मोठ्या कागदावर "जागा भाड्याने देणें आहे" अशीं अक्षरें लिहून तो राजवाड्याच्या दरवाजावर चिकटवला !

सकाळीं ९ वाजता लोकसभेच्या बैठकीला सुरुवात झाली. "राजा पळून गेला आहे, म्हणून तो ज्याला सांपडेल त्याने त्याला अटक करावी" असा कुलजाहीरनामा सभेच्या नांवाने काढण्यांत आला. आणि राजाला पकडून कोणी पॅरिसमध्ये आणीपर्यंत सभेची बैठक अखंड रात्रंदिवस चालू राहावी असें ठरलें. परदेशीं जाणाऱ्या सर्वांचे परवाने रद्द केल्याचा या पुढे आणखी एक हुकूम असाच निघाला. सभेंतील मामुली कामकाज करण्याकडे कोणाचें लक्ष लागेना. आणि रिकामपणीं भांडावें तर या क्षणीं तरी सभेंत मतभेद नव्हता.

इतर लोकांप्रमाणे स्वतः लाफायत सेनापतीच स्वार होऊन निघाला.

**पुन्हां कैद**

आणि प्रयत्नाने बातमी काढीत काढीत व्हरीन येथे पोचतांच त्याने राजाचे हातीं लोकसभेचें वॉरंट देऊन त्याला कैद केलें !

या पुढील परतीच्या यात्रेंतील राजाराणीची दुर्दशा वर्णन करणाराला

**काळाचा सूड**

आजहि वाईट वाटेल. मोठेपणा भोगलेले लोक कितीहि वाईट असले तरी त्यांचा अधःपात कोरड्या डोळ्यांनी पाहील तो सहृदय कसला ? भर उन्हाळ्यांतला उकाडा; गर्दीच्या पायपिटीने धुळीचे लोट उठलेले; निंदा ऐकूं आल्याशिवाय एक क्षणहि जात नाहीं; कोणी म्हणावें, "आम्ही नव्हता हा राजा पूर्वी पाहिला. भला आहे कीं मोठा ! एका राजाचे चार राजे करण्याइतका !" लाक्षणिक का होईनात, राजा-राणीचीं आंतडीं शिजवून खाण्याच्या गोष्टी या गर्दीतले चांडाळ बोलत. "राजा-राणीच्या कमाविलेल्या कातड्याचे पट्टे मोठे नाजूक होतील नाहीं" असें कोणी म्हणावें ! एक कैदाशीण तर बगीच्या खिडकींत तोंड घालून

राजाराणीचे तोंडावर थुंकली देखील! राजा पकडला गेला ही बातमी तीन दिवस म्हणजे ता. २४ जूनपर्यंत पॅरिसमध्ये कळली नव्हती. दरम्यान रिकामपणीं लोक हास्यविनोद करीत होते. एकाने म्हणावें, "राजाराणी बेपत्ता! अशी गोष्ट कधीं कोणी ऐकिली काय?" एक म्हणाला, "त्यांना पकडून देणाराला एक मोठें बक्षीस लावा." त्यावर दुसरा म्हणाला, "होय, होय, बक्षिस मोठें लावा; पण तें राजाला हुडकून देणाऱ्याकरिता नव्हे; तर मी हटकून राजाचा पत्तासुद्धा कायमचा नाहींसा करीन असे म्हणेल त्याला; आता राजा आयता सांडला, त्याला पडकून पुनः पायावर उभें करणें म्हणजे काय?"

**राजपद बुडालें**

शेवटीं ता. २५ जून रोजीं राजा–राणीला परत आणून टुलरीसच्या राजवाड्यांत नजरकैदेंत ठेविलें. लाफायतने पळपुट्या राजाला लोकसभेच्या आज्ञेने पकडलें होतें खरें, पण राजवाड्यांत तो फिरून येऊन बसल्यावर "राजा तो राजा आणि नोकर तो नोकर. मला काय ती आज्ञा व्हावी" असें म्हणून तो इमानी सेनापति राजापुढे उभा राहिला! तेव्हा राजा खिन्न होऊन म्हणाला, "सेनापतिसाहेब, माझी उगीच थट्टा कां करितां? मी आतां राजा नाहीं. राजपद बुडालें!" बरोबरच दुसरे दिवशीं लोकसभेने राजाला 'सस्पेंड' करण्याचा ठराव केला!

**लोकमताचा सूर**

नव्या बनणाऱ्या राज्यघटनेंत आजपर्यंत 'राजा मुख्य' ही कल्पना होती. यापुढे अराजक लोकसत्ताक राज्य (रिपाब्लिक) स्थापावें अशी इच्छा लोकसभेंत प्रबळ झाली. आतापर्यंत राजपक्षपाती असणाऱ्या लोकांचाहि सूर बदलूं लागला. राज्यावर कोणी राजा नाहीं या नुसत्या विचाराने, प्रत्येक प्रजाजनाला आपण किंचित् तरी महत्त्वाचे आहों असें वाटूं लागलें. "राज्याशिवाय राजा होऊंच शकत नाही, पण राजाशिवाय राज्य होऊं शकतें हें कसें तें आम्ही आता करूनच दाखवूं" असें कांही लोक आत्मविश्वासाने बोलून दाखवूं

लागले. इतर पळपुट्या अमीरउमराव लोकांइतकीच राजाची किंमत! ते लुच्चे यशस्वी रीतीने सरहद्द ओलांडून गेले म्हणून वांचले. राजाला तेंहि करतां आलें नाही. तेव्हा पळपुट्यांविरुद्ध केलेल्या कडक कायद्यांचा प्रभाव आता सर्व राजालाच दाखवूं असें लोक म्हणूं लागले. राजाचा एकनिष्ठ लष्करी सरदार बॉइले याजकडून कबुलीजबाब लिहून घेण्यांत आला कीं, "मी राजाला घेऊन देशांतर करणार होतों." मग काय विचारतां?

**दोन नवीन तट**

रिपब्लिक स्थापण्याबद्दल जाकोबीन क्लबाकडून मोठी चळवळ सुरू झाली. पण त्याचबरोबर "ज्याचा अनुभव आपल्याला नाही अशा रिपब्लिकमध्ये आपलें कसें होईल!" असेंहि कांही भित्रे लोक म्हणूं लागले. या मतभेदामुळे पुनः दुही माजली. कांही क्लबांत फाटाफूट होऊन एकाचे दोन क्लब झाले. ता. १५ व १६ जुलै रोजीं बारनेव्ह याच्या प्रतिगामी धाडसाला चुकून यश येऊन "रिपब्लिक स्थापूं नये, फक्त राज्यघटना पुरी तयार करून होईपर्यंत राजा 'सस्पेंड' समजावा," असा ठराव लोकसभेने पास केला. पण ता. १७ रोजीं शॉंदी-मारमधील लाकडी सिंहासन उलथून टाकण्याचा प्रयत्न झाला. त्यावेळीं दंगा माजला तो मोडण्याकरिता लाफायतने गोळीबाराचा हुकूम केला. रक्त-पात फारसा झाला नाही! पण झाला तेवढ्यानेच लोकांचे दोन तट पडून या रक्तस्रावामुळे त्यांच्यामध्यें खुणेची तांबडी रेघ ओढली गेल्यासारखें झालें. उजव्या म्हणजे नेमस्त बाजूला लाफायत, मध्यम वर्गाचे पुढारी, पॅरिस म्युनिसिपालिटी, आणि लोकसभेंतील बहुमत. आणि डाव्या म्हणजे जहाल बाजूस जाकोबीन पक्षाचे पुढारी, गांवांतील गुंड, मवाली लोक बरीचशी जनता अशी बनावट झाली. तथापि लोकसभेने बंडाळीविरुद्ध नवे कायदे केले नाहींत. तिला एक प्रकारचा शीण आल्यासारखा झाला होता. आणि तोच पुढे वाढून, सभेंत व्यक्तिमहात्म्य प्रस्थापित झालें; व क्रांतीच्या पोटांतून प्रतिक्रांति, फिरून प्रतिक्रांतीच्या पोटांतून क्रांति, असें उलटसुलट रिकामटेकडेपणाचे घातक खेळ सुरू झाले.

# १२ पुढारीपणाची स्पर्धा

**मध्यम जहालांचें वर्चस्व**

राजा लुई पॅरिसमध्यें परत येणार त्या वेळीं त्याच्या संबंधाने दोन प्रकारचा देखावा एकदमच दिसण्याचा संभव होता. कांही लोक टाळ्या वाजवून त्याचें स्वागत करणार, तर कांही शिव्याशाप देऊन त्याचा अपमान करणार. लोकसभेने या दोनहि गोष्टी मना करून तसा जाहीरनामा काढला. मात्र जो स्वागत करील त्याला फटक्यांची शिक्षा, पंक्तिप्रपंच या जाहीरनाम्यांत केला होता! यावरून एक गोष्ट उघड दिसून आली कीं, राजा पळपुटा बनला व त्याला कैद करून परत आणावें लागलें, तरी देखील त्याचा उघड अपमान होऊं नये, अशी विद्यमान सत्ताधारी पण फक्त मध्यमजहाल क्रांतिकारक यांची इच्छा होती. 'कढ आला तरी उतूं जाऊं नये' अशा प्रकारची मर्यादा संभाळणाऱ्या या अधिकाऱ्यांवर ज्वलत् जहाल क्रांतिकारकांचा रोष सहजच वाढला. पण या जहालतम प्रतिनिधींच्या हातीं अजून लोकसभेतली सत्ता गेली नव्हती.

अजूनहि लोकसभेने असा बहाणा ठेवला कीं, राजा पळून गेला तो कांही स्वतःच्या इच्छेने नव्हे, तर त्याच्या भक्तपरिवारानेच त्याला जुलमाने रथांत घालून चालविलें! "राजा हा स्वतः वाईट असें कांहीच करीत नसतो. त्याच्या हातून वाईट झालें तरी त्याची सर्व गुन्हेगारी प्रधान व कारभारी यांजकडे असते" या इंग्लंडच्या राज्यघटनेंतल्या तत्त्वाचा उपयोग नेमस्त व

मध्यम अशा मुत्सद्दयांनी या वेळीं करून घेतला. लुई राजाने पळून जातांना एका कागदावर असें लिहून ठेवण्याचा उद्योग केला होता कीं, " नव्या राज्यघटनेच्या कांहीं कलमांना मी संमति दिली ती केवळ जुलमाने, खरी नव्हे. म्हणून ती रद्द समजावी !" पण राजा पळून गेल्यामुळे त्याचे राज्याधिकार तहकूब केले आहेत असा ठराव लोकसभेने केल्यामुळे , तत्त्वतः घटना अबाधितच राहिली.

राजा पळून गेल्याचें कळतांच लोकसभेनें राजवाड्याला कुलूप लावलें. आंतलें सर्व कागदपत्र ताब्यांत घेऊन त्यावर अभिप्राय कळविण्याकरितां तीन सभासदांची नेमणूक केली. तथापि त्याबरोबरच, जाकोबीन व कॉरडाल्अर वगैरे क्लबांनी राजाविरुद्ध जे जाहीरनामे भिंतीवर लावले तेहि राजद्रोही ठरवून जप्त केले! याचेंच नांव मध्यम जहाल ! मिराबो मेला तरी लोकसभा अद्यापि या मध्यम जहालांच्या हातांतून गेलेली नव्हती. ड्यूपो, बारनेव्ह, लॅमेथ आणि लाफायत हेच तिची सूत्रें हालवूं शकत होते.

**लोकसभेंतील वाढता बेबनाव**

तथापि याच वेळीं डँटन, मारात, रोबेस्पिअर व पेतिअन असे जहाल पुढारी आपलें डोकें पुढें काढीत होते. राजा पळून गेल्याच्या दुसऱ्या दिवशीं लोकसभेचे सभासद एखाद्या मिरवणुकीच्या पद्धतीनें शहरांतून हिंडलें. तेव्हां डँटन याने गर्जना करून चवाठ्या-चवाठ्यावरून राजाचा निषेध केला. त्याबरोबर डँटनचाच जयजयकार सुरू झाला. लोकसभेतलें बहुमत अजून आपल्या हातीं आहे या भरंवशावर लाफायतने पॅरिस शहरांत शांतता राखण्याचा प्रयत्न चालविला. तूर्त तरी राष्ट्रीय सैन्य त्याच्या बाजूला होतें. आणि श्रीमंत, सधन लोकांनाहि आपली मालमत्ता लुटली जावूं नये, शांतता राखली जावी, हें इष्ट होतें. तथापि शहरांतील क्लबांतून दुसऱ्याच प्रकारची कारवाई सुरू होती. लोकसभेचें कार्यकारी मंडळ हें नेमस्त व राजपक्षपाती बनलें, तें काढून टाकून दुसरें प्रजापक्षपाती

व अधिक खंबीर असें नेमले पाहिजे, अशी ओरड त्यांनी सुरू केली. डँटन-च्या सूचनेवरून कॉरडालअर क्लबानें ठराव केला कीं, "राजा पदच्युत करावा ४
व इतर सामान्य गुन्हेगारांप्रमाणेंच त्याचा इनसाफ केला जावा." आणि या ठरावान्वयें लिहिलेला एक प्रचंड जाहीरनामा शहराच्या मध्यभागीं एका वेदीवर ठेवून त्यावर सह्या घेण्याची चळवळ सुरू झाली. राजा ता. २४ जूनला परत आला व हा जाहीरनामा ता. १४ जुलैला शहरांत निघाला. हा प्रयत्न हाणून पाडावा, असें लाफायत यानें ठरविलें. पॅरिसच्या मेयरचीहि त्याला संमति मिळाली.

**ज्वलत् जहालांची सत्तेकरितां धडपड**

आदल्या वर्षी १४ जुलै १७९० रोजीं संमेलन समारंभ झाला होता त्याच जागीं ही वेदी पूर्वीची बांधलेलीच होती. तिचाच उपयोग जाहीरनाम्यावर सह्या घेण्याकरितां करण्यांत आला आणि पूर्वीच्या आनंदप्रद संमेलनासाठीं लोक जमले, तसेंच आताहि सह्या करण्यासाठीं हजारो स्त्री-पुरुष येथें जमूं लागले. प्रेक्षकहि तसेंच. इतक्यांत कांहीं संशय आल्यावरून कांही लोकांनी वेदीखालीं दडून बसलेल्या एका-दोघांना, बाहेर ओढून मरेपर्यंत मारलें. झालें, मोठा दंगा सुरू झाला! तो मोडण्याकरितां सहजच नॅशनल गार्ड्सचे शिपाई आले. लष्करी कायद्याप्रमाणें सर्व सूचना दिल्या तरी लोक हटेनात, तेव्हां गोळीबार करण्यांत आला. मोठी प्राणहानी झाली. लाफायतनें ही कत्तल राजपक्षपातामुळें केली अशी ओरड सुरू झाली. पॅरिसचा मेयर बेले यालाहि लोक जबाबदार धरूं लागले. पॅरिसची दरिद्री जनता आणि अधिकारारूढ श्रीमंतपक्षपाती प्रधानमंडळ यांच्यांतला बेबनाव वाढूं लागला. लोक-सभेनें दंगा मोडल्याबद्दल लाफायतचें अभिनंदन केलें, पण डँटन, डेसमॉलिन, मारा हे राजविरोधी असले तरी श्रीमंतपक्षपाती, त्यांनीं लोकसभेकडून हा ठराव करवून घेतला, म्हणून त्यांच्यावर खटले कर-ण्याच्या सूचना आल्या!

**नवी घटना**

या बखेड्यानंतर दोन आठवड्यांनीं राज्यघटना कमिटीचा रिपोर्ट लोकसभेपुढें आला. तो वाचून तिजमध्यें कांहीं सुधारणा करण्यांत आल्या. त्यांतील एक महत्त्वाची अशी होती कीं, तिजमुळें मतदारांतून बेकार, उडाणटप्पू, पुंड हे कमी व्हावे आणि मतदार-संघ निकोप व्हावा. ही घटना राजाला सादर करण्याकरितां साठ सभासदांचें शिष्टमंडळ नेमण्यांत आलें.



# १३ नवें कायदेमंडळ

ता. ४ सप्टेंबर रोजीं एकंदर नवी घटना मान्यतेच्या सहीकरितां राजापुढें ठेविण्यांत आली. तिला त्यानें मान्यता दिली, पण असेंहि बोलून दाखविलें कीं, "हिच्या व्यवहार्यतेबद्दल मला शंका आहे. तथापि अनुभव घेऊन पाहण्याला माझी हरकत नाहीं, माझ्या मान्यतेचा जाहीरनामा मी स्वतः लोकसभेंत येऊन वाचीन" असें मोघम आश्वासन त्याने दिलें. सर्वत्र आनंदी आनंद झाला. शांततावादी लोक, आणि लाफायतच्या सूचनेवरून पूर्वीच्या दंग्यांत शिक्षा झालेल्यांनाच काय पण पळून गेलेलेहि लोक परत येतील तर त्यांनाहि, सर्वांस माफी देण्याचें ठरलें. ता. १७ रोजीं राज्यक्रांतीचे शत्रु व मित्र दोघांनीं मिळून पॅरिसमध्यें आनंदोत्सव केला! फेडरेशनच्या उत्सवानंतरचा हा दुसरा महत्त्वाचा आनंदोत्सव व त्या पहिल्याप्रमाणें या उत्सवांतहि राजाविषयीं अनेक प्रकारें मानसन्मान प्रदर्शित करण्यांत आला. नाचगृहें व नाटकगृहें जोरांत सुरू झालीं. दारूकाम सोडण्यांत आलें. तेथें व इतरत्रहि राजा हा, पूर्वीचें वृत्त जसें कांहीं घडलेंच नाहीं अशा थाटानें, मोकळा हिंडत होता. 'लुई कीं जय' अशा आरोळ्यांनीं वातावरण दुमदुमून गेलें. पॅरिसमधील बहुतेक घरांतून दिवे व निशाणे लाविलेलीं दिसत होती. शाँदएलाषिजी या नांवाच्या मैदानांतून रंगीत दिवे पेटविलेले एक मोठें विमान वर उडविण्यांत आलें. तें खूप वर गेल्यावर त्याच्या डोक्यावरील टोपांतून स्फोट झाला. लोक

म्हणूं लागले, "हें नव्या राज्यघटनेचें विमान उडलें व फुटलें कीं काय?" त्याच दिवशीं लोकसभा बरखास्त करण्यांत आली, नवी राज्यघटना हाच राज्यक्रांतीचा शेवट, अशी पुष्कळांना आशा वाटूं लागली.

**पुढाऱ्यांचा पश्चात्ताप**

राज्यघटना समितीनें बनविलेल्या नव्या राज्यघटनेप्रमाणे आतां जुनें कायदेमंडळ बरखास्त होऊन नव्याची निवड व्हावयाची होती. तोंच १७९१ च्या ऑगष्टच्या प्रारंभीं जॉकोबीन लोकांनीं अशी ओरड आरंभिली कीं, जुनें कायदेमंडळ जें नादान ठरलें, त्याचे जागीं उमदें आलें पाहिजे. लोकसभेंतील जुन्या सभासदांनाहि कामाचा कंटाळा आला होता. कांहींना असें वाटूं लागलें होतें कीं, आपण आता यांतून मोकळेच होऊं या. कांहींना शरीराचा थक्वा आला होता. कांहींचें ध्येय केवळ आभासमय ठरलें होतें. लोकसभेंत येण्यापूर्वी आपण जे कल्पनातरंग उठविले ते जागच्या जागीं जिरले असे कांहींना वाटलें. "नवी राज्यघटना केली खरी, पण ती निरुपयोगी ठरली. तिची थोडी दुरुस्तीहि झाली, पण त्यानेहि फारसा उपयोग झाला नाहीं." १७८९ सालीं मोनिअर याला, १७९० सालीं मिराबोला व १७९१ सालीं बारनेव्हला—म्हणजे अशा तीन प्रमुख पुढाऱ्यांना एकच वाटलें तें असें कीं, आपण फक्त विध्वंसक कार्यांचे धनी ठरलों. आपल्या हातून विधायक म्हणण्यासारखें कार्य झालें नाही! या त्यांच्या पश्चात्तापी वृत्तीचा परिणाम राजाकडे झुकण्यांत झाला.

**कट्टर जहाल जॉकोबीन**

पण जॉकोबीन लोक नेमस्त पुढाऱ्यांना मागे खेचित होते. "राजमंडळ-किती केलें तरी आपले शत्रु, त्याला साहाय्य करूं गेल्यास त्याचा कांहीं उपयोग होणार नाही; आणि तुम्ही मात्र फुकट मराल. ध्यानांत ठेवा" असें जहालांकडून नेमस्तांना बजाविण्यांत येऊं लागलें. "प्रथम आग पेटवितांना विचार केला नाहींत. आता उलटून आगीचे बंबवाले म्हणून पाणी मारूं पाहतां. पण ती विझणार नाही,

हें लक्षांत ठेवा " असा टोमणाहि त्यांना देण्यांत येत होता. " राजमुकुटांतले हिरे काढणें सोपें; ते जेथल्या तेथे पुन्हां जडविणें कठीण " असे उद्गार निर्विकार संभावितांच्याहि तोंडून निघूं लागले! लोकसभा फार जहाल झाली, म्हणून मतदारीच्या हक्कांना मर्यादा घालून वाटेल ते उडाणटप्पू, मवाली, गुंड निवडून येऊं नयेत अशी दुरुस्ती घटनेंत सुचीविण्यांत आली. त्याला उत्तर म्हणून अशी सूचना आली कीं, " आणखी दहा वर्षें काय वाटेल तें झालें तरी आहे ही घटना बदलूं नये. मग १८०१ सालीं पाहूं ! "

**घटना भंगली आणि जाहीरनामा उरला**

पहिल्याच्या जागीं दुसरें कायदेमंडळ नव्या निवडणुकीने बनलें, त्यांत तरुण अननुभवी जहाल पण पूर्वीच्या लोकसभेंतील मर्मस्थळें न समजणारे असे प्रतिनिधी निवडून आले. त्यांनी नवी घटना अधिक व्यवहार्य न करितां ती आपल्या गुणाने होती त्यापेक्षां अधिक वाईट ठरविली. १७८९–१७९१ या तीन वर्षांत, कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली उर्फ घटनासमिती या नात्यानें लोकसभेने केलेलें सगळें काम ढासळणार असें वाटूं लागलें. आंतील इमारत उध्वस्त होऊन तोंडापुढची शोभिवंत कमान तेवढी शिल्लक उरावी, त्याप्रमाणे राज्यघटना छिन्नविच्छिन्न झाली. फक्त स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्त्वांचा जाहीरनामा तेवढा शिल्लक उरला !

नवे कायदेमंडळ निर्माण झालें त्यांत नवे सभासद येणार त्यांच्याविषयी सहजच कुतूहल उत्पन्न झालें. कोणाला वाटे कीं, आता काय जुन्या रोमन सेनेटसारखे कँटो, सिसरो, सिन्सीनेटस असे महाभाग येणार आणि राज्य चालविणार ! पण कोणी असाहि तर्क केला कीं, नव्या लोकसभेंत निवडून येतील ते लोक फक्त भयंकर जहाल व इतर रीतीने मात्र नादानांतले नादान असे येतील. आणि हा दुसरा तर्कच पुष्कळसा खरा ठरला. नवे प्रतिनिधी आले त्यांना नवें मोठें वैभव लाभलें व नवें महत्त्वाचें काम हातीं आलें. पण त्यांनी वैभव जितकें

मिरविलें तितकें प्रतिनिधित्वाचें काम चांगलें केलें नाही. वकील व वाङ्मया-भ्यासी अशा लोकांचा भरणा बराचसा होता. शिवाय ते तरुणहि होते म्हणून अननुभवी होते. दोन तत्कालीन लेखकांनी आपलें मत असें लिहून ठेविलेलें आहे कीं, “अशा अपक्व, नाजुक, मिजाशीच्या, भावनाप्रधान लोकांच्या हातीं लोकसत्ता-राज्य-जाणें म्हणजे लांडग्यांच्या कळपाच्या हातीं जाण्यासारखेंच होय! शेती किंवा व्यापार करून पोट कसें भरावें, मोठमोठ्या जमीनदारांची व्यवस्था कशी लावावी, याचें ज्ञान ज्यांना नाही तीं माणसें लोकसभेंत बसून राज्यकारभार करण्याला लायख कशीं समजावी! इतकेंच नव्हे तर, नव्या सातसाडेसातशें प्रतिनिधींपैकीं बरेच जण घरचे दरिद्री व बुभुक्षित आहेत! अशा शेकडों लोकांची सालीना मिळकत एकत्र हिशेबांत धरली तरी, ती तीन लाख लायव्हर इतकीहि होणार नाही. कांही प्रतिनिधि दुपारच्या जेवणाकरितां शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून चार दोन लायव्हरहि उसने घेतात. अर्थात् दर प्रतिनिधीला रोज अठरा लायव्हर पगार द्यावा अशी सूचना लोकसभेपुढे आली तिला त्यांजकडून संमति मिळाली यांत काय आश्चर्य ? लोकसभेंतील यांचा पराक्रम म्हटला म्हणजे भाषण करण्याचा! “आणि एखादे” वेळीं एकाहून एक उंच उड्या मारण्याची स्पर्धा जशी वानरांत होते, तशी यांचीहि जहाल व पल्लेदार भाषणांत होती. दुर्दैवाने, जहाल वृत्ती स्वीकारून धुळीस मिळवावयास एका राजपदाशिवाय दुसरें कांहीच नव्या राज्यघटनेने शिल्लक ठेविलें नव्हते.

**कालचे जहाल आजचे नेमस्त**

नेहमींप्रमाणें याहि सभेंत तीन पक्ष वेगवेगळे बसणारे होते. पैकीं या वेळीं नेमस्त म्हणून जो पक्ष उजव्या बाजूला जागा मागून घेऊन बसला, तोच मुळीं जुन्या सभेंतील डावीकडे बसणारा म्हणजे जहालपक्ष होता! पूर्वींचा जहाल हा जर आजचा नेमस्त, तर आजचा जहाल कसा असेल याची कल्पना सहज करावी. शिवाय उजवीकडे

बसणाऱ्या या पक्षाला नुसत्या 'नेमस्त' या नांवाबद्दलच लोक चिडवीत होते. कोणी त्यांना निद्रापटु अफीणबाज असें म्हणत. कोणी म्हणे, "हा नेमस्तपक्ष म्हणजे एक मुका बोळ आहे. यांत शिरलें कीं गडपच! बाहेर निघण्याला दुसरी वाट मिळायची नाही." हीं सर्व वर्णनें अगदींच खरीं होती असें नाहीं. केवळ तरतम भावानें त्यांना नेमस्त म्हणावयाचें इतकेंच काय तें!

**इतर पक्ष**

डावा पक्ष म्हणजे जहाल पक्ष. यांत मुख्यतः बोर्डो परगण्यांतील तडफदार लोक होते. हेच पुढें जिरॉंडीन म्हणून प्रसिद्धीस आले. शिवाय यांच्याहि पलीकडे कांही थोडे लोक नुसते पिशाचांत जमा असे होते! जिरॉंडीन लोक हे स्वतः प्रख्यात तत्त्ववेत्ता रूसो याचे अनुयायी म्हणवीत. त्यांतले बहुतेक नास्तिक होते. त्यांना खिस्ती हा शब्द लावणेंहि कठीण. त्यांच्या डोळ्यांपुढें रोमन सेनेटचें ध्येय होतें. म्हणून ते स्वतःला रोमन्सची उपमा घेत. कोणी ब्रूटस, कोणी ग्राकस, कोणी केटो! राजा लुई याला टार्क्विन किंवा कॅलिग्यूला या दुष्ट रोमन राजांची उपमा सहजच येई. हे लोक तोंडाला येईल ते बोलत. जिरॉंडीन लोकांच्या मनांत अत्याचार नसला तरी, तोंडांत सगळी भाषा अत्याचाराची असे. एकानें असे म्हटलें आहे कीं, "लोकांवर केवळ आपल्या पक्षाची छाप पाडण्याकरितां त्यांतील एखाद्यानें आपल्या हातानें आपला गळाहि कापून घेतला असता!" डाव्या हातच्या अगदीं टोंकाच्या उपपक्षाला कॉर्डेलियर्स असें नांव होतें. मध्यम पक्षाचे लोक सावधपणाने वागत. आपण निःपक्षपाती आहों, योग्य दिसेल ते करणारे आहों, अशी प्रौढी ते मिरवीत. पण यामुळें त्यांना 'अर्धे रे अर्धे' असें थट्टेचें नांव मिळालें होतें. "डोकें वानराचें दिसते, पण आंतला मेंदु कोल्ह्याचा आहे बरं कां" असेंहि यांचें एक वर्णन आढळतें.

**जहाल हेच खरे पुढारी**

पक्ष तीन असले तरी लोकसभेचें खरें पुढारीपण जहाल पक्षाकडेच होतें. या पक्षांत एकजिनसीपणा अधिक होता. त्याचे १३० सभासद सगळे जॉकोबीन क्लबाचे सभासद होते. आणि पॅरिसमधील किंवा इतर ठिकाणच्या जॉकोबीन क्लबाच्या आज्ञेप्रमाणे ते

मतें देत. त्यांचा एक गुण हा होता कीं, सभेचें काम कितीहि वेळ चालो, ते आपली जागा म्हणून सोडावयाचे नाहींत! नेमस्त व मध्यम वर्गाचें असें नव्हतें. यामुळें जहाल पक्षाला बहुमत मिळण्याला अनेकदा सहज संधि सांपडे. याशिवाय सभेच्या गॅलऱ्यांतून व चष्म्यांतून बसणारे प्रेक्षक जितके बेजबाबदार तितकेच जहाल. यामुळें खालीं सभागृहांतून वर या प्रेक्षकांकडे पाहणारा त्यांच्या आहारीं जाई. कोण कसें मत देतो हें सत्वर प्रसिद्ध व्हावें अशी जहालांची मागणी असे. याचें कारण अगदीं उघड आहे.

**नव्या लोकसभेचें काम**

नव्या लोकसभेकडील काम आतां राज्यघटनेचें नसून फक्त राज्य-कारभारासंबंधीं कायदे करण्याचें होतें. म्हणून तिला यापुढे घटना समितीचें स्वरूप न राहतां मामुली कायदेमंडळाचें स्वरूप आलें होतें. पहिलीं युद्धें मंडळाच्या कामकाजाच्या रिवाजासंबंधीं झालीं. पण त्यानंतर लगेच राजपद नष्ट करण्याच्या विचाराला सभा लागली. कोणी फक्त "राजाला उद्देशून लावण्यांत येणारीं सन्मानाचीं उपपदें काढून टाकावीं" इतकीच सूचना केली; तर कोणी राजपदच नष्ट करण्याचीहि केली. सभेच्या अध्यक्षाइतका मान फार तर राजाला देऊं असें कांहींचें म्हणणें पडलें. राजा लुई फारच रागावला. आणि "मी यापुढें सभेला हजर राहणार नाहीं" असें त्याने कळविलें. त्याचा परिणाम होऊन, सभेने आपला ठराव बदलला. तेव्हां मग राजा सभेला आला. त्याने आपल्या भाषणांत लष्करांतील शिस्त, देशसंरक्षणाची तयारी, युरोपियन राष्ट्रांशीं स्नेह-भाव, वगैरे मुद्यांवर भर दिला. शेवटला मुद्दा उल्लेखिण्याचें कारण असें कीं, "युरोपियन राष्ट्रांचें एकमत होईल तर आपण फ्रान्सच्या राजकारणांत हात घालूं" असा जाहीरनामा पिलनिट्झ येथें ऑस्ट्रियन बादशहाने नुकताच प्रसिद्ध केला होता. आणि हा जाहीरनामा निघण्याचें कारण पळपुट्या उम-रावांची कारवाई अशी सर्वांची समजूत होती.

# १४ पळपुट्यांची कारवाई (परराष्ट्राशीं युद्ध)

**पळपुट्यांवर राग**

" पळपुटे बाहेर गप्प बसतील तर त्यांनी देशत्याग करण्याला आमची हरकत नाही. पण ते पळून जातात तेव्हा फ्रान्सची संपत्ति बाहेर नेतात. कलागती लावतात. आणि त्यांनी कांहीहि केलें तरी परदेशांत आम्हांला त्यांच्यावर हात टाकतां येत नाही " अशी तिहेरी तक्रार त्यांचे विरुद्ध होती. हे पळपुटे बहुधा ' ऱ्हाईन ' नदीच्या आसपास जुळले होते. लोकसभेचा कल पाहून ता. १४ ऑक्टोबर रोजीं राजाने एक जाहीरनामा काढून, " देशत्याग केलेल्या लोकांनी परत यावें, " अशी सूचना केली. या पळपुट्या लोकांचा बंदोबस्त करणाऱ्या कायद्याची चर्चा ११ दिवस सुरू होती. अखेर " हे लोक परत येतील तर गैरहजेरींत त्यांना फांशीची शिक्षा फरमावावी " असा ठराव झाला. राजघराण्यांतल्या लोकांनी दोन महिन्यांचे आंत फ्रान्सला परत आलें पाहिजे अशी ताकीद देण्यांत आली. ज्या धर्माधिकाऱ्यांनीं नव्या राज्यघटनेला अनुसरून रीतसर शपथ घेतली नव्हती त्यांच्यावर काहूर उसळलें. धर्माधिकाऱ्यांनीं शपथ न घेतली तर त्यांना बंडखोर समजावें, त्यांच्यामागे ' हजेरी ' देणें लावावें, व त्यांच्या परगण्यांत दंगेधोपे झाले तर त्यांबद्दल त्यांना जबाबदार धरावें असें ठरलें !

**लोकसभेंतील घडामोडी**

हे सर्व कायद्यांचे ठराव राजाकडे संमतीच्या सहीकरितां गेले. पण हे ठराव घटनेला अनुसरून नाहींत, या सबबीवर त्यांतील कांहींना संमति देण्याचें राजानें नाकारलें. ता. ११ डिसेंबर रोजीं राजाने असें कळविलें कीं "कांहीं ठरावांचा मी विचार करीन," म्हणजे संमति देत नाही हाच त्याचा अर्थ. याच सुमारास युरोपांत फ्रान्स-विरुद्ध अधिक चळवळ झालेली ऐकूं येऊं लागली. आणि यामुळें राज्यक्रांति यशस्वी करण्याच्या जड कामाबरोबर पराराष्ट्रांशीं युद्ध करावें लागणार, असें लोकसभेला दिसून येऊं लागले. प्रधानमंडळांत फेरबदल करण्याचे विचार सुरूं झाले. जो प्रधान नकोसा वाटेल, त्यावर पळपुट्यांना सामील असल्याचा आरोप करावा, ही एक युक्तीच होऊन बसली. युद्ध म्हटलें कीं, एकतंत्री झोटिंगाच्या हातीं सर्वाधिकार देण्याची कल्पना उदित होतेच. कोणी म्हणूं लागले, "आतां स्वतंत्रतेच्या पुतळ्यावर पडदा टाकलेला बरा." पण युद्ध सुरूं झालें तर फ्रान्सला जय मिळेल हें कशावरून? हाच विचार काय तो जहालांचा पाय थोडासा मागें ओढीत होता. युद्धाच्या तयारीसंबंधीं एक कमिटी नेमण्यांत आली. युद्धाला प्रतिकूल असणारे प्रधान काढून टाकण्यांत आले. मध्यम पक्षाने जहाल पक्षाशीं संगनमत करून प्रधानमंडळावर दोषारोप करण्यास संमति दिली. भराभर प्रधानांनी आपले राजीनामे पाठविले. अशा रीतीने लोकसभा बोर्डो परगण्यांतील तडफदार प्रतिनिधींच्या आहारीं गेली. मंत्रिमंडळ नेमिलें. त्यांत डू मॉरिझ्, मादाम रोलॉं, तसेंच तिचा नवरा इत्यादि बुद्धिवान व तरतरीत लोक होते. या मंडळाचें पहिलें काम सरकारी अधि-काराच्या जागांतून वरिष्ठ वर्गाचा बीमोड करणें हें होतें. हे लोक काढून टाकले म्हणजे सगळी घाण निघाली! धर्माधिकारी मंडळाची उरलीसुरली सत्ता नाहींशी करणें हेंहि या नव्या मंत्रिमंडळाने आपलें आवडतें काम म्हणून आंखून घेतलें होतें.

नव्या मंत्रिमंडळाकडे आलेलें याहून महत्त्वाचें काम म्हणजे परराष्ट्रीय युद्ध होय. हें युद्ध टळत नाही असें दिसून येऊं लागलें. परराष्ट्रांनी फ्रान्सच्या राजकारणांत पडण्यापासून फ्रान्सला भीति होती ती दोन वेगवेगळ्या रीतींनी वाटत होती. जहाल पक्षाला वाटे कीं, युरोप आपल्याविरुद्ध उठलें तर राजाचा पाठपुरावा होऊन क्रांतीचें पेकाट मोडेल. नेमस्त पक्षाला वाटूं लागलें कीं, परराष्ट्रांचा हात असा शिरूं लागला तर, तो खेळ राजा उगीच करवितो असें वाटून क्रांतिकारक चळवळ्ये रागाने अधिकच बेफाम होतील, आणि मग राजपद संभाळून, केवळ सुधारणारूपाची जी विधायक क्रांति व्हावी, ती तशी न होतां अत्याचार होतील, आणि क्रांति कोणत्या थराला जाईल हें सांगतां येणार नाही.

**युद्धाचे ढग**

पण खुद्द युरोपांतील राष्ट्रांमध्ये तूर्त असावी तशी एकी नव्हती. प्रत्येक राष्ट्र स्वार्थी बनलें होतें, व दुसऱ्यावर अतिक्रमण करूं पाहात होतें. फ्रेंच राज्यक्रांतीला विरोध करण्याची कल्पना कोणा राष्ट्राच्या मनांत आलीच तर ती फ्रान्सचा एखादा लचका तोडून घशांत घालतां येईल कीं काय हें पाहावें म्हणून! फ्रान्सच्या राजाने आपणाला शरण येऊन मदत मागावी व कांही मोबदला कबूल करावा, म्हणजे मगच त्याच्या मदतीला पुढे सरसावलेले बरें, असा विचार त्यांनी केला होता. पूर्वेतिहासांत ज्या फ्रान्सने आपलें सामर्थ्य युरोपाला दाखविलें होतें, तें फ्रान्स आज अन्तःकलहाने थोडेंसें कमकुवत झालें तर आयतें बरें, असें त्यांना मनांतून वाटे. फ्रान्समधील राजसत्तेला थंडी बाधली तर युरोपांतील राष्ट्रांना शिंक यावी, अशी स्थिति अजून झाली नव्हती. फ्रान्सच्या राजाराणीच्या जिवावर संकट ओढवणार हें निश्चित; पण त्यापूर्वी युरोपांत राजेराण्या यांचे खून काय थोडे झाले होते? पूर्वेतिहासांत फ्रान्सने युरोपियन राष्ट्रांना ताप दिला होता. तो फक्त फ्रेंच राजांच्या महत्त्वाकांक्षेमुळे. त्यांत

**परराष्ट्रांची वृत्ति**

फ्रान्सच्या खऱ्या जनतेचें अंग नव्हतें. मग त्या जनतेने आपल्या राजाविरुद्ध उचल केली, तिचा राग आपण कां माना ? " तिला ती उचल करण्याला जीं कारणें झालीं, तीं आपल्याहि राज्यांत आहेत, म्हणून आपलेंहि उद्या तसेंच होणार नाही कशावरून ? " हा तात्त्विक सुविचार युरोपियन राजांच्या मनाला अजून शिवला नव्हता. फ्रान्समध्यें कांहीहि झालें तरी त्याच्या आपल्या दरम्यान एवढी मोठी ' ऱ्हाईन ' नदी आहे, तेव्हां आपणाला भीति नाहीं, असें त्यांना वाटे.

पोलंडची वांटणी, रशियाचें तुर्कस्थानासंबंधींचें धोरण, इत्यादि कारणांनी युरोपियन राष्ट्रांत फूट पडली होती; पण जवळच्या जर्मनीशीं बेबनाव होण्याचीं कांही कारणें फ्रेंच लोकसभेच्या परराष्ट्रीय धोरणांतून उत्पन्न झालीं होतीं व युरोप प्रथम गप्प असलें तरी पुढेहि तसेंच राहील असा विश्वास लोकसभेच्या पुढाऱ्यांना वाटत नव्हता. लोकसभेने आपणाकडून एक वर्षापूर्वी असें मुद्दाम जाहीर केलें होतें कीं, " कोणाहि युरोपियन राष्ट्रांशीं भांडण करण्याची आमची इच्छा नाहीं, आम्हाला कोणा परक्याचा मुलूख घ्यावयाचा नाही." पण हे उद्गार पोट भरलेल्या फ्रान्सचे होते हें विसरून चालणार नाही. फ्रान्सच्या कमकुवतपणाचें हें लक्षण होय असा त्याचा अर्थ कित्येक युरोपियन राष्ट्रांनी केला. आणि इंग्लंडला तर मनांतून असा आनंदहि झाला कीं, युरोपांतील राजकारणांत आपणाला पायबंद घालणारा मुख्य प्रतिस्पर्धी जो फ्रान्स तो अशा अकल्पित रीतीने निकामी झाला तर आपलें आयतेंच काम झालें !

लोकसभेने आपल्या शांतताप्रधान धोरणाची घोषणा केली, पण त्यानंतर थोड्याच काळांत फ्रान्सने रोम येथील पोपच्या ताब्यांतील फ्रान्समधील ' ॲव्हिग्नॉन ' हा परगणा घेऊन आपल्या राज्याला जोडला. तेव्हा युरोपियन राष्ट्रांनी किंचित् मान वर उचलली. पण याहून दुसरें एक अधिक प्रबळ असें

कारण युरोपने चढाई करून उठण्याचें घडलें. तें असें कीं, फ्रेंच राणीचा भाऊ हा खुद्द ऑस्ट्रियाचा बादशाह होता. त्यामुळें आपल्या मेव्हण्याच्या बचावाची काळजी त्याला सहजच वाटत होती. जोंपर्यंत राजा लुई हा स्वतःच राज्यक्रांतीची उपेक्षा करतो, किंबहुना ती केवळ राजकीय सुधारणा असें मानून तिचें रक्षण करण्याचें आश्वासन देतो, तोंपर्यंत आपणाला या प्रकरणीं हात घालण्याचा अधिकार पोंचत नाही, असें बादशहाला वाटलें तर तें योग्यच होतें. बहिणीचा निरोपच आला तर गोष्ट वेगळी. पण हा निरोप लवकरच जाऊन पोहोंचेल अशीं चिन्हें दिसूं लागलीं. राजा लुई याने नव्या राज्यघटनेंतील पुष्कळ कलमांना संमति दिली. पण ह्या घटनेनेच त्याला नामंजुरीचा (व्हेटोचा) जो अधिकार ठेविला होता त्याचा उपयोग केल्या-शिवाय आतां राहूं नये असें कांही बाबतींत त्याला वाटूं लागलें. त्यांतली एक बाब म्हणजे धर्माधिकाऱ्यांचीं वतनें, जमिनी, मिळकती जप्त व सरकारजमा कराव्या ही होती. धर्माधिकाऱ्यांचे लोकांवरील अधिकार व या अधिकारामुळें पाद्री वर्गाला मिळणारें उत्पन्न याला संक्षेप घालावा, असा ठराव लोकसभेने केला. तो पाहून राजा चिडल्यासारखा झाला. स्वतःच्या हक्कांना कमीपणा आला तोहि त्याने सोसला, पण पोप व धर्माधिकारी मंडळ यांच्यावर लोक-सभेने जें अतिक्रमण सुरू केलें, तें त्यांच्या धार्मिक भावनेला खपलें नाही! प्रथम राज्यक्रांतीला संभाळून धरण्याचा जो आव राजा लुई याने घातला, तो लवकरच फुकट जाण्याला जीं प्रबळ कारणें झालीं त्यांतलें हेंहि एक होतें. राजा त्या वेळीं म्हणालाहि, "यापुढे फ्रान्सचा राजा म्हणून राहण्यापेक्षा एखादा गरीब शेतकरी म्हणून राहणें अधिक बरें." पण आपला भाऊ ऑस्ट्रियन बादशाह याची मदत घेऊन संकटमुक्त व्हावें असें राणीला सहजच वाटूं लागलें.

मंत्रिमंडळांत युद्धप्रियता तर होतीच. डू मॉरिझ् याने ऑस्ट्रियन बादशाहाच्या जाहीरनाम्याला खणखणीत उत्तर पाठविलें. त्यांत कांही अटी

घातल्या. पण तिकडून त्या मान्य होणार नाहींत ही खात्री आधींच वाटून, त्याने नजीकच्या बेलजिअम देशांत ऑस्ट्रियाविरुद्ध बंडाची चिथावणी करण्याकरितां दूत पाठविले. युद्धाचें वातावरण बनूं लागलें हें दर्शविण्याकरितांच कीं काय, मुख्य प्रधान लष्करी पोषाख घालून लोकसभेंत येऊं लागला. ता. १८ एप्रिल रोजीं ऑस्ट्रियन बादशहाचें उत्तर आलें, तेंहि तसेंच खणखणीत होतें. मग बार उडावयाला काय उशीर? लोकसभेने युद्ध पुकारिलें. युद्धाचे वेळीं बेइमान लोक सैन्यांत ठेवणें धोक्याचें म्हणून लष्करी अधिकाऱ्यांपैकीं कांहींना बडतर्फ केलें. कांहींचे राजीनामे घेतले. त्यांच्या जागा भरण्याकरितां नागरिक स्वयंसेवकांना आमंत्रण करण्यांत आलें. हे स्वयंसेवक अर्थात् देशभक्तिप्रेरित होते. पण त्यांना शिस्तीचें वावडें होतें. शिस्त पाळावी म्हणजे दुसऱ्या कोणाचा हुकूम मानावा! मग तो स्वयंसेवक कसला! या वेळीं पायदळ, घोडदळ, तोफखाना मिळून सुमारें दीड लाख फौज फ्रान्सची होती. तीन सारख्या दर्जाचे सेनापति नेमिल्यामुळें, युद्धाच्या धोरणांत एकसूत्रता नव्हती. युद्धाचें साहित्य यथातथाच आणि किल्ल्यांचीहि पडझड झाली होती. तथापि देशभक्तीने ही सर्व उणीव भरून निघेल अशी मंत्रिमंडळाला आशा वाटे. राज्यक्रांति केली. ती परक्यांनी बिघडवावी म्हणजे काय? या अभिमानाने सर्व देशभर क्षात्रवृत्तीची एक लाट एकदम उठली हें मात्र कांहीं खोटें नाहीं. ऑस्ट्रियाने हल्ला करण्यापूर्वीच आपणच गोट सोडून बाहेर निघावें, असें धोरण ठरलें. या युद्धाच्या प्रसंगाने फ्रेंच समाजाच्या तळांतली सगळी घाण ढवळून निघून वर आली ती पेट घेणारी होती, आणि तीच पुढे कांहीं दिवस सर्व युरोपभर पसरली, असें एकाने या स्वयंसेवक सैन्याचें वर्णन केलें आहे!

२० एप्रिल रोजीं राजा लुई लोकसभेंत आला. त्याला मनांतून हे युद्ध पसंत नव्हतें. धर्मशाळेंत कुत्र्यांनी भांडून प्रवाशाच्या दशम्या विटाळाव्या

असा हा नसता उपद्रव त्याला वाटला. पळपुटे एका बाजूला व जॅकोबिन एका बाजूला. दोघेहि या कामीं सारखेच दोषी असें त्याला वाटे. पण बिचारा करतो काय ! युद्धमंत्र्याने लिहून हातीं आणून दिलेलें भाषण त्याने लोकसभे-पुढे वाचलें व उद्वेगाने तो निघून गेला. नंतर औपचरिक चर्चा झाली तींत कोणाचेंहि नेमस्तपणाचें भाषण सभा ऐकून घेईना. सर्व जगाच्या स्वातंत्र्याचा मक्ता घेऊन आज आपण युद्धाला निघालों आहों असें लोकसभेला वाटलें. सगळें जग एकीकडे—अर्थात् जगांतील सर्व जुने राजे एकीकडे—आणि एकटा रिपब्लिकन फ्रान्स एकीकडे, असा अहंकार लोकसभेंत उत्पन्न झाला. युद्ध करूं नये असें म्हणणारे अवघे सात सभासद निघाले. एका दृष्टीनें राणीच्या मना-सारखी गोष्ट झाली. तिची एकच गुप्त इच्छा होती कीं, फ्रेंच सैन्याने सडकून मार खावा, म्हणजे राज्यक्रांतीला पायबंद बसेल, आणि राजपद अढळ होईल. आश्चर्य हें कीं, क्रांतीच्या शत्रूंप्रमाणे तिच्या कांहीं अस्सल मित्रांनाहि फ्रेंच सैन्याचा पराभव इष्ट वाटत होता. त्यांचें म्हणणें असें कीं, हें संकट आलें म्हणजे देशांतील बंडाळीला देशभर धिंगाणा घालावयाला चांगला वाव सांपडेल ! या उलटसुलट कारणांनी दोनहि पक्षांनी मनांत धरलेली ही आशा लवकर सफळ झाली.

# १५ राजावर बाजू घसरूं लागली

**फ्रेंच सैन्याचा पराभव**

स. १७९२ च्या ता. ३० एप्रिल रोजीं फ्रेंच सैन्याचा पराभव झाल्याची वार्ता पॅरिसला येऊन पोहोचली. पूर्वी 'सूड सूड' हा शब्द फ्रान्समध्यें ऐकूं येत होता, तर आतां त्याऐवजीं "देशद्रोह देशद्रोह" हा शब्द ऐकूं येऊं लागला. इतक्या सोप्या रीतीने आपल्याला जय कसा मिळाला याचें ऑस्ट्रेलियन सैन्याला आश्चर्य वाटूं लागलें. आणि कोणाचा तरी बळी द्यावयाला पाहिजे म्हणून जहालांनी धर्माधिकारी मंडळावर संक्रांत फिरविली. कोणी एक अशी बातमी उठविली कीं, लढाईत ऑस्ट्रियन शिपायांचे म्हणून जे कांहीं मुडदे फ्रेंच सैन्याचे हातीं लागले, त्यांत कांहीं फ्रेंच धर्माधिकारी आपल्या पोषाखासह सांपडले! आणि या बातमीवर सभेने विश्वास ठेविला! या पराभवाचा फायदा घेऊन सभेंतील नेमस्त पक्षाने जहाल पक्षाला दोष देण्याला सुरुवात केली. आणि "हे सर्व घातकी खेळ करणारे जॉकोबीन क्लब बंद करावे" असें त्याने सुचविलें. त्यावरून भर सभेंत 'तोंडातोंडी' 'गुद्दागुद्दीहि' झाली. "निवडक देशभक्तांची कत्तल करण्याचा बेत व कट राजाने केला आहे," अशीहि गप्प कोणी त्यांतच सोडून दिली! यामुळे सभेने ठराव केला कीं, "राजाच्या भोंवती संरक्षक शिपायांची म्हणून जी पलटण ठेविण्यांत आली आहे, ती मोडून शिपायांना रजा द्यावी. म्हणजे राजाला कोणाचें कांहीं वांकडें करतां

येणार नाही. अस्सल देशभक्तांचेंच सैन्य कसें बनवावें याचा विचार सुरू झाला. ठराव असा झाला कीं, " पूर्वीसारखे एक फेडरेशनच्या नांवानें बडे सम्मेलन भरवावें. त्याकरितां प्रत्येक परगण्यानें लष्करी पोषाख देऊन सैनिक-वजा प्रतिनिधि पाठवावे." असा सैनिक प्रतिनिधींचा इष्टांक वीस हजार हा ठरला. संमेलनाची तारीख १४ जुलै ही ठरली. या ठरावाला राजाची संमति पाहिजे होती, ती मिळविण्याचा प्रयत्न मंत्रिमंडळानें केला; पण तो फसला. राजानें दोनतीन मंत्र्यांना आपल्या अधिकारांत बडतर्फ केलें. हें मंत्री सभेंत खालीं मान घालून आले, तेव्हां सभेनें त्यांच्याबद्दल सहानुभूति प्रकट केली.

**गुप्त कटाचें पर्यवसान**

आतां मात्र राजाची धडगत नाहीं असें लोक बोलूं लागले. मादम रोलाँ हिच्या घरीं गुप्त रीतीनें कटाची योजना झाली. राजपद नष्ट करण्याचा शाब्दिक ठराव सभेनें केला तो आतापर्यंत नामंजूर झाला, हें मागें सांगितलेंच आहे. पण ती जी गोष्ट तेव्हां जातां जातां सहजासहजीं घडली, तीच आतां मुख्य समजून घडवून आणण्याचा जहालांचा निश्चय झाला. ट्यूलरीस राजवाड्यांत लोकांनीं स्वातंत्र्याच्या वृक्षाचें बीजारोपण करावें, असें बंडाळीला निमित्त ठरविण्यांत आलें. सुमारें आठ हजार लोक या कामगिरीवर निघाले. त्यांना अर्जदार म्हणून आंत घेण्याविषयीं बाचाबाची झाली. राजवाड्याच्या वेशीवर पाहारा नव्हता. लोक आंत घुसून मैदानावर पसरले. त्यांनी दरवाजे फोडूं मोडूं नयेत म्हणून राजा स्वतःच शांतपणें बाहेर आला. गर्दीत त्याला थोडी धक्काबुक्कीहि झाली. शिव्या-शापहि त्याच्या कानीं पडले. " बडतर्फ केलेले मंत्री पुन्हा कारभारावर घ्या, धर्माधिकारीमंडळ नष्ट करा," अशा मागण्या करण्यांत येऊं लागल्या. राजानें धैर्यानें व गंभीरपणानें त्यांना उत्तर दिलें कीं, " या गोष्टीचा विचार करण्याची ही जागा नव्हे, ही वेळ नव्हे. मला तुम्ही काय समजतां ? मी तुमच्या इतकाच देशभक्त आहें. तुमच्या इतकेंच मलाहि स्वातंत्र्य प्रिय आहे."

आणि जणुं काय हें कृतीने दाखवावे म्हणून, स्वातंत्र्याची खूण अशी जी तांबडी टोपी जवळच्या एका माणसाच्या डोक्यावर दिसली, ती त्याने आपल्या हाताने उचलून स्वतःचे डोक्यावर घातली ! मग काय विचारतां ? बंडवाल्यांतले कांहीं लोक त्यांतल्या त्यांत दारूहि पीत होते, त्यांपैकीं एकाने आपला ग्लास भरून राजाच्या हातीं दिला. तें पाहून कांहींजण मोठ्याने ओरडून म्हणाले, "पहा, खुद्द राजेसाहेब आमच्याबरोबर दारूचा पेला झोकीत आहेत ! आता बरोबरी पुरी झाली की नाही ? समानतेच्या वादांत आता काय उरलें ?" इतक्यांत पॅरिसचा मेयर वगैरे मंडळी आली. त्यांनी राजाला गर्दीतून बाहेर काढलें. राजाने लोकांच्या नक्की मागण्याला स्पष्ट असें उत्तर कांहींच दिलें नाहीं. मेयर लोकांना म्हणाला, "राजाचें उत्तर हवें खरें; पण तें बळजबरीनें घेतलें असा देखावा स्वतः राजाला किंवा लोकसभेलाहि इष्ट नाही." लोकहि थकले भागले होते व हळूं हळूं निघून गेले.

**उद्विग्न लाफायतचा नगरत्याग**

लोकांच्या या राजदर्शनाचा हा असा प्रकार झाला. त्यावर लोक-पक्षानें असा शेरा मारला कीं, "इतके लोक चाल करून गेले असतां राजवाड्याचीं फक्त कांहीं तावदाने फुटलीं. यावरून आपलें स्वातंत्र्य व शक्ति हीं त्यांना शहाणपणाने वापरतां येतात हें सहजच सिद्ध झालें नाहीं काय ?" फुटलेल्या तावदानांचा मोबदला राजाला किंचित् सहानुभूतीनें मिळाला. इतक्यांत सेनापति लाफायत तेथें आला. त्याने जॉकोबीन क्लबाविरुद्ध हत्यार उपसण्याचें ठरविलें. त्याने लोक-सभेंत प्रवेश करून दंगेखोर पक्षाची सडकून हजेरी घेतली. वयाने त्याच्या इतका वडील व अनेक दृष्टींनी मान्य असा नव्या चळवळींत कोणी नव्हता. जहाल पक्षाने त्याच्या भाषणाला उत्तर देण्याचें धैर्य दाखविलें नाहीं. परंतु त्याच्या विरुद्ध एकाने निंदाव्यंजक ठराव आणला, तो ३३९ विरुद्ध २३४ इतक्या मतांनीं नापास झाला. रात्रीं जॉकोबीन क्लबांतून लोक जमले. तेव्हां त्यांनी दांत-

ओठ चावून लाफायतवर खूप तोंडसुख घेतलें. आणि दुर्दैव हें कीं, इतकें सर्व करूनहि खुद्द राजमंडळांत लाफायतविषयीं भलेपणाचा एक शब्दहि कोणी काढीना. इतकेंच नव्हे तर, एक दिवस राष्ट्रीय सैन्याची कवायत घ्यावी असें ठरविलें असतां, राजमंडळाने मेयरकडून 'परेड' थांबविली. तेव्हां निराश व उद्विग्न होऊन तो पॅरिस सोडून निघून गेला.

**'देश संरक्षक मंडळ'**

नव्या निवडणुकींतील ब्रेस्ट व मार्सेल येथील जहाल प्रतिनिधी लोकसभेंत येऊन दाखल झाल्यावर, आणखी एखाद्या संमेलनाचा असाच प्रकार करावा असा जॅकोबीन लोकांनी बेत केला. पूर्वी ता. २० जून रोजीं त्याने जें कांहीं केलें त्याचें हें त्याला प्रायश्चित्त होते. ता. ८ जुलैपासून राजाला पदच्युत करण्याची भाषा पुनः सुरू झाली होती. लोकसभेंत क्षणभर त्याला अनुकूल तर क्षणभर त्याला प्रतिकूल असें मत असल्याचा भास होई. ता. ११ जुलै रोजीं लोकसभेने राज्यावर संकट आलें आहे, असा ठराव केला. ता. १२ जुलै रोजीं पॅरिसच्या मेयरला जागेवरून काढण्याचा हुकूम निघाला. ता. १३ रोजीं पॅरिसच्या मेयरला पुन्हा त्याच्या जागेवर नेमण्यांत आलें. उलटसुलट सर्व प्रकार सुरू होते, आणि लोकसभेचा चंचलपणा हा विचारी लोकांच्या उद्विग्नतेचा विषय झाला होता. संमेलनाकरितां बाहेरून प्रतिनिधि येतच होते. ता. १७ रोजीं संमेलनवाल्यांनीं लोकसभेला अर्ज केला कीं, "राजा हा देशद्रोही ठरला, म्हणून त्याला कायमचें पदच्युत करावें." आधीं तें करून मग परदेशी शत्रूंचा समाचार घ्यावा, असा त्यांचा बेत होता. स्वयंसेवक सैन्यहि म्हणूं लागलें कीं, "आम्ही ऑस्ट्रियाविरुद्ध लढण्याकरितां सरहद्दीकडे जाण्याला एका पायावर तयार आहों. परंतु तिकडे आमच्या मागे राज्यक्रांतीला पायबंद बसणार नाहीं याची हमी कोण घेतो?" जहालपणाचीं पुटांवर पुटें लोकसभेवर बसूं लागलीं होतीं. आणि गुळवेलीच्या सत्त्वांतून पुनः सत्त्व काढावें त्याप्रमाणे जहालपणांतून जहालपणाचा अर्क

वस्त्रगाळ निघत होता. लोकसभेनें एक बाराजणांचें मंडळ नेमिलें व त्याला "कमिटी ऑफ पब्लिक सेफ्टी" म्हणजे 'देशरक्षकमंडळ' असें नांव दिलें. त्याने लोकसभेला यादी लिहून कळविलें कीं, "राष्ट्र हें स्वतःचें व लोकांच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याला समर्थ आहे. परंतु राजाला एकदा स्पष्ट विचारावें कीं, आणि तेंहि शेवटचेंच विचारावें कीं, 'राजपद वांचविण्याची तुमची इच्छा आहे कीं नाहीं ? व असेल तर आम्ही सांगूं त्याप्रमाणे वागण्यास आपण तयार आहां कीं नाहीं ?' राजा जर आपल्या तंत्रानें वागेल तर आपण त्याला वांचवूं शकूं असें जिरॉंडीन लोकांना वाटत होतें.

ता. २९ जुलै रोजीं रोबेस्पिअर या इतिहासप्रसिद्ध जहाल सभासदाने लोकसभेंत ठराव मांडला कीं, "तूर्त राजपद 'सस्पेंड' करावें, राजा लुई याचे हातांतील सर्व अधिकार तहकूब करावे, आणि 'राष्ट्रीय कन्व्हेन्शन' भरवावी. पूर्वीच्या राजघटनेंत राजपद शिल्लक होते, यामुळें ही राष्ट्रीय कन्व्हेन्शन म्हणजे नवी कॉंस्टिटयूअण्ट असेंब्ली ऊर्फ घटना समितीच होय." ता. २९ जुलै रोजींच मार्सेल येथील नव्या प्रतिनिधींची तुकडी पॅरिसला येऊन पोंचली. मार्सेलच्या मेयरला निरोपच गेला होता, तो असा कीं, "प्रत्यक्ष मरणाला तयार असेंच सहाशें लोक पाठवा !" फ्रान्सच्या दक्षिण टोंकापासून पॅरिसला येथून पोहोंचेपर्यंत ते राष्ट्रीय गाणीं गात येत होते. यांतलेंच एक गाणें मार्से-लीस नांवाने प्रसिद्ध आहे. ता. ३० ला त्यांनी पॅरिसमध्यें प्रवेश करून नॅशनल गार्ड्चा एक अधिकारी मारला. कित्येक शिपायांना जखमीं केलें. आणि चोहोंकडे दंगेधोपे पेरले.

**धमकी दिली खरी**

इकडे ऑस्ट्रियाने युद्ध पुढें चालविण्याची तयारी केली. सैन्याच्या हालचालींचें धोरण त्यानें असें ठेविलें होतें कीं, पॅरिसचे कांहींहि होवो, पण फ्रान्सचे जे परगणे आपल्या राज्याला जोडून घेणें सोयीचें आहे, त्यांतच सैन्य भरपूर ठेवावयाचें; पळपुट्या लोकांनी

डयूक ऑफ ब्रन्स्विककडून जाहीरनामा काढविला कीं, "जर राजा लुई व त्याचें कुटुंब यांच्या केसाला धक्का लागेल तर पॅरिस जाळून उध्वस्त करूं आणि लोकसभेचे सर्व सभासद फांशीं देऊं!" ता. ५ मे १७८९ पासून जे राज्यक्रांतीच्या बंडाळींत शिरले होते त्या सर्वांनाच ही शिक्षा फर्माविली गेली.

**परिणाम विपरीत झाला**

पण या जाहीरनाम्याचा परिणाम फ्रेंच राजाला घातक झाला. या जाहीरनाम्याचे निमित्त करून जहालांनी राजाला पदच्युत करण्याची मागणी जोरानें चालविली. ता. ८ ऑगस्ट रोजीं लोकसभेला असें दिसून आलें कीं, बंडवाले लोक आजउद्यां हत्यार घेऊन उठणार. ता. ९ रोजीं बहुतेक सभासद लोकसभेतून उठून गेले. पैकीं कांहींना बंडवाल्यांत मिसळून हातांत हत्यार घ्यावयाचें होतें, तर कांहींना बंडवाल्यांपासून आपलें संरक्षण करावयाचें होतें. रात्रीं १२ च्या सुमारास सार्वजनिक जागांतल्या मोठमोठ्या घंटा वाजूं लागून एकमेकांना उत्तर देऊं लागल्या. पहिला हल्ला हॉतेल दि व्हिल या इमारतीवर करण्याचें ठरलें. कारण राजपक्षपाती लोकांचा अड्डा तेथें होता. यानंतर नॅशनल गार्ड सर्व वश करून घेणें, नंतर राजवाड्यावर हल्ला करणें, असा कार्यक्रम ठरला होता. या सुमारास लोकसभेतील ठरीव पक्षांव्यतिरिक्तहि निरनिराळे गट व क्लब बनले गेले होते. प्रत्येकजण जें आपण ठरवूं तेंच कायदेशीर असें आग्रहाने म्हणत होता. आणि शेवटीं जो जय मिळवील त्याचेंच करणें कायदेशीर असें म्हणावें लागण्याइतकी अधिकाराची गुंतागुंत झालेली होती. राजवाड्यांत मांदा याने नॅशनल गार्ड्चे लोक संभाळून ठेविले होते व बाहेरून स्विस् पलटणीला बोलाविणें पाठविलें होतें. पण नॅशनल गार्ड्च्या लोकांना स्विस् पलटण बोलाविली ही गोष्ट आवडली नाहीं. भल्या पाहाटेस डँटन याने हॉतेल दी व्हिलवर हल्ला केला. कौन्सल जनरलने मांदा याला राजवाड्यांतून हॉतेल दी व्हिलकडे बोलाविलें तो त्याप्रमाणें टाऊनहॉलमध्यें आला. तेथें येतांच त्याचा लष्करी पोषाख काढून घेतला,

त्याचा अधिकार काढून घेतला, आणि पदरीं अपमान घेऊन तो इमारतींतून बाहेर जाऊं लागला तेव्हां कोणी त्याचा खून केला! हें कृत्य वर जे अनेक गट वा क्लब बनल्याचें सांगितलें, त्यापैकीं एकाने केलें. त्यानेच कौन्सल जनरल 'सस्पेंड' केलें असाहि जाहीरनामा काढला. अर्थात कौन्सिलने या अनधिकारी फाजीलपणाचा धिक्कार केला. पण शेवटीं वरील जहाल गटाचा जोर होऊन पॅरिसची कॉम्यून ही कौन्सिल जनरलची जागा बळकावून बसली. दुसऱ्या एका गटाने पॅरिसमधील एका इमारतीवर तोफ चढवून ती राजवाड्यावर रोखली.

**त्यावेळचा नेपोलियन**

सकाळीं उठून राजा घाबरेपणानें नॅशनल गार्ड्च्या पलटणीपुढून हिंडून शिपायांची खुषामत करूं लागला. आणीबाणीचा प्रसंग पाहून, नॅशनल गार्ड्च्या लोकांत, आपण आतां कोणता पक्ष घ्यावा, याविषयीं चर्चा सुरू झाली. इतक्यांत बाहेरून बंडखोरांनी वाड्याच्या बाहेरच्या दरवाज्यावर धक्के देण्याला सुरवात केली. कोणी तटावर चढले आणि आंतील लोकांना बंडांत सामील होण्याचा उपदेश करूं लागले. तेव्हां राजपक्षपाती एकदोघा पुढाऱ्यांनी, राजाने आतां खुद्द लोकसभेंतच जाऊन आश्रय घ्यावा असा सल्ला दिला. राणीच्या मनांत वाडा लढवावा असें होतें. परंतु अखेर तो बेत रहित होऊन राजा, राजमंडळ, अद्यापि अधिकारारूढ असलेले मंत्री, आणि नॅशनल गार्ड् असे सर्व मिळून वाड्यांतून बाहेर पडले. या राजवाड्याचें दर्शन राजाला पुन्हा घडलें नाहीं.! लोकसभा राजाचें स्वागत करण्याला सिद्ध होती. अध्यक्षाच्या डाव्या बाजूला राजाला खुर्ची देण्यांत आली! "लोकसभा अजून खंबीर आहे, काळजी करूं नका" असें अध्यक्ष राजाच्या कानांत कुजबुजला. राजाला सभेंतच खुर्ची मिळाली, पण राणी व राजमंडळ यांना सभेच्या बाजूच्या एका खोलींत गर्दी करून बसावें लागलें! "यावेळीं लष्करांत कनिष्ठ दर्जाच्या जागेवर असणारा नेपोलियन बोनापार्ट हा राजा राजवाड्यांतून बाहेर पडून

लोकसभेकडे चालला, हा सर्व प्रकार गंभीर मुद्रेने पाहात होता," असें इतिहासकाराने तोंडी हकीकतीवरून लिहून ठेविलें आहे !

सकाळीं ८ वाजल्यापासून राजवाड्याच्या वेढ्याला सुरवात झाली.

**वाड्याला वेढा**

आपल्या खास संरक्षक स्विस् पलटणीला राजवाड्याच्या आंतल्या आवारांत जाण्याला राजानें हुकूम पाठविला. बाहेरच्या आवारांत नॅशनल गार्ड्चे कांहीं लोक उभे होते. लौकरच वाड्यावर तोफांचे गोळे पडूं लागले. स्विस् पलटणीला अतिशय चेव आला. हातांत हत्यारें असतां, 'लढूं नये' या राजाच्या हुकुमाचा अर्थ त्यांना कळेना. आणि आत्मरक्षणाकरितां तरी लढूं असा त्यांनीं निश्चय केला. त्यांच्यापैकीं दोघांना वार लागतांच त्यांनीं उलट बंदुका झाडल्या. पहिल्याच गोळीने मार्सेल पलटणीचा पुढारी मरून पडला. बाहेरच्या चौकांतील फरशीवर सुमारें शंभर माणसें मरून किंवा जखमी होऊन पडली. स्विस् पलटण त्यांच्या मुडद्यांवरून चालत अलीकडे येऊन तिने तोफांवर हल्ला केला, व त्या हस्तगतहि केल्या. पण इतक्यांत पळून जाणाऱ्या बंडखोरांना बाहेरून कुमक आली, आणि स्विस् पलटणीजवळचा दारूगोळा संपत आला होता, म्हणून ती परत राजवाडया-कडे गेली. जातां जातां त्यांनीं कांहीं लोक मारले.

राजवाडयाकडे झालेला गोळीबार लोकसभेंत ऐकूं येऊं लागला तेव्हां

**नरयज्ञाला सुरवात**

'आतां यापुढें नगर रक्षणाचें सर्व उपाय पॅरिसच्या लोकांचे हातीं आम्ही दिले आहेत,' असा ठराव तिने केला. बाहेर लोकांचें बळ वाढलें तेव्हां त्यांनी स्विस् पलटणीवर हल्ला केला, तींतले बहुतेक लोक मारले, आणि राजवाडयाच्या बाहेरच्या आवारांत मोठ-मोठ्या आगी पेटवून त्यांत अनेकांचीं प्रेतें टाकून दिलीं. राजवाडयांतल्या गरीब नोकरांचेहि खून झाले. लोकपक्षीयांच्या अंगावर पक्का खून चढला. तरण्या मुलांना सुद्धां हत्यार चालवावें, एखादा तरी खून पाडावा, अशी हौस

वाटूं लागली! अशा रीतीनें ऑगस्ट १० तारखेला सुमारें आठशें लोक प्राणाला मुकले! हा सर्व प्रकार चालू असतां, राजा व राजमंडळ हीं लोकसभेंत अडकून पडलीं. साडेसातशें सभासदांच्या लोकसभेंत आतां सुमारें तीनशेंच उरले. बाकीच्यांनी आपला रस्ता सुधारला होता. उरलेले हे तीनशें बहुतेक सर्व जहाल पक्षाचे होते. ते म्हणूं लागले कीं, " आतां एवीतेवी नरयज्ञाला सुरुवात झालीच आहे, तेव्हां त्याची कड पोंचविल्याशिवाय आम्ही थांबणार नाहीं. " राजाला एकदम पदच्युत करावा, किंवा कन्व्हेन्शनचा ठराव होईपर्यंत राजाधिकाराची तहकुबी फर्मावावी, हाच वाद संध्याकाळपर्यंत सभेंत चालू होता. रात्रीं १० वाजतां राजाला जवळच्या एका मठांत निजण्याला जागा दिली, व फिरून दुसरे दिवशीं सकाळीं त्याला लोकसभेकडे नेण्यांत आलें. शेवटीं हॉतेल दी व्हिल या इमारतींत बंडवाल्यांचें मुख्य ठाणें होते, तेथें त्यांच्याच स्वाधीन राजा व राणी यांना करण्यांत आलें! राजाला प्रतिपक्षाच्या स्वाधीन करणें हा जिरॉंडीन लोकांचा पाडावच झाला म्हणावयाचा. कारण राजा प्रथम आपल्या स्वाधीन झाला आहे, तरी आता त्याला हातीं ठेवून क्रांतीचें राजकारण खेळावयाचें अशी उमेद त्यांनीं धरली होती. पण ती फुकट गेली. डँटन याला विजयी पक्षाचा पुढारी नेमण्यांत आलें. त्याच्या हातीं न्यायखातें देण्यांत येऊन, राजानें पूर्वी बडतर्फ केलेले मंत्रि परत त्यांच्या जागेवर नेमण्यांत आलें. यापुढें झोटिंगशाहीचे जे अवतार झाले, त्यांतील पहिला अवतार डँटन हा होय. मिराबोसारखाच तो अप्रामाणिक; पण त्याच्यापेक्षां प्रचलित क्रांतीवर अधिक निष्ठा ठेवणारा असा तो होता. स्वभावाने तो उत्पाती असून, लोकांनीं त्याचें नांव 'ज्वालामुखी' हें यथार्थपणें ठेविलें होतें! पूर्वी ता. २० जून रोजीं झालेल्या दंग्याविरुद्ध बाहेरच्या प्रांतांतील लोकांनीं तक्रार केली होती. पण १० ऑगस्टच्या दंग्याविरुद्ध कोणी बोलेना.

यांचें कारण मध्यंतरी ड्यूक ऑफ ब्रन्स्विकचा जाहीरनामा निघून परच-

**युद्धाच्या घडामोडी**

क्राची भीति वाढली होती. ता. १९ ऑगस्ट रोजीं प्रशियन सैन्यानें सरहद्द ओलांडली. त्याच्या छावणींत कांहीं पळपुटे लोक असून सैन्याबरोबर ते पॅरिसमध्यें प्रवेश करणार होते. स्वारी करणाऱ्या सैन्याची संख्या सुमारें सवा लाखपर्यंत वाढली. फ्रेडरिक दि ग्रेट याच्या हाताखालीं तयार झालेलें कांही सैन्य यांतच होतें. लोकसभेनें जमविलेलें सैन्य सुमारें ८०००० इतकेंच होतें. लाफायत हा आपली सेनापतीची जागा सोडून गेला त्याचे जागीं डू मोरीज याची नेमणूक झाली. नव्या सैन्यांत अनुभविक सैनिकांपेक्षां उत्साही नागरिकांचीच भरती अधिक होती. मूळचें भांडें कच्चें पण प्रत्यक्ष युद्धाच्या भट्टींत तें लवकरच भाजून निघालें. स्वयंसेवकांनी आपल्या इच्छेप्रमाणें आपले अधिकारी निवडून घेतले. नागरिक सैन्याला खूष ठेवण्याला केव्हांहि असेंच करावें लागतें. या फ्रेंच सैन्यांतील पायदळ व घोडदळ यांपेक्षा तोफखानाच अधिक खंबीर होता. सैन्याची भरती उत्साहामुळें सहा आठवड्यांत होऊं शकली. ता. २० ऑगस्ट रोजीं जर्मन सैन्यानें लॅग्वी हें ठाणें घेतलें. पराभव पावलेले फ्रेंच लोक आपण वश करून घेऊं, अशी जर्मन सैन्यांतील पळपुट्या फ्रेंच लोकांना आशा वाटत होती, पण ती फुकट गेली. ता. २ सप्टेंबर रोजीं शत्रुसैन्यानें 'व्हर्डून' हें ठाणें घेतलें. हळू हळू या सैन्याची आघाडी इतकी जवळ आली कीं, नजीकच्या एका डोंगरावरून खाली मैदानावर पसरलेलें पॅरिस शहर तिला अंधुकपणें दिसूं लागलें.

लोकसभेंत गडबड झाली. तिचा एक परिणाम असा झाला कीं,

**धरपकडीचें सत्र**

फितुरी यापुढे तरी बंद व्हावी म्हणून, राज्यक्रांतीच्या शत्रूंना म्हणजे उरल्यासुरल्या वरिष्ठ वर्गांना दहशत घालण्याकरितां धरपकडी, चौकशा व शिक्षा यांचें सत्र ता. १७ ऑगस्ट रोजीं लोकसभेनें आरंभिलें. ज्याचा संशय येई त्याला तर कैद करावाच, पण

त्याच्या आप्तसंबंधीं लोकांनाहि कैद करावें, आणि पळपुट्या लोकांचीं घरें स्वाधीन करून घेऊन त्यांतच त्यांच्या कुटुंबियांना कैदेंत ठेवावें, असा हुकम झाला. वस्तुतः लोकसभेच्या हातून जॅकोबिन या गोष्टी करवून घेत होता.

जिरॉंडिन–जॅकोबिन या दोन सत्तांचें एकीकरण व्हावें म्हणून डँटनची खटपट सुरूं होती. रणांगणावर झालेल्या पराभवाला देशांतील बेइमान लोकांची कत्तल एवढें तरी उत्तर आपण द्यावें, असें जॅकोबिन क्लब आणि कॉम्यून्स यांनीं ठरविलें होतें. डँटन याला स्वतःला निरपराधी लोकांचे खून पसंत असोत वा नसोत, त्याने या खुनांना अप्रत्यक्ष मदत केली. ती अशी कीं, त्याने स्वयंसेवकांची सैन्यांत भरती करण्याकरितां, अस्सल देशभक्त व संभावित लोक शॉंदिमार येथें बोलाविले. आणि वर कैद केलेल्या किंवा तुरुंगांत ठेविलेल्या लोकांना शहरांतील मवाली बदमाश जहाल लोकांच्या स्वाधीन केलें.

**तीन दिवसांत सोळाशें मारलें**

ता. २ सप्टेंबर रोजीं इकडे व्हर्डून शत्रूच्या हातीं लागलें, तों इकडे पॅरिसमध्यें निवडणुकीची धामधूम सुरूं होती. या निवडणुकींत साध्या जहालांचा पराभव करून इरसाल जहाल निवडून आणावे असा प्रयत्न सुरूं होता. या चारदोन दिवसांत भीति, उत्साह, क्रूरपणा व कामुकता या सर्वांना जसा कांहीं ऊत आला होता! वस्तुतः खुनाचें यज्ञकंकण हातीं बांधलेले आणि रक्तपाताची हौस पुरवून घेणारे असे इसम एकंदर शेंदोनशेंच असतील. परंतु त्यांना प्रतिबंध करण्याला कोणीच पुढें येत नसल्यामुळे, त्यांनी लोकसभा, तिचें कार्यकारी मंडळ, व एकंदर जनता यांना आपल्या रुद्रावताराने भिववून सोडलें होतें. चौकशीचा फार्स करून मारलेले व चौकशी न करितांहि मारलेले अशांची संख्या त्या दोन तीन दिवसांत सोळाशेंवर गेली! आणि हें सर्व लोकसंरक्षणाच्या नांवाने चालू होतें! या कत्तलीकडे लोकसभेने दुर्लक्ष केलें. शांतता प्रस्थापित करण्या-

करितां सभेने एक मंडळ म्हणून नेमिलें, पण त्याचा कांही उपयोग झाला नाहीं. कोणाची कोणाला दाद लागेना आणि लागली तरी ती कोणी घेईना. अत्याचार होतात असें कोणी म्हटलें तर त्याला उत्तर इतकेंच मिळे कीं, "अत्याचार न होतील तर काय होईल ? दोन वर्षें लोकांना जें दुःख सोसावें लागलें, त्याचें हें फळ होय. शहाण्या माणसाने आपली दृष्टि दुसरीकडे वळवावी हाच उत्तम उपाय." खुनांना 'अंतिम न्याय' असें प्रतिष्ठित नांव मिळालें. सगळेच जहाल खरे. पण त्यांतले नुसते जहाल कोण ? आणि अत्याचारी जहाल कोण ? याची निवड या वेळीं झाली.

**वामी येथें पहिला जय**

जनतेच्या अंगावर दोन मोटीं ओझीं पडलेलीं होतीं. पहिलें ओझें उध्वस्त झालेल्या नव्या राज्यघटनेचें; दुसरें ओझें, अशा कत्तली होत असतां त्या थांबविण्याला आपण असमर्थ आहों, या दुबळ्या व दोषी जाणीवेचें. ता. १९ सप्टेंबर रोजीं आरगॉनच्या खिंडीपर्यंत शत्रुसैन्य आल्याची बातमी पसरली. ता. २० रोजीं जुनी लोकसभा बरखास्त होऊन लोक नव्या लोकसभेची वाट पाहूं लागले. येणार ही वास्तविक खरी लोकसभाच नव्हती. कारण पूर्वीची राज्यघटना आतां शिल्लक नव्हती. लोकसभेच्या नांवाने जे चार शिरजोर लोक अधिकार चालवितील, तीच लोकसभा म्हणावयाची असें होऊन बसलें होतें. आरगॉनची खिंड ही मोठी महत्त्वाची जागा होती. येथपर्यंत प्रशियन सैन्य येऊन पोहोंचलें पण यापुढें तीन अकल्पित गोष्टी त्याच्या अनुभवाला आल्या. एक ही कीं पॅरिसमध्यें एवढें अराजक माजलें असतां, सैन्याची भरती होण्याला खळ पडत नाहीं. दुसरी अशी कीं, "तुम्ही फ्रान्समध्यें शिरण्याचा अवकाश कीं राज्यक्रांतीला कंटाळलेले लोक तुमचें ठिकठिकाणीं स्वागत करतील व तुमच्या सैन्यालाहि येऊन मिळतील" असें जें पळपुट्या लोकांनीं भासविलें होतें, तें सर्व खोटें ठरलें. तिसरी गोष्ट अशी कीं, या युद्धाच्या मिषानें ऑस्ट्रियन

बादशाह बेल्जियममधील किल्ल्यांना वेढे देऊन ते हस्तगत करीत होता व हें झालें म्हणजे आपोआपच आस्ट्रियाचा राज्यविस्तार वाढणार, अशी शंका प्रशियाला येऊं लागली होती. फ्रेंच सेनापति केलरमॉन याने या संधींत पॅरिस शहर व प्रशियन सैन्य यांच्या दरम्यान उंच जागेवर आपलें ठाणें बसविलें. धुकें पडल्यामुळें त्याची ही हालचाल प्रशियन सेनापतीला दिसली नाहीं. धुकें वितळल्यावर उभयपक्षीं तोफांची मारागिरी सुरू झाली. फ्रेंच सैन्य उत्साहानें लढत होते, व हा अकल्पित उत्साह पाहूनच प्रशियन सैन्य गांगरून गेलें होतें. शेवटीं ड्यूक ऑफ् ब्रन्स्विक याच्या सूचनेवरून प्रशियन सैन्याने माघार घेतली. अशा रीतीनें फ्रेंच सैन्याला पहिला जय मिळाला. याला वॉमीची लढाई असें म्हणतात. फ्रेंच सैन्याने यापुढें कित्येक वर्षे युद्धांत मोठे लढवय्ये म्हणून कीर्ति मिळविली, तिला येथूनच प्रारंभ झाला.

# १६ लुई राजाचा वध

ता. ५ ते २० सप्टेंबर (१७९२) पर्यंत नॅशनल कन्व्हेन्शनच्या निवडणुकी झाल्या. त्यांतील खऱ्या चुरशीच्या खुद्द पॅरिस शहरांत झाल्या. त्यांत ब्रिसो, कंडॉरसेट, पेमियन वगैरे जुने जहाल पुढारी पराभूत होऊन, डँटन, रोबेस्पिअर, मारा, वगैरे जहालांचे अर्क निवडून आले. मादम रोलाँ व तिचा नवरा हे निवडून आले; पण त्यांतल्या त्यांत कमी जहाल म्हणून मोठ्या कष्टाने. बाहेर परगणेनिहाय निवडणुकी झाल्या, तेथें कोणत्याच तत्त्वावर निवडणुकी झाल्या नाहींत. स्थानिक महत्त्वामुळें पुष्कळसे प्रतिनिधि निवडले गेले. तरीपण राजपक्षापेक्षां नव्या घटनेचे, म्हणजे राज्यक्रांतीचेच अभिमानी अधिक होते. नव्या लोकसभेंत घटना समितींतील कल्पनांचा सुकाळ मुळींच दिसत नव्हता. केवळ विद्यमान परिस्थितींत जें घडेल तें खरें, असें म्हणणारेच पुष्कळ होते.

**कन्व्हेन्शनची निवडणूक**

साडेसातशें लोकांपैकीं दोन अडीचशेंच सभेला हजर राहत. धर्माधिकारी मंडळ आणि राष्ट्रीय सरकार यांचें संबंध मोठे वादग्रस्त असत; पण त्यांकडे या नव्या सभेने फारसें लक्ष दिलें नाहीं. परराष्ट्रीय धोरण असें फारसें नव्या लोकसभेच्या डोक्यांत नव्हतेंच. समतेच्या नांवाखालीं सर्व वर्ग एकाच दर्जाला आणून ठेविण्यावरहि नव्या सभेचा फारसा कटाक्ष नव्हता. मात्र एक गोष्ट नव्या सभेंत विशेष दिसली ती

**पॅरिसचा हेवा**

ही कीं, एकटें पॅरिस शहर एकंदरीनें आपणाला डोईजड होऊन बसतें या गोष्टीचा नव्या सभेला मोठा राग आला होता. यामुळें हतवैभव अशा जिरॉं-डीन पक्षाच्या पुढाऱ्यांना नवी लोकसभा मधून मधून पाठिंबा देई. उलट पॅरिसच्या पुढाऱ्यांचे म्हणणें असें कीं, "राज्यक्रांति मूळ पॅरिसने सुरू केली. त्याने पुढाकार घेतला नसता तर राज्यक्रांति होतीच ना. म्हणून पॅरिसकडे पुढारीपण व लोकसंरक्षण समितीचें चालकत्व राहावें हें स्वाभाविक होय." लोकसभेंत जिरॉंडिन पक्षाची संख्या सुमारें दीडशें असावी, पण त्यांतले पुष्कळ गैरहजर असत. शिवाय त्यांच्यांत एकमत होत नसे. या पक्षांतील लोक बुद्धिमान विद्वान म्हणूनच त्यांची ही अशी स्थिति होई !

**जॅकोबिन पक्षाची चिंता**

जॅकोबिन पक्षाला विद्वत्ता, शहाणपण यांची गरज वाटत नव्हती. रिपाब्लिक हें साध्य आणि अत्याचार हें साधन या दोन गोष्टींतच त्यांचें सगळें तत्त्वज्ञान परिसमाप्त झालेलें होतें. नव्यापैकीं बरेंच प्रतिनिधि खरोखर मनांतून जहाल नव्हते. पण झाली एवढी क्रांति जमेस धरून त्यांना पुढील कार्यक्रमांत दोन प्रकारची भीति वाटे. (१) क्रांतिविरुद्ध प्रतिक्रांति होऊन पदरांत पडलें तें सर्व नाहींसें होईल, ही एक, आणि (२) दुसरी भीति अशी कीं, याहून मोठी सामाजिक क्रांति होऊन आहे तेहि हातचे जाईल. दुसऱ्याचें लुबाडून घेतलेलें असलें म्हणजे मग आहे ती स्थिति कायम राहावी असें स्वार्थी मनुष्याला वाटतें. पण मध्यमांनीं वरिष्ठांना लुबाडून त्यांची मिळकत आणि हक्क ज्या न्यायाने काढून घेतले तोच न्याय मागाहून कनिष्ठ वर्गाचे लोक मध्यमांना लागू करूं लागले म्हणजे मग डोळे उघडतात ! पण कनिष्ठांत देखील साधारण गरीब, बरेचसे गरीब, फारच गरीब, आणि कमालीचे गरीब अशा चार प्रति असतातच. आणि वरच्या दोन वर्गांच्या हातून काढून घेतलेली संपत्ति कनिष्ठ म्हणविणाऱ्या वर्गापर्यंत आली म्हणजे, फिरून कनिष्ठांत व गरिबांतहि पहिल्यासारखेंच भांडण उपस्थित होतें.

**पक्षभेद नव्हे तर पक्षद्वेष**

उजवेकडील जिरॉंडिन लोकांच्या अगदी विरुद्ध असणाऱ्या डाव्या जहाल पक्षाला 'पर्वत', हें टोपणनांव मिळालें होतें. याचें कारण त्याचे पुढारी डाव्या बाजूकडील सर्वांत उंच जागांवर बसत. या पर्वत–पक्षांत डँटन, डिमॉलिन, फेबर, कॅनील, सेकिलिज, रोबेस्पियर, सेंट जस्ट, मारा वगैरे लोक होते. फिरून यांतील प्रत्येकाचा एक एक लहानसा गट होता. दोन मोठ्या पक्षांच्या दरम्यान जो पक्ष बसे त्यास 'मैदान' किंवा 'दलदल' असेंहि म्हणत. 'दलदल' म्हणण्याचें कारण असें कीं विश्वासानें त्यांच्यावर आधार घेतला तर ते तो आधार टिकवितील किंवा बुडवितील याचा नेम नसे ! पूर्वीच्या लोकसभेंतहि हे तीन पक्ष एकमेकांशीं भांडत; तीं भांडणें म्हणजे एखाद्या क्रीडांगणांतील भांडणें, इतकेंच वाटे. पण या नव्या कन्व्हेन्शन सभेमध्यें असणारे हे तीन पक्ष जुन्या काळीं रोम शहराच्या भयंकर क्रीडांगणांत येऊन बसलेले, मारूं किंवा मरूं अशा निश्चयानें एकमेकांकडे रोखून पाहणारे, पंचहत्यारी ग्लॅडिएटर्स म्हणजे जेठी किंवा मल्ल असेच वाटत. या सभागृहांत प्रवेश करणाऱ्यानें मरण्याच्या तयारीनें यावयाचें अशीच समजूत होती. आपल्या पायाखालीं ज्वालामुखी पेटला आहे, मधून मधून धक्के बसत आहेत, आगीच्या ज्वाला, वितळलेल्या लोखंडाचा रस आणि लाल रंग चढलेली राख हीं वर येऊं लागलीं आहेत—असें पाहिल्यावर मनुष्यानें देहभान विसरून जावें, आणि आधी प्रतिपक्षी मारावा मग आपण जगलों वा न जगलों पाहतां येईल, अशा भावनेनें त्यानें रानटी पशूसारखें क्रूर बनावें यांत काय आश्चर्य ?

ता. २१ सप्टेंबर रोजीं, "राज्यघटनेंतून राज्यपद यापुढें काढून टाकलें" असा कन्व्हेन्शननें जाहीरनामा काढला. बाहेर परगण्यांतून या जाहीरनाम्याला मिळावा तसा उत्साहाचा जात्र मिळाला नाहीं. हें झाल्यावर पहिला हल्ला पतिपत्नी रोलॉं यांनी डँटनवर केला. उलट त्या पतिपत्नींचीं गृहछिद्रें

बाहेर काढून अब्रू मलीन करणारे लोक प्रतिपक्षांतहि कमी नव्हते. पॅरिस शहर हा फ्रान्सच्या ८३ विभागांपैकीं फक्त एक विभाग. असें असतां या एकट्याने इतर सर्वांवर शिरजोरी करावी हें सोसून घेणें लाजिरवाणें आहे, अशी हाकाटी बाहेर गांवांहून आलेल्या कांहीं प्रतिनिधींनी केली. पण जहालांतले अस्सल पुढारी पॅरिस शहरानेंच निवडून दिलेले होते. याचप्रमाणें भांडणाचे आणखी बरेच मुद्दे होते. ते सर्व सांगत बसणें कंटाळवाणें होईल. या सार्वजनिक बाबींच्या मुद्यांत व्यक्तिविषयक द्वेषबुद्धीची भर पुष्कळच पडली होती. यामुळें मनुष्यमात्र नीतिदृष्ट्या जितक्या बदमाशी करूं शकेल त्या सर्वांचे आरोप भरसभेंत एकमेकांवर उडघपणें केले जात! बंदुकींतील छरे एकाच बारांतून उडालेले पण पांच पंचविसांना लागणारे असतात, त्याप्रमाणें एकच आरोप पण तो अनेकांची अब्रू घेणारा ठरे.

**दुहेरी पेंच**

हळूंहळूं पर्वत-पक्षाचें बळ वाढूं लागलें. हें बळ कायम ठेवण्याचें एक साधन परराष्ट्रीय युद्ध होय हें ध्यानांत धरून या पक्षाने बेल्जियमवर स्वारी करण्याचा बेत केला. ऑस्ट्रिया व प्रशिया यांत फूट पाडण्याकरितां ऑस्ट्रियाने जिंकलेल्यापैकीं कांहीं प्रांत तुम्हाला देऊं अशी लालूच त्याने प्रशियाला दाखविली. पण प्रशिया जागेवर पाय धरीना. फ्रेंच सैन्य अनेक ठिकाणीं विजयी होऊन चढाई करूं लागलें. युरोपांतील कांहीं दुबळ्या देशांना रिपब्लिकच्या सैन्याची भीति वाटूं लागली. पूर्वी ता. २२ मे १७९० या दिवशीं लोकसभेने असें जाहीर केलें होतें कीं, "परराष्ट्रीय राजकारणांत फ्रान्सचें धोरण केवळ आत्मसंरक्षणाचें राहील, अतिक्रमणाचें राहणार नाहीं." पण आळश्यावर गंगा लोटावी त्याप्रमाणे अंगावर येऊन पडलेल्या या युद्धांत, फ्रेंच सैन्याला अनपेक्षित रीतीने जय मिळाले व मुलूखहि मिळाला. तेव्हां आतां बोलल्याप्रमाणेच करावें किंवा कांहींतरी निमित्त काढून ढाल फिरवावी हा वाद सभेंत सुरू झाला. "बोल-

त्याप्रमाणे करण्यांत प्रामाणिकपणाची कीर्ति मिळेल, उलट धोरण बदललें तर वेळ अशी आहे कीं, रिपब्लिकला परदेशांत मान्यता मिळून लौकिक वाढेल, लष्करी वैभव प्राप्त होईल ! " पण असें करण्यांत अकस्मात् वेताळाचा झोंटिंगाचा अवतार होऊन एखादा सीझर, एखादा क्रॉमवेल वरचढ होऊन, त्याने सर्व सत्ता हातीं घेऊन रिपब्लिकच मोडलें तर काय करा, असा दुहेरी पेंच पडला.

**डु मोरीज**

सेनापति डु मोरीज हा रणांगणावरून पॅरिसला आला. विजयश्रीने त्याला सहजच नेहमीहून अधिक तेज व बळ चढलें होतें. जिरॉंडिन पक्षाने त्याची बाजू उचलून धरण्याचें ठरविलें. मादम रोलॉं व तिच्या पुढ्यांतील इतर जहांबाज स्त्रिया यांच्याशीं त्याने तह केला. त्यांचीं संमेलनें, मेजवान्या होऊं लागल्या. पर्वत-पक्षाला याची मोठी भीति वाटली. डु मोरीज हा बेइमान ठरणार असें त्यांना वाटूं लागलें. लोकसभेने दिलेल्या लष्करी अधिकाराचा उपयोग करून ता. ६ नोव्हेंबर रोजीं त्याने ऑस्ट्रियन सैन्यावर मोठा जय मिळविला. ता. १५ रोजीं त्याने ब्रुसेल्स शहरांत प्रवेश केला; व लगेच लीज ॲंटवर्प येथपर्यंत जाऊन, म्हणजे सर्व बेल्जियम पादाक्रांत करून, ऑस्ट्रियन सैन्याला हांकून देऊन, बेल्जियमने स्वातंत्र्य पुकारावें व फ्रेंच रिपब्लिकशीं स्नेहाचा तह करावा असें कारस्थान रचलें. त्यानंतर हॉलंड देशहि जिंकून खालसा करावा अशी कल्पना निघाली. पर्वत पक्ष युद्धाला उत्तेजन देत होता, आणि जिरॉंडिन-पक्ष युद्धाचें धोरण ठरवीत होता. " युद्ध सुरू असतां देशांत मतस्वातंत्र्य असूं नये, " अशा सबबीवर राष्ट्र-संरक्षक कमिटी नेमण्याचा ठराव झाला, आणि पुढाकार घेणाऱ्या जिरॉंडिन पक्षाच्या हातांत तिचें चालकत्व गेलें. पण हें सहन न होऊन रोबेस्पिअर व त्याचे अनुयायी यांनी या पक्षांत फूट पाडण्याकरितां राजा लुई याची चौकशी करावी असा नवाच बूट काढला !

जिरॉंडिन पक्षाचें म्हणणें, राजाची रीतसर चौकशी करावी, असें होतें.

**राजाच्या चौकशीचा वाद**

पण पर्वत-पक्ष म्हणे कीं, " चौकशी कसली करावयाची ? राजाचा गुन्हा शाबीत होण्याची आणखी बाकी ती काय राहिली आहे ? कन्व्हेन्शन सभा हें स्वतःच काय न्यायकोर्ट नव्हे ? राष्ट्रीय सरकाराला राष्ट्ररक्षणाकरितां काय वाटेल तें करण्याचा अधिकार असतो. ज्यूलिअस सीझर हा शोटिंग बनून त्याने रोमन रिपब्लिकच्या मुळाला हात घातला, तेव्हां रोमन सेनेटने त्याची कधी चौकशी केली ? ब्रूटस सारख्या निरपवाद देशभक्तांनीं भरसभेंत सीझरच्या अंगावर खंजिर चालवून त्याला ठार केलाच कीं नाहीं ? " पण " चौकशीशिवाय राजाला शिक्षा करणें हेंच सें काय, चौकशी करूनहि शिक्षा करणें हें, बेकायदेशीर होतें. कारण १७९१ च्या राज्यघटनेप्रमाणे राजा हा आपल्या कृत्यांबद्दल जबाबदार ठरतच नव्हता, " असें नेमस्त पक्ष म्हणे. राजाने पाहिलें कीं, " आपण न्यायासनापुढे उभे राहात नाहीं असें म्हटल्याने गोष्ट निकराला येणार नाहीं; उलट आपण न्यायाच्या तत्त्वाला मान देतों असें दिसून आलें तर लोकमत अनुकूल होऊन कडक शिक्षा तरी होणार नाहीं. "

**न्यायासनापुढें राजा**

न्यायासनाची मांडणी होऊन त्यापुढे हजर राहण्याविषयीं राजाला रीतसर बोलावणें करण्यांत आलें. दोषारोपाचीं कलमें तिसाहून अधिक होतीं. न्यायसभेचा अध्यक्ष बारे हा होता. न्यायासनापुढे राजाने आपली वागणूक साधी, गंभीर आणि राजाच्या जागेला शोभेल अशीच ठेविली होती. आराम खुर्चीवर बसल्या बसल्या त्याने प्रत्येक प्रश्नाचें उत्तर सफाईने दिलें. तो ह्मणाला " दोषारोपांतील हकीकत सर्व खरी नाहीं, कांही खरी असली तरी तिजवरून दोषारोप शाबीत होत नाहीं, आणि दोन वर्षांपूर्वी जी राज्यघटना लोकसभेने मजवर लादली, तिच्याप्रमाणेंहि मला गुन्हेगाराप्रमाणें वागवितां येत नाहीं. " जिरॉंडिन पक्षाने राजा-

करितां वकील देण्याची परवानगी मिळविली. एक दोन वकिलांनी राजाचें वकीलपत्र आपण स्वीकारीत नाहीं असें सांगितलें. शेवटीं एक म्हातारा वकील मालेशर्ब व एक तरुण वकील डीज, अशा दोघांनीं वकीलपत्र घेतलें. तरुण वकिलानें आपलें काम मोठ्या कुशलतेनें केलें. तें इतकें कीं, पर्वत-पक्षाला निकालाची धास्ती वाटून न्यायमूर्तींना असा इषारा अप्रत्यक्ष रीत्या द्यावा लागला कीं, "आपण न्यायासनावर आहां, तरी पण आधी देशभक्त मुत्सद्दी आहां, व नंतरच न्यायाधीश आहां, हें लक्षांत ठेवा!"

**चौकशीचा फार्स**

चौकशी चालू असतां जो तो आपल्या जिवाच्या काळजींत होता. मादम रोलॉं हिनें असें लिहून ठेविलें आहे कीं, "या दिवसांत कोणीहि सभासद कमरेला हत्यार लाविल्या-शिवाय बाहेर पडत नाहीं. पुष्कळ सभासद खासगी जागेंत न निजतां, रात्रीं एखाद्या हॉटेलांत जाऊन निजत." रिपब्लिकच्या अमलांतील स्वातंत्र्य या दिवसांत या नमुन्याचें होतें! चौकशीचें काम चालू असतां गॅलऱ्यांतून प्रेक्षक बसत ते न्यायाधिशांना भिववीत!

राजा दोषी कीं निर्दोषी या प्रश्नाला अस्तिपक्षीं उत्तर देण्यांत आलें. नंतर या निकालावर त्याला राष्ट्राकडे अपील करतां येतें कीं नाहीं असा प्रश्न निघाला. त्यावर सरन्यायाधिशानें असें सांगितलें कीं, "या अपीलामुळें एका बाजूला पॅरिसचे लोकमत व दुसऱ्या बाजूला जनतेचें लोकमत असा लढा उत्पन्न होऊन यादवी युद्ध जुंपेल." शेवटीं ४२४ विरुद्ध २८३ इतक्या मतांनीं न्यायकोर्टाचा निकाल हाच अखेरचा समजावा, जनतेकडे अपील करूं देऊं नये, असा निर्णय झाला. ता. १६ जानेवारी रोजीं शिक्षेचा प्रश्न मताकरितां घालण्यांत आला. एकएका प्रतिनिधीने उठून वक्त्याच्या तक्तावर चढून आपला निर्णय मोठ्याने सांगावा असें ठरलें. यामुळें शेंकडों सभासदांचीं मतें एकामागून एक जाहीर होण्याला सुमारें चोवीस तास लागले.

ता. १७ रोजीं सकाळीं १० वाजतां बहुमत मोजलें तें देहांत शिक्षेला अनुकूल दिसूं लागलें. रात्रीं ८ वाजतां असें जाहीर करण्यांत आलें कीं, ३८७ लोकांनीं देहांत शिक्षा फर्माविली. आणि प्रतिकूल मतें, किंवा कांहीं अटी घालून देहांत शिक्षा द्यावी अशीं मतें ३३४ पडलीं. ता. १८ रोजीं जिरॉंडिन पक्षाने शिक्षेच्या माफीचा प्रश्न पुन्हा उपस्थित केला. तो नियमबाह्य ठरवावा अशी रोबेस्पिअर पक्षाने मागणी केली. त्याप्रमाणें "माफीची सूचना विचारांत न घेतांच आणखी तीन दिवसांनीं तुमच्यावर देहांत शिक्षा बजाविण्यांत येईल" अशी नोटीस राजाला देण्यांत आली!

**मृत्यु न म्हणे हा भूपती**

ता. २१ जानेवारी (१७९३) रोजीं ही शिक्षा अमलांत आणिली गेली. बंडखोरीला प्रवृत्त झालेल्या पॅरिसच्या जनतेला देखील राजाला जिवें मारणार या गोष्टीचें मनांतून इतकें चमत्कारिक वाटलें कीं, रात्रींच्या वेळीं पाखरें झाडांवर शब्द न करितां बसतात त्याप्रमाणें, त्या दिवशीं सर्व पॅरिसमध्यें हलक्या आवाजाने केलेल्या कुजबुजीशिवाय मनुष्याचा शब्द उमटत नव्हता! शत्रूने वेढा दिलेल्या शहरासारखी पॅरिसची स्थिति झाली होती. सकाळीं हिरव्या रंगाचा एक मोठा रथ राजवाड्यांतून आणून त्यांत राजाला बसविलें. आणि सभोंवती बंदोबस्ताकरितां सैन्याची एक तुकडी ठेवून पंधराव्या लुई राजाच्या वाड्याच्या अंगणांत सोळाव्या लुईला नेण्यांत आलें. मध्यभागीं १५ व्या लुईचा पुतळा होता. त्याच्या शेजारीं लांकडी तक्तावर राजा गंभीरपणाने चढला. त्याने तोंडावर कोणताहि विकार दिसूं दिला नाहीं. कांहीं सहृदय लोकांना असें वाटलें कीं, दैव हें मोठें आडमुठें असतें असें म्हणतात तें खरेंच आहे! फ्रान्सच्या एकंदर राजांमध्यें अत्यंत वाईट असा राजा झाला असेल तर हा १५वा लुई; त्याचा लोकांनी पुतळा उभारला! आणि त्याच्याच मागून गादीवर आलेला सोळावा लुई हा शंभर पटीनें चांगला असें असतां त्या पुतळ्या-

शेजारीं लोक याचा शिरच्छेद करणार! पण हें दैवदुर्विलसित शांत मनानें सोसणारा हा १६ वा लुई सिंहासनावर बसल्यापेक्षां वधस्तंभाच्या तक्तावर ताठ उभा राहिलेलाच अधिक शोभतो नव्हे कां!

**धीरोदात्त राजाचा निर्घृण वध**

यापुढील हकीकत राजाच्या मानेवर कुऱ्हाड घालणाऱ्या सॅम्सन नांवाच्या वतनदार मारेकऱ्याने आपल्या हाताने लिहून ठेवलेली आढळली आहे. ती अशी—"राजाच्या अंगावरचा कोट मी काढूं लागलों, तेव्हां, थांब तूं कशाला तसदी घेतोस, हा पहा मीच तो काढतों, असें म्हणून त्याने तो काढलाहि. फांशीच्या नियमाप्रमाणें एकजण त्याचे हात बांधूं लागला तेव्हां राजाने होऊन ते पुढें केले! फक्त इतकेंच म्हणाला कीं, हात बांधण्याचें काय कारण? मी मुळीच हलणार देखील नाहीं. तक्तावर उभें राहून लोकांना उद्देशून कांहीं बोलावें असें वाटून राजा दोन पावलें पुढें सरला; पण तें न खपून शिपायांनीं त्याला मागें सारलें! नंतर वधस्तंभाशीं त्याला बांधल्यावर मात्र तो मोठ्याने ओरडून म्हणाला, "सर्व लोक हो ऐका. मी अगदीं निरपराध असा मारला जात आहें. पण माझा बळी घेऊन फ्रेंच लोकांचें कल्याण होणार असेल तर त्यालाहि मी राजी आहें!" शेवटीं मारेकऱ्याचा हात किंचित् ढिला पडतोसा पाहून, शिपायांनीं बरोबर आणिलेले ढोल वाजविण्यास सुरुवात केली. मानेवर कुऱ्हाड पडतांना राजा ओरडला असला तरी त्याचें तें ओरडणें ढोलांच्या आवाजांत ऐकूं गेलें नाहीं. राजाची धर्मनिष्ठा महशूर होती. यामुळे त्याला हें मानसिक बल धर्मानेंच दिलें असें लोकांना वाटलें. राजाचें डोकें तुटून खालीं पडतांना 'फ्रेंच राष्ट्राचा जयजयकार' असें कांहीं थोडे लोक ओरडले. पण तेथें जमलेला प्रचंड लोकसमुदाय उदासीनपणाने खालीं मान घालून जमिनीकडे पाहत होता.

राजाच्या रक्ताबरोबर अनेक नागरिकांच्या अश्रूंनीहि जमीन भिजली असेल. आणि यापुढे घडलेले वृत्तांत वाचले म्हणजे तर असें वाटतें कीं,

"यावेळीं लीलाप्रिय असें दैव अदृश्य रूपाने त्या नृपांगणांत त्यावेळीं वावरत असून, वध होणाऱ्या राजाकडील आपली दृष्टि काढून राजाला मारविणाऱ्या लोकसभेंतील मारेकरीवजा सभासदांकडेच त्याने ती रोखली असावी!" यापुढे लोकसभेंत होणाऱ्या सर्व अटीतटींच्या वादविवादांच्या प्रसंगीं वधस्तंभाचें भूत हवेंत फिरत राहिलें असावें. आणि खरोखरच या दिवसापासून, नेपोलियन बोनापार्ट हा बादशाह होऊन झोटिंग बनून सर्व राजसत्ता हातीं घेऊन फ्रेंच जनतेला गुरांसारखी वळवूं लागेपर्यंत, स्वस्थतेचा किंवा शांतपणाचा असा एकहि दिवस लोकसभेला लाभला नाहीं!

अंधेरांत चालणारे लोक भीतीमुळे एकमेकांचे हात धरून चालतात, त्याप्रमाणें लोकसभेंतील राजाच्या मारेकऱ्यांना, शक्य तितकें एकमतानें वागावें, आपसांत फूट होऊं देऊं नये, अशी गरज वाटूं लागली. पण एकमत होण्याला परस्पर मिळतीं अशीं कांही निवडक मनेंच प्रथम एकत्रित व्हावीं लागतात. पण पुढे लवकरच या थोड्यांतून कोणी एखादा आपलेंच डोकें वर काढतो, आणि इतर सर्वांचीं मनें गुलाम बनवून स्वतः झोटिंग बनतो! "आपण आपल्या देशांत केलेलें हें घोर कृत्य संपादलें जावें, जगाला पटावें, याला उत्तम उपाय म्हटला म्हणजे आपण केलें तेंच चांगलें म्हणून जगाला शिकवावें" असें रिपब्लिकन फ्रान्सला वाटूं लागलें. यामुळें फ्रान्सचा पुढील इतिहास त्या वळणावर गेला. पण खरें पाहतां राजकीय अशा राज्यक्रांतीच्या मूळच्या हेतूंत रिपब्लिक, राजवध, किंवा परराष्ट्रांवरील अतिक्रमण यांपैकीं कांहीच बसत नव्हतें!

# १७ कन्व्हेन्शनची कामगिरी

**राजवधाचा भयानक पडसाद**

राजाच्या वधानंतर पर्वत-पक्षाने आपला मोर्चा सभेंतील शत्रूंकडे वळविला. आणि ज्यांनी राजाला देहांत शिक्षा देण्याला अनुकूल मत दिलें त्यांपैकींच कांहीं निवडक लोकांना देशद्रोही ठरविण्याचा बेत केला. निमित्त असें केलें कीं, यांनी जरी या शिक्षेला अनुकूल मत दिलें असलें तरी त्या शिक्षेविरुद्ध जनतेकडे अपील करण्याच्या ठरावालाहि त्यांनी अनुकूल मत दिलें! इतकी पुढे मजल गेल्यावर, मुळांतच त्या शिक्षेला ज्यांनी प्रतिकूल मत दिलें ते लोक शत्रु ठरावे हें काय सांगायला पाहिजे? म्हणून अशा लोकांना राज्यघटनासमिति व देशसंरक्षक मंडळ यांतून खड्यासारखे निवडून काढून टाकण्याचा प्रयत्न पर्वत-पक्षाच्या पुढाऱ्यांनीं आरंभिला. युरोपांत या वधाचा प्रतिध्वनि भयप्रद रीतीने उमटला. अनेक देशांतून राजवधाचा तीव्र निषेध करण्यांत आला. फ्रेंच सैन्य बेल्जियममधून अँटवर्पच्या बंदराकडे येत आहे असें पाहून इंग्लंड तर कावरेंबावरेंच झालें. डँटन याने असें जाहीर केलें कीं, फ्रान्सची स्वाभाविक सरहद्द आज दिसते ती खरी नसून, पश्चिमेस महासागर, पूर्वेस ऱ्हाइन नदी व दक्षिणेस आल्प्स पर्वत येथवर ती विस्तृत आहे. याचा अर्थ असा कीं, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया, इटाली, स्पेन, पोर्च्युगाल आणि बेल्जियम व हॉलंड या देशांवर अतिक्रमण करण्याचा फ्रान्सला हक्क आहे! त्याप्रमाणें सेनापति डु मोरीज याला हॉलंड-

वर स्वारी करण्याचा हुकूमहि झाला. हें पाहतांच युरोपियन राष्ट्रांनी सहविचार व संघटना सुरू केली. त्यांनी इंग्लंडला अँट्पर्व बंदर देऊं केलें. कारण इंग्लंडवर स्वारी करण्याला तें एक मोठें नाकें होतें. उलट इंग्लंडने सैन्य वाढविण्याकरितां इतर राष्ट्रांना पैशाची मदत देण्याचें कबूल केलें. निरनिराळ्या युरोपियन राष्ट्रांच्या मनांत या घोर राजवधाबद्दल फ्रान्सला अद्दल घडविण्याच्या सात्त्विक भावनेपासून फ्रान्सचे तुकडे करून तें घशांत घालण्याच्या स्वार्थी तामस वृत्तीपर्यंत अनेक निरनिराळे हेतु होते.

**सत्तेची लालसा**

इकडे नेमस्त व अर्धजहाल पक्षांत चलबिचल होऊन, त्यांतली एक एक जागा पर्वत-पक्ष आपल्या पायाखालीं घालूं लागला. डँटन याने दोन्ही पक्षांची तोंडमिळवणी करण्याचा प्रयत्न केला. कारण सैन्य वाढविणें, युद्धाकरितां दारूगोळा व तोफा तयार करणें, व खर्चाकरितां पैका जमविणें या गोष्टी लोकसभेंत एकमत असल्याशिवाय होणार नाहींत हें त्याला माहीत होतें. उलट रोबेस्पिअर प्रभृतींचा प्रयत्न एक चौकशी कमिटी नेमून सभेंतील बेइमान वाटणाऱ्या लोकांना शिक्षा करून सूड कसा घेतां येईल याविषयीं चालू होता.

डू मोरीज याचा एका लढाईत पराभव झाला त्याचें निमित्त करून रोबेस्पिअरप्रभृति लोकांनी जिरॉंडिन पक्ष व त्याचा हा पुढारी हे दगलबाज ठरले अशी हूल उठविली. जिरॉंडिन पक्षाचें धोरण असें होतें कीं, फ्रेंच सैन्यें युरोपांत चाळवावीं, लष्करी जयविजय मिळवावे, आणि त्या लौकिकानें फ्रेंच जनतेचे डोळे दिपवून 'डिफेन्स कमिटी' आपल्या हातीं ठेवावी. उलट पर्वत-पक्षाचें धोरण असें होतें कीं, युरोपांत लढाया मारण्यापेक्षां स्वदेशांतील शत्रूच आधीं ठेचून काढून, स्वतंत्रतेचा पाय मोकळा करण्याकरितां पब्लिक सेफ्टी कमिटी व तिच्या लगामीं असलेली चौकशी कमिटी या आपल्या हातीं ठेवाव्या.

**प्रतिक्रांतीची लाट**

रेव्होल्यूशनरी ट्रायब्यूनल ( क्रांतिकारक न्यायमंडळ ) नांवाची चौकशी कमिटी स्थापण्यांत आली तिचें स्वरूप भीतिनिवारक असण्यापेक्षां भीतिकारकच अधिक होतें. मार्च २० रोजीं सेनापति ड्यू मोरीज याचा पराभव झाला. हें अपयश घेऊन तो परत येतांच जिरॉंडिन लोकांच्या पाडावाची घटका भरली. त्यांतच फ्रान्सच्या पश्चिम विभागांत बंड झालें. हें बंड म्हणजे क्रांतिकारक पक्षाविरुद्ध बंड. दोहों अंगच्या युद्धाकरिता तीन लाख स्वयंसेवक सैन्यांत दाखल करून घेण्याचें लोकसभेने ठरविलें. पण ही गोष्ट लोकांना आवडली नाही. ला व्हेंडी, ला मँक, नॉर्मंडी इत्यादि परगणे मागसलेले होते. क्रांतिकारक भावनेची लाट अद्यापि त्यांच्यापर्यंत जाऊन पोचली नव्हती. त्यांत मुख्यतः अडाणी व आडमुठ्या शेतकऱ्यांची वस्ती असून मध्यम धनिक वर्ग असा मुळीच नव्हता. एखादा जमीनदार थोडासा संपन्न असला तरी तो एखाद्या शेतकऱ्यासारखाच राही. अशा लोकांवर धर्मश्रद्धेचा पगडा अधिक असावयाचाच. यामुळे नव्या राज्यघटनेने निर्बळ व निर्धन केलेले धर्माधिकारी असंतुष्ट होऊन, त्यांनी या तीन प्रांतांतील लोकांवरील आपल्या वजनाचा पुरा फायदा घेतला आणि पॅरिसमधील क्रांतिकारकांविरुद्ध संघटनेने लोकमत तयार केलें.

**ड्यू मोरीजची बेइमानी**

लष्करभरतीच्या वेळीं कांहीं स्वयंसैनिक आपखुषीने येतात पण कांहींवर सक्ती होते हें प्रसिद्धच आहे. यामुळे हें नवें सैन्य गोळा करण्याला लष्करी सुभेदार या प्रांतांत आले तेव्हां कटकटी, मारामारी झाल्या. पण पॅरिसच्या पुढाऱ्यांना हा विरोध झाला तो राजाच्या प्रेमामुळे नव्हे तर त्या लोकांच्या स्वतःच्या स्वातंत्र्याच्या प्रेमामुळे! लवकरच या गांवढळ पण शूर लोकांनी आसपासचे नॅशनल गार्ड पिटाळून लावून, स्वतःचीं अशीं तीन सैन्यें निर्माण केलीं. फ्रान्सच्या दक्षिणेलाहि असेच असंतोषाचे वारे वाहत होते. ड्यू मोरीज याने प्रतिपक्षाशीं तहाचें

बोलणें सुरू केलें. लढाई थोपवून धरून इकडे पॅरिसमध्ये प्रतिपक्षावर चढाई करावी हा त्याचा हेतु लक्षांत येतांच पर्वत-पक्षाने जिरॉंडिन पक्षाला दहशत बसविण्याकरितां कायद्यामागून कायदे केले. पब्लिक सेफ्टी कमिटीवर जिरॉं-डिन पक्षाचा एकहि सभासद निवडला गेला नाहीं. आणि या कमिटीच्या हातीं तर चौकशीशिवाय देहांत शिक्षा देण्याचा अधिकार! हें पाहून डू मोरीज युद्धभूमीकडे परत गेला पण बेइमान होऊन आत्मरक्षणाकरितां खुद्द शत्रूच्याच गोटांत गेला. या त्याच्या लाजिरवाण्या कृत्याचा निषेध करण्या-शिवाय खुद्द जिरॉंडिन पक्षालाहि गत्यंतर नव्हतें.

**रुधिरप्रिय जनतेचा साम्यवाद**

लोकसभेंत पर्वत पक्षाला जें बळ केव्हां कमी पडे तें बाहेरची रुधिर-प्रिय जनता भरून काढी. तिने आजच्या 'कम्यू-निझम'चीं तत्त्वें पसरविण्याला तेव्हांच सुरुवात केली होती. खाजगी मिळकत ठेवणें हा गुन्हा आहे. जमीन, पाणी व वातावरण यांनी उत्पन्न केलेले पदार्थ प्रत्येकाच्या सारख्या मालकीचे असले पाहिजेत अशी शिकवण सुरूं केली. पण या तोंडच्या शिकवणीवर जनता गप्प बसली नव्हती. लोकसभेंत तोंडी वादविवाद चालू असे, पण जनता हातांत हत्यार घेऊन तें शत्रूवर चालवी किंवा निदान तें उगारून लोकसभेला धाकांत ठेवी. साप व पक्षी यांची नजरानजर होतांच साप तोंड उघडतो व पक्षी पंख मिटून हळू हळू सापाच्या तोंडाकडे चालत जातो, असें म्हणतात. त्याप्रमाणे जनता व लोकसभा यांची गति होऊं लागली.

**लोकसभेंत धरपकड**

ता. ३० मे १७९३ रोजीं पॅरिसच्या जनतेने बंड केलें. तिचा पहिला हल्ला जिरॉंडिन्सवर झाला. ट्यूलिअर्सच्या वाड्यांत जुन्या नाटकगृहांत यावेळीं लोकसभा भरत असे. तिजमध्यें गुंडांनीं प्रवेश केला. सशस्त्र लोकांनी सगळ्या वाटा अड-विल्या. जिरॉंडिन सभासदांना कैद करण्यांत आलें. आपल्या अधिकाराचें

अतिक्रमण होत आहे अशी तक्रार लोकसभेनें केली. पण आपण दुसऱ्याचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें म्हणजे आपलें स्वातंत्र्यहि जाण्याची पाळी लवकरच येते! जिरॉंडिन पक्षाचे बावीस सभासद नांवनिशीने पकडून जनतेच्या स्वाधीन करण्यांत आले. आणि मगच सशस्त्र जनता बडबड्या लोकसभे-विषयीं तुच्छता प्रदर्शित करून निघून गेली.

**डँटनचा पराभव**

१७९३ च्या मे पासून ऑक्टोबर पर्यंत पश्चिम व दक्षिण फ्रान्स-मधील बंडाचा बहुतेक मोड झाला. पण बाहेरील संकट कमी होतांच, पर्वत–पक्षांतील मुख्य पुढाऱ्यांत सत्तेविषयीं पुन्हा स्पर्धा सुरू झाली. डँटन व रोबेस्पिअर या दोघांत अतिशय चुरशीची कुस्ती होऊन डँटनचा पराभव झाला. पब्लिक सेफ्टी कमिटींतून त्याचें नांव काढून टाकण्यांत आलें. आणि जो स्वतः संरक्षण समितींत नाहीं त्याला बाहेर संरक्षण मिळण्याची आशा कुठली? या क्षणाला तरी रोबेस्पिअर हा पर्वत–पक्षाचा खरा पुढारी ठरला.

**सर्वाधिकारी रोबेस्पिअर**

१७९३ च्या उन्हाळ्यांत ऑस्ट्रियन सैन्याला पॅरिस सर करून घेण्या-करितां चालून येतां येण्यासारखें होतें. परंतु पोलंड देशाच्या वांटणीच्या कारस्थानांत ऑस्ट्रियाची व प्रशियाची स्पर्धा सुरू झाल्यामुळे ही स्वारी झाली नाहीं. म्हणून स्वस्थतेचा कांहीं काळ लाभला. रोबेस्पिअर वगैरे लोकांनी या संरक्षण कमिटीची अंतर्व्यवस्था ठीक केली. पळपुट्या फ्रेंच उमरावांनी आस्ट्रियन मुत्सद्द्यांमागे लढाई चालू ठेव-ण्याचा तगादा सुरू केला होता. पण त्यांना उलट असें सांगण्यांत आलें कीं, "हें युद्धाचें काम आम्ही केवळ आमच्याच सोयीप्रमाणें करूं." क्रांति-कारक पक्षानें पब्लिक सेफ्टी कमिटीच्या घटनेबरोबर सैन्याचीहि घटना चाल-विली. सर्व तंत्रें कमिटीच्या स्वाधीन झालीं. सेनापति नेमणें, काढून टाकणें, परराष्ट्रीय धोरण ठरविणें, मुलकी अधिकारी नेमणें, सर्व गोष्टी कमिटी करूं

लागली. तिनें गुप्तपोलिसांची संख्या वाढविली. टपालखातें ताब्यांत घेतले. आणि ती लोकसभेच्या सभासदांचीं खाजगी पत्रेंहि पकडून उघडूं लागली. कमिटीची मुख्य कचेरी राजवाड्याच्या दिवाणखान्यांत भरूं लागली. वाड्याच्या आजूबाजूला तोफा उभारण्यांत आल्या. रोब्रेस्पिअर हा सर्वाधिकारी झाला. सेंट जस्ट याजकडे पोलिस अधिकार दिले. कोथॉन हा गृहमंत्री झाला. सेंट आंद्रि याजकडे आरमार सोपविलें. कार्नो हा युद्धमंत्री झाला. अशा रीतीने दहा पुढाऱ्यांत सर्व खातीं वाटलीं गेलीं. हे सर्व लोक मोठे उद्योगी व उत्साही होते. ते रात्रंदिवस काम करीत. विश्रांति अशी फार थोडी घेत. त्यांच्या राक्षसी कृत्यांची ही चांगली बाजू इतिहासकारांनीहि मान्य केली आहे. या अविश्रांत कारभाराने बनविलेलें राज्ययंत्रच पुढे नेपोलियनला उपयोगी पडलें.

**राज्यक्रांतीचें चौफेर जाळें**

राष्ट्राचा प्रतिनिधि कन्व्हेन्शन, कन्व्हेन्शनचा प्रतिनिधि कमिटी, आणि कमिटीचा प्रतिनिधि हें दहा लोकांचें मन्त्रिमंडळ अशी रचना झाली. या दहांनी करावें तें राष्ट्राचें म्हणावें व ठरावेंहि. यामुळे हुकुमामागे हुकूम सुटूं लागले. तोंडांतून शब्द निघाला व कागदावर तो लिहिला गेला कीं तोच पक्का हुकूम! एकएका बैठकींत सर्व राष्ट्राला लागू होणारे असे दहावीसहि हुकूम निघत. त्यांची फेरतपासणी नव्हती. या मंत्रिमंडळाकडून विशेष प्रकारच्या अंमलबजावणीकरितां बाहेर परगण्यांतून जे कारभारी पाठविण्यांत येत, त्यांना कोणासहि देहांत शिक्षा देण्यापर्यंत सर्व अधिकार दिले जात! जुन्या राजवटींतील सगळी घाण धुऊन निघावयाची तर ती फक्त रक्ताच्या सड्यानें व सारवणाने निघेल, अशा समजुतीने कामाचा सर्व उरक साधण्यांत येत होता. हें 'दशमंत्रिमंडळ' म्हणजे एक प्रकारची गुप्त समिति असून, तिच्या नमुन्यावरहुकूम देशभर असेच क्लब किंवा छोट्या लोकसभा व मंत्रिमंडळें बनलीं गेलीं. स्थानिक

अधिकाऱ्यांच्याहि निवडणुकी नेमणूका या क्लबांच्या हातीं गेल्या. अशा रीतीनें राज्यक्रांतीचें जाळें देशभर विणण्यांत आलें. झटपट रंगारी पद्धतीनें रंगविलेल्या या राज्ययंत्राचें काम सुसूत्र कसें चालत असेल, याचें आश्चर्य वाटण्यासारखें आहे. पहिल्या दमांत तें सुसूत्र चाललें खरें. पण ह्याचें आयुष्य लांबलें याहून अधिक लांबतें तर हें यंत्र कोलमडून पडलें असतें, निकामी झालें असतें, यांतहि शंका नाहीं. आतषबाजीच्या दारूकामांत सोडलेला बाण शेदोनशें पावले जोराने जातो, किंवा ठिणगी तोंडाला लागतांच 'चिचुंद्री' गमतीदार नाच करते; पण थोड्याच वेळांत या दोघांची काय स्थिति होते हें माहितच आहे. तीच गत या दशमंत्रिमंडळाची होणार होती.

**कार्नोचें लष्करी संघटन**

पहिल्या दमांत दोन लाख सैन्य उभारलें गेलें आणि विशेष लष्करी शिक्षण नसतांहि यांतील कांहीं शिपाई पुढें नामांकित सेनापती बनले, ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. कारण राष्ट्रीय गीत हा लष्करी शिक्षणाचा एकच खरा मंत्र आजवर कोणत्याहि देशांत ठरलेला आहे. मानवी समाज हा हिऱ्याच्या खाणीसारखा आहे. त्यांतले दगड गोळा केले तर त्यांत कांहीं हिरे निघावयाचेच. चौदा लक्ष सैन्य आपण उभारू अशी मंत्रिमंडळाने बढाईखोर उमेद धरली खरी. पण जवळ जवळ सात लक्ष सैन्य तरी फ्रान्सला पुढे पायावर खडें करतां आलें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं ! या सर्वांचें श्रेय लाझार कार्नो याला देतात. रणांगणावर जशी नेपोलियनची बुद्धि चाले, तशी लष्कराच्या संघटनेंत कार्नो याची चाले. अडचण काय ती पैशाचीच. याकरितां पळपुट्या उमरावांच्या इस्टेटी जप्त करून विकून पैसा मिळविण्याला सुरुवात झाली. तसेंच शेंकडों हजारों श्रीमंत लोकांवर हुंड्या लिहिण्यांत आल्या. त्या न पटविल्या तर आपली काय गत होईल हें लोकांना आतां कळून चुकल्यामुळें, ते त्या हुंड्या बिनतक्रार स्वीकारीत व पटवीत. कपडे सैन्याला कमी पडले तर, गांवोगांव

लोक पाठवून दर माणशीं दोन सदरे किंवा शर्ट यांची खंडणी नागरिकांकडून वसूल केली जाई. तीच गोष्ट बुटांची. सगळ्या राष्ट्रांतील लोकांनीं खाण्याकरितां पाळलेल्या डुकरांपैकीं आठवा हिस्सा या नव्या सैन्याकरितां दिला पाहिजे असाहि हुकूम सुटला. पण त्याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, जहाल नसलेल्या अशाहि कांहीं देशभक्तांना परचक्राच्या भीतीमुळें व फ्रान्सचें नांव मोठें करण्याच्या इच्छेमुळें आपले गुण व आपली विद्या या कामीं खर्चण्याची प्रेरणा होत होती. लढण्याकरितां तरुण पुढे आले, त्याबरोबर आपल्या लष्करी ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा देण्याकरितां प्रौढ व वृद्धहि पुढे आले. तोफा ओतणें, दारू कर ा, उपयुक्त रसायनें बनविणें, औषधें बनविणें, लष्करी विमानें बनविणें, तारायंत्रें तयार करणें, या गोष्टींची मदत शास्त्रज्ञान असणाऱ्या विद्वान् लोकांनीं केली. यामुळें १७९३ च्या अखेरीस युरोपियन राष्ट्रांत कांहींसें एकमत होऊन त्यांची स्वारी फ्रान्सवर होण्याच्या सुमारास, फ्रान्सचीहि युद्धाला तोंड देण्याची बहुतेक तयारी झाली. पण हा सामना होण्यापूर्वीं घरच्याघरीं रक्ताचा एक अमंगळ अभिषेक व्हावयाचा होता, त्याची हकीकत इतिहासकारांनीं फ्रान्सच्या त्या वेळच्या मनःस्थितीची नमुनेदार म्हणून मानिली आहे.



# १८ क्रांतिभारतांतील हत्याकांड

**स्वातंत्र्य कीं बेबंदशाही**

१७९३ च्या हिंवाळ्यांत फ्रेंच सैन्याचे मधून मधून पराभव झाले. आणि प्रत्येक पराभवाबरोबर पर्वत पक्षांतील गणंग जहाल पुढारी रक्तपाताची हौस पुरवून घेत होते. या अघोरी हौसेबद्दल पुष्कळांनीं मोठें आश्चर्य प्रकट केलें आहे. तें काय क्रांतीचें भूत, किंवा केवळ मानवी दुष्टपणाचा कळस किंवा इतर आणखी कांहीं होतें याचा इतिहासलेखकांना चांगलासा उमज पडत नाहीं. रोबेस्पिअरने एक सिद्धांत असा लिहून ठेविला आहे कीं, "शांततेच्या काळीं सद्गुणांतून स्वातंत्र्याचे व स्वराज्याचे अंकुर फुटतात. पण क्रांतीच्या काळीं मात्र सद्गुणांच्या जोडीला प्राणाची भीति उत्पन्न झाली तरच अंकुर फुटतात. पण एरवी फुटत नाहीत." कसेंहि असो रानटी समाजाच्या काळाप्रमाणें या वेळीं फ्रान्सची स्थिति झाली होती. जो भेटेल तो शत्रु. आणि तो जर आपला जीव घेणार तर आपणच त्याचा जीव आधी कां घेऊं नये! प्रत्येक जोडींतील प्रतिपक्षाने आपणाला स्वातंत्र्याचा मित्र आणि दुसऱ्याला स्वातंत्र्याचा शत्रु असें मानून एकदम हात उगारावा असें होई. संशयाला निमित्तें शंभर मिळतात. कोणी शत्रूला मिळण्याचा कट केला आहे! कोणी अजून थोडासा राजपक्षपाती उरला आहे! कोणी रिपब्लिक यशस्वी करण्याच्या धोरणाला

आड येतो ! कोणाला रिपब्लिकची घटना मान्य नाहीं ! कोणी स्वातंत्र्याचा भोक्ता नाहीं ! असे आरोप करीत गेल्यास त्याला अंत कोठून येणार !

**क्रांतिकुंडांतील बळी**

त्या वेळच्या एका पत्रांतील खालील उतारा एका इतिहाससंशोधकाला मिळालेला छापलेला आहे. तो लिहितो— "परवा मी असा गोड देखावा पाहिला कीं, तो तूं पाहिला असतास तर आनंदानें नाचूं लागला असतास ! दोनशेनऊ देशद्रोही लोकांना देशद्रोहाबद्दल एकदम देहान्त शिक्षा करण्यांत आली." देशाचें किंवा स्वातंत्र्याचें नांव घेऊन मग काय वाटेल तें दुष्कृत्य करावें, असा तो काळ येऊन गेला खरा. शिरच्छेदाची नेहमीचीं साधनें अपुरीं पडूं लागलीं म्हणून 'गिलोटीन' नांवाचें डोकीं तोडण्याचें यंत्र तयार करण्यांत आलें. चौकशी कमिटी ( ता. १० मार्च रोजीं नेमलेली ) आणि हें शिरच्छेदाचें यंत्र यांचें भयंकर कार्य सतत चौदा महिने सुरूं होतें ! चौकशी कमिटीनें शिक्षा दिलेल्या लोकांची संख्या खालीलप्रमाणें कोणी हिशोब करून मोजली आहे. प्रथम दर दोन दिवशीं एक. १७९३ च्या नोव्हेंबरपासून १७९४ मार्चपर्यंत दरमहिन्यास सरासरी ६५. पहिल्या बावीस दिवसांत ३८१ व पुढील ४७ दिवसांत १३६६. पॅरिसमधील सॅम्सन नांवाच्या एकट्या मारेकऱ्याने आपल्या हाताने दोन हजार सहाशे पंचवीस लोकांची कत्तल केली !

**दुर्दैवी राणी मेरी**

ता. १ ऑगस्ट रोजीं राणी मेरी इची चिट्ठी निघाली. त्या दिवशीं तिला कपडेहि बदलूं दिले नाहींत. चौकशी कमिटीच्या शेजारच्या एका अंधाऱ्या खोलींत तिला ठेवण्यांत आलें होतें. ता. १४ ऑक्टोबर रोजीं तिच्या चौकशीचा फार्स करण्यांत आला. तिच्यावर कांहीं आरोप इतके घाणेरडे करण्यांत आले कीं, "तुला या बदनामीबद्दल कोर्टांतून घालवून देईन" असें फिर्यादीला न्यायाधिशाने सांगण्याची पाळी आली. आणि खरोखरच त्या आरोपाचे शब्द कोणाच्याहि

हातून लिहवणार नाहींत. शेवटीं आपल्या नवऱ्याप्रमाणेंच तीहि अगदीं शांत चित्ताने मरणाला सिद्ध झाली.

**जिरॉंडिनांची पाळी**

राणीनंतर जिरॉंडिन पक्षाची पाळी आली. त्यांनी आपला बचाव कायदेशीर रितीने करण्याचा कसून प्रयत्न केला. त्यांतील कांहीं वकीलच होते. पण त्यांना तक्रारी सांगण्याला पुरेइतका वेळहि देण्यांत आला नाहीं. कित्येकांनीं गुप्तपणें हत्यारें मिळवून आत्महत्याहि केली. या पक्षाचे २१ लोक मारले. मौज ही कीं, मरतांना तेहि "स्वातंत्र्याचा जयजयकार" "रिपब्लिकचा जयजयकार" हेच शब्द उच्चारीत होते.

**मादाम रोलॉं**

ता. १ जुलै १७९३ रोजीं मादम रोलॉं इचें टिकेट निघालें. जूनपासून ती कैदेंतच होती. ही एक प्रसिद्ध राजकारणी बाई होऊन गेली. तिनें तुरुंगवासांत लिहिलेल्या आठवणी मोठ्या मनोरंजक आहेत. ता. ८ नोव्हेंबर रोजीं तिनें कोर्टापुढें आपली कैफियत मोठ्या वक्तृत्वपूर्ण रीतीने मांडली. पण "तूं खरोखर आपला बचाव करीत नसून गुन्ह्याची तारीफच करीत आहेस" असें म्हणून कोर्टानें तिचें बोलणें थांबविलें. तिच्या मृत्यूनंतर कांहीं दिवसांनी तिच्या नवऱ्याने क्रांतिकारकांना शाप देत देत आत्महत्या केली. हीं नवराबायको रिपब्लिकच्या नांवाने अत्याचारांची तळीं उचलणाऱ्या पुढाऱ्यांपैकींच होतीं! अशा रीतीने मारल्या गेलेल्या नुसत्या प्रमुख व प्रसिद्ध लोकांचीच यादी केली तरी ती कंटाळवाणी होईल. प्रतिपक्षियांचे मरण पाहून आज ज्याने टाळी वाजवावी त्याच्याच मरणाची पाळी उद्यां यावी, असा क्रम सुरू होता. ड्यूक ऑफ कॉर्लिन्स नांवाचा राजघराण्यांतील एक कलिपुरुष होता, त्याने राजा व राणी यांना मारविण्याच्या कामीं चिथावणी दिली होती. थोड्याच दिवसांत स्वतः त्याची पाळी आली. अमीर उमरावच काय पण मठांतल्या जोगिणी, बाजारांतील

कसबिणी अशा किरकोळ लोकांनाहि क्षुल्लक संशयावरून ठार मारण्यांत आलें. आज तुरुंग नव्या लोकांनीं भरले जावे, उद्यां ते मोकळे होऊन त्यांत नव्या लोकांची भरती व्हावी, असें सुरू होतें.

**क्रांतिकुंड धडाडून पेटलें**

जी गोष्ट पॅरिसमध्यें, तीच बाहेरहि फिरत्या चौकशी कमिट्यांकडून घडत होती. या फिरत्या चौकशी कमिट्यांना कॉमिसॅरीज असें म्हणत. या चौकशीखेरीज लष्करभरती करणें, स्थानिक अधिकारी नेमणें किंवा दूर करणें, धान्य व रोटया यांची व्यवस्था करणें हीं कामेंहि त्या करीत या कमिट्यांच्या हुकमावरून जिगदेत या ठिकाणीं खाणींत १८०० लोकांना गोळ्या घालून मारण्यांत आलें. एके ठिकाणीं १८०० लोकांना नदींत बुडविण्यांत आलें. मोठमोठ्या नावांतून हे लोक घालून त्या नदींत न्याव्या आणि त्या नावांना एकदम जलसमाधि द्यावी ! रक्तपातानें वेडावलेल्या लोकांनी रक्तांत बोटें भिजवून तीं चाटलींहि ! ज्या परगण्यांतून राज्यक्रांतीविरुद्ध बंडें झालीं त्या सर्वांमध्यें रक्तपाताने दहशत बसवण्याचा प्रयत्न झाला. फिरत्या न्यायकोर्टांतील कांहीं न्यायाधिशांवर लांच खाण्याचा आरोप आला. तेव्हां न्यायाचा न्याय होऊन त्यांनाहि मारण्यांत आलें. अशा रितीने निरनिराळ्या परगण्यांतून मारलेल्या लोकांची संख्या हजारोंनी मोजावी लागेल. पॅरिसमधून चिथावणीचीं पत्रें जाऊन सर्व देशभर एकच सूर राहील अशी योजना करण्यांत आली होती.

कन्व्हेन्शनमध्ये बसणाऱ्या सभासदांनाहि आपली धडगत वाटत नव्हती. रोज कोणत्या तरी एका नव्या पक्षावर दोषारोप करण्याचें काम रोबेस्पिअर प्रभृतींचें चालूच होतें. कित्येकांना आपल्या गतकर्मांचा पश्चात्ताप होऊं लागला. स्वतःवर पाळी आली म्हणजे आपण लोकांना कसें वागविलें याची आठवण होतेच ! कधीं पूर्वी न केलेली गोष्ट, म्हणजे दुसऱ्याकरितां दयेची शिफारस करण्याची गोष्ट, आता कित्येकांना सुचूं लागली. हेतु हा कीं, आपल्या

जीवावर जेव्हां बेतेल, तेव्हां दुसऱ्या कोणाला आपगासाठी दयेची शिफारस करण्याची बुद्धि व्हावी.

**नवीनांचा अजीर्ण-मतवाद**

ह्या सुमारास ( ३० सप्टेंबर १७९३ ) सोशालिझमचीं तत्त्वें फ्रान्स-मध्ये प्रथम पुढे आली. आजपर्यंत समता म्हणजे "फक्त श्रीमंतांचा नाश" इतकाच अर्थ होता. पण आता "कोणत्याहि भांडवलवाल्याचा नाश" असा त्याचा अर्थ होवूं लागला. व्यापारी लोकांनी दहशत खाल्ली. शेती चांगली व अधिक मेहनतीने करून त्यांत चार पैसे मिळविणाऱ्यांनी पोटाच्या गरजेपेक्षा अधिक प्रमाणावर शेतकी करण्याचें टाकून दिलें. खाजगी कारखाने बंद पडले तर सरकाराने त्यांचा ताबा घ्यावा आणि उपाशी मरणाऱ्या मजुरांना कामाला लावावें. कारण "केवळ सोन्याने कारखाने चालत नाहीत तर मनुष्यबळाने" असें कांही लोक म्हणूं लागले. श्रीमंती नाही व दारिद्र्यहि नाही अशी स्थिति हीच खरी समता, अशी व्याख्या ऐकूं येऊं लागली. मात्र पुढे स्वतःच लक्षाधीश किंवा कोट्यधीश झालेल्या लोकांनी या नव्या चळवळींत पुढाकार घेतला होता!

**परत एक पाऊल मागें!**

रोबेस्पिअर वगैरे जहालाग्रणी या मताचे नव्हते. त्यांना समतेची ही व्याख्या पसंत नव्हती. या चळवळीबरोबर ख्रिस्ती धर्म नष्ट करण्याचीहि एक चळवळ सुरू झाली. जगांत तर्कवाद किंवा विवेक आणि स्वातंत्र्य यावेगळा दुसरा धर्म नाहीं, हें तत्त्व प्रतिपादण्यांत येऊं लागलें. त्याप्रमाणें कांहीं ठिकाणीं देवळांतील मोठमोठ्या घंटा ठेवण्यांत आल्या, व पुढे त्या वितळवून त्यांचीं नाणीं पाडावीं अशी सूचना आली. आणि या घंटा ज्या मनोऱ्यांतून टांगून ठेवीत ते मनोरे, इतर इमारतींहून उंच असल्यामुळें, समतेच्या तत्त्वाविरुद्ध गुन्हा करितात म्हणून ते मनोरेहि कांही ठिकाणीं पाडून टाकण्यांत आले! जुना धर्म व सनातनी धर्म यांची थट्टा करणारी नाटकें, प्रहसनें, रंगभूमीवर येऊं लागलीं.

कन्व्हेन्शनने सरळ स्पष्ट ठराव करून धर्माला मूठमाती दिली नाही. पण असें एक पंचांग कुशलतेने तयार करण्यांत आलें कीं, रविवार, साधुपूजेचे दिवस, व धार्मिक सण भलत्या दिवशीं पडून वगळले जावे. महिन्यांचीं नांवें बदलण्यांत येऊन, प्रत्यक्ष सृष्टींत जे अनुभव येतात तद्दर्शक सार्थ अशीं नवीं नांवें ठेवण्यांत आली, तारखांचा मेळ बदलला आणि ऋतुमानाशीं संबंध जोडून दिला. उदाहरणार्थ 'एप्रिल' हें नांव बदलून 'जर्मिनल' म्हणजे कळ्यांचा महिना, 'मे' हें नांव बदलून 'फ्लोरिअल' म्हणजे फुलांचा महिना, 'सप्टेंबर' हें नांव बदलून 'फ्रुकटीडॉर' म्हणजे फळांचा महिना अशीं नांवें ठेवण्यांत आलीं. सणांचें धार्मिक स्वरूप काढून टाकून, त्यांना केवळ सामाजिक स्वरूप दिलें. मोठमोठे बाहुल्यांचे खेळ तयार करून, पाद्री भटांची व धर्माधिकाऱ्यांची हकालपट्टी करून त्यांच्या जागीं देवळांतून या बाहुल्यांचा नांच करण्यांत येऊं लागला. मृत्यूपलीकडे कांहीं नाहीं, मृत्यु ही अभंग निद्रा आहे, असा उपदेश करून स्वर्ग व नरक यांच्या सनातनी कल्पना नष्ट करण्याचा प्रयत्न सुरूं झाला. धर्ममंदिरांवर 'सत्याची मंदिरें' अशा पाट्या लागल्या. मंदिरांतील ख्रिस्ताची आई मेरी, व चमत्कार करून दाखविणारे साधुसंत, यांच्या मूर्ति फेकून दिल्या. आणि धर्मोपासनेला लागणारीं सोन्यारुप्यांची भांडीं पळवून नेलीं. क्रूसांची चिन्हें व बिशपआर्चबिशप यांचीं किरीटकुंडलें पायाखालीं तुडविलीं. कांही लोक बाप्तिस्मा काढून टाकण्याचा काल्पनिक विधि करूं लागले. कांहींचा त्यांच्या जपाच्या माळेपासून घटस्फोट झाल्याचा हास्यास्पद विधि करण्यांत आला.

•

कन्व्हेन्शनला हे प्रकार पसंत नव्हते. ते केवळ खाजगी प्रयत्नाने सुरूं होते. सर्व गोष्टींना रोबेस्पिअरने लोकसभेंत कसून विरोध केला. पण फाउचे, शॉमट वगैरे पुढारी यांनी कम्यूनकडून धर्म बुडविण्याचा परवाना घेतला. ता. २० ब्रुमेअर (नोव्हेंबर) रोजीं या धर्मोच्छेदकांनी एक मोठा जाहीर उत्सव

केला. त्या दिवशीं सुप्रसिद्ध नॉतरदामच्या धर्ममंदिराचें नांव "तर्कबुद्धीचें मंदिर" असें ठेवण्यांत आलें. या तर्कबुद्धीची प्रतिमा करून तिला तिरंगी वेष देऊन स्वतंत्रता देवीच्या हातून या प्रतिमेला सिंहासनावर बसविण्यांत आलें. स्वैराचार मातले. लिऑन्स येथें एका पवित्र मानलेल्या धर्ममंदिरांतील भांड्यांतून एका गाढवाला दारू पाजण्यांत आली! डँटन व रोबेस्पिअर या दोघांनी याविरुद्ध तक्रार केली. कन्व्हेन्शन व कम्यून यांच्यांत झगडा सुरू झाला. देशभर हा उच्छेद करणाऱ्या कॉमिसरीज यांना परत पॅरिसला बोलवावें, असें कमिटीने ठरविलें. ता. १३ फ्रिमेअर (डिसेंबर) रोजीं डँटनच्या प्रयत्नाने कन्व्हेन्शनने नास्तिकपणाचा जाहीरनामा रद्द करून, त्याच्या जागीं फक्त धर्मस्वातंत्र्य दिलें. या ठरावाचा फायदा मुख्यतः कॅथॉलिक पंथाच्या लोकांना मिळाला.

**चौकशीचा फार्स**

या धार्मिक बाबतींत डँटन व रोबेस्पिअर यांची जी जोड जमली होती ती युद्धविषयक धोरणावर लवकरच फुटली. रोबेस्पिअर याने डँटनच्या अनुयायांना हळू हळू मार्गांतून काढून टाकलें. भरसभेंत हे दोघे एकमेकांना फाडून खाणार कीं काय असें वाटण्यासारखीं त्यांचीं वाग्युद्धें सुरू झालीं. डँटन दिवसेंदिवस थकत चालला. त्यांचें डोकें फिरलें कीं काय असा संशय येऊं लागला. राजसिंहासन उलथून पाडून, एकवटलेल्या युरोपला तोंड देण्याची ईर्षा धरणाराची ही अधःपाताची स्थिति पाहून लोकांना वाईट वाटलें. ता. ३० मार्च १७९४ रोजीं डँटनवर सभेंत दोषारोप करण्यांत आला. आणि तो व त्याचे उरलेले अनुयायी यांना कैद करण्यांत आलें. या लोकांना पकडून आम्ही दुसरें तिसरें कांहीं करीत नाहीं, तर राजपक्षपाती लोकांची छपून राहिलेली शेवटची टोळी पकडीत आहों, असा रोबेस्पिअरप्रभृतीनी कांगावा केला! ता. २ एप्रील रोजीं या सर्व लोकांना चौकशी कमिटीपुढे उभे कर-

ण्यांत आलें. तेव्हां भवितव्यतेने डँटनला त्याच्या कर्मांची ओळख दिली. तो म्हणाला, "अरे रे! गतवर्षीं याच दिवसांत ही दुष्ट चौकशी कमिटी नेमण्याला मी कारणीभूत झालों. तेव्हां आतां माझ्यावर प्रसंग आला, हा ईश्वरी न्यायच झाला म्हणावयाचा. ईश्वराने या पापाबद्दल मला क्षमा करावी." डँटनने कमिटीपुढे आपली कैफियत स्वतः मांडली. तींत त्याचा मुख्य मुद्दा असा होता कीं, "मला नेमस्त म्हणणारे लोक माझा अपमान करीत आहेत. मी जहालांतला जहाल आहें. मला मरणाच्या भीतीपेक्षां नेमस्त या विशेषणाचें दुःख अधिक होतें." ता. २ एप्रिल रोजीं सर्वांना फाशीची शिक्षा सांगण्यांत आली. तेव्हां जातां जातां निराशेने शाप देण्याच्या स्वराने डँटन रोबेस्पिअरला म्हणाला, "संभाळ. माझ्यामागून तुझी लवकरच पाळी आहे असें समज." डँटनचा शिरच्छेद करणाऱ्या मारेकऱ्याने असे उद्गार काढले कीं, "एवढी मोठी शिकार आपण यापूर्वी कधी केली नव्हती." आणि तेंहि खरेंच आहे. कारण राजा लुई व राणी मेरी हीं मरणापूर्वी पुष्कळ दिवस कःपदार्थ बनलीं होतीं. राजपदाची सर्व शक्ति, त्या पदाचा त्याग करून लोकसभेंतील जहाल पक्षाच्या अंगांत शिरली होती. आणि त्या सभेंतील डँटन हा एक फारच मोठा मोहरा. वधस्थानीं डँटन उभा असतां, समोरच्या एका गच्चीवर उभा राहून एक नामांकित चित्रकार त्याचें चित्र काढीत होता. मारेकऱ्याला तो म्हणाला, "माझा शिरच्छेद केल्यावर माझें डोकें तूं जनतेला दाखीव. त्यांनी तें पाहावें असेंच तें उमदें व मातबर आहे!"

**युरोपचा गैरसमज**

डँटन मेल्याने कांही वेळ रोबेस्पिअरच्या हातीं सर्व सत्ता एकवटलेली दिसली. याच सुमारास फ्रेंच सैन्याने निरनिराळ्या युरोपिअन सैन्यांचा पराभव कांही लढायांत केला. विसेम्बोर्ग येथून जर्मन आणि टुलॉन येथून इंग्रज यांची हकालपट्टी झाली. क्लेअर, हॉक, मार्सो, ड्युगोमिर, जोर्डन वगैरे नव्या शिपायांनी पराक्रम

दाखवून कीर्ति मिळविली. पोलंडच्या विभागणीच्या प्रश्नावर युरोपिअन राष्ट्रांत दुमत झालें. त्यांनी फ्रान्सवरची चढाई शिथिल करण्याकरितां लोकांना समजेल असा कांगावा केला कीं, "आतां रोबेस्पिअर हा एकटा सत्ताधीश झाला आहे. यामुळें क्रॉमवेलने ज्याप्रमाणें इंग्लंडांत राजवध केल्यानंतर क्रांतीला आळा घालून शांतता व व्यवस्था निर्माण केली, त्याप्रमाणें हा रिपब्लिकन पुढारीहि फ्रान्समध्ये करील. मग आपलें तरी फ्रान्सशीं काय भांडण राहिलें ?" पण ही त्यांची समजूत चुकीची होती.

**सद्गुणोपासनेचे बळी**

मध्यतरीं कन्व्हेन्शनने व कॉम्यूनने जे वेडगळपणाचे चाळे करून धर्म, खाजगी मिळकतींचे हक्क इत्यादिकांवर गदा आणली तें रोबेस्पिअरला पसंत नव्हते. त्याला यापुरतीच प्रतिक्रांति करावयाची होती. पण क्रांतीप्रमाणें प्रतिक्रांतीचेंहि रक्तपात हेंच एक साधन त्यावेळीं कोणालाहि ठेतें. त्याने नांगरणी कुळवणी करून, म्हणजे आपले प्रतिपक्षी अधिकारांच्या जागांवरून हळू हळू वेचून काढून टाकून, पेरणीहि केली. प्रतिक्रांतीमुळे सधन लोक, व्यापारी, जमीनदार, व मठाधिकारी यांना तो सहजच प्रिय झाला. दुसऱ्या एका गोष्टीनेहि त्याची छाप लोकांवर पडली. या वेळीं फ्रान्स हा राजकारणांत रोमन लोकांचें आणि तत्त्वज्ञानांत ग्रीसचें अनुकरण करीत होता. रिपब्लिकन लोकसभा ही जुन्या रोमन सेनेटच्या पुनरवतार होय, असें फ्रेंच पुढारी मानीत. आणि ग्रीक तत्ववेत्त्यांच्या शिकवणीने सर्व नीतितत्त्वें सद्गुणांत सांठविलीं आहेत अशी घोषणा रोबेस्पिअर याने सुरू केली. मात्र सद्गुणांचा अवतार होण्याला अत्याचार व रक्तपात हे अवश्य आहेत अशी पुरवणी त्याला आपल्या घोषणेला जोडावी लागली ! आपल्या एकतंत्री सत्तेचा उपयोग हत्याकांडाला चालना देण्याकडेच त्याने केला. केवळ एकेका साक्षीदाराच्या साक्षीवर विश्वास ठेवून शेकडों स्त्रीपुरुष वधःस्तंभाकडे पाठविण्यांत येऊं लागले ! पूर्वी 'राज्यक्रांतीचें शत्रुत्व' हा एक

ठरावीक दोषारोप होता त्याच्या जोडीला, आतां सद्गुणांचें शत्रुत्व हें दोषारोपाचे नवें सदर रोबेस्पिअरने निर्माण केलें. साथींचा रोग मनुष्यांना गुप्तपणे पछाडतो. पण हा नवा रोग लोकांना उघडपणें पछाडूं लागला. आणि बघतां बघतां त्यांचे प्राण घेऊं लागला. ता. ७ थर्मिडॉर (ऑगस्ट) या दिवशीं आरास येथें एक हजार, स्ट्रॉसबुर्ग येथें तीन हजार, टुलूस येथें पंधराशें व पॅरिस येथें सात हजार लोक तुरुंगांत होते, हे सर्व सद्गुणोपासनेला दुसरे तिसरे दिवशीं बळी द्यावयाचे होते! अशा रितीने आपला मार्ग पुष्कळसा मोकळा करून आस्तिक्यबुद्धीचा विजय आणि सद्गुणोपासनेचा उत्कर्ष यांच्या नांवाने एक मोठा उत्सव करण्याचें त्यांनीं योजिलें.

**प्रछन्न टीका**

ईश्वर हा मुळांत नसला तरी, आपण तो निर्माण करून सर्वश्रेष्ठ अशा स्थानावर बसविला पाहिजे. ह्याची गरज मनुष्याला जिवंतपणीं असतेच; पण मरणाचे वेळीं विशेष असते. आणि मृत्यूचें पौरोहित्य रोबेस्पिअरसारख्या निष्ठेने इतर कोणीही केलें नसल्यानें मृत्युसमयीं होणारा ईश्वराचा उपयोग त्याला विशेष पटावा, यांत काय आश्चर्य? या उत्सवाचें अध्यक्षस्थान स्वतःकडे यावें म्हणून त्यानें आपणाला कन्व्हेन्शनच्या अध्यक्षपदाच्या जागीं निवडून घेतले. उत्सवाकरितां स्तोत्रें गाणीं, त्यांना साथ करणारे वाद्यांचें ताफे वगैरे सर्व तयारी झाली. रोज नव्या रीतीनें अधिकाधिक शृंगारल्या जाणाऱ्या पॅरिस शहरांत उत्सवाच्या रंगीत तालमी सुरूं झाल्या. रोबेस्पिअरने धर्मविषयक, नीतिविषयक, उपदेशपर व्याख्यानांचे प्रबंध लिहिले. आपल्या टोपींत त्याने तीन रंगांची पिसें खोविलीं. आणि सुंदर पोषाख घालून तो व्यासपीठावर उभा राहतांच त्याच्यापुढें इतका धूप जाळण्यांत येई कीं, त्याच्या धुराच्या ढगांत तो अदृश्य होई. आणि हा सद्गुणमंडित ईश्वरप्रतिनिधि, किंवा प्रत्यक्ष ईश्वरच म्हणाना, अभ्राच्छादित आकाशांतून पृथ्वीवरील मनुष्य प्राण्यांना उद्देशून आपलें दिव्य ज्ञान

प्रगट करीत आहे, असा भोळ्या लोकांना भास होई. फाऊचे याला हें आवडलें नाहीं. कदाचित् मत्सरबुद्धीनेहि त्याला दंश केला असेल. पण त्या दिवशीं संध्याकाळीं जॅकोबीन क्लबांत रोबेस्पियर गेला तेव्हा फाऊचे हा प्रथम त्याचें औपचारिक अभिनंदन करून लगेच पुढें म्हणाला, "रोबेस्पिअर, ईश्वरोपासनेचे निरनिराळे प्रकार तुला माहीतच आहेत. रोमन सेनेटमध्यें ब्रूटसने म्हणजे एका जिवलग मित्राने सीझरच्या उरांत जंबिया खुपसला, तेव्हां त्याने खरी ईश्वरोपासना सिद्ध केली, असेंच जग म्हणालें. हें तुला माहीत आहेना?" हें बोलणें अर्थात् द्वयर्थी होतें. पण त्याचें मर्म रोबेस्पिअरला कळल्याशिवाय राहिलें नाहीं. हें बोलणारा फाऊचे हा त्या वेळीं जॅकोबिन क्लबचा अध्यक्ष होता, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

**रोबेस्पिअरचें हत्याकांड**

रोबेस्पिअरचा अनुयायी कोथॉन याने कन्व्हेन्शनपुढे असें बिल आणले कीं, यापुढे स्वातंत्र्यद्रोहाबद्दल व तत्सम अपराधांबद्दल दोषारोप व चौकशी व्हावयाची ती व्यक्तिशः न होतां आरोपींचे गट करून व्हावी, व ज्यूरीने त्यांना गटागटांनीच शिक्षा द्याव्या! शिवाय यापुढे आरोपींना वकील देण्याची सवलत ठेवूं नये. कन्व्हेन्शनचा सभासद चौकशी कमिटीपुढे आणावयाचा तर त्याला यापूर्वी खुद्द कन्व्हेन्शनचा तसा ठराव अवश्य असे. पण हा नियम रद्द करण्यांत येऊन तो अधिकार निरनिराळ्या कमिट्यांना देण्यांत आला. आणि हा विलक्षण कायदा अर्ध्या तासाच्या चर्चेंत पास झाला! दुसरे दिवशीं कन्व्हेन्शनच्या सभासदांनी आपल्याला लागूं होणारें हें भयंकर कलम आदले दिवशीं पास झालेल्या कायद्यांतून काढून टाकावें, असा ठराव आणला व तो पास झाला! पण फिरून लगेच रोबेस्पिअरच्या आग्रहावरून तें कलम कायद्यांत पुन्हा प्रविष्ट करण्यांत आलें!! कायद्यांचा हा खेळ पाहून फ्रेंच पार्लमेंटची त्या वेळची खरी स्थिति वाचकांच्या लक्षांत येईल. लगेच या

कायद्याचा उपयोग रोबेस्पिअरने फाउचे याच्याविरुद्ध केला! पुढील सहा आठवड्यांत या कायद्याच्या अधिकाराने १३६७ लोकांचा शिरच्छेद झाला. रोबेस्पिअरचे दूत चोहोंकडे संचार करूं लागले, यामुळे सार्वजनिक भेटीच्या जागा, क्लब, दारूची दुकानें सर्व ओस पडलीं. जो तो आपल्या घराचे दरवाजे लावून बसूं लागला. लोकसभेचे सभासद सुमारें शंभराहून अधिक सभेंत हजर नसत. म्हणजे लोकसभा ही ओसाड पडण्याची वेळ आली. जे प्रतिनिधि हजर राहत त्यांतलेहि कांहीं एकाच जागेवर न बसतां, आतां या मग त्या जागेवर असे रोबेस्पिअरची विषारी नजर चुकवून बसत. आणि मतें देण्याची वेळ आली म्हणजे कांहीं उठून बाजूला जात. प्रत्येकाला वाटे कीं, माझ्या-भोवती रोबेस्पिअरचे पाश पडले आहेत, यांतून माझी कशी सुटका होईल ती होवो. त्याच्या विश्वासाची अशी खाशी दहापांच मंडळी असत ती त्याच्या आसपास घिरट्या घालीत. आपण आपलें रक्षण करीत नसून रोबेस्पिअरचें रक्षण करीत आहों असा बहाणा कांहीं भित्रे लोक करीत. वास्तविक या वेळीं रणांगणावर फ्रान्सची चलती होती. युरोपिअन राष्ट्रें युद्धाच्या कामीं उदासीन होतीं. अर्थात् देशद्रोही लोक शत्रूला मदत करतात हा ठराविक आरोपहि कोणावर करण्यास जागा नव्हती. तथापि हत्याकांड सुरूंच होतें.

**बाजू उलटूं लागली**

१७९४ च्या जुलै महिन्यांत रोबेस्पिअरच्या प्राणाला ग्रहण लागण्यास सुरुवात झाली. देशसंरक्षक कमिटीमध्यें रोबेस्पिअरच्या विरुद्ध बहुमत सिद्ध झालें. त्यामुळें त्याने कन्व्हेन्शनचा आश्रय करून या व इतर कमिट्यांवर दोषारोप सुरू केले; जेमतेम ता. २७ जुलैपर्यंत देशसंरक्षक कमिटीमध्ये त्याचा हात चालूं राहिला; पण तेथून तो जो घसरला तो केव्हांच सावरला नाहीं. ता. २७ रोजीं त्याने लोकसभेंत एक मोठें भाषण केलें; त्यांत सभेला कमिट्यांविरुद्ध चिथावणी देण्याचा प्रयत्न केला. या कमिट्यांची पुनर्घटना केली पाहिजे, त्यांनी लोकसभेचा अधिकार

बळकावला आहे तो हिसकावून परत घेतला पाहिजे वगैरे कांगावखोर तक्रारी त्याने सांगितल्या. त्याला प्रतिपक्ष्यांनी खरमरीत उत्तर दिलें. एकाने स्पष्ट सांगितलें कीं, " कन्व्हेन्शनचा अधिकार कोणी खरा बळकावला असेल तर तो एकट्या रोबेस्पिअरनेच. " रोबेस्पिअरचें भाषण शिरस्त्याप्रमाणें छापून वाटावें असें प्रथम सभेने ठरविलें होतें. पण त्याच्या प्रतिपक्ष्याच्या भाषणानंतर तो ठराव रद्द करण्यांत आला. ता. २७ व २८ जुलै रोजीं उभयपक्षांत समेटाची कांहीं बोलणीं सुरूं होतीं. हें होत असतांनाच इकडे लोकसभेंतील इतर पक्षांचें पाठबळ आपणास मिळण्याचा प्रयत्न उभय पक्षांकडून सुरूं होता. ता. २८ जुलै रोजीं लोकसभेंतील युद्धाला तोंड लागलें. रोबेस्पिअरचा मित्र कोलो याला अध्यक्षस्थान देण्यांत आलें. नेमस्तपक्षाचे लोक फार थोडे हजर होते. मध्यम पक्षाचे लोक मात्र जमावाने आंवळून बसले होते. रोबेस्पिअर एका प्रमुख जागेवर सर्वांना सारखा दिसेल अशा ठिकाणीं बसला होता. त्याचा मित्र सेंट जस्ट याने तख्तावर चढून प्रतिपक्षावरील हल्ल्याच्या भाषणाला सुरुवात केली. इतक्यांत प्रतिपक्षाकडील टॅलिअन याने वर चढून त्याला बाजूस सारलें. पण टॅलियनचें भाषण संपण्यापूर्वीच दुसऱ्या एका सभासदाने वर चढून त्याला बाजूस सारलें. तिसरा एक सभासद भाषण करण्याला पुढे आला. त्याचें भाषण कोणीच ऐकून घेईना. अध्यक्षाने जोरजोराने घंटा वाजविली. परंतु तिचा कांहीं उपयोग होईना. रोबेस्पिअरने उत्तर देण्याकरितां तख्तावर पुन्हा चढण्याचा प्रयत्न केला. परंतु पांचपन्नास सभासदांनीं मोठ्या आवाजाने त्याला मागे फिरण्याविषयीं आज्ञा केली. त्यामुळे त्याला परत फिरावें लागलें. " कालच जॅकोबीन क्लबांत रोबेस्पिअर व त्याचे मित्र यांनीं राष्ट्राविरुद्ध कट केलेला मी प्रत्यक्ष ऐकिला " असें टॅलियन यानें पुन्हा तख्तावर जागा मिळवून लोकांना ओरडून सांगितलें. आणि कमरेचा खंजीर काढून तो लोकांना दाखवून म्हणाला, " रोबेस्पिअरवर दोषारोप करण्याचें धैर्य जर लोकसभा दाखविणार नाहीं, तर मींच हा खंजीर त्याच्या उरांत खुपसून

न्याय मिळवीन." कांहीं वेळानें कोलो हा अध्यक्षपदावरून उठला. त्याचे जागीं डँटनचा एक अनुयायी थुरीओ हा येऊन बसला. रोबेस्पिअरच्या प्रतिपक्ष्यांनीं असें ठरविलें होतें कीं, "आपणच एकामागून एक तख्तावर चढून तें ताब्यांत ठेवावें. स्वतः रोबेस्पिअरला किंवा त्याच्या मित्रांना जागाच देऊं नये." एकाने "रोबेस्पिअरला कैद करावें" अशी उघड मागणी केली. त्यावर रोबेस्पिअर चवताळून तख्ताकडे जाऊं लागला. पण अध्यक्षाने त्याला बोलण्याला परवानगी देण्याचें नाकारलें. तेव्हां रोबेस्पिअर म्हणाला, आज काय होणार हें दिसतच आहे. परंतु मला शेवटचें भाषणहि करूं न द्याल तर मी तुम्हाला अध्यक्ष न म्हणतां मारेकऱ्यांचे पुढारी म्हणेन. त्याबरोबर "अध्यक्षाचा अपमान झाला, लोकसभेचा अपमान झाला, झोटिंगाचें खरें स्वरूप बाहेर पडलें" अशा आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या.

**सद्दी सरली**

पर्वत पक्षानेच आपल्या विरुद्ध उचल केलेली पाहून रोबेस्पिअरने मध्यम पक्ष व नेमस्त पक्ष यांच्यांत जागा मिळवून बसण्याचा प्रयत्न केला. पण 'हटा मागें हटा' असें दोन्ही पक्षांनीं त्याला दटावून सांगितलें. ज्या लोकांना तूं मारविलेंस, ते लोक ज्या खुर्च्यांवर बसत त्यापैकीं एकीवरहि तुला बसूं देणें हा त्यांच्या स्मृतीचा अपमान होईल, तो आम्हीं करूं देणार नाहीं असें त्याला बजाविण्यांत आलें. अखेर तो बाजूस असलेल्या एका खुर्चीवर कोसळला. आणि इतक्यांत रोबेस्पिअरला पकडण्याचा ठराव पास होऊन लोकसभेचे शिपाई आंत आले. त्यांनी त्याला व त्याच्या चौघा मित्रांना कैद केलें. पॅरिसच्या मेयरने ही बातमी ऐकतांच शहराच्या वेशीचे दरवाजे लाविले, भयसूचक घंटा वाजविल्या, व कॉम्यूनच्या ताब्यांतील एका पलटणीला बोलाविणें पाठविले. रोबेस्पिअरला तुरुंगाच्या रखवालदाराच्या स्वाधीन करण्याला नेलें तेव्हां 'मेयरचा हुकूम नाहीं' म्हणून त्यांनी कैद्याचा ताबा घेण्याचें नाका-

रलें. मेयरने रोबेस्पिअरला अटकेंतून सोडविलें. आपल्या हुकुमांची अम्मल-बजावणी होत नाहीं असें पाहून लोकसभेनें आपल्या पलटणीच्या अधिकाऱ्यांना तो हुकूम अमलांत आणण्याची आज्ञा केली.

हॉटेल दी व्हील येथें रोबेस्पिअरचे पक्षपाती लोक जमावानें बसले होते. पॅरिसचा मेयरहि तेथेंच होता. लोकसभेने निरानिराळ्या कमिट्यांकडे आपले दूत पाठवून त्यांच्याकडील लष्करी लोक बोलावून घेऊन, लहानसें सैन्य तयार करून, तें बारास याचें हातीं देऊन त्याला हॉटेल दी व्हीलवर पाठविले. या इमारतींत राष्ट्राला उद्देशुन एक नवा जाहीरनामा काढण्याचे सुरू होते. शेवटीं मध्यरात्रीच्या वेळीं जाहीर-नाम्याच्या मसुद्यावर सह्या होऊं लागल्या. पण योगायोग असा सांगतात कीं, रोबेस्पिअर हा आपल्या सहीचें पहिलें अक्षर 'रो' हे लिहितो इतक्यांत, लोकसभेचें सैन्य येऊन पोहोंचलें. आणि त्यांतील एका शिपायाने बंदूक झाडली, तिची गोळी रोबेस्पिअरला लागून, त्याच्या हातांतील टाक धक्क्यानें गळून पडला. गोळी दोन्ही गालफडांतून आरपार निघून गेली. तिनें त्याच्या जबड्याच्या चिंध्या केल्या, आणि तो ज्या कागदावर सही करीत होता, त्यावर तो उपडा पडल्यानें कागद रक्ताने भिजला. लोकसभेच्या सैन्याचे मागोमाग कॉमिसरीजचे लोक आले. त्याबरोबर रोबेस्पिअरच्या पक्षाचे लोक वाट सांपडेल तिकडे पळूं लागले. ला लीबास याने जागच्या जागीं आत्महत्या केली. ऑगस्टीन हा वरच्या मजल्याच्या गॅलरीच्या कठड्यावरून छपून पळत जात असतां खालीं कोसळला व त्याचीं हाडें मोडलीं. कोथॉन टेबलाखालीं लपून राहिला. त्याला एकाने उचलून जिन्याखालीं फेकून दिलें. तो मेल्याचें सोंग करून दुसरे दिवशीं सकाळपर्यंत जागच्या जागीं निमूटपणें पडून राहिला. सेंट जस्ट हा मात्र कांहीं धडपड न करितां शिपायांच्या स्वाधीन झाला. रात्र पडली तशी हवाहि थंड झाली. अंधकार पसरला. या घडलेल्या गोष्टीचा गवगवा व्हावा तितका बाहेर झाला नाहीं. यामुळे शहरांतील बहुतेक नाटकें

व तमाशे नेहमीसारखेच चालू होते. एका नाटक कंपनीला या हकीकतीची चाहूल लागल्यामुळें तिनें तेवढा खेळ बंद ठेवून, " कांहीं कारणामुळें खेळ बंद राहील " अशी पाटी दारावर लावली. पुष्कळ लोकांना याचा अर्थ दुसरे दिवसपर्यंत कळला नाहीं.

**मरणाच्या दारीं**

रोबेस्पिअरला पकडून राजवाड्यांतील लोकसभेकडे नेलें. परंतु सभेने " अशा दुष्टाचा विटाळ नको " असें म्हणून शेजारच्या एका खोलींत त्याला घातलें. तेथें एका टेबलावर तो आडवा झाला. काडतुसांची एक पेटी त्याला उसें म्हणून देण्यांत आली. कालपर्यंत तो आपला सुंदर निळा पोषाख घालून थाटानें लोकसभेंत येऊन तिच्यावर अधिकार गाजवी व अहंकारबुद्धीने इतर सर्वांना तुच्छ लेखी. तोच आज त्याच लोकसभेंत प्रवेशहि न मिळून शेजारच्या खोलींत मरणाच्या दारीं टेकलेला शिपायांच्या पहाऱ्यांत अस्ताव्यस्त असा पडला होता. सगळें थोबाड फुटलेलें व फिरलेलें. पायांत बुट नाहींत. रक्तानें भरलेला फाटका सदरा उरावर लोळत आहे. पायांतले पायमोजे मातीनें मळले आहेत व घोट्याशीं लोंबत आहेत. गालांतून रक्त वाहत आहे. कोण हा भवितव्यतेचा दारुण सूड ! ! कोणाचाही अधःपात झालेला पाहून आनंद मानणारे कांही चांडाळ असतातच. त्यांतला एक जवळच होता. तो हंसून म्हणाला, " महाराज, कांही दुखतें खुपतें वाटतें ! फ्रान्सचा राजा मेला आणि आपण राजे झालां. आपली वटवट बंद कशानें झाली ? कांहीं बोला. निदान लोकसभेंत उभे आहों असें समजून एखादा ठराव मांडा कीं ! त्या कामाकरितां तरी तुम्हाला खचित वाचा फुटेल. "

**कुत्र्याच्या मोतीनें मारला**

अशा स्थितींत त्याला चौकशी कमिटीपुढे नेण्यांत आलें. पण देशाचे शत्रु ठरलेल्या आरोपींना वकील देण्याची परवानगी नाहीं, चौकशी नाहीं, नुसतें नांव नोंदून घेऊन वधस्तंभाशीं नेऊन खुशाल जीवें मारावें, असा कायदा रोबेस्पिअर यानेच पूर्वी

आपल्या हाताने केला होता! त्याला गाडींत बसवून लोकांची गर्दी असलेल्या रस्त्यांतून सावकाश नेण्यांत आलें. एका चिरपरिचित घराजवळ गाडी थांबलीं तेव्हां एक उनाड पोरगा शेजारच्या खाटकाच्या दुकानांत गेला, व त्याने तेथून ओंजळभर रक्त आणून गाडीच्या दारांतून रोबेस्पिअरच्या अंगावर फेकलें! तें पाहून रोबेस्पिअरचें अंग थरारलें. व लोकांच्या जमावाने टाळ्या वाजवल्या. आणि ज्यांचे नवरे किंवा मुलगे रोबेस्पिअरच्या हत्याकांडांत मारले गेले होते, त्यांनीं त्याजवर शिव्याशापांची लाखोली वाहिली. अशा थाटांत सायंकाळीं सात वाजतां ही भयंकर मिरवणूक वधस्तंभाशीं आली. प्रथम १९ लोकांचा शिरच्छेद झाल्यावर पॅरिसच्या मेयरची व रोबेस्पिअरची पाळी आली. मारेकऱ्याने हाताला धरून उभा करतांच मरणाऱ्या वाघाप्रमाणे रोबेस्पिअरने डुरकणी फोडली. हजारों लोकांनी आनंदाने आरोळ्या मारल्या. त्यांच्या तोंडून एकच उद्गार निघत होता. "आतां मात्र आम्हाला खरें स्वातंत्र्य कांहींसें लाभेल." दुसऱ्या कित्येकांना असें वाटलें कीं, "रोबेस्पिअर हीच राज्यक्रांतीची देहधारी मूर्ति होती. आतां तो गेला, पण त्याबरोबर राज्यक्रांतीहि लयाला जाण्याचा संभव आहे!"

**रक्तपाताला आळा बसला**

या दोन्ही गोष्टी थोडथोड्या खऱ्या ठरल्या. दुसरे दिवशीं सकाळीं राजवाड्यांतून लोकसभेचे पुढारी बाहेर पडले, तेव्हां जनतेने आपला जयजयकार केलेला पाहून, त्यांना थोडे आश्चर्य वाटलें! या पुढाऱ्यांपैकीं मध्यम पक्षाच्या लोकांनीच योग्य वेळीं उचल केली व रोबेस्पिअरच्या विरुद्ध मतें दिलीं, म्हणून हा डाव साधला. आणि खरोखरच त्या दिवसापासून रक्तपाताला आळा पडला. यापुढे अगदीच रक्तपात झाला नाही असें नाहीं; पण तो थोडा झाला, व झाला तोहि कमिट्या व कॉम्यून्स वगैरे समित्यांतून रोबेस्पिअरच्या पक्षाचे जे लोक पसरले होते, त्यांच्यांत झाला. उलट या पक्षाने तुरुंगांत डांबलेल्या लोकांची सुटका हळूं-

हळूं होऊं लागली. राज्यक्रांतीकडून लक्ष काढून आपलें डोकें कसें वांचवावें, याचा प्रयत्न कट्टे क्रांतिकारकहि करूं लागले! तुरुंगांतून मुक्तता झालेल्यांना पुनर्जन्म झाला असें वाटलें. आणि मांजर निघून गेलें म्हणज उंदीर ज्याप्रमाणे बिळांतून बाहेर पडून वावरूं लागतात, त्याप्रमाणे भीतीमुळे लपूनछपून बसलेले लोक हळूहळू बाहेर पडूं लागले. या सर्वांनी मिळून जॅकोबिन लोकांवर हत्यार धरलें. ही प्रतिक्रिया मोठी· लक्षांत धरण्यासारखी घडली. तिचा अर्थ तत्कालीनांनी व इतिहासकारांनी असा केला कीं, "फ्रेंच जनतेला खरोखरच मनापासून रक्तपाताचा वीट आला होता."

**पण फिरून भाकरीचें भूत**

जॅकोबिन लोकांविरुद्ध लगोलग फार्स रचले जाऊन रंगभूमीवर दाखवण्यांत येऊं लागले. पश्चिमेकडे लाव्हेंडी, उत्तरेकडे नॉर्मंडी वगैरे परगण्यांतून पूर्वी बंड केलेले लोक समाधान पावले. वर्तमानपत्रांनी जॅकोबिन लोकांविरुद्ध लिखाण सुरू केलें. क्रांतीची खूण म्हणून जो दिसेल त्याच्या डोक्य‌ावर तांबडी टोपी बळजबरीने घालण्यांत येत होती, त्याच्यावर बहिष्कार पडला. लोकसभेंतील पर्वतपक्ष जवळ जवळ मोडला. सप्टेंबर महिन्यांत क्रांतिकारक कमिट्याच बरखास्त करण्यांत आल्या. असाच प्रकार निरनिराळीं नांवें धारण करणाऱ्या अत्याचारी समित्यांचा झाला. नोव्हेंबर महिन्यांत जॅकोबिन क्लबावर प्रत्यक्ष हल्लाच झाला. हा क्लब सक्तीने बंद करण्याचा हुकूम लोकसभेने दिला. तो हातीं घेऊन शिपाई गेले. त्यांनी क्लबाच्या दाराला कुलुपें घातली व किल्ल्या परत लोकसभेला आणून दिल्या. पर्वतपक्षांत अवघे पन्नास लोक शिल्लक राहिले. जुन्या नेमस्त पक्षाचे लोक व जिरॉंडिन पक्षाचे अवशिष्ट लोक सर्व मिळून नवीन पक्षरचना करण्यांत आली. पुढील जानेवारींत लाव्हेंडी प्रांतांतील बंडखोरांना जाहीरनाम्याने माफी देण्यांत आली. धर्माधिकारी व फ्रान्समधून पळून गेलेले लोक यांच्यासंबंधी प्रत्यक्ष कायदा असा कांही लोकसभेने केला नाहीं. परंतु हे लोक

परत येऊन उघडपणें लोकसभेच्या गॅलऱ्यांतून बसूं लागले. अशा रीतीने पूर्वी अविचाराने घडलेल्या गोष्टी क्रमाने उलटल्या. या प्रतिक्रियेच्या लंबकाने बेसुमार झोला खाल्ला नाहीं असें भासवण्याकरितां, स्वातंत्र्याच्या नांवाने एक महोत्सव करण्यांत आला. पण अत्याचाराइतकेच महोत्सवांना कंटाळलेले लोक म्हणूं लागले, "तुमची ही क्रांति व प्रतिक्रांतीचे उत्सव, हे सर्व रोटीवाल्या-च्या भट्टींत घालून जाळा. आमचें समाधान केवळ पोटभर भाकरी मिळा-ल्याने होणार आहे!" अशा रीतीने क्रांतीपूर्वी जो वेताळ फ्रेंच जनतेच्या खांद्यावर बसला होता, तोच ती क्रांति संपल्यानंतरहि तेथेंच बसलेला दिसूं लागला.

## १९ फ्रेंच राज्यक्रांतीचा शेवट

**जनता निष्क्रिय बनली**

सन १७९५ च्या प्रारंभीं फ्रान्सची जनता थकूनभागून गेल्यामुळें निष्क्रिय झाली. १७८९ सालीं तिला प्रथम ताप भरला. १७९२ सालीं तिने जुन्याचें मढें गाडून सर्व कांही नवें निर्माण करण्याचा अतिमानुष पराक्रम केला. पण पुढच्या दोन वर्षांतील रक्तस्रावामुळे तिला चलनवलनाचीहि शक्ति राहिली नाहीं. वेडाच्या किंवा अपस्माराच्या भरांत नसतें दहा माणसांचें बळ अंगीं येऊन मनुष्य दहा माणसांना भारी होतो. पण एकदां शक्तिपात होऊन तो पडला म्हणजे मग त्याला आपला हातहि उचलवत नाहीं. त्याप्रमाणें फ्रान्सची स्थिति झाली. तथापि क्रांतींत जें विधायक स्वरूपाचं मिळविलें त्याचें रक्षण व्हावें, अशी फ्रेंच जनतेला इच्छा सहजच होती. जनतेप्रमाणे व्यक्तिमात्रांना लाभ झाले होते ते टिकवावे असें त्यांनाहि वाटे. राज्यक्रांतीच्या धामधुमीने जनतेच्या दारिद्र्याला आळा पडणें शक्यच नव्हतें. उलट परदेशांशीं लढाया केल्या त्यामुळे देशांतले बहुतेक सोनें खर्च झालें. सोन्याऐवजी चलनी नोटा बेसुमार काढण्यांत आल्या. त्यांतच खासगी रीतीने गुन्हेगारांनी नकली नोटा खोट्या तयार केल्या, त्यांची भर पडली. १७९५ च्या प्रारंभींच लुई नाण्याची किंमत १३० होती, ती वर्षअखेर २५०० झाली! धान्य वगैरे मालाच्या किंमती बेसुमार वाढल्या. कोणीहि आपल्या जवळची खाण्याची

सामुग्री बाहेर विकावयास काढीना. वाढत्या किंमतीची भरपाई करण्याकरितां चलनी नोटांचीं पुडकींच्या पुडकीं एकएका साध्या व्यवहारांत द्यावीं लागत. आणि या नोटांचा पुरवठा कमी पडूं नये म्हणून फ्रेंच सरकारने आपला छापखाना रात्रंदिवस चालू ठेविला होता !

**श्रमाचा भोपळा फुटला**

ज्या कामकरी व गरीब वर्गाकरितां म्हणून राज्यक्रांति करण्यांत आली अशी समजूत होती, त्याची स्थिति क्रांती-पूर्वींच खरोखर अधिक बरी होती ! मध्यम वर्गाची अशीच दुर्दशा झाली. जुने श्रीमंत नाहींसे होऊन कांहीं नवे बनले. सत्ते-प्रमाणे द्रव्याची अदलाबदल क्रांतीच्या काळांत इतक्या मोठ्या प्रमाणावर झाली कीं, तींत न्यायाचें कोणतेंहि तत्त्व शिल्लक राहणें अशक्य होतें. आणि सट्टेबाजांचें मात्र खूप फावलें. परंतु एका बाजूला कनिष्ठ कामकरी वर्ग जसा आपल्या पोटाकडे हात करून त्याची खळगी किंवा बखळ दाखवी, तसेंच सरकारी तिजोरीच्या पोटाचेंहि झालें. राष्ट्रीय सरकारी खजिन्यांत एखादे वेळीं त्या दिवसाचीं बिलें भागविण्याइतकीहि शिल्लक नसे !

**थडग्यांवर नाच**

अन्यायाने मिळालेल्या पैशाला लवकरच पाय फुटतात. क्रांतींत ज्यांनी आपलीं घरें भरून घेतलीं, त्यांना चैनबाजी सुचली. आणि देशांत जो थोडासा उदीमधंदा दिसत होता, तो केवळ या चैनबाजीमुळे होता. नाटकगृहें, कुंटणखाने, व सार्वजनिक नृत्यगृहें यांची संख्या एकदम वाढली. आणि ही वाढ इतक्या घाईने झाली कीं, पुष्कळशा नव्या चैनबाजीच्या दिवाणखान्यांतील जमिनीवर व भिंतीवर राज्यक्रांतींत पडलेले रक्ताचे सडे किंवा शिंतोडे दृष्टीआड करण्याला, अवश्य ती चुनासफेती देण्यालाहि कोणाला वेळ मिळाला नाहीं. "मुडद्यांच्या थड-ग्यांवर नाच सुरू होते !" असें वर्णन तत्कालीन लेखकांनी केलें आहे. कित्येक नाचांतील नर्तिकांनी बसविलेले नवे हावभाव क्रांतींतील हत्याकांडां-

तून सुचलेले होते! जुगारीला ऊत आला होता. अशा स्थितींत आहे तें ठीक आहे असा देखावा दिसल्यास नवल नाहीं. पण चैन करणाऱ्यांच्याहि मनांत क्रांतीची आठवण गरीब भिकाऱ्यांच्या उपासमारीच्या ओरडीने मधून मधून थोडीबहुत जागृत होई.

**क्रांतीनें काय साधलें**

जुन्याविषयीं अप्रीति पण नव्यावरहि अविश्वास अशी फ्रेंच जनतेची मनःस्थिति होती. मात्र राज्यक्रांतीने समाजांतील थरांची उलथापालथ पूर्णपणें करून टाकली होती यांत शंका नाहीं. १७९० च्या मार्च महिन्यांत धर्माधिकाऱ्यांची मिळकत, आणि १७९२ च्या ऑगस्ट महिन्यांत फ्रान्समधून गेलेल्या लोकांची मिळकत जप्त करण्यांत आली तिची किंमत २५० कोटी रुपये होती. पण १७९५ च्या अखेरीस यांतली पुष्कळशी संपत्ति राष्ट्राने युद्धापायीं खर्चून टाकली होती. पहिल्या दोन वर्षांत खरेदीविक्री मोठ्या प्रमाणावर झाली. कारण त्यांत सधन लोकांचा हात होता. पण दुसऱ्या दोन वर्षांत पुष्कळसे खरेदीदार कनिष्ठ वर्गांतीलच पुढे आले. कारण जप्त केलेल्या इस्टेटी त्यांना विकत घेतां याव्या म्हणून मुद्दाम जप्त मिळकतीचे लहान लहान गट केले होते. यामुळे स्वतः शेतकी करणाऱ्या शेतकऱ्याच्या मेहनतीला अधिक क्षेत्र मिळून त्याची स्थिति मात्र थोडी सुधारली यांत शंका नाहीं. मध्यंतरीं सोशालिझम म्हणजे समता-वाद निर्माण होऊन, कोणाहि मनुष्याने अमुक इतक्यापेक्षां अधिक संपत्ति आपल्या हातीं ठेवूं नये असा कायदा करण्यांत आला होता. त्यामुळे श्रम-सायास करून उत्पन्न वाढवावें असें त्या वेळीं कोणास वाटेनासें झालें. पण तो कायदा आतां रद्द झाल्यामुळे, आणि अधिक जमीनहि हातीं आल्यामुळे, शेतकऱ्याला उद्योग करावासा वाटूं लागला. या वर्गांतील शेतकऱ्याला आपल्या पदरांत पडलेल्या लाभापुरती क्रांति टिकवायाला हवी होती; पण त्याला रिपब्लिकन राज्यपद्धतीची चाड होती असें म्हणतां येत नाहीं. तसेंच

तो भोळ्या धार्मिक समजुतीचा असल्यामुळे, राज्यक्रांतीने धर्माधिकारी नाहींसे केले हें त्याला वाईट वाटे. परंतु हे धर्माधिकारी लोकांकडून वतनी हक्काने जो दशांश कर घेत तो हक्क बुडविला याबद्दल ते राज्यक्रांतीला धन्यवादच देत. तात्पर्य त्यांची क्रांतिप्रियता विशिष्ट मर्यादित आणि स्वार्थी अशी होती. ज्याचें स्वतःचें पोट भरलें, तो त्यानंतर इतरांनाहि होणाऱ्या आग्रहाला अत्याचार म्हणतो. त्याप्रमाणे फ्रान्समधील अनेक वर्ग झाली इतकी सामाजिक उलथापालथ पुरे, म्हणून झाली इतकी राज्यक्रांतीहि पुरे, अशा मताचे होते.

**क्रांत्युत्तर बजबजपुरी**

देशभक्तीची व्याख्या व व्याप्ति पुष्कळशी स्वार्थी असते याचें एक स्पष्ट उदाहरण फ्रान्सच्या १७९५ सालच्या लोकांच्या मनःस्थितीवरून मिळण्यासारखें आहे. नऊदशांश जनतेला क्रांति अवश्य हवी होती; पण रिपब्लिकबद्दल ती फारशी काळजी करीत नव्हती. राजवंश फिरून फ्रान्सच्या गादीवर आणण्याची तिला इच्छा नव्हती हें खरें, पण राजा नाहीं अशी राज्यघटना कोणी मूठभर लोकांनी वहिवाटली तर त्याला तिची फारशी हरकत नव्हती. एखादा राजाहि तिला चालला असता! पण एका अटीवर. ती ही कीं, त्याने शांतता राखावी, व्यवस्था नीट ठेवावी, पण झालेल्या उलथापालथींत बदल करूं नये. पळून गेलेले सामान्य लोक वाटेल त्या अटीवर परत फ्रान्सला येण्याला तयार होते. पण राजवंशांतील लोक दुःस्थितींत खितपत असतांहि, ते परत येण्याकरितां व राजपद चालू ठेवण्याकरितां अटी घालायला तयार नव्हते. उलट परत आलों म्हणजे एकमेकांना पाहून घेऊं, अशी सूडाची भावना ते बेसावधपणें बोलून दाखवीत! जुन्या हत्याकांडाऐवजीं नवें हत्याकांड सुरूं करण्याला ते तयार होते. आणि त्यांच्या या मनोरथांतून नेमस्त पक्षहि वगळला नव्हता. १६ व्या लुई राजाचा मुलगा फ्रान्सच्या तुरुंगांतच झिजून मेला. तरी त्याच्या पुढच्या नंबरच्या लुईने शहाणपण न शिकतां उलट इंग्रजांची कुमक घेऊन

फ्रान्सच्या उत्तरेच्या परगण्यांत बंड करविलें. जॅकोबिन लोकांना हातीं असलेली सत्ता व मत्ता यांपैकीं कांहींच सोडावयाचें नव्हतें. सत्ता किती होती हें पूर्वी पाहिलेंच. पण मत्ता म्हणजे मिळकतहि पुष्कळ होती. जॅकोबिन हे क्रांतिकारक असले तरी तत्त्वनिष्ठ नव्हते. यामुळे पुढील इतिहासांत त्यांतलेच कोणी काउंट, बॅरन, साम्राज्यवादी, स्टेट कौन्सिलर्स, पदरीं सैनिक ठेवणारे, डोक्यांत तुरे खोवून रथांतून जाणारे, आणि सर्व इस्टेट वंशपरंपरा चालावी असा कायदा करणारे लोक अनेक निघाले. समतावादी फाउचे हा पुढे दीड कोटी रुपयांचा धनी होणार होता! अर्थात् जे दुसरे जॅकोबिन्स होते म्हणजे दरिद्री होते ते नुसते क्रांतिकारक नव्हे तर अराजकवादी ( अनार्किस्ट ) बनले. ज्याच्याजवळ कांहींच नसतें, त्याला कसलीहि अव्यवस्था खपते व परवडते!

**भाकरीची भीक**

हातीं मत्ता असो वा नसो, आहे ती सत्ता हातीं राहावी याविषयीं मात्र निरनिराळ्या पक्षांचेंहि एकमत होतें. आणि ही सत्ता टिकविण्याचें एक साधन युरोपिअन राष्ट्रांशीं युद्ध सुरू ठेवणें हें होतें! पण याचा मोबदला म्हणून त्यांना लष्करी पुढाऱ्यांशीं नमून भिऊन वागावें लागे. रोबेस्पिअरच्या मृत्यूपर्यंत लोकसभेचा सेनापतींवर जो दाब होता, तो तितका पुढे राहिला नाहीं. त्यांनाहि आपल्या यशामुळें आपलें महत्त्व वाटूं लागलें, व यामुळेच नेपोलियनचा अवतार शक्य झाला. राजा नको, पण एकतंत्री राज्य चालविणारा झोटिंग चालेल, अशी जनतेची मनःस्थिति होती; व या झोटिंगाच्या अवताराची पूर्ण तयारी युरोपांत लढणाऱ्या लष्कराच्या छावण्यांतून सुरू होती. जी गोष्ट बाहेर युरोपांतील रणांगणावर तीच खुद्द पॅरिसमध्येंहि चालू होती. लोकसभेचें संरक्षण कोणी तरी करणारे हवेच होतें. कारण शब्दांच्या शक्तीला मर्यादा असते, ती संपली म्हणजे पुढे तिला तरवारीची मदत घ्यावी लागते. लोकसभेला ही मदत भुकेल्या जनतेच्या हल्ल्यांविरुद्ध वरचेवर घ्यावी लागे. उपासमारीनें सुकलेली

पोटें आणि अजीर्णानें कुजलेली पोटें यांच्यांत या वेळीं खरा तंटा होता. आंत लोकसभेंचें काम चालूं असतां बाहेर भुकेने गांजून भटकणारे स्त्रीपुरुष सभागृहाच्या खिडक्यांतून तोंडें खुपसून "भाकरी द्या भाकरी" म्हणून ओरडत, तीं पाहिलीं म्हणजे हिंवाळ्यांत पिसाळून बाहेर पडलेल्या लांडग्यांची आठवण आंतल्या लोकांना होई. अशा लोकांना लष्करी शिपायाशिवाय कोण परतवूं शकणार ? ही सर्व चिथावणी जॅकोबीन लोकांची असावी अशा संशयाने किंवा बहाण्याने लोकसभेने त्यांच्यावर हत्यार धरलें. आणि पूर्वी जॅकोबीन लोकांनी इतरांचे जीव घेतले त्याप्रमाणे रोबेस्पिअरच्या शत्रूंनी जॅकोबीन लोकांचे जीव घेतले !

## नव्या घटनेची फलश्रुति

**नवीन घटनेचा आराखडा**

१७९५ सालीं जुन्या राज्यघटनेची फिरून दुरुस्ती करणें अवश्य वाटूं लागलें. ती दुरुस्ती करण्याकरितां ११ लोकांचें एक मंडळ नेमण्यांत आलें. त्यांत नेमस्त व मध्यम पक्षांचेंच बहुतेक लोक होते. ॲबे साई याने या कमिटीवर काम करण्याचें नाकारलें. १७९३ ची घटना वाईट आहे अशा पूर्वग्रहाने या मंडळाने आपलें काम सुरूं केलें. त्यांनी पहिली गोष्ट ही केली कीं, मुख्य कार्यकारी मंडळाचे सभासद लोकनियुक्त असावेत हें जुन्या घटनेंतील कलम काढून टाकलें. एका लोकसभेऐवजी वेगवेगळ्या दोन लोकसभा केल्या; व या लोकसभांनी, म्हणजे अप्रत्यक्ष निवडणुकीने, मंत्रिमंडळ नेमले जावें असें ठरविलें. मोठ्या लोकसभेंत भावनाप्रधान तरुण लोकांचा भरणा होईल म्हणून वरिष्ठ लोकसभेंत ( सेनेट ) केवळ विवेकबुद्धि चालविणारे लोक यावे अशी योजना, निदान कल्पना तरी, होती. बरेच दिवस घटनामंडळाचें काम चालून, जनता व सैनिक यांच्या पसंतीला ती पाठविण्यांत आली. घटनेंतील एक मुख्य तत्त्व हें होतें कीं, सरकारी कर देण्याइतकी मिळकतीची लायकी ज्याची असेल, त्यालाच मत-

दानाचा अधिकार असावा. याचा अर्थ खाजगी मिळकतीला मान्यता दिली, सोशालिझमचें तत्त्व काढून टाकलें, आणि मतदारांचे गट मर्यादित केले. वरिष्ठ व कनिष्ठ लोकसभा मिळून संयुक्त कार्यकारीमंडळ असावें, त्यांतील तिसरा हिस्सा सभासद दरवर्षी नवे निवडून द्यावे, व त्यांनी जुन्या दोन हिस्से सभासदांबरोबर काम करावें असें ठरविण्यांत आलें. कनिष्ठ लोकसभेलाच कायद्यांचीं बिलें प्रविष्ट करण्याचा हक्क ठेवला. परंतु वरिष्ठ सभेने ती मंजूर करीपर्यंत त्यांना फक्त शिफारशींचें स्वरूप असावें. मुख्य प्रधानमंडळ पांचाचें असावें. प्रथम कनिष्ठ सभेने पन्नास उमेदवार निवडावे व मग वरिष्ठ सभेने त्यांतील पांच निवडावे. या पांचांच्या मंत्रिमंडळाला डिरेक्टरी असें नांव असावें. या पांचापैकीं एकाने ( ज्याच्या नांवाची चिठ्ठी निघेल त्याने ) दरवर्षी राजीनामा द्यावा व त्याचे जागीं दुसरा कोणी निवडून द्यावा. खजिना मंत्रिमंडळाच्या हातीं न देतां, त्याकरितां लोकसभेने निवडलेल्या कमिशनरांच्या हातीं असावा. दोन्ही सभांनी केलेला कायदा नामंजूर करण्याचा अधिकार कोणासच ठेविला नाहीं. अशा रितीने बेजबाबदार मंत्रिमंडळ निर्माण केलें, पण त्याला खरा अधिकारहि ठेविला नाहीं. लोकसभेला मंत्रिमंडळ दूर करता येऊं नये व मंत्रिमंडळाला लोकसभा बरखास्त करतां येऊं नये, असें दुहेरी कुलूप तयार केलें होतें.

**टॅलियनची कारवाई**

पण या नव्या घटनेने लोकांच्या उपासमारीचें निवारण कसें होणार ? उपाशी मरणाऱ्या लोकांना इतकेंच वाटत होतें कीं, जुनी घटना वापरणारे लोक फिरून निवडून येऊं नयेत. कारण त्यांना भाकरीचा बंदोबस्त करतां आला नाहीं. पण उलट टॅलियन याच्या कारवाईने खुद्द घटनेंतच असें एक कलम घालण्यांत आलें कीं, नव्या घटनेंतील लोकसभेच्या ५०० सभासदांपैकी $\frac{2}{3}$ सभासद जुन्या सभासदांतूनच नेमले पाहिजेत ! आणि मतदार लोक जर हें मान्य करणार

नाहींत व जुन्यांना निवडून देणार नाहींत, तर त्यांच्या जागा इतर निवडलेल्या लोकांनी आपल्या इच्छेप्रमाणें भरून काढाव्या. हे दोन्ही ठराव मंजूर होऊन जाहीर झाले. पण मतदारांची संख्या आधींच घटलेली असून त्यांतल्याहि फार थोड्यांनी नव्या निवडणुकींत भाग घेतला. लोक उदासीन झाले होते. यामुळें जे सभासद निवडले गेले, त्यांत नेमस्तांचाच भरणा होता. जॉकोबीन लोकांची संख्या पुष्कळच तुटली. नवे प्रधानमंडळ नेमलें गेलें तेंहि नेमस्तांचेंच. राजवध करणाऱ्या पर्वतपक्षाला आपल्या पायाखालीं आतां पाताळ दिसूं लागलें. या नेमस्तांच्या उत्कर्षाचा परिणाम म्हणून लुई राजाचा वंश फिरून गादीवर येण्याचा संभव होता. परंतु राजपक्षपाती लोकांच्या बिनमुत्सद्देगिरीमुळें ही कारवाई फसली.

**गोलंदाज नेपोलियन**

शांतता झालीशी पाहून पळपुटे लोक देशांत परत येऊं लागले होते व कांहीं राजपक्षपाती लोकांनी तर बंडाचाहि देखावा केला. यामुळे पुन्हा थोडी खळबळ उडाली. लोकसभेने सैन्याची जमवाजमव करून बारास याला सेनापति नेमिलें; व त्याने आपल्या हाताखालीं जे दुय्यम अधिकारी घेतले,, त्यांत एखादा चांगला गोलंदाज पाहिजे म्हणून नेपोलियन बोनापार्टला नेमिलें. या नव्या सैन्याने राजपक्षपाती बंडखोरांना पायबंद लाविला. या नव्या सैन्याला दुसरेंहि एक काम करावयाचें होतें. तें नव्या घटनेला विरोध करणाऱ्या लोकांना हतबल करण्याचें होतें. परंतु हें करतांना बारास व त्याचे अधिकारी यांनी रक्तपात केला नाहीं. प्रतिपक्षाशीं ते फार सौम्यतेनें वागले. विजयी सैन्याच्या अधिकाऱ्यांना बारास याने लोकसभेपुढे नेवून शाबासकी देवविली. जनता हटली व नेमस्त मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाले. जुनी लोकसभा (कन्व्हेन्शन) विसर्जन होण्याचा देखावा मोठा उदात्त व बोधप्रद होता. कारण या जुन्या लोकसभेच्या अंगीं पुष्कळ दोष असले तरी तिच्या हातून विधायक स्वरूपाची सामाजिक क्रांतीहि पुष्कळच झाली होती. पुढील काळांत ज्या कित्येक

नामांकित सुधारणांमुळे व सांस्कृतिक गोष्टींमुळे फ्रान्स प्रसिद्धीला आला, व ज्यांना नेपोलियनच्या कर्तृत्वामुळे तेज चढलें, त्यांचीं बीजें १७९२–९५ या तीन वर्षांत रोविलीं गेलीं होतीं. देशांतील दंगेधोपे, बंडाळी, रक्तपात, अमानुष कृत्यें, यांच्या योगानें दाही दिशा धुंद होऊन प्रेक्षकांना बाहेर चांगलें असें फार थोडें दृष्टीस पडत होतें. पण युरोपांतील रणांगणावर लाखों सैन्य पाठवून, त्याला युद्धाचीं सर्व साहित्यें पुरवून, शत्रूला हटवून, अद्‌भुत विजय मिळवून, फ्रान्सची लष्करी कीर्ति जगभर गाजविण्यापासून तों राष्ट्रीय शिक्षण, विद्या व कला यांची वाढ करणाऱ्या "इन्स्टिटयूट ॲकॅडेमी" यासारख्या संस्था स्थापण्यापर्यंत, अनेक नामांकित गोष्टी या तीन वर्षांच्या अवधींत याच लोकसभेनें केल्या होत्या.

ता. ३ नोव्हेंबर १७९५ रोजीं नव्या पांच सभासदांच्या मंत्रिमंडळाची ऊर्फ डिरेक्टरीची प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली. त्याची कचेरी लक्झेंबर्ग येथील राजवाड्यांत मांडली होती. ही कचेरी प्रथम भरली तेव्हां तेथें तिला लागणारें साधें सामानहि नव्हतें! आणि या दैन्याचें वर्णन म्हणजे लोकसभेच्या क्षीणपणाचें आणि जनतेच्या उदासीनतेचेंच वर्णन होय. तत्कालिनांनी तें केलेलें वाचून हसूं येतें.

**देवाचा धावा**

हे पांच डायरेक्टर म्हणजे केवळ ललितांतलीं सोंगें होत असें त्यांजविषयीं लिहिलेलें आढळतें. त्यांचे हातीं नव्या घटनेनें दिलेला कायदेशीर अधिकार पूर्णपणें होता. परंतु तेजाच्या चमकेशिवाय अधिकार व्यर्थ ठरतो. लोकांची रीतच अशी आहे कीं दुष्ट, दुष्कर्मी, पण कांहीं तरी गडबड करील असा अधिकारी किंवा पुढारी त्यांना हवा असतो. नेमस्तांकडे पाहून त्यांचें मन रमत नाहीं. शिवाय हेंहि खरें आहे कीं, आपल्या पुढील कारकीर्दींत, या डायरेक्टरांतील पंचायतनाला जनतेची यापूर्वींच्या ५-६ वर्षांत झालेली हानि भरून काढतां आली नाहीं.

या प्रधानमंडळाचा पाठपुरावा करील असा एकहि पक्ष या नव्या कायदेमंडळांत नव्हता. त्याने स्वतःचा असा कांहीं निश्चित कार्यक्रम ठरविला नव्हता. सुदैवानें जनता या वेळीं कायदेमंडळाच्या कामांत लक्ष घालीत नव्हती. कारण तिची उपासमार त्याच्या हातून थांबण्याची आशा जनतेला दिसे. कायदेमंडळाच्या सभासदांनीं मात्र आपला रोजचा भत्ता दुप्पट करून घेतला होता! तसेंच कायदेमंडळाकरितां सुंदर शोभिवंत इमारती वगैरे बांधण्याचें काम त्यांनी सुरू केलें. सरकारी खजिन्यांत पैसा नव्हता. कर देण्याचे कामीं लोकांनी हात आंखडला होता. यामुळे पूर्वीचें चलनी नोटा छापण्याचें काम भरमसाट सुरू झालें! सोन्याचें एक लुई नाणें, ज्याची किंमत सोन्याच्या हिशेबाने फक्त चोवीस लायव्हर्स असावी, ती या चलनी नोटांच्या पुरामुळे बारा हजार लायव्हर्स झाली! शेतकरी चलनी नोट हातीं धरीना. तो म्हणे, "या चलनी नोटांच्या पुडक्यांनी माझ्या घोड्यापुढे टाकण्याच्या गवताचें काम होईल, तरी मी त्या घेईन. पण माझें घोडेंहि त्यांना तोंड लावीत नाहीं! पण डायरेक्टरी झाली तरी काय करणार! एकंदर जनताच दमल्यासारखी भागल्यासारखी व हताश झाली होती. लोकमत म्हणून कांहीं उरलें नाहीं. निराश मनुष्याचें तेज फक्त त्याच्या द्वेषबुद्धींत मात्र उरतें, त्याप्रमाणे जनता येथून तेथून सर्वांचा द्वेष करूं लागली. लोक म्हणूं लागले, "आम्ही राजाचा जीव घेतला, एवढी क्रांति केली, ती काय आमच्याच पैशावर श्रीमान झालेले उपटसुंभ लोक आमच्या उरावर बसवून घेण्याकरितां कीं काय!" पण हें बोलणाऱ्या जनतेच्या हातून या तीव्र भावनेला अनुसरून कांहीं घडण्याचें चिन्ह दिसेना. ते म्हणत, "तें रणांगणावरील वैभव नको आणि तें स्वातंत्र्यहि नको. ईश्वराचीच कृपा होईल तर तो अवतार घेऊन आम्हांला सोडवील." अशा अवतारालाच सर्व लोक शरण येतात, व तोच त्यांच्यावर हुकमत चालवूं शकतो. मनुष्याची आशा सोडून ईश्वराची करुणा भाकणारे हे लोक हळू हळू पूर्वीसारखे धर्मभोळे होऊन, रोमचा पोप व फ्रान्स-

मधील त्याचे प्रेषित व इतर धर्माधिकारी, यांच्या कह्यांत जावूं लागले होते. आणि हे लोक प्रतिक्रांति घडवून आणतील कीं काय अशी भीति कायदे-मंडळाला वाटे. पण इसापनीतींतील एकडोळ्या हरणाच्या गोष्टीसारखी कायदे-मंडळाची ( लोकसभेची ) स्थिति होती. कारण या मानीव शत्रूकडे त्याने आपला धडका डोळा ठेविला होता, तरी त्याला खरें भय उत्पन्न झाले तें आंधळ्या डोळ्याच्या बाजूनेच झालें ! कारण या सर्व गोंधळांत क्षात्रवृत्तीचे बुद्धिमान लोक डोळे उघडे ठेवून वावरत होते, आणि त्यांच्या दक्षतेचें हें फळ त्यांना लवकरच बोनापार्टसारखा पुढारी व नेता मिळून लाभलें.

## डिरेक्टरीच्या अडचणी

डिरेक्टरीने हाताखालचे अधिकारी नेमून कामाला तर सुरुवात केली.

**पैशाचा प्रश्न**

पण प्रथमच तिला पैशाची अडचण भासली. लोकसभेने दोन कोटी लायव्हर्स मंजूर केले, पण ६० कोटीशिवाय गरज भागणारी नव्हती. तेव्हां क्रांतीच्या काळांत श्रीमंत झालेल्या लोकांवर नवे कर बसविण्यांत आले. सरकारी कर्जें त्यांच्यावर लादण्यांत येऊं लागलीं. यामुळे हा वर्ग नाखूष झाला हें एक. पण ह्या वर्गाला श्रेष्ठ म्हणून सहजच मान्यता मिळाली व समतेच्या तत्त्वाला धक्का बसला. क्रांतितत्त्वा-विरुद्ध हें पाप घडलें. कारण समता हें क्रांतीचें आद्यतत्त्व होतें. पण " लोभ-मूलानि पापानि " हें ठरलेलेंच आहे. तथापि या युक्तीनेहि हवा तितका पैसा जमला नाहीं. सर्व पदार्थांच्या किंमती वाढल्या. तयार माल भारी किंमतीने विकावा व नवा तयार करूं नये, असें कारखानदारांना वाटूं लागलें. मग सरकारी हुंड्या, प्रॉमिसरी नोटा, लहान मुदतीच्या काढून विक-ण्यांत आल्या. पण चलनी नोटा काय किंवा या मुदतीच्या हुंड्या काय, त्यांची फेड करण्याचें साधन सरकाराजवळ कोठें होतें ?

**जनतेचा आशा-किरण**

डायरेक्टरीचे हे डाव फसल्याने तिला खर्चाला पैसा तर मिळाला नाहींच; पण तिच्या अप्रियतेचा फायदा घेऊन तिचे प्रतिपक्षी सरसावले. त्याला तोड म्हणून मंत्रिमंडळाने कॅथॉलिक पंथाचे धर्माधिकारी व पळपुटे लोक यांच्याविरुद्ध कायदा करण्याचा प्रयत्न केला. ता. ८ जानेवारी १७९६ रोजीं सरकारने पँथिऑन क्लब नांवाची अराजक संस्था बंद करण्याकरितां लष्करी लोक पाठविले. इकडे युरोपांत फ्रेंच सैन्य लढत असून नेपोलियनचा ठिकठिकाणीं जय होत होता. इटालीमध्यें त्याने नुसता कहर केला. अवघ्या दोन आठवड्यांत त्याने सहा लढाया जिंकल्या, एकवीस निशाणें पाडाव केलीं, आणि अनेक तोफा, तटबंदीची गांवें तसेंच पंधरा हजार शत्रुसैनिक हस्तगत केले. या विजयांमुळे मात्र डिरेक्टरीची पत बाहेर जगांत व खुद्द फ्रान्समध्येंहि वाढली. इटालींत बोनापार्टने ऑस्ट्रियन साम्राज्याचा पराभव करून इटालियन जनतेची परदास्यांतून मुक्तता केली. तेव्हां फ्रान्समधील लोक म्हणूं लागले कीं आमचीहि मुक्तता हा कां न करील ? सामान्य जनतेप्रमाणे डिरेक्टरीलाहि त्याने आशा दाखविली, तिजमुळे इटालींत नेपोलियनने आणखी जय मिळवावे, पण त्याबरोबर त्या देशांतून आणखी लुटीचा पैसा मिळवून तो स्वदेशीं पाठवावा, या हेतूने डिरेक्टरीने नेपोलियनची उघडपणे स्तुति करण्याला प्रारंभ केला. पण स्तुति केलेला मनुष्य चढून डोक्यावर बसतो हें त्यांच्या लक्षांत प्रथम आलें नाहीं.

**दैवाचा हात**

त्यांतच डिरेक्टरीविरुद्ध प्रतिपक्षाने एक लहानसें बंड उठविलें. तें मोडण्यांत आलें तरी, त्यामुळे डिरेक्टरीला आत्मरक्षणासाठीं सैन्याकडे पाहण्याची गरज वाढली. भावी राजा लुई याचे हस्तक त्याला राजपद मिळण्याकरितां खटपट करूं लागले. डिरेक्टरी आणि कौन्सिलें म्हणजे लोकसभेचीं उपमंडळें यांच्यांत चुरस सुरूं

झाली. नव्या निवडणुकींत राजपक्षपाती उमेदवारांचा पाडाव करून डायरेक्टरीचे अनुयायी निवडून आणण्याची खटपट सरकारपक्षाने केली; परंतु सामान्य जनतेने निवडणुकीच्या दंगलींत धर्मरक्षणाच्या मुद्द्याला अधिक महत्त्व देऊन, धर्मरक्षणाचे कामीं मदत करण्याचें आश्वासन ज्यांनी दिलें अशा अनेकांना निवडून आणलें.

**क्रांतीची लाट ओसरूं लागली**

अशा रीतीने नव्या लोकसभेंतील बहुमत एकजिनसी सिद्ध न होतां, खिचडीच्या स्वरूपाचें झालें. या बहुमताच्या जोरावर धर्माधिकारी पक्षाने पहिला जय मिळविला. तो असा कीं, कोणाहि मनुष्याने आपल्याला हव्या त्या धर्माधिकाऱ्याला बोलावून आपलीं धर्मकृत्यें करावी, कोणाहि धर्माधिकाऱ्याला कसलीहि शपथ घेण्यास सरकाराने भाग पाडूं नये, जुन्या चालीप्रमाणे देवळांतील घंटा वाजविण्याची मुभा असावी, आणि प्रत्येक विशिष्ट धर्मपंथाला आपल्या अनुयायांचीं प्रेतें पुरण्याला स्वतंत्र कबरस्थानें नेमून द्यावीं असें ठरलें. अर्थात् या बाबतींत १७८९ ची क्रांति फुकट गेली असें लोक म्हणूं लागले. पॅरिस शहरांतील अनेक देवळें, पूर्वी सरकारजमा झालेलीं, ज्या त्या धर्मपंथाच्या स्वाधीन करण्यांत आलीं. धर्मभावनेची एक नवी लाटच उसळल्यासारखें झालें. देवळांतील घंटांचा आवाज कानावर येत नाहीं अशी एक घटकाहि पॅरिसमध्यें किंवा पॅरिसबाहेर देशांत जाईनाशी झाली. यामुळे अखेर कायम निकालाच्या वेळीं थोडासा फेरबदल होऊन असें ठरलें कीं, धर्मविरुद्ध घातलेला बहिष्कार काढून टाकावा; पण धर्माधिकाऱ्यांना आपली धर्मनिष्ठा न गमावितां, राज्यघटनेविषयीची निष्ठा प्रगट करतां येण्यासारखी, सौम्य पर्यायवाचक अशी एक नवी शपथ धर्माधिकाऱ्यांनी घ्यावी. या ठरावाविरुद्ध असणाऱ्या मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला.

## नपोलियनचा उदय

**विजयी वीराचे डावपेच**

पण हें भांडण अखेर तरवारीच्या बळावरच निकालांत निघणार असें दिसूं लागलें. डिरेक्टरी व कौन्सिल्स यांच्यांत लढत लागून कौन्सिल्सनी डिरेक्टरीवर दोषारोप करण्याचा बेत केला. तेव्हां डिरेक्टरीने आपल्या मदतीला सैन्यांतील कांहीं पलटणी बोलाविल्या. लोकसभेने या लष्करी अतिक्रमणाविरुद्ध तक्रार केली. इकडे बोनापार्ट पॅरिसमध्यें चाललेल्या गोंधळावर दुरून लक्ष ठेवीत होता. स्वतः तो बोर्बोन राजवंशाची पुनः प्राणप्रतिष्ठा करण्याविरुद्ध होता. पण त्या बरोबर प्रतिगामी कौन्सिलचें धोरणहि त्याला मनांतून पसंत नव्हतें. त्याच्या सैन्याला नव्या निवडणुकींतील प्रतिनिधी आवडत नव्हते. कारण त्यांचा कल क्रांति-पूर्व राज्यघटनेकडे उघड दिसून येत होता.

नेपोलियनने आपल्या सैन्यांतील निरनिराळ्या अधिकाऱ्यांना सांगून एक जाहिरनामावजा पत्रक काढलें. त्याचा आशय असा होता कीं, "नव्या रिपब्लिकच्या विरुद्ध जे कोणत्याहि बाबतींत आपलें मत प्रगट करतील ते देशाचे शत्रु समजावे. त्यांचा निःपात करण्याला फ्रेंच सैन्य सरकारला मदतच करील." इतक्यांत नव्या लोकसभेचा अध्यक्ष राजवंशाशीं कांहीं गुप्त खलबत करीत असल्याचे कागदपत्र सांपडले. त्यामुळे या जाहिरनाम्याला जोर आला. सैन्याचा हा चढेलपणा पाहून कौन्सिलांनीं जुनें राष्ट्रीय सैन्य उभारण्याचा बेत केला. पण त्या सैन्यांत स्वयंसेवक दाखलच होईनात!

१७९६ मध्यें नेपोलियनने अनेक जय मिळविले. तथापि इकडे तह करून देशालाच परत जावें असें त्याला मनांतून वाटत होतें. आणि हा तह करतांना हात थोडा ढिला व सढळ करावा असाहि त्याचा बेत होता. एक तर विजयी मनुष्याला औदार्य शोभाच देतें. शिवाय शत्रु मनांतून असंतुष्ट

१०६५५०



राहिला तर आपणाला घरच्या राजकारणांत वावरण्याला शांतता किंवा मोकळेपणा हवा तेवढा लाभणार नाहीं हेंहि त्याला माहित होतें. फ्रान्समधून नित्य त्याच्या कानावर ज्या बातम्या जात होत्या, त्यावरून त्याला हें कळून चुकलें होतें कीं, सर्वांचें लक्ष आतां आपणाकडे लागून राहिलें आहे. आणि कोणत्याहि संकटांतून फ्रान्सला सोडविणें प्राप्त झालें तर तें आपणच करूं शकूं, असा विश्वास फ्रेंच जनतेच्या मनांत उत्पन्न झाला आहे. या गोष्टीचा फायदा घ्यावा अशी उत्कट इच्छा त्याला होण्याला, आणि तें अपेक्षित संकट उत्पन्न होण्याला, लवकरच गांठ पडली.

**एकाला शाप तो दुसऱ्याला वर**

हें संकट घरचें व नेहमीचेंच होतें. नव्या निवडणुकी झाल्या, त्यांत आपल्या बाजूचे लोक निवडून यावे म्हणून डायरेक्टरीने पुष्कळ खटपट केली. परंतु ती साधली नाहीं. ता. २१ मे १७९७ रोजीं खालच्या वरच्या लोकसभेचे अध्यक्ष निवडले गेले. नव्या सभासदांनी, अलीकडील जमाखर्चाचे हिशेब सभेपुढे मांडावे असा तगादा केला. नेपोलियन बोनापार्टने अलीकडे पुष्कळच लुटीचा पैका फ्रान्सला पाठविला होता. तेव्हां त्याच्या खर्चाच्या बाबतींत डायरेक्टरीवर कांहीं दोषारोप करण्याला जागा मिळेल असा संभव प्रतिपक्षाला वाटत होता. मुख्य प्रधान बारास याला प्रतिपक्षाची नडवणूक पदोपदीं भासूं लागल्याने त्यानेहि तह लवकर करण्याच्या नेपोलियनच्या सूचनेला संमतिच दिली. नेपोलियन हा आपलाच हस्तक म्हणून उदयाला आला, त्या अर्थी तो आपल्याला संकटांत मदत करील, असें त्याला सहजच वाटलें. राजवंशाला गादीवर परत आणण्याच्या बेताला किंचित् रंग येऊं लागला असा खालच्या लोकसभेने गवगवा केला. नेपोलियनला हा बेत पसंत नव्हता; पण आपण जॅकोबिन पक्षाचे पुरस्कर्ते पूर्वी असतांहि, प्रतिगामी बहुमतामुळे आपण जहालांना आवडेनासे झालों, असें त्याला मनांतून वाटूं लागलें होतें. म्हणून "माझी

तरवार रिपब्लिकच्या सेवेला वाहिलेली आहे," अशी मोघम घोषणा ठेवून, व कोणत्याहि पक्षोपपक्षांशीं स्नेहसंबंध न दिसूं देतां, आपलें काम साधावें असा त्याचा विचार होता. फ्रान्सला जर कोणी बचावील तर तें एक सैन्यच, अशी सर्वांचीच समजूत होऊं लागली. आणि आपण स्वदेशीं परत गेल्यावर डिरेक्टरीपैकीं एक डिरेक्टरच होण्याचें निमंत्रण बहुधा आपणाला येईल अशी नेपोलियनला आशा होती.

## झोटिंगाचा अवतार

**भस्मासूर उलटला**

समस्त सेनापतींनी मिळून आपली एक कैफियत दोन्ही लोकसभांपुढें पाठविली. तिजवर दोन्ही सभांतून बरीच टीका झाली. सैन्य समर्थ आहे ही जाणीव दोन्ही सभांना होती हें खरें, पण ते शिरजोर न होतां, त्याने आपल्या तंत्राने वागावें, असें प्रत्येक पक्षाला हवें होतें. पण तें कसें साधणार? तहाच्या चळवळीमुळें रजा दिलेले, नोकरी सोडून निघालेले, स्वयंसैनिक व त्यांचे कांहीं नाइक पॅरिसला येऊन पोहोंचले होते.

ता. १७ सप्टेंबर रोजीं डायरेक्टरींतील लोकांना पकडण्याचा कट झाला. तो ऐकून डायरेक्टर कार्नो याने प्रथम पळ काढला. पण दुसरा डायरेक्टर बार्थेल्मी याला पकडण्यांत आलें. "मला कोणाचे हुकुमाने पकडतां? मी स्वतःच डायरेक्टर आहे," असें तो म्हणूं लागला. पण त्याचें कोण ऐकतो! डायरेक्टरीने लोकसभेच्या अधिकाराच्या कांहीं स्थूल सीमा म्हणून ठरविल्या होत्या. परंतु त्यांचें अतिक्रमण करून, बंडाळी करण्यास उठलेले सैनिक आंत घुसत होते. लोकसभेच्या ८०० खड्या सैन्याला सज्ज होण्याचा हुकूम फर्माविला गेला; पण त्यांच्या भोंवतीं जवळजवळ १०-१२ हजार सैन्याचा गराडा पडून कांहीं तोफाहि सज्ज केलेल्या दिसूं लागल्या. हें पाहून

लोकसभेच्या सैन्यानें आपली हत्यारें खालीं ठेविलीं. बंडखोर सैन्यानें लोक-सभेच्या जागांचा ताबा घेतला. लोकसभेच्या अध्यक्षांनीं स्थानापन्न होऊन, आपले टोप डोक्यावर चढवून, आपला खास अधिकार बजाविण्याची ऐट आणिली! अध्यक्ष सिमिऑं याला खुर्चीवरून ओढून काढण्यांत आले! खुर्ची सोडतां सोडतां त्यानें प्रोसिडिंग बुकांत शेरा लिहून ठेविला, तो असा कीं, "सभा बरखास्त करण्यांत आली आहे; पण ती माझ्या अधिकारानें नव्हे तर बंडखोर सैन्याच्या शिरजोरीनें."

ज्या सभासदांवर सैन्याचा राग होता त्या सर्वांना पकडून 'टेंपल' नांवाच्या इमारतींत ठेविण्यांत आले. पूर्वी एक वेळ याच इमारतींत राजा लुई हा कैदेंत होता! आणि मौज ही कीं, या राजाचे जीवावर उठलेल्या अशाच कांहीं सभासदांवर "तुम्हीं राजपक्षपाती आहां" असा दोषारोप ठेवून त्यांना कैदेंत डांबण्यांत आलें. उरलेले सभासद नेहमीहून वेगळ्या इमारतींत बसले. खालच्या लोकसभेने या बंडाची चौकशीं करण्याकरितां कमिशन नेमले व जे दोषी ठरतील त्यांना शिक्षा करण्याचा अधिकार दिला. कोणीं सुचविलें कीं, झालेल्या निवडणुकी रद्द कराव्या. वरच्या लोकसभेनेहि असेंच एक कमि-शन नेमिलें. ४९ परगण्यांतील निवडणुकी रद्द ठरविण्यांत आल्या. पळपुट्या लोकांच्या आप्तेष्टांचा मतदारीचा हक्क काढून घेण्यांत आला. धर्माधिकाऱ्या-वरहि कडक कायदे करण्यांत आले. होत असलेल्या गोष्टीपैकीं कोणती कायदे-शीर, कोणती बेकायदेशीर हें ठरणें कठीण होऊन बसलें. कारण चंचल अशा क्रियाप्रतिक्रियेने राज्यघटना अशी जाग्यावर काय उरली हेंच कोणासहि कळेना! याचा उघड अर्थ 'बळी तो कान पिळी' असाच झाला. ता. १७ व १८ या दोन दिवशीं झालेल्या गडबडीने राजवंश परत गादीवर येणें दुरा-वलें खरें; परंतु तिच्यामुळें नेपोलियनरूपी झोटिंगाचा अवतार दूर होता, तो फार जवळ आला!

## राज्यक्रांतीची आरती

**नेपोलियनचा आत्मविश्वास**

नेपोलियन बोनापार्ट हा परदेशांतील लढाया आवरत्या घेऊन फ्रान्सला परत आला तेथपासून फ्रेंच राज्यक्रांतीच्या आरतीलाच सुरवात झाली. नेपोलियन आला तो फ्रान्स-मधील अंतःस्थितीचा कानोसा घेत घेत आला. त्यांत त्याला असें दिसून आलें कीं, क्रांतीचें विध्वंसक कार्य जरी टिकणारे होते व बोर्बोन राजवंश फिरून गादीवर आणण्याचा प्रयत्न साधण्यासारखा नव्हता, तरी क्रांतीचें विधायक कार्य झालें तेवढ्यावरच स्थगित होऊन रहाणार अशीं चिन्हें होती. किंबहुना कांहीं बाबतींत प्रतिक्रियाहि झाली होती. राष्ट्रीय राजकारणाच्या खाद्यांत जो मसाला व जें तिखट पाहिजे असतें तें अशा स्थितींत आपणच पुरवूं शकूं, असा आत्मविश्वास नेपोलियनला वाटत होता. आणि आपण तें पुरविलें असतां आपल्या महत्त्वाकांक्षेचें मंदीर क्रांतीच्या पायावरच उभारितां येईल असें त्याने हेरून ठेविलें होतें.

**जनतेचा त्राता नेपोलियन**

पॅरिसला परत आल्यावर प्रथम त्याने आपलें मनोगत कोणास कळूं दिलें नाहीं. फक्त निरनिराळ्या पक्षोपपक्षांतील पुढाऱ्यांशीं संधान बांधून, कोणाचा जोर कसा आहे आणि आप-णाला त्यांतल्या त्यांत अधिक उपयोगी कोण पडेल, याचा अंदाज त्याने बांधला आणि मग आपल्या कार्याला हळूहळू सुरवात केली. पण झालेली ही उचल अगदींच एकांगीं नव्हती. तींत नेपोलियनचा जरी गुप्त स्वार्थ होता, तरी त्याच्याशिवाय फ्रान्सला आतां कोणी त्राता नाहीं अशीं फ्रेंच जनतेचीहि पुरी खात्री झाली होती. म्हणून मनाने ती नेपोलियनचा धावाच करीत होती. विजेच्या दोन अंगांचा अशा रीतीने संयोग झाल्यावर नवें तेज व त्याबरोबर नव्या बनावटीची उष्णता निर्माण झाली यांत काय नवल! वास्त-विक क्रांतींतील कांहीं जुने पुढारी अजून शिल्लक होते. पण ते उपद्व्यापी

किंवा अघोरी प्रवृत्तीचे नसल्यामुळें, त्यांचें शहाणपण लोकांना पटेनासे झाले. पहिली लाट ओसरून नवी लाट निर्माण होण्यापूर्वी जसा खळगा पडतो, तसा फ्रेंच राजकारणांत या वेळीं पडला होता, त्याचा फायदा घेऊन नेपोलियनने लोकसभा वश करून घेतली; पांचशें लोकांचें म्हणून एक वेगळें मंडळ होतें त्याला तलवार दाखवून नरम केलें; आणि पंचमुखी कारभारी मंडळ मोडून टाकलें. या पांचापैकीं चौघांनीं आपण होऊन राजीनामे दिले व पांचवा तर आत्मसंरक्षणार्थ नेपोलियनच्या सैन्याच्या स्वाधीन झाला.

**सम्राट् नेपोलियन**

अशा रितीनें हजार गेले, पांचशें गेले, पांच गेले; पण शेवटीं कोणी तरी एक जाग्यावर उरावयाचाच. व त्या अधिकाराची माळ नेपोलियनच्या गळ्यांत आपण होऊन पडली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या बहुतेक पुढाऱ्यांच्या डोक्यांत जुन्या ऐश्वर्यकालीन रोमन लोकशाहीचें अनुकरण करण्याचें वेड कसें शिरले होतें हें वाचकांनीं पूर्वी वाचल्याचें त्यांस आठवत असेल. त्याच वेडाला अनुसरून लोकसभेने नेपोलियनला प्रथम मुदतबंद कॉन्सल (सर्वाधिकारी) म्हणून नेमिले. लौकरच या मुदतीची अट काढून टाकून त्याला तहहयात सर्वाधिकारी नेमण्यांत आलें, इतकें झाल्यावर स्वाभाविक पुढची पायरी म्हणून नेपोलियनने स्वतःला बादशाह म्हणून खुद्द पोपच्या हाताने अभिषेक करून घेतला. आणि एवढ्यानेहि समाधान न होतां त्याने आपल्या नांवाने नवा राजवंशहि चालू केला!

**क्रांतीची फलश्रुति**

नेपोलियनच्या नांवाशीं संबद्ध असलेल्या या व यापुढील हकीगती पुष्कळ वाचकांना माहीत असतील. कारण नेपोलियनचें एखादें चरित्र ज्याने वाचले नाहीं असा मराठी वाचक विरळा. पण या हकीकती या ग्रंथांत न देण्याचें मुख्य कारण हें कीं, ग्रंथाच्या विषयाशीं म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीशीं त्यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध उरत नाहीं. पंचमुखी डिरेक्टरी मोडली तेव्हाच राज्यक्रांतीचा इतिहास संपला!

परंतु राज्यक्रांतीचा इतिहास संपला तरी तिने घडवून आणलेलें राजकीय परिणाम कांहीं शिल्लक उरलेच. ते फ्रान्सच्या पुढील शंभर वर्षांच्या इतिहासानेहि लोपले नाहींत. किंबहुना आज ज्याला आपण नवें युग म्हणतो त्यांत दिसून येणाऱ्या लोकसभेच्या व लोकशाहीच्या कांहीं मूलभूत कल्पना, यांचा उगम फ्रेंच राज्यक्रांतींतच झाला, व त्या कल्पना तत्त्वतः तरी अजून जिवंतच आहेत असें कबूल करावे लागतें. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या त्या नवीन कल्पना होत. वास्तविक त्यांचा जन्म फ्रेंच राज्यक्रांतीच्याहि पूर्वी, अमेरिका बंड करून इंग्लंडच्या राज्यांतून निघून स्वतंत्र झाली तेव्हांच, झाला हें खरें. परंतु स्वतः स्वयंनिष्ठ, स्वयंपूर्ण व स्वतंत्र राहिल्यानेच आपले हित होईल या बुद्धीनें अमेरिकेने अमेरिकेबाहेरच्या जगाशीं संबंध ठेविला नाहीं. दुसरे पक्षीं फ्रान्सदेश हा युरोप खंडांत अग्रगण्य असल्यामुळें फ्रेंच राज्यक्रांतीनें सगळ्या युरोपला हलवून सोडलें. अमेरिकेने आपला जीवनक्रम स्वतंत्र चालविला म्हणून, आणि आशिया खंडांत लोकशाहीच्या लोकसत्तेच्या कल्पनांचा उगम होण्याइतकें राजकारण प्रगतिपर किंवा परिणत झालें नव्हतें म्हणून, गेल्या दीडशें वर्षांचा जगाचा राजकीय इतिहास घडवून आणण्याचें श्रेय एकट्या युरोप खंडालाच मिळालें. आणि वर दर्शविल्याप्रमाणें, इंग्लंड वगळले असतां, फ्रान्स हेंच अखिल युरोपखंडांतील राजकारणाचें केंद्र असल्यामुळें त्या राज्यक्रांतीनें गेल्या दीडशें वर्षांत प्रथम युरोपांतील राजकारणाचें रूप बदललें व त्यानंतर आशिया खंडांतील राजकारणाचेंहि रूप बदलण्यास कमी केले नाहीं.

# परिशिष्ट

## [१]

## फ्रेंच राज्यक्रांति व ख्रिस्ती धर्म

सन १७८९ च्या राज्यक्रांतीनें फ्रान्सच्या राज्यघटनेवर व समाजघटनेवर परिणाम झाला तसाच तो फ्रेंच लोकांच्या धर्मावरहि झाला. फ्रेंच राज्यक्रांती सुरू असतां राजपद जमीनदारी व भांडवलशाही यांच्या प्रमाणेंच ख्रिस्ती धर्मावर एकदां अशी वेळ येऊन गेली कीं, तो रसातळाला जातो व नामशेष होतो असें दिसूं लागले. परंतु क्रांतीचा जोर पुढें लवकरच अनेक कारणांनी ढिला पडला. यामुळें भांडवलशाहीप्रमाणे धर्मावरचें गंडांतर टळलें. फ्रान्समध्यें जमीनदारी आजीहि थोडीबहुत शिल्लक उरली आहे. राजपदाची स्थित्यंतरें झाली. लोकसत्ताक राज्य स्थापल्यानंतर राजपदाने तीनवेळ उचल खाल्ली. परंतु १८७० पासून आजपर्यंत फ्रान्समध्यें ( रिपब्लिक ) राजविहीन राज्यघटनाच अमलांत राहिली आहे. असो. धर्माचें कसें काय झालें तें आतां पाहूं.

**प्रॉटेस्टंट पंथाचा लौकिक**

राज्यक्रांतीला प्रारंभ होण्यापूर्वी फ्रान्समध्यें रोमन क्याथोलिक धर्मपंथ दृढमूल झाला होता. देशांत थोडेसे प्रॉटेस्टंट कॅल्विनिस्ट वगैरे इतर ख्रिस्ती होते. ख्रिस्ती नव्हत असे कांही थोडे यहुदी ज्यूहि होते पण ते खिसगणतींत घेण्याइतके नव्हते. ते आपल्या धर्माचा प्रसार करीत नसत यामुळें त्यांना भिण्याचें कारण नव्हतें. कोणालाहि स्वतःला प्रॉटेस्टंट म्हणवून घेण्याचा कायदेशीर हक्क होता, पण असे उघडपणें प्रॉटेस्टंट म्हणून मिरविणारे थोडेच होते. जे जे होते त्यांना कोणत्याहि प्रकारची मान-मान्यता नव्हती. शिवाय त्यांच्या

अंगावर कोणी हात टाकला तर कायद्याचें संरक्षण त्यांना फारसे लाभत नसे. तथापि त्या काळचे उदारमतवादी तत्ववेत्ते मात्र प्रॉटेस्टंट लोकांना फार चाहत. पोपचा जुलूम मनांतून न आवडणारे पण तो निमूटपणे सोसणारे लोक, हेच उद्यां त्या जुलमाविरुद्ध बंड करणारे वीर ठरतील असा प्रॉटेस्टंटांचा लौकिक उदारमतवादी लोकांत असे. चौदावा व पंधरावा लुई यांनी प्रॉटेस्टंट लोकांना जरब दाखविली. सोळावा लुई देखील रोमन क्याथोलिक पंथाचा अनुयायी व अभिमानी; पण त्यानें क्रांतीच्या तोंडीं नेमलेला मुख्य प्रधान फडणवीस हा प्रॉटेस्टंट होता!

क्याथोलिक धर्मपंथाची घटना मोठी सुदृढ होती. तिला राजकीय व धार्मिक महत्त्व असून, शिवाय आपल्या स्वतंत्र साधनांनी ती अतिशय संपत्तिमान होती. राजाकडून एक पैचीहि प्राप्ति तिला नसल्याने ती वेळीं राजालाहि जुमानीत नसे. मात्र या प्रमाणात या संघटनेला लोकप्रियता लाभली नव्हती. धर्माधिकाऱ्यांमध्यें श्रीमंती व गरीबी यांतील अंतर फारच असल्यामुळें कनिष्ठ आपल्या वरिष्ठांना पाण्यांत पाहात, आणि क्रांति घडून येण्याला हेंहि एक कारण होतें. "राजाइतकें प्रबळ आणि राजाइतकेंच लोकांना अप्रिय" असें या वेळच्या धर्ममंडळाचें वर्णन करण्यांत येतें. समस्त धर्ममंडळाला सरकारी करपट्टींची माफी असे; व राजमंडळाच्या बरोबरीचा आपला मान प्रदर्शित करण्याकरितां हें धर्ममंडळ आपला एक प्रतिनिधी राजमंडळांत नेमीत असे. धर्ममंडळाला अनुकूल म्हणून सांगण्यासारखी एक मात्र गोष्ट अशी कीं, विद्यापीठें पाठशाळा वगैरेंच्या द्वारें तें शिक्षणाचा फैलाव करी. अगदीं उत्पन्नाच्या मानानेंच नव्हे तरी पण थोडा बहुत दानधर्म त्याच्या हातून होई, आणि दयाबुद्धीने आर्त दुःखी यांचा परामर्षहि थोडा बहुत त्याजकडून घेतला जाई.

सन १७८९ च्या पूर्वीपासून फ्रान्समध्यें उच्च श्रीमंत व सुशिक्षित या तीनहि वर्गांची धर्मश्रद्धा ढासळूं लागली होती. कोणी बुद्धिमान किंवा

विनोदी लेखकांनीं धर्मावर हल्ला चढविला तर त्याला टाळ्या मिळत व धर्माचेंच हसूं होई. हास्यकारक चित्रें व कविता यांच्या द्वारेंहि धर्मनिष्ठेची टवाळी होत असे. शहरांपेक्षां खेडेगावांतून धर्मश्रद्धा अधिक आढळे. पण ती श्रद्धा आंधळी होती. म्हणजे फ्रान्समध्यें खिस्ती धर्माचा प्रवेश होण्यापूर्वीचीं बरीचशीं तत्त्वें व आचारविचार हे खेडवळ पाळीत, पण मनाची खोटी समजूत मात्र करून घेत कीं आम्ही खिस्ती धर्माचेंच आचरण करीत आहों. खेडवळ शेतकरी लोकांचें व कनिष्ठ धर्माधिकाऱ्यांचें सख्य असे. कारण शिक्षण धर्मादाय लग्नविधि दफनविधि क्रियाकर्मांतर हीं सर्व या अधिकाऱ्यांच्या हातीं असत. आणि ते औषधोपचार करीत व सांगत. गरीब भाविकांना धर्मविधिपालनाला, व श्रीमंत अधार्मिकाला त्या विधींची माफी देण्याला, मिळून दोनहि बाजूंनी ते लोकांच्या उपयोगी पडत.

**बडव्यांचा उच्छेद**

रूसो व्हॉल्टेअर वगैरे लेखकांनीं धर्ममंडळाविरुद्ध पुष्कळ लिहिलें. पण तें नास्तिकवाद पसरविण्याकरितां नव्हे. त्यांचें म्हणणें मनुष्याला धर्म म्हणून हवा. पण व्हॉल्टेअरला धर्माधिकाऱ्यांच्या जुलमाचा उच्छेद करावयाचा होता, तर रूसोला प्रचलित खिस्ती धर्माला त्याचें मूळचें साधें स्वरूप प्राप्त करून द्यावयाचें होतें. व्हॉल्टेअरचें तर असें मत होतें कीं "राष्ट्र बलाढ्य पण शांततामय राहावयाचें तर कायद्यानें धर्म व राष्ट्रीय सरकार यांची सांगड घातली पाहिजे." मात्र सर्वसाधारण सुधारकाचें मत असें कीं, "सहिष्णुता व बुद्धिस्वातंत्र्य यांवरच धर्माची बैठक बसविणें अवश्य आहे. धर्ममंडळानें परलोकच्या गोष्टी बोलण्यापेक्षां विद्यमान समाजाला नीतिशिक्षण द्यावें. सार्वजनिक पैशांतून ठरीव सार्वजनिक धर्मविधि होण्यास हरकत नाहीं." १७८९ सालीं स्टेट्स–जनरल भरविली त्या वेळीं, गावगन्ना लोकांनी गाऱ्हाणीं व मागण्या यांचे अर्ज वर पाठविले त्यांतहि धर्ममंडळाचा उच्छेद करावा अशी

मागणी केलली नव्हती; फक्त मतस्वातंत्र्यावर फारसा जोर न देतां रोमन-क्याथोलिक पंथ अबाधित राहावा इतकेंच मागितलें होतें. आणि १७८७ मध्यें राजानें क्याथोलिक नाहींत अशा लोकांना सहिष्णुतेचें. आश्वासन दिलेंहि होतें.

तात्पर्य १७८९ चे सुमारास धर्मसंबंधीं लोकमताचें वर्णन करावयाचें तर तें असें करता येईल—"असहिष्णुतेचा धर्मछळाचा प्रखर उन्हाळा संपला होता. धर्मविरोधाचा पर्जन्य पडण्याला सुरवात झाली नव्हती, मग त्याच्या पुरांत धर्म वाहून जाऊन नष्ट होण्याची भीति कोठून असेल? सहिष्णुतेचे थंड वारे वाहू लागले होते. आणि धर्मश्रद्धेवर बुद्धिस्वातंत्र्याचें दाट पटल आल्यामुळें तिचें तेज लोपलें होतें. राजकारणांत राजा असावा पण प्रजाजनांत समता असावी असें लोकमत होतें, तसेंच धर्म असावा पण धर्ममंडळाचा जुलूम नसावा इतक्या सुधारणेचीच तूर्त लोकांची मागणी होती."

स्टेट्स-जनरलच्या तीन वेगळ्या लोकसभांचें एकीकरण घडवून आणण्यांत प्रथम कनिष्ठ व नंतर वरिष्ठहि धर्माधिकाऱ्यांनी मदत केली. पुढे नॅशनल असेंब्ली व राज्यघटनामंडळ यांनी प्रथम ज्या सुधारणा केल्या, त्या कनिष्ठ धर्माधिकाऱ्यांच्या फायद्याच्या केल्या, आणि सहिष्णुतेच्या पलीकडे एक पाऊल टाकून प्रॉटेस्टंट वगैरे पंथांना सार्वजनिक रीतीनें धर्माचार व उपासना विधी आचरण्याचा हक्क दिला. समानतेच्या जाहीरनाम्याविरुद्ध कनिष्ठ काय वरिष्ठ काय कोणाहि धर्माधिकारी वर्गानें फारशी तक्रार केली नाहीं.

१७८९ च्या ऑगस्ट महिन्यांत राज्यघटनामंडळानें दोन तीन महत्त्वाचे कायदे केले. त्यांचा घाला सरंजामी इनामी पद्धतीवर पडला. रयतेनें सरकारी जमीनधाऱ्याचा दशमांश धर्ममंडळाला देण्याची वहिवाट होती ती मोडून टाकण्यांत आली. तथापि असेंहि ठरविण्यांत आलें कीं, धर्ममंडळाच्या नित्यनैमित्तिक कार्याकरितां लागणाऱ्या खर्चाची तजवीज स्वतः सरकारानें

हातीं घेऊन ती उत्पन्नाच्या इतर बाबींतून करावी. सरकारानें धर्माधिकाऱ्यांचे पगार व इतर वेतन ठरवून द्यावें. त्याहून वेगळा वसूल त्यानी करूं नये. त्याना जादा अधिकार किंवा माफीचे हक्क वगैरे कांहीं असू नयेत. तसेंच व्यक्तिशः कोणाहि धर्माधिकाऱ्याला जास्तींत जास्त किती वार्षिक उत्पन्न असावें यालाहि मर्यादा घालण्यांत आली.

**धर्ममंडळाचा क्रांतीला विरोध**

धर्मव्यवस्था सुधारावी, पण धर्म बुडविलाच पाहिजे असें नाहीं, असेंच मत क्रांतिकारकांचे होतें. आणि झाल्या त्या धर्मसुधारणाविषयीं आनंद प्रदर्शित करण्याकरितां लोकसभेनें सार्वजनिक संगीत प्रार्थना करविल्या. या प्रसंगाच्या स्मरणार्थ पदकें तयार केली. १७८९ च्या नोव्हेंबरांत मात्र लोकसभेनें एक महत्त्वाची गोष्ट केली ती अशी कीं, धर्ममंडळाच्या ताब्यांत असलेली कायमनिधी स्वरूपाची व संग्रहीत मालमत्तेची जप्ती करून फ्रेंच सरकार हेंच त्याचें मालक ठरविलें. कारण या वेळीं सरकारचे जवळजवळ दिवाळे निघण्याचीच पाळी आली होती. हें करतांना कनिष्ठ धर्माधिकाऱ्यांचे सर्वस्वी नुकसान होऊ नये अशी मात्र खबरदारी लोकसभेने घेतली. कारण या वर्गाचें साहाय्य लोकसभेला आपल्या राजकीय कलहांत पूर्वी मिळाले होते व पुढेहि हवे होते. या वर्गाच्या सुखसोयीकरतां सभेने असे ठरविले कीं, धर्माधिकाऱ्याच्या मिळकतीला जशी कमाल मर्यादा तशीच किमान मर्यादाहि असावी. कनिष्ठ धर्माधिकाऱ्यालाहि सालीना १२०० फ्रँक वेतन, एक लहानसे घर व छोटीशी बाग असावी, असें ठरवण्यांत आले. यामुळे आपला मानमरातब व चैनबाजी हटली या रागावर वरिष्ठ धर्ममंडळाने राज्यक्रांतीला विरोध करण्याला येथपासून सुरवात केली. श्रीमंत अधिकाऱ्यांची मिळकत विकून लोकसभेने ४० कोटींची रक्कम वसूल केली!

प्रथम राज्यघटनासमितीने धर्ममंडळाला सरकारचे तें एक अंग अशी मान्यता दिली होती. परंतु मानवी समानतेच्या हक्काचा जाहीरनामा

निघाल्यावर हें धोरण त्याशी विसंगत दिसू लागले. तेव्हां अनेक आढेवेढे घेऊन लोकसभेने आपल्या धोरणाला मुरड घालण्याला प्रारंभ केला. इकडे धर्माधिकाऱ्यांनीहि असा गिल्ला केला कीं, आमच्या मंडळावर जें अतिक्रमण तें खरोखरी धर्मावरच अतिक्रमण होय. पण सर्वसामान्य जनतेने ही तक्रार उचलून धरली नाहीं.

या सर्व प्रकाराने पोप महाराजांना भीति वाटूं लागली. तोहि राज्य-क्रांतीचा शत्रू बनूं लागला. कारण क्रांतिकारकांनीं धर्ममंडळाचे अधिकारच काय पण खुद्द पोपच्या ताब्यांतील कांहीं मुलूखहि आपल्या ताब्यांत घेतला. जनतेला पोपचा वचक फार; तथापि त्याच्या आज्ञेपेक्षां साम्यवादाच्या जाहीर-नाम्याला आज अधिक महत्त्व द्यावें असें तिला वाटूं लागले. पोपने या जाहीरनाम्याला उघड विरोध केला. "धर्माच्या नांवाने आज्ञा करण्याचा हक्क ईश्वराचा व त्याचा प्रतिनिधी मी म्हणून माझा" अशी घोषणा त्याने केली. बुद्धिस्वातंत्र्याने शब्दप्रामाण्याला हरकत येते ही त्याची तक्रार. "धर्माज्ञेचें उल्लंघन करणाराला शिक्षा करण्याचा किंवा न करण्याचा अधिकार आपलाच आहे, तो इतरांना नाही, आणि कॅथोलिक नसलेल्या लोकांना नोकऱ्या-चाकऱ्या देणें ही अप्रत्यक्षरीत्या माझ्या हक्कावर गदा आहे" अशीहि तक्रार त्याने केली, पण पोपची ही तक्रार मनावर कोण घेणार? राजा राजमंडळ व धर्म-मंडळ यांजकडून लोकसभेविरुद्ध उघड पाठिंबा मिळणें शक्य नव्हतें. बरें, या लोकांच्या संमतीशिवाय आपण कांहीं फर्मान काढावें तर एकदम दुही पडणार. म्हणून क्रांतीला विरोध करण्याचे मनांत होते तरी ती गोष्ट पोपलाहि जपूनच करावी लागली.

**गरिबाला गोत नाहीं**

ता. १२ जुलै १७९० रोजीं राज्यघटनामंडळाने एक अत्यंत महत्त्वाचा कायदा केला व त्याला राजानेहि २४ ऑगस्ट रोजीं संमति दिली. या कायद्यांत मुख्य कलमें अशीं होतीं—बिशपच्या दर्जाचे धर्माधिकारी निवडणुकीने नेमले जावें. जो

कॅथेलिक पंथाचा नाही त्यालाहि हा निवडणुकीचा अधिकार मिळावा. मतदारी फक्त कॅथॉलिकांनाच असावी अशी स्पष्ट उपसूचना आली ती नामंजूर झाली. इतके मात्र झालें कीं, मतदारीच्या या योजनेमुळें, ज्या गरीब लोकांना राजकीय मतदारसंघांत स्थान नव्हते त्यांचें तें स्थान धार्मिक मतदारींतून नाहींसें झाले. म्हणजे गरीबाला गोत नाही असा थोडासा प्रकार झाला व तितक्यापुरता साम्यवादाच्या जाहीरनाम्याला कमी-पणा आला. नव्या योजनेंत धर्माधिकाऱ्यांच्या जागा कमी करून त्यांच्या अधिकाराच्या स्थलमर्यादा वाढविण्यांत आल्या. धर्माधिकाऱ्यांचे पगार ठरवून त्यांना जनतेचे नोकर ठरविण्यांत आलें. सार्वजनिक धर्मव्यवस्थेच्या सरकारी खर्चाचें बजेट दहा कोटींचें ठरलें, यावरून स्वतः क्रांतिकारकांनीच धर्माचा संबंध राज्यकारभारांत किती ठेवला हें दिसून येईल. धर्माधिकाऱ्यांनी आपली नेमणूक पोपकडे कळविण्यास हरकत नसावी असें ठरलें. पण ते इतक्याच करता कीं, फ्रान्सप्रमाणें इतर राष्ट्रांतील धर्माधिकाराचे एक प्रतीक असा मान पोपला आहे व तो एकट्या फ्रान्सला काढून घेता येत नाहीं म्हणून.

राष्ट्रीय सरकाराच्या मानानें धर्ममंडळाकडे आलेले गौणत्व इतरहि एका रीतीने प्रत्ययाला आलें. लोकसभेने राष्ट्रनिष्ठेच्या एका नव्या शपथेचा मसुदा तयार केला. या मसुद्याप्रमाणें सर्व धर्माधिकाऱ्यांना शपथ घेणें भाग आहे असें ठरविण्यांत आलें. शपथ अशी होती, "मी लोकसभेने (राज्य-घटनासमितीने) बनविलेल्या नव्या राज्यघटनेशीं इमानदार राहीन." या शपथेंतूनच पुढें भांडणें निघालीं व राज्यक्रांतीला विरोधी वातावरण निर्माण होऊं लागलें. राज्यक्रांतीनें धर्म बुडविला नसला तरी धर्माला प्रतिस्पर्धी अशी एक निष्ठा फ्रान्समध्यें या सुमारास उत्पन्न झाली होती. निष्ठा म्हणजे तो एक प्रकारचा धर्मच. आणि प्रत्यक्ष निष्ठा प्रगट करणाऱ्या आचाराला धार्मिक आचाराचें स्वरूप येऊं लागले होते. ही निष्ठा म्हणजे राष्ट्राभिमान!

**धर्मापेक्षां राष्ट्र मोठें**

तत्त्ववेत्त्यांनीं निखालस धर्मलंडतेपेक्षां या नव्या निष्ठेचा मतप्रसारच अधिक केला होता व तो अधिक फलद्रूप झाला होता. राष्ट्रीय संमेलन (फेडरेशन) पारिसमध्यें भरलें तेव्हां धर्माधिकारी नसणाऱ्या अशा लोकांनी देखील ही राष्ट्रनिष्ठेची शपथ आत्मस्फूर्तीनेंच घेतली होती. तिचा मंत्र 'ऐक्य स्वातंत्र्य व समता' हाच होता. हा मंत्र म्हणून शपथ घेण्याकरितां या समारंभाचे वेळीं पितृ-देशाच्या नांवाने वेदी व स्थंडिलें उभारलीं होतीं त्यांना प्रदक्षिणा घालून हा मंत्र म्हटला जाई. या वेदींचा व स्थंडिलांचा आकार कॅथो-लिक पंथाने ठरविलेल्या आकारासारखा नव्हता, वेगळा होता, हें लक्षांत ठेव-ण्यासारखें आहे! या समारंभांत कनिष्ठ धर्माधिकाऱ्यांनी स्वतः भाग घेऊन राष्ट्रदेवतेला पोपच्या बरोबरीच्या सन्मानांत भागीदार केलें होतें. या शपथ-विधीच्या प्रसंगीं ज्या सार्वजनिक प्रार्थना आगेमागें होत त्या कांहीं प्रार्थना मंदि-रांत तर कांहीं या वेदी-स्थंडिलाजवळहि होत. तात्पर्य, **क्याथोलिक पंथा-पेक्षां ख्रिस्ती धर्म मोठा, व ख्रिस्ती धर्मापेक्षां राष्ट्रधर्म मोठा** अशी विचारसरणी बळावत चालली होती. नवीन जन्मलेल्या मुलाच्या ख्रिस्तधर्मदीक्षे-बरोबरच राष्ट्रधर्मदीक्षेचा विधि (सिव्हिल बाप्तिस्मा) करण्यांत येऊं लागला.

पोप महाराजांनी एक चौकशीमंडळ नेमून या नव्या राष्ट्रघटनेची, विशेषतः त्यांतील धर्ममंडळविषयक कलमांची, छाननी करविली. तींत असें निष्पन्न झालें कीं, पोपची सहकारिता व संमति न घेतां अशी धर्मव्यवस्था करणें म्हणजे तो एक नवा धर्म स्थापणेंच होय. इतकें झालें तरी पोप महा-राजांनी फ्रान्सवर बहिष्कार व धार्मिक छळ यांचें हत्यार न उपसतां प्रथम फक्त तक्रारी खलिते पाठविण्यास सुरवात केली. पण हें युद्ध टळलें नाहीं. ज्या बिशप लोकांनीं नवी शपथ घेतली त्याना पोपनें बहिष्कृत केलें. पोपच्या दरबारीं असलेला फ्रेंच राजाचा वकील पोपच्या भेटीला गेला त्याला भेट नाकारण्यांत

आली. राजदरबारीं असलेला पोपचा वकील रोमला परत बोलावण्यांत आला. अखेर खुद्द लुईच्या राजवाड्यांत पोपच्या नांवाची कापडाची एक बाहुली करून ती जाळण्यांत आली.

**धर्ममंडळांत फूट**

धर्ममंडळांत उघडा उघडी दोन तट पडले. पोपचे कट्टे अनुयायी व क्रांतीचे कट्टे अनुयायी. शपथ घेण्याचें नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांना क्रांतिद्रोही असें नांव पडूं लागलें. टॅलेरॉं हा स्वतः बिशप असतां त्यानें शपथ घेतली आणि त्यानें उदार-मतवादी बिशपांचें पुढारीपण घेऊन धार्मिक मतस्वातंत्र्याचा पाठपुरावा सुरू केला. नागरिकत्वाचा व धर्मपंथाचा कांहीं संबंध ठेवू नये असा सल्ला त्यानें लोकसभेला दिला. तो म्हणे, "खुद्द राजानेंहि हवा तो धर्म पाळावा तसाच प्रजेनेंहि." क्रांती टिकविण्याला तुम्हाला लोकांचें साहाय्य पाहिजे तर तुम्ही त्यांना धार्मिक मतस्वातंत्र्य दिलें पाहिजे असा एक प्रकारचा खोडा क्रांतीच्या पुढाऱ्यांना घालण्यांत आला. म्हणजे, हें मतस्वातंत्र्य एक प्रकारच्या धाकानें किंवा लुचपतीनें मिळविण्यांत आलें असें उघड झालें. पण एकेका वेळीं फक्त कोणत्या तरी एकेका गोष्टीला महत्त्व असतें त्याप्रमाणें तें महत्त्व यावेळीं धर्मावरून उठून क्रांतीला प्राप्त झालें होतें.

क्रांतीला मान्यता देणारे प्रॉटेस्टंट अर्थातच बुद्धिस्वातंत्र्याचे भोक्ते होते. ज्यूवगैरे लोकांना जे थोडेसेंच स्वातंत्र्य मिळालें त्यानेंच ते खूष झाले. प्रश्न काय तो क्याथोलिक पंथीयांचा उरला. कारण लोकसभेच्या नव्या धोरणानें जें कांहीं नुकसान् व्हावयाचें होतें तें फक्त त्यांचेंच. नव्या घट-नेला मान्यता न देणें, मान्यतेची शपथ न घेणें, हा राष्ट्रद्रोह ठरू लागला. यामुळें तशा कांहीं लोकांनी, सरदार उमरावाप्रमाणें, देशत्याग आरंभला. मात्र या उमरावांप्रमाणें त्यांना बरोबर नेण्याला संपत्ति अशी कांही नव्हती! देश-त्याग न करतां जे जागा धरून बसले त्यांनीं सरकाराकडून पगार घेण्याचें ना-

कबूल करून तत्वनिष्ठा प्रगट केली. ते तत्वाकीरतां स्वार्थत्यागाला तयार झाले होते. छळामुळें त्यांच्या प्रतिक्रियेला तेज चढलें होतें. शपथ न घेतां जाहिर रीतीनें धर्मकार्ये करणाऱ्या पुरोहितांवर उपाध्यायांवर व उपदेशकांवर खटले होऊं लागले. शपथ घेणारे व न घेणारे यांच्यांमध्यें यादवी सुरू झाली. कांहीं परगण्यांतून शपथ न घेणाऱ्या सनातनी धर्माधिकाऱ्यांना जनतेचें पाठबळ मिळालें. पण जेथें जनता क्रांतिप्रिय होती तेथें तिनें कायद्यापलीकडे जाऊन त्यांचा छळ आरंभिला. देशत्याग करावा तर क्रांतिद्रोही म्हणवून घ्यावें, आणि देशांत राहावें तर शिक्षा सोसावी, असा दुहेरी पेंच त्यांना पडला. धर्माधिकाऱ्यांच्या छळानें क्याथोलिक पंथावरहि प्रतिक्रिया होऊं लागली. लग्नकार्ये जन्ममृत्यू यांच्या नोंदीच्या वह्या ठेवणें व लिहिणें यांचें काम मुलकी अधिकाऱ्यांकडेहि देण्यांत आलें. विवाह हा धार्मिक विधी नसून मुलकी करार आहे, अर्थात् घटस्फोट मिळवून लग्नबंधनांतून सुटका करून घेतां येते, हें मत प्रभावी झालें.

**क्याथॉलिक पंथावर गंडांतर**

नवीन नॅशनल कन्व्हेन्शन निवडली गेली तींत सरसकट सर्व जनतेनें मतदारी गाजविली. यामुळे निवडून आलेले उमेदवार फारसे सुशिक्षित नव्हते. १३ नोव्हेंबर १७९२ रोजीं धर्ममंडळासंबंधाचें अंदाजपत्रक फेटाळून लावावें अशी सूचना आली ती नापास झाली. २३ मार्च १७९३ रोजीं असा ठराव करण्यांत आला कीं, धर्माधिकाऱ्यावर लष्करी नोकरीची सक्ती करूं नये. कन्व्हेन्शनचें हत्यार, शपथ न घेणारे अर्थात् पोपचे अनुयायी म्हणून क्रांतीचे शत्रु गणलेले, यांजवरच उगारण्यांत आले होते. फ्रेंच प्रधानमंडळाचा एक सेक्रेटरी रोम येथें गेला असतां त्याचा खून झाला. आणि मारेकऱ्यांचा शोध लावून त्यांना शिक्षा दिली नाही यावरून त्यांत पोपचे अंग असावें असें अनुमान पारीसच्या लोकांनी केले ! या सुमारास ला व्हेंडी प्रांतांतील लोकांनी

लष्करी नोकरीच्या जुल्माला कंटाळून बंड केलें हें पाहून, आपला फायदा साधण्यासाठीं राजपक्षपाती व पोपपक्षपाती लोकांनी त्याला उत्तेजन दिलें. यानें आगींत तेल पडलें. इकडे परराष्ट्राची फ्रान्सवर स्वारी आणि इकडे खुद्द राष्ट्रांतच बंड, या संयोगामुळें शपथ न घेणाऱ्यांवर सर्व पॅरिस शहर चवताळून उठलें. कायद्याचा छळ अधिक कडक होऊं लागला. मुलकीऐवजीं लष्करी न्यायकोर्टांकडून चौकशी व शिक्षा सुरू झाल्या. या आगीची झळ शपथ घेणाऱ्यांनाहि बाधली. अशा लोकांनी क्रांतीविरुद्ध संगनमत केल्याचा यत्किंचितहि पुरावा मिळाला तरी त्यानाहि शिक्षा देण्यांत देई. केवळ शपथेने त्यांचा बचाव होईनासा झाला. जहाल पक्ष म्हणे "सगळेच धर्ममंडळ बुडविले पाहिजे. उडदांत काळे आणि गोरे कोणी निवडीत बसावें?" जहालांचा प्रति-स्पर्धी जो जिरॉंडिन पक्ष त्याचे हे सहकारी असाहि दोषारोप धर्ममंडळाला बाधू लागला. मतस्वातंत्र्याचा वारा प्रथम तत्वज्ञानी लोकांनी उठविला त्याला पूर्वी खाद्य मिळाले नव्हते तें आतां मिळाले. प्रार्थनामंदिरें व धर्ममंडळाचे मठ यांत शिरून उघडपणें हल्ले व नासधूस करण्यांत येऊं लागली. धर्माधिकाऱ्यांनी लग्न करू नये असें बंधन होते तें मोडण्यांत येऊं लागले. दोन हजार मठवासी लोकांनी याचा फायदा घेतला. याचा अर्थ कॅथोलिक पंथाच्या आद्य तत्त्वांचा उच्छेद होऊं लागला.

लोक म्हणूं लागले, "बुडत आहे तो खरा धर्म नव्हे तर ढोंगीपणा बुडत आहे. राष्ट्रप्रेमाचा धर्म हाच खरा धर्म. सत्य बुद्धिस्वातंत्र्य हीं धर्माची खरी केंद्रें किंवा प्रतीकें असें म्हणण्यांत येऊं लागले. देवळाबाहेर धर्माधिकाऱ्यानी नाग-रिकांचा साधा पोषाखच करावा असा आग्रह धरण्यांत येऊं लागला. या प्रतीकांचे उत्सव व समारंभ होऊं लागले. निसर्गाची उपासना हाच खरा धर्म असा सिद्धांत पुढें येऊन, जुने पंचांग काढून टाकून एक नवे पंचांग या अनुरोधाने करण्यांत आले. वर्षाचे महिने १२. दर महिन्याचे दिवस ३०.

दर रविवाराऐवजी दर १० वी तारीख शाबाथ म्हणजे हा विश्रांतीचा धार्मिक दिवस. जुन्या पंचांगांत सणवारांना धार्मिक साधुसंतांची नांवें होतीं तीं काढून टाकून एका प्रतिभासंपन्न राष्ट्रभक्ताने त्याना सृष्टिधर्मानुरूप नवी नांवें दिली!

**धर्मोच्छेदाची लाट**

शिक्षण खात्याचें मुख्य काम म्हणजे जुन्या धर्माविरुद्ध मतप्रसार करणें हें ठरलें. मठवासी महंत व महंतिणी यांच्याकडील शिक्षणाचें काम काढून घेण्यांत येऊं लागले. साधुसंतांचे पुतळे उखडून काढून तेथें राष्ट्रभक्तांचे बसविण्यांत येऊं लागले. पण या सर्व गोष्टींत खुद्द जनताच पुढाकार घेई, कन्व्हेन्शन सभा फक्त जनतेच्या उद्गारांचा प्रतिध्वनी कायद्याचे रूपाने काढी. ही स्थिति पाहून कांहीं धर्माधिकाऱ्यांनी आपण होऊन राजीनामे दिले. लौकरच ख्रिस्तमाता मेरी इचा पुतळा काढून टाकून त्या जागीं बुद्धिस्वातंत्र्याचा पुतळा उभारण्याचा समारंभ झाला! चहूबाजूस व्हॉल्टेयर रूसो फ्रँकलिन यांचे पुतळे, व मध्यें सत्याच्या नांवची चिठ्ठी मारलेली धगधगणारी एक मशाल! या दृश्याचा अर्थ उघडच आहे. स्वातंत्र्यमूर्ति म्हणून एक सुंदर स्त्री मिरवणुकीला आणून तिच्या डोक्यावर क्रांतिकारक टोपी घातली होती. आणि जहाल क्रांतिकारकांनी तिला प्रणाम करून, तिजपुढें नाचून, वीररसप्रधान गाणीं म्हटलीं. अर्थात् हे सर्व सजविण्याला कुशल नटनटी व नाटकगृहांचे व्यवस्थापक यांच्या कलानैपुण्याचें साहाय्य घेतलें होतें. प्रॉटेस्टंट वगैरे धर्मपंथांचें सहजच या वेळीं फावले. देवळांत प्रार्थनेला कधीं न जाणाऱ्या प्रॉटेस्टंट लोकांना तसें करण्याचा जवळ जवळ परवानाच मिळाला. २४ नोव्हेंबर १७९३ रोजीं पॅरिसच्या कम्यूनने तर आपल्या हद्दींतील एकूणएक धार्मिक मंदिरें, सार्वजनिक व खाजगीहि, बंद करण्याचा ठराव केला. पॅरिसचें उदाहरण बाहेर देशभर गिरविले जावें अशाविषयीं क्लब व संघ यांच्या द्वारें मतप्रसार सुरू झाला. मात्र हा उच्छेद विशिष्ट धर्मपंथाचा होता. तो खरा आस्तिक्यबुद्धीचा उच्छेद नव्हता.

इतकेंच नव्हे तर, पॅरिसमधील बेताल नर्तकींना देवतांचे शृंगार घालून मिरविणें या गोष्टींचा निषेध करून, फ्रांसमधील इतर भागांत फक्त अशा गृहिणींनाच भूषविले व पूजाविले कीं ज्यांच्या शीलाबद्दल चारित्र्याबद्दल स्थानिक जनतेची आदरबुद्धीच होती.

धर्ममंडळाच्या उच्छेदाची ही लाट एकदम एवढी मोठी उठली कीं तिजविरुद्ध रोबेस्पिअरसारख्या जहाल क्रांतिकारकांनींहि तक्रार केली. आम्ही पोपचे शत्रु म्हणून कांहीं खऱ्या ख्रिस्तीधर्माचे शत्रु नव्हे. क्रांतीपुरती जगाची अप्रियता आम्ही सोसूं. कारण ती तत्त्वनिष्ठा आहे. पण नास्तिकवाद किंवा ख्रिस्ती धर्माचा उच्छेद करणें ही कांहीं क्रांतिकारकांची तत्त्वनिष्ठा होऊं शकत नाहीं व नाहींहि. रोबेस्पिअरच्या मताचेच इतर सर्व क्रांतिकारक नव्हते. पण रोबेस्पिअरच्या मताचे लोक परगण्यानिहाय अनेक असल्यामुळें ठिकठिकाणीं वादाची द्वंद्वें सुरू झालीं. आणि ला व्हेंडी व ब्रिटनी या प्रांतांतील बंडाच्या मुळाशीं तर हा धार्मिक मतभेदच होता. तथापि सर्वसाधारण जनता बरीचशी उदासीन व तटस्थ होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. उद्गार उघड ऐकूं येत ते फक्त दोहों बाजूंच्या जहाल एकांतिक मताच्या लोकांचे. रोबेस्पिअरने परमात्म देवतेचा म्हणून एक मोठा समारंभ मुद्दाम करविला. आणि राज्यक्रांतीला नास्तिक्याचें दूषण नाहीं हें जगाला पटविण्याकरितां ७ मे १७९४ रोजीं लोकसभेकडून एक ठराव करून घेतला. त्याचीं पहिलीं तीन कलमें अशीं होतीं :—

(१) फ्रेंच लोक हे ईश्वराचे म्हणजे परमात्म्याचे अस्तित्व आणि आत्म्याचे अमरत्व हे सिद्धांत मान्य करतात.


(२) मात्र खरी ईश्वरोपासना म्हणजे मनुष्य धर्माचे पवित्र आचरण.

(३) या मनुष्य धर्मांत जुलूम जबरदस्ती विश्वासघात यांचा उच्छेद, तसेंच कमकुवत लोकांना न्यायनिष्ठ साहाय्य अनाथाचें रक्षण पतिताचा उद्धार सत्यप्रियता व न्यायबुद्धि यांची उपासना या गोष्टींचा समावेश होतो.

**धर्माचें पुनरुज्जीवन** तसेंच पूर्वी सृष्टिगुणप्रदर्शक उत्सव म्हणून सांगितले त्याऐवजीं मानवी सद्‌गुणप्रदर्शक उत्सव सुचविण्यांत आले. अस्सल जॅकोबिन म्हणविणाऱ्या लोकांनीं रोबेस्पिअरच्या सूचनेला फारसा पाठिंबा दिला नाहीं. ईश्वर न मानणाऱ्या लोकांना बाहेर घालवून द्यावें असाहि ठराव पुढें येणार होता. पण जॅकोबिन लोकांच्या विरोधामुळें तो मागें घ्यावा लागला. या धर्मपंथाचा अग्रणी म्हणून रोबेस्पिअर हा डिक्टेटर ( झोटिंग पातशहा ) होतो कीं काय अशीं भीति वाटूं लागली. त्याच्यावर मारेकरीहि घालण्यांत आले पण तो तेव्हां बाचला. उलट नास्तिकवादाचा एक पुतळा करून तो समारंभाने जाळण्यांत आला ! रोबेस्पिअरच्या ईश्वरनिष्ठेचा उपयोग त्याला धर्ममंडळाची सहानुभूति मिळण्याच्या कामीं झाला. पण स्वतः ईश्वरनिष्ठा पुढें येणें याचा अर्थ विशिष्ट कॅथोलिक धर्मपंथ मागें पडणें असाच लोकांनीं केला. या गोंधळाने अज्ञानी लोक भांबावून जात आणि धूर्त त्या गोंधळाचाच फायदा घेत. धर्ममंडळाचे पगार सुरू होते तरी त्याची व सरकाराची फारकत करावी असे प्रयत्न सुरू होते. हळुहळू शिक्षण संस्थांतून धर्मशिक्षणाचे अंग काढून टाकून त्या जागीं साम्यवादाचा जाहीरनामा, राज्यघटनेचा कायदा, असले विषय शिकवण्यांत येऊं लागले. धर्माधिकारी एखादा गेला तर हळूच त्याच्या जागीं गृहस्थ शिक्षक नेमावा व त्याचें घर याला रहायला द्यावें अशा युक्त्या सुरू झाल्या. दर दहाव्या म्हणजे सुटीच्या दिवशीं मुलांना जमवून त्यांजकडून राष्ट्रभक्तीची गाणीं म्हणवून घ्यावी, नागरिक नीति शिकवावी, असा उपक्रम सुरू झाला.

पण राज्यक्रांति जसजशी पुढें संपुष्टांत येऊं लागली तसतसें फिरून कॅथोलिक पंथाचें प्रस्थ माजूं लागले. रोबेस्पिअरच्या मरणाने रक्तपाताचें युग थांबलें त्याबरोबर क्रांतीहि थांबली. खिस्ती म्हणजे कॅथोलिक धर्म व धर्ममंडळाचे अधिकार यांचेंहि पुनरुज्जीवन थोडथोडे होऊं लागलें.

सम्राट् नेपोलियन



# परिशिष्ट

## [२]

# नेपोलियनचें आपल्या मुलास अखेरचें पत्र

**[ राज्यक्रांतीच्या इतिहासांत शेवटीं नेपोलियन बोनापार्टचा उल्लेख आला आहे. नेपोलियनचा उदय आणि राज्यक्रांतीचा अन्त हीं एकाच काळीं घडलीं. पुढं अवघ्या सोळा वर्षांत स्वतः नेपोलियनचा अस्त झाला. तथापि मृत्युपूर्वी त्याने फ्रान्सच्या व युरोपच्या भावी इतिहासाचें अनुमान बिनचूक केलें होतें आणि भविष्यवाद्याच्या दृष्टीने आपल्या मुलाला मार्गदर्शन केलें होतें, हें खालील लेख वाचून कोणाच्याहि लक्षांत येईल. ]**

नेपोलियन ता. ५ मे १८२१ रोजीं सेंट हेलिना येथें मरण पावला. यापूर्वी सुमारे तीन आठवडे त्याने आपलें मृत्युपत्र केलें. त्यांत लहानांपासून थोरांपर्यंत जेवढे आप्तस्वकीय ऋणानुबंधी मित्र नोकरचाकर असतील त्या सर्वांना त्याने स्मरणपूर्वक लहानमोठ्या देणग्या दिल्या होत्या. त्याच्या मुलासंबंधाने अर्थातच त्यांत मजकूर होता. या मुलाबद्दल बंदिवासांत त्याला अतोनात वाईट वाटे. त्याचा खून होईल काय, त्याला कोणी विष घालील काय इत्यादि नाना कुशंका येत, आणि मायेचे कढ उठवून पोटांत कालवाकालव करीत.

हा मुलगा त्या वेळीं अवघ्या दहा वर्षांचा असला तरी पुढे मोठा होणार; स्वतःचें नशीब जसें शिकंदर ठरलें तसेंच कांहीं तरी सटीने मुलाच्या कपाळीं लिहिलें असेल काय ? अशी आशा मरणाच्या दारीं बसलेल्या नेपोलियनच्या मनांतहि येऊन गेली. म्हणून आपल्या मुलाने मोठेपणीं काय करावें, कसें वागावें, याबद्दल सूचना त्याने मृत्युपत्राच्या अधिकाऱ्यांना तर

दिल्याच; पण स्वतःचें मनोगत पुढे मागे मुलाला लेखी वाचण्यास मिळावें म्हणून त्याने एक सविस्तर पत्रच लिहिलें. आज आपणाला व आपल्या राज्यभ्रष्ट वंशाला पुढे राज्यावर येण्याची यत्किंचितही आशा नसली तरी, "आपल्या झालेल्या छळामुळे नुसत्या युरोपांतच नव्हे तर खुद्द इंग्लंडांतहि लोकमतांत आपोआप सहानुभूतीची प्रतिक्रिया निर्माण होईल व त्याने पुनः राज्यक्रांति होऊन पुनः आपल्या वंशाला राज्यपद मिळेल" इत्यादि भाकीत नेपोलियनने या पत्रांत केलें होतें, व तें पुढे खरें ठरलें; हें पाहिले म्हणजे एक राजकारणी पुरुष या नात्याने मनुष्यस्वभावाच्या त्याच्या खोल व सूक्ष्म ज्ञानाचे कौतुक वाटल्याशिवाय राहत नाहीं. हें सर्वच पत्र इतकें मनोवेधक व बोधप्रद आहे कीं, राजकारणाची आवड असणाऱ्या सामान्य वाचकालाहि तें मनोरंजक वाटेल.

ता. १७ एप्रिल १८२१ रोजीं आपल्या परिवारापैकीं काउंट मांथोलान यास नेपोलियनने जवळ बोलावलें. दोन दिवसांपासून मृत्युपत्र पुरें करण्याचा विषय डोक्यांत घोळत होता, व त्यांतच कांहीं विशेष कल्पना अंतःकरणांत चमकून गेली, त्यामुळे चेहेरा प्रफुल्लित झाला व डोळ्यांतहि एक प्रकारचें पाणी खेळत होतें. ती कल्पना हीच कीं आपल्या मृत्युपत्राच्या अधिकाऱ्यांनी मुलाशीं बोलतांना बापाची त्याच्याबद्दल काय इच्छा होती म्हणून सांगावें ! आणि मुलगा वयांत येईपर्यंत युरोपांत काय काय स्थित्यंतरें होतील ? मांथोलान यास टाकाने लिहावयास सांगून नेपोलियनने पुढील टांचण भराभर तोंडाने सांगितलें, तें असें:—

"सेंट हेलिनासारख्या दूरच्या बेटावर मला बंदिवासांत मृत्यु आला, म्हणून कांहीं तरी कल्पनेने माझ्या मृत्यूबद्दल सूड घेण्याचा विचार माझ्या मुलाने करूं नये. उलट माझ्या अकालीं मृत्यूमुळे उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा स्वतःला फायदा करून घ्यावा ! मी ज्या ज्या गोष्टी केल्या त्या त्याने

सतत मनांत घोळवाव्या व माझ्याप्रमाणेंच फ्रेंच राष्ट्राचा अभिमान बाळगावा. शक्य तितकें शांततेने राज्य करण्याचें धोरण ठेवावें. मी लढाया केल्या म्हणून कांही कारण नसतां त्यानेंहि लढाया उपस्थित केल्या तर हें अनुकरण हास्यास्पद तर होईलच पण मी जणुं कांहींच केलें नाहीं असा त्याचा अर्थ होईल ! त्याला कराव्या लागणाऱ्या लढाया सर्व आयुष्य खपून मीं केल्या व एका अर्थी त्याचे श्रम वांचविले; याकरितां, लढायांमुळे माझ्या मनांतील ज्या इतर गोष्टी करण्याच्या राहून गेल्या त्या त्याने पुऱ्या कराव्या. हें केलें असतां माझ्या मनाच्या भूमिकेंत व्यापक अशी एक विधायक कल्पना होती व माझी विध्वंसक कामगिरी हा त्याच विधायक कामगिरीचा केवळ एक भाग होता, याची सत्यता लोकांच्या नजरेस येईल. महायुद्धासारख्या गोष्टी शतकांतून एकेकदा होतात. माझ्या दुर्दैवाने मला तेंच काम प्रथम अंगावर घ्यावें लागलें. पण आतां शांततेच्या व परानुनयाच्या मार्गानेच जनतेचीं मनें आपलींशीं करण्याचा काळ आहे. फ्रेंच राज्यक्रांतींत लोकांनी इतके अत्याचार केले कीं ज्या कांहीं चांगल्या मूलभूत कल्पना त्यांत होत्या त्याहि नष्ट होण्याची वेळ आली होती. मी पुढे होऊन तो प्रसंग टाळला आणि राज्यक्रांतीमधील बीजभूत मूलतत्त्वें जिवंत ठेवलीं. माझ्या अमदानींत किती तरी नव्या कल्पना मी उदयास आणल्या आहेत कीं, खास माझ्या म्हणून लोकांना केव्हांहि त्यांचें श्रेय माझ्याकडे देतां येईल. म्हणून जें मी पेरलें आहे तें उगवून त्याचें फळ पदरांत पाडून घेण्याचा विचार मुलाने करावा ! इतकें जरी त्याने नीट केलें तरीहि ‘ एक मोठा राजा ’ म्हणून इतिहासांत त्याचें नांव होईल.

हल्ली माझ्या सिंहासनावर बुरबॉन राजे बसले आहेत, पण त्यांना आपलें पद टिकवितां येणार नाहीं. माझ्याकरतां लोकमतांत नक्की प्रतिक्रिया होईल व तीच माझा वंश पुनः गादीवर आणील. नुसत्या युरोपांतच नव्हे तर खुद्द इंग्लंडमधील लोकहि माझ्या बाजूने सहानुभूतीने बोलावयाला लागतील.

आपल्या हातून झालेल्या छळाची थोडी तरी निष्कृति व्हावी अशी पश्चात्तापाची भूमिका इंग्लंडांत उत्पन्न झालेली दिसेल व तीच माझा वंश पुनः गादीवर येण्याला सुवर्णसंधि आणील. अर्थात् घेणाराने शहाणपणाने त्या संधीचा उपयोग केला तर! म्हणून इंग्लंडशीं सलोखा राखण्याकरितां कसेंहि करून त्यांच्या व्यापाराला अप्रतिबंध सुरक्षितता दिलीच पाहिजे. इंग्लंडशीं युद्ध करणें शक्य नाहीं. तेव्हां जगाच्या व्यापारांत इंग्लंडशीं भागीदारीच केली पाहिजे. असें सलोख्याचें धोरण ठेवलें व संभाळलें तरच सार्वत्रिक सहानुभूति मिळून माझ्या मुलाला माझें कार्य पुढे चालवितां येईल.

माझा मुलगा शत्रूंच्या हातीं सध्यां नजरकैदेंत व्हिएन्नाला आहे. त्याची बिनशर्त कशी सुटका होईल ती होवो. पण त्याने हें लक्षांत ठेवावें कीं फ्रान्सच्या शत्रूंची मदत घेऊन त्याने फ्रेंच सिंहासनावर कधींहि पाऊल ठेवूं नये! असें करून त्याला कदाचित् फ्रान्सची गादी मिळेलहि, पण असलें नामधारी जिणें जगण्यांत स्वारस्य काय? राज्य करावयाचें तर असें कीं भावी पिढ्या व इतिहास दुवा देईल. माझ्या कुटुंबांतल्या नातेवाईकांशीं त्याने जिव्हाळ्याचे संबंध ठेवावे व वाढवावे. यूजिन त्याचा सावत्र भाऊ असला तरी तो व जोसेफ त्याला नेहमी हिताचा सल्ला देतील. माझी आई बिचारी जुन्या वळणाची आहे. पण हॉरटेन्स (जोसेफाईन राणीची मुलगी) व कॅरोलिन या नव्या मताच्या आहेत. त्यांची बंदिवासांतून सुटका न झाली तर आपल्या एखाद्या पुतणीशीं त्यानें लग्न करावें. पण फ्रान्सची गादी मिळाली तर त्याने रशियन राजकन्येशीं विवाह करावा. कारण हें एकच राज्य असें आहे कीं त्याच्याशीं रक्तसंबंधाने उत्पन्न केलेला ऋणानुबंध, राजकीय सलोखा व धोरण यांना मदत करील. रशियाची सोयरीक केली तरी त्याचा उपयोग फ्रान्सचे परराष्ट्रीय संबंध दृढ करण्याकडे त्याने करावा. पण रशियांतलीं माणसें फ्रान्सच्या कायदेमंडळांत घुसवूं नयेत! तसें करण्याचें कारणहि नाहीं. फ्रेंच

...राष्ट्र हें साधेंसुधें धोपटमार्गी आहे. त्याला न बुजावितां न बिचकवितां त्यावर सुखाने राज्य करतां येतें. असे प्रामाणिक दिलाचे गरीब लोक दुनियेंत आढळावयाचे नाहींत. आपल्या हिताकरितां कष्ट करणारा, भांडणारा कोण व हितशत्रु कोण हें त्यांना समजतें. पण नेहेमी त्यांच्या विवेचक बुद्धीला उद्देशून बोललें पाहिजे. त्यांच्याशीं आडमुठेपणाने वागलें म्हणजे त्यांनाहि राग येतो, असंतोष उत्पन्न होतो व मग त्याचा स्फोट होतो.

डयूक ऑफ ऑरलीन्स याच्या पक्षाकडूनच फक्त माझ्या मुलाला धोका आहे; कारण या पक्षाचीं मुळें फार पूर्वीपासून रुजलीं आहेत. पण कोणत्याहि पक्षाच्या नादीं न लागतां बहुजनसमाज हाच आपला पक्ष असें माझा मुलगा समजेल तर त्याला कोणालाच भिण्याचें कारण नाहीं. चुका पुष्कळांच्या होतात, पण ज्यांनी देशद्रोह करून देशाचा घात केला अशांखेरीज, कोणी कसाहि असला तरी त्याचें पूर्ववृत्त विसरावें. आणि माणसाची बुद्धिमत्ता, गुण व देशसेवा यांकडेच लक्ष देऊन चांगल्या चांगल्या लोकांचा संग्रह करावा. चेत्रूब्रिऑं याने माझी बदनामी केली असली तरी तो देशभक्त आहे हें विसरूं नये.

सरदार लोकांना फ्रान्समध्यें काडीमात्र महत्त्व नाहीं. त्यांच्या पाठबळावर आपले मनोरथ रचणें म्हणजे वाळूच्या पायावर किल्ला उभारण्याप्रमाणें आहे. ज्याला कांहीं तरी महत्कृत्य करावयाचें त्याने बहुजनसमाजाचाच आश्रय केला पाहिजे. लोकांची संमति हाच सर्व सत्तेचा मूलाधार. म्हणून मूळ केव्हांहि सोडून उपयोगी नाहीं. पूर्वीच्या बुरबॉन राजांनी सरदार, धर्माधिकारी यांच्या मदतीवर विश्वास टाकला. पण अशीं का राज्यें चालतात? पाणी आपली पातळी गांठणारच. आणि ही पातळी म्हणजेच बहुजनसमाज. नागरिक, व्यापारी, सरदार, धर्माधिकारी यापैकीं केवळ कोणाहि एकाकरितां अगर एकाच्याच मदतीने मी कधींहि राज्य केलें नाहीं. जसें एखादें अविभक्त कुटुंब असतें त्याप्रमाणे सर्वांकरितां आणि या सर्व वर्गांच्या मदतीने मी राज्य केलें.

सरदारवर्गाचा व माझ्या सेनापतींचा माझ्या मुलाला राज्य मिळण्याचे दृष्टीने कांहीं उपयोग नाहीं. पण कॅप्टनपासून सैन्यांतले एकूणएक शिपाई मात्र माझ्या वंशाला केव्हांहि भक्तिभावाने स्मरतील. त्यांची सेवाहि मी तशीच केली आहे. त्यांचा खरा प्रतिनिधि जर कोणी असेल तर मीच. मी डिक्टेटर किंवा सर्वाधिकारी होतों. पण तसें होणें अपरिहार्य होतें. याबद्दल पुरावा हा कीं जितकी सत्ता मी मागितली त्यापेक्षां कांहींतरी अधिक सत्ता लोकांनी वेळोवेळीं मला खुशीने दिली आहे. प्रत्यक्ष माझा मुलगा झाला तरी आतां त्या गोष्टी तितक्या सोप्या नाहींत. त्याला पदोपदीं लोकमताचें बंधन जाणवेल व विरोधहि होईल. लोकांना स्वातंत्र्य पाहिजे ही जाणीव राज्य करीत असतां त्यानेहि ओळखलीच पाहिजे. असेंब्लीसारख्या राज्यकारभाराला जबाबदार असणाऱ्या सभेंत तुमच्या बाजूचें हुकमी बहुमत हातीं ठेवतां येईल. पण त्याचा दुरुपयोग करून देशहिताचा घात होणार नाहीं याकडे सदैव लक्ष ठेवलें पाहिजे. फ्रान्सची सगळी प्रजा सनदशीर वागणारी, कायद्याला मान देणारी आहे. म्हणून राज्यकारभारांत लाचलुचपतीचा प्रयोग करण्याची पाळीच येणार नाहीं. राज्यकारभार करणें म्हणजे लोकांना आपलें सार्वजनिक हित व नीतिमत्ता यांचें शिक्षण देणें होय, दुसरें काय? हें विसरून कांहीं तरी असत्पक्षाची उभारणी करणें किंवा डाव खेळत बसणें याने फार तर गांवगुंडी साधेल, खरें राजकारण साधणार नाहीं.

तरुणपणीं फारसा अनुभव नव्हता त्यावेळीं माझ्याहि डोक्यांत कांहीं कांहीं भ्रामक कल्पना होत्या. अर्थात् कालांतराने त्या निघून गेल्या. असेंब्ली-मध्यें वक्तृत्व गाजवून सभा जिंकणारे मोठमोठे वक्ते घेतले तरी त्यांचें खरें राजकीय ज्ञान अगदीं बेताचें, सामान्यच आढळतें. त्यांच्या पद्धतीचें अनु-करण करावयाला जाऊन वक्तृत्वांत त्यांना विरोध करूं नये. कारण जो गर्जून बोलेल त्याला केव्हांहि टाळ्या अधिक. म्हणून अशा रितीने फड अंगावर

घेऊं नये. भावनाप्रधान भाषणांस खरा प्रतिकार तर्कशुद्ध विचारसरणीने व ठाशीव युक्तिवादानेच होतो. भावनांचा कापूस पिंजून निवळ धुकें आणि अभ्रें निर्माण करतात त्यांना तार्किक प्रश्न विचारून व्यावहारिक भूमिकेवर आणलें कीं त्यांच्या व्याख्यानांचा निकाल होतो! माझ्या कौन्सिलांत वक्तृत्वांत माझ्याहून श्रेष्ठ असे पुष्कळ लोक होते. पण दोन आणि दोन चारच होतात ना! असा मी साधा व्यावहारिक सिद्धान्त पुढे मांडून किती तरी वेळां बाजू जिंकली आहे.

फ्रान्समध्यें गुणवान् व व्यवहारचतुर माणसें किती तरी आहेत. त्यांची खरी किंमत जाणून त्यांना योग्य स्थान दिलें पाहिजे. दिवाण होण्याला लायक असा एकजण हल्लीं राजकारणाला विटून स्वस्थ शेतकी करीत आहे. आणि हल्लीच्या कौन्सिलांत एकजण असा आहे कीं तेथून त्याला पिटून तो नांगराला जुंपण्यालायक आहे. नाना गोष्टी लोक सांगतात, त्या सर्व ऐकून घ्याव्या. पण अखेर ऐकावें जनाचें, करावें मनाचें, हें विसरूं नये. अगदीं मूर्खपणाचा सल्ला देखील शहाणींसुर्तीं माणसें तोंडावर तत्त्वज्ञानाचा गंभीर आव आणून देतात. तथापि हें लक्षांत ठेवावें कीं, जिच्याबद्दल समर्थनपर चार वाक्येंहि सांगतां येणार नाहींत अशी जगांत एक तरी वस्तु आहे काय? म्हणून प्रत्येक वस्तूची, प्रत्येक माणसाची, प्रत्येक विचाराची, खरी किंमत किती हें सुवर्णाच्या सूक्ष्म ताजव्याने मनांत नेहमी तोलून ठेवावें व देशांतलीं गुणवान् मातबर माणसें नेहमी आपल्याभोवती ठेवावीं.

फ्रेंच लोकांना दोन गोष्टी मोठ्या प्यार आहेत. एक स्वातंत्र्येच्छा व समता. व दुसरी म्हणजे मानमरातब. या दोन्ही गोष्टींत वाटतो तितका विरोध नाहीं. एकांतूनच दुसरी निर्माण झाली आहे. पण काटेकोर न्याय-पद्धतीनेच लोकांना त्या देणें साध्य होईल. कायद्याला सगळे लोक सारखेच. पदव्या मानमरातब जहागिरी जरी कोणाला दिल्या तरी ज्यांच्या लायकीबद्दल

दुमत नाहीं अशांनाच त्या दिल्या तर कोण कां तक्रार करील ? माझी 'लीजन् ऑफ ऑनर' संस्था अशीच आहे. पलटणींतल्या अगदीं साध्या शिपायाला देखील तो बहुमान मिळविण्याची महत्त्वाकांक्षा धरतां येते, म्हणूनच ही संस्था लोकप्रिय झाली. त्यांत खऱ्या गुणांचीच किंमत आहे. कारवाईला तेथें जागा नाहीं. आणि एकदा तेथे कारवाई शिरली व पैशाने हा बहुमान विकत घेतां येतो असें सिद्ध झालें, म्हणजे ही संस्था धुळीला मिळालीच !

वर्तमानपत्रांना जें एक जन्मसिद्ध स्वातंत्र्य आहे तें माझ्या मुलाला त्यांना द्यावे लागेल. सध्याच्या काळांत या स्वातंत्र्याची जरूरी आहे. अमुक एक तत्त्व डोळे मिटून पाळणें म्हणजेच राज्य करणें असें नव्हे; तर हातीं असलेल्या गोष्टींत निर्वाह करणें, अडचणीच्या प्रसंगीं सलोख्याने गम खाणें, व प्राप्त परिस्थितीचाहि उपयोग करून घेणें यांतच खरें राजकीय शहाणपण आहे. वर्तमानपत्रांची हाक देशांतल्या अगदीं कोनाकोपऱ्यांत ऐकूं जाते. नुसते कायदे लोकांना काय शिकवणार ? म्हणून चांगलीं तत्त्वें आणि हित-कारक मत प्रसृत करून लोकांना शिक्षण देण्याचे कामीं या वर्तमानपत्रांचा उपयोग करून घ्यावा, त्यांना मोकळें रान सोडणें म्हणजे मात्र स्वतः एखाद्या कड्याच्या कांठावर झोपण्यासारखें भयंकर आहे. लढाईनंतर शांतता प्रस्था-पित झाल्यावर माझ्या मनांत असें फार होतें कीं देशातल्या विद्वान् व कर्त-बगार संपादकांची एक संघटना करून माझे हेतु व राजकीय कल्पना यांचें शिक्षण अगदीं खेडोपाडीं प्रसृत करावें. समाज शहाणा होईल, बदलेल, मग आपण त्यांना सांगूं ही आशा व्यर्थ आहे. तो तीनशें वर्षांपूर्वीचा जुना काळ आतां गेला. जगाच्या जीवनकलहांत एक तर नेटाने पुढें आलें पाहिजे अगर नामशेष झालें पाहिजे; दुसरा मार्ग नाहीं.

माझ्या मुलाने आपलें मन नवनवोन्मेषशाली ठेवलें पाहिजे. नवी कल्पना चट्कन् ग्रहण करतां यावी, तिचा प्रसार करतां यावा, ज्या कार्या-

करितां मी झगडलों व जें मी यशस्वी केलें त्याचा त्याने अभिमान वाळगला पाहिजे. पूर्वी मोठेपणा कांहीं एका मिरासदारीवर चिकटलेला असे. तें सर्व घालवून जो व्यक्तिगत मोठेपणाचा गुण तोच जगांतहि मोठा ठरेल. व्यक्तीचा विकास होईल, समाजाचा विकास होईल असें केलें पाहिजे. या सुप्त समाज-शक्ति आपला उद्या भाग्योदय होईल म्हणून शतकानुशतकें वाट पाहात आहेत. ख्रिस्ती धर्म व संस्कृति यांचा जगभर फैलाव केला पाहिजे. याच कार्यांत मी माझे प्राण वेंचले म्हणून ज्यांनी मला विरोध केला ते एका अर्थाने मनुष्यजातीचेच शत्रु होत. लोकांना 'मुकीं बिचारीं कुणि हका' अशीं जनावरें समजून फ्रान्सवर जुलूम करावा अशी या विजयोन्मत्त राष्ट्रांची इच्छा आहे. काळाचा प्रवाह मूळ उगमाकडे त्यांना रेटीत न्यावयाचा आहे. पण जुलुमाची शीग संपून एकदा प्रतिक्रिया सुरू झाली म्हणजे ती कसलींच बंधनें जुमानणार नाहीं.

राजपद हें भयंकर समजून त्यावर आजच तिलांजली घेऊन उठण्याचें कोणाला कारण नाहीं. मध्ययुगीन काळांत राजा हा सुलतान असे व सर्वत्र अमीरउमराव यांचीच बडेजावी असे. पण राज्यक्रांतीनंतर प्रत्येक मनुष्याला हक्क व स्वातंत्र्य आहे व प्रत्येक नागरिकाच्या हक्काचा राजा हा प्रतिनिधि व पालनकर्ता आहे ही कल्पना आम्ही पुढें आणली. ही कल्पना नीटशी रुज-ण्याला दुर्दैवाने अवसर दिला नाहीं. माझ्या मरणानंतरहि माझ्या वारसांबद्दल शत्रूंचा द्वेष असेल तर, युरोप खंड किती काळ रक्तांत आकंठ बुडून रहाणार आहे याची कल्पनाहि करवत नाहीं.

जें जें मी लिहिलें अगर तोंडाने सांगितलें तें सर्व प्रसिद्ध करण्यांत यावें. त्या गोष्टी नीट मनन करण्यास मुलास सांगावें. ज्यांनी माझी सेवा-चाकरी बजावली त्यांचा त्याने स्मरणपूर्वक प्रतिपाळ करावा. अशा निष्ठावंत सेवकांची संख्याहि थोडी थोडकी नाहीं. माझे शूर शिपाई आज कदाचित्

भाकरीच्या तुकड्यालाहि महाग झाले असतील. या फ्रेंच लोकांच्या अंगीं केवढें शौर्य, केवढी समजूत आहे ! यापुढे त्यांचे अंगीं असलेले हे संपत्तिगुण कदाचित् जगास दिसणारहि नाहीत. म्हणून हल्लीं जें समाजांत विचाराचें स्थित्यंतर चालू आहे त्याला मदत करावी. त्याचे पाय पाठीमागे खेचूं नयेत.


प्रत्येक राष्ट्राला आपले राष्ट्रीयत्व कायम ठेवण्याची तीव्र इच्छा असते. या इच्छेला मान दिला पाहिजे. मी अनेक राजे निर्माण केले पण ती गोष्ट यापुढे विसरावी. वॉटर्लूच्या आधी माझ्या भावांच्या कानींकपाळीं ओरडून मी त्यांच्याकडून कबुली घेतली कीं त्यांनी आपलें राजपद विसरून आपणाला यापुढे फ्रेंच राजघराण्यांतील राजकुमार असें ह्मणत जावें. माझ्या मुलानेहि असेंच करावें.

यापुढें जागतिक खळबळीचा बिंदु उत्तर युरोपांत रहाणार नाहीं. तो भूमध्यसमुद्रांत येईल. आणि रानटी व खिस्तेतर समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांचे लचके तोडून युरोपियन राष्ट्रें आपलें समाधान मानतील! व्यापाराच्या वाहतुकीचे रस्तेहि वाढत आहेत. यामुळें कोणा एकाच राष्ट्राच्या यापुढें ते सर्व ताब्यांत राहतील असें नाहीं. म्हणून माझ्या मुलाने स्वतःच्या देशाच्या अंतर्गत कारभाराकडे अधिक लक्ष द्यावें. लोकांच्या चालीरीती व कायदे यांत अंतर नसावें. न्यायकोर्टात शिक्षा किती जणांना झाल्या त्याचा रिपोर्ट जवळ ठेवावा. गुन्हे अधिक असले तर त्याचा अर्थ समाजांत दारिद्र्य तर आहेच पण राज्यव्यवस्था वाईट आहे. गुन्ह्यांची संख्या कमी होणें हाच राज्य नीटपणें चालल्याचा पुरावा होय.

कांहीं संकुचित दृष्टीचे तत्त्ववेत्ते धर्माची किंमत कमी लेखून त्यांची हेटाळणी करितात. पण असें करणें चूक आहे. धर्म या कल्पनेचा पगडा मनुष्यजातीच्या मनावर इतका जबरदस्त आहे कीं तो कधींहि दूर होणें शक्य नाहीं. धर्म आपणांस पाहात असतो या कल्पनेने मनुष्य जातीचें आजवर

कितीतरी हित झालेलें आहे. पोपचें आधिराज्य लोकांचे 'मनावर' असल्या कारणाने नुसत्या पोपला मान वाकविण्यानें कोट्यवधी माणसांचें मन आपलेंसें करतां येतें. हल्लीचा वयोवृद्ध पोप विद्वान्, सुसंस्कृत असून तो केव्हांहि माझ्या मुलाला अनुकूल असेल. आमच्या कौन्सिलांत निष्कारण धर्मविषयक वितंडवाद होत. कार्डिनल फेच याने माझें मत समजून न घेतल्यामुळें तो निराळा पक्ष घेत असे. पण माझें धर्मविषयक धोरण जाणणारी माणसें आजहि कौन्सिलांत सांपडतील. माझी आठवण म्हणून ' हें चिरंतन स्मारक जर त्यांना करावयाचें असेल तर राज्यकारभाराविषयीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें जे विचार व कल्पना मी प्रदर्शित केल्या त्यांचा त्यांनी संग्रह करावा. मी कोणकोणती कामें केलीं, फ्रान्स व इटाली या देशामध्यें कोणकोणत्या भव्य इमारती बांधल्या त्यांची यादी करावी. कौन्सिल ऑफ स्टेटमधील भाषणांत निवळ प्रासंगिक काय व तत्त्वदर्शक व चिरंतन महत्त्वाचें कोणतें याचाहि भावी संग्रहकाराने विवेक करणें जरूर आहे. माझ्या मुलाने इतिहासाचें सतत वाचन ठेवावें.

इतिहास नीट मनन करणें यासारखा दुसरा गुरु नाहीं. ज्याला आयुष्याचें तत्त्वज्ञान म्हणतात तें इतिहासाच्या वाचनानेच निर्माण होतें. युद्धशास्त्र शिकावयाचें तरी मोठमोठ्या जगज्जेत्यांनी जिंकलेल्या लढायांचा अभ्यास करावा. पण हें लक्षांत ठेवावें कीं, सत्य आणि सद्गुण यांवर अंतःकरणांतूनच खरी भक्ति असल्याशिवाय केवळ पुस्तकी वाचन अगर कोणीहि दिलेला सल्ला, उपदेश, फुकट आहे. तेथें पाहिजे जातीचें. कांहीं तरी स्वयंभू अंतर्गत असावेंच लागतें. तें असलें तर इतर बाह्य गोष्टींचा उपयोग. असो. भाग्यदेवतेने जें भाग्य त्याच्या नशिबीं लिहिलें असेल तें उपभोगण्याला माझा मुलगा लायक निपजेल इतकीच मी आशा करतों."



# परिशिष्ट
# [३]
# बास्तीलचा तुरुंग

या पुस्तकाच्या आवरणावर बास्तीलवरील हल्ल्याचें दृश्य दाखविलें आहे. क्रांतिकाळीं या किल्ल्यांत राजकीय कैद्यांचा तुरुंग होता आणि आंत शेकडो कैदी कुजत पडल्याचा प्रवाद रूढ होता. पण ज्यावेळीं क्षुब्ध जनतेनें हा किल्ला फोडून उध्वस्त केला त्यावेळीं त्यांत अवघे सातच कैदी निघाले असें म्हणतात. आणि ते देखील राजकीय महत्त्वाचे नसून बदमाश गुन्हेगार होते.

हा किल्ला मूळ इंग्लंडच्या चढाईपासून पारीसचें रक्षण करण्याकरतां बांधण्यांत आला. त्याची सुरवात चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धांत झाली. भरभक्कम भिंतीनें एकमेकास जोडलेले आठ बुरुज किल्ल्याला होते. आणि पंचवीस फूट खोल व एकशेवीस फूट रुंद अशा खंदकानें तो वेष्टिलेला होता. ज्या वेळीं दारुगोळा फारसा प्रचारांत नव्हता त्यावेळीं ह्या किल्ल्याला अतिशय महत्त्व होतें.

कालांतरानें राजकीय कैदी ठेवण्याकडे त्याचा उपयोग होऊं लागला व ती सुरवात सुप्रसिद्ध कार्डिनल रिचल्यूनें केली. तरी देखील किल्ल्यांत करमणुकीचे दरबारी प्रकार हरहमेश होत व सरकारी खजिनाहि त्यांत सांठविलेला असे. पुढें पुढें त्यांत इतरहि कैदी ठेवण्यांत येऊं लागले आणि १७ व्या शतकांत त्यांत छळाचीं नवीन नवीन साधनेंहि उपयोगांत आणलीं जाऊं लागलीं. १६ व्या लुईनें मात्र छळाचे सर्व प्रकार बंद केले. पण हा कनवाळू राजा शेवटीं लोकक्षोभाला बळी पडला. दैवदुर्विलास म्हणतात तो हाच !

कॉंडे, फाउगेट, व्हॉल्टेअर, कॅग्लिऑस्ट्रो वगैरे निरनिराळ्या दर्जाचे आणि निरनिराळ्या प्रकाराचे लोक या किल्ल्यांत ठेवले गेले होते. त्यांच्यासंबंधीं व इतरहि अनेक भुलभुलाईच्या दंतकथा व सत्यकथा प्रचलित आहेत. त्या The Grim Bastille या मनोरंजक ग्रंथांत वाचावयास सांपडतील.

# राणी मेरिअँटॉइनेट

व्हिएन्ना येथें ता. २-११-१७५५ सालीं जर्मनीचा सम्राट् फ्रॅन्सिस व ऑस्ट्रियाची मराया थेरिसा या दांपत्याच्या पोटीं या दुर्दैवी राणीचा जन्म झाला. फ्रान्सचा राजा १६ वा लुई याच्याशीं १७७० च्या मे महिन्यांत तिचा विवाह झाला. क्रांतिकाळीं राजपलायनाच्या बुडाशीं तिचाच हात प्रामुख्यानें असल्यानें क्रांतिकारकांचा तिच्यावर रोष झाला. आणि त्या रोषाचें पर्यवसान म्हणजे ता. १६ आक्टोबर १७९३ रोजीं क्रांतिकारकांनीं तिला फांसावर लटकाविलें.

---

# संदर्भ ग्रंथसूचि


1 Christianity and the French Revolution—A. Aulard ... 1927

2 France—Ed. John Buchan

3 Lectures on the French Revolution
—John Emarich Edward, Dalbarg-Acton

4 The French People—Arthur Hassal ... ... 1902

5 The French Revolution—Louis Madelein ... ... 1933

6 The French Revolution: —Thomas Carlyle Vol. I ... 1888

7 The French Revolution:
—Thomas Carlyle Vol. I, II and III ... 1837

8 The French Revolution: From 1789-1849—
T. W. Redhead Vol. II and III ... 1848

9 Historical View of the French Revolution -J. Michelet... 1888

10 History of France—E. E. Crowe Vol. II

11 History of France—The Rev. James White... ... 1859

12 A History of France—( Pub. John Murray ) ... 1862

13 History of the French Revolution—F. A. Mignet ... 1889

14 The History of the French Revolution—M. A. Thiers... 1883

15 The Huguenots in France—Samuel Smiles ... ... 1893

16 Mediæval France—Gustava Masson ( Fifth Edition )

17 On the State of Society in France before the revolution of 1789 and on the causes which led to that events
—Alexis de Tocqueville ... 1873

18 The Grim Bastille—Friedrich M. Kircheisen

१९ फ्रान्सचा जुना इतिहास—कृष्णा अर्जुन केळुसकर १८९३

# व्यक्ती आणि विषयांची सूचि

या सूचिपत्रांत मुख्यतः महत्वाच्या व्यक्तींचीच नांवें दिलीं आहेत. तरीपण ह्या नांवांपुढें दिलेल्या पानांत त्या त्या व्यक्तींचीच केवळ माहिती आहे असें नव्हे तर त्या व्यक्तींचा ज्या महत्वाच्या घडामोडींत संबंध आला यासंबंधीं माहितीही तेथें सांपडेल.


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| ॲबे साई | ५५, ६०, ८५, ८६, ८७ |
| कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली | ९९, १२६ |
| टॅलेराँ | ५६, ८६, ९८ |
| धर्म | १९४, २०७ |
| डँटन | ४७, ८५, १२१, १२२, १४२, १५०, १६१ |
| नॅशनल असेंब्ली | ५६, ५७, ७०, ८१ |
| नॅशनल फेडरेशन | १०४ |
| नेपोलियन बोनापार्ट | १५९, १९१, १९४, १९८, २००, २०१, २०२, २०४ |
| नेकर | २४, २६, ४९, ५३, ६३, ७३ |
| बास्तिलचा तुरुंग | ३४, ६७, ६९, १०६ |
| बारनेव्ह | ८५, ८६, ९६ |
| मिराबो | ४०, ५४, ७५, ८३, ८५, ८६ |
| राणी मेरी ॲंटॉइनेट | ९३, ९५, ९७, १०५, ११०, १११, ११८, १४३, १४५, १६९ |
| मोनिअर | ७९, ८६, ८७, ९५, ९६ |
| रॉबेस्पिअर | ४७, ८५, १०७, १२१, १४१, १५०, १७२, १७४, १७९, १८०, १८२, १८३, १८४, २२० |

७०६५०


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| रुसो | २९, ४७, ७५, २०९ |
| लुई १६ वा | २३, ४९, ९३, ९४, ९५, ९७, ९८, ११५, ११७, ११८, १२९, १३८, १४५; |
| लाफायत | ७०, ९४, ९५, ९८, १०५, १०७, ११७, ११९, १२२, १४० |
| व्हाल्टेअर | २९, ४७, २०९ |
| स्टेट्स जनरल | ३८, ५० |


---

# महत्त्वाच्या तारखा

| तारीख | | | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| २२ | फेब्रुवारी | १७८७ | नोटेबल्सची सभा | २४ |
| १ | जानेवारी | १७८९ | लुईचा जाहीरनामा | २७ |
| १ | मे | १७८९ | कलहास तोंड | ५१ |
| १७ | जून | १७८९ | नॅशनल असेंब्लीचा जन्म | ५६ |
| १९ | जून | १७८९ | धर्माधिकारी लोकसभेस मिळाले | ५७ |
| २७ | जून | १७८९ | वरिष्ठ उमराव कनिष्ठ सभेस मिळाले | ६० |
| १ | जुलै | १७८९ | राजाची लोकसभेस मान्यता | ६३ |
| १४ | जुलै | १७८९ | नॅशनल असेंब्लीची बैठक | ७० |
| १६ | जुलै | १७९० | ,, फेडरेशन | १०४ |
| २१ | जून | | राजाचें पलायन | ११४ |
| २१ | जानेवारी | १७९३ | राजाला फाशी | १५७ |
| ३० | मे | १७९३ | पॅरिस जनतेचें बंड | १६३ |
| १ | ऑगस्ट | १७९३ | राणीला फाशी | १६९ |
| ३ | एप्रिल | १७९४ | डँटनला फाशी | १७५ |
| २८ | जुलै | १७९४ | रॉबेस्पिअर व मेयर यांस फाशी | १८४ |

——: ० :——

## य. गो. जोशी यांची प्रकाशनें

पुनर्भेट भाग २ रा ( कथासंग्रह ) किं. १ रुपया.
पुनर्भेट भाग ३ रा ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
जीवन-पथ ( कथासंग्रह ) किं १ रुपया.
आवडत्या गोष्टी ( ६१ लेखकांचा कथासंग्रह ) किं. ३ रु.
चित्तरंजन किं. १। रुपया.
वायफळांचा मळा किं. २॥
वाहते वारे ( कथासंग्रह ) किं. १२ आणे.
गारांचा वर्षाव ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
सोनेरी नागीण ( कादंबरी ) किं. १ रुपया.
शि. म. परांजपे चरित्र व आठवणी किं. १ रुपया.
खेड्यांतील स्वभावचित्रें ( ले. मो. गो. सोमण, बी. ए. ) किं. १। रुपया.
बोलका सिनेमा ( ले. य. गो. जोशी ) किं. ८ आ.
होमकुंड ( ले. य. गो. जोशी ) किं. २ रु.

---

## प्रो. वा. म. जोशी यांची पुस्तकें

नीतिशास्त्र-प्रवेश
रागिणी
नलिनी
इन्दु काळे व सरला भोळे

| | |
|---|---|
| मनोहर महादेव केळकर,<br>१९६।३३ सदाशिव,<br>पुणें २. | यशवंत गोपाळ जोशी,<br>७२३ सदाशिव,<br>पुणें २. |

4606

REFBK-0005607